म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. ११९४
REFBK-0009761

# ज्ञानगंगा

१११५
मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्वाक्त.
अनुक्रम २२८०१ वि. निबंध
क्रमांक ११११ ११११ नों. दि. ११।९५८
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. १८६१.
REFBK-0009761

सुरस ग्रंथमाला, सोलापूर.

प्र थ मा वृ त्ति ... ... १९५८
सुरस ग्रंथमाला ... ... पुष्प १९६

: रचना व संकलन :

**के. मा. नाईक**
B. Sc., B. A.

: संपादन :

**प्रिं. सुमेर जी**
M. A., B. T.

चित्रकार

**श्री. चव्हाण**

सर्व हक्क प्रकाशकाधीन

प्रकाशक : **न. गौ. व्होरा**, सुरस ग्रंथमाला, सोलापूर
मुद्रक : **पु. म. गोखले**, रमेश प्रेस, ७०२ सदाशिव, पुणे

# निवेदन

प्रत्यहीं साहित्यसंसारांत नव्या नव्या विचारांची भर पडत असतें. साहित्याच्या हिऱ्याला क्षणोक्षणीं पैलू पडून त्याची शोभा वाढत असतें.

हृदयाला पटणारीं, भावनांना हेलावणारीं, अनेकविध शंकांचें समाधान करणारीं, जीवनाच्या विविध अंगावर प्रकाश पाडणारीं हजारों वाक्सुमनें उधळलीं जातात.

त्या सुमनांचा संचय करणें अवघड काम असतें. इंग्रजी सारख्या जगन्मान्य व प्रभावी भाषेंत अशा वाक्संचयाची पुस्तकें फारच कौशल्यानें सम्पादित केलेलीं नजरेला येतात.

मराठींत अनेक गोष्टींची वाण आहे. त्याची यादी वाचण्यापेक्षां तशा प्रकारची उणीव अंशतः दूर करण्याचें कार्य मालेनें अंगिकारलें आहे. जागतिक वाक्सुमनांचा हा पहिला हार परिश्रमानें संकलित व सम्पादित करून वाचकांना सादर करतांना आम्हास आनंद होत आहे.

जवळ जवळ जीवनव्यापी अशा १३९ विषयांची निवड करून त्या सदराखालीं ही वाक्सुमनें ग्रंथित केलीं आहेत. हें करतांना ज्या ज्या थोर साहित्यिकांचीं वचनें आम्हीं उद्धृत केलीं त्या सर्व ज्येष्ठ–श्रेष्ठ साहित्यिकांचें आम्हीं चिरऋणी आहोंत.

—प्रकाशक

क्रमांक ... नों: दि:

आम्हां घरीं धन शब्दांचीच रत्नें ।
शब्दांचींच शस्त्रें यत्न करूं ।। १ ।।

शब्दचि आमुच्या जीवाचें जीवन ।
शब्द वाटूं धन जनलोकां ।। २ ।।

तुका म्हणे पाहा शब्दचि हा देव ।
शब्देंचि गौरव पूजा करूं ।। ३ ।।

ज्ञानगंगा

## विषयानुक्रम


| विषय | पान | विषय | पान |
|---|---|---|---|
| १ अनुभव | १ | २९ क्रांति | ६३ |
| २ अपयश | ४ | ३० मति | ६५ |
| ३ अभिमान | ७ | ३१ गणित | ६६ |
| ४ अभ्यास | ९ | ३२ गरज | ६७ |
| ५ अर्थ | १० | ३३ गनिमी कावा | ७० |
| ६ अलंकार | १३ | ३४ ग्रंथ | ७१ |
| ७ अश्रू | १५ | ३५ गुरु-शिष्य | ७४ |
| ८ आई | १६ | ३६ घर | ७६ |
| ९ आचार | २१ | ३७ चांगलें-वाईट | ७८ |
| १० आशा-निराशा | २२ | ३८ चिता-चिन्ता | ९१ |
| ११ आत्मा | २५ | ३९ जीवन | ९३ |
| १२ आस्तिक-नास्तिक | २६ | ४० तारुण्य | १०६ |
| १३ आळस | २८ | ४१ त्याग | ११० |
| १४ आत्मविश्वास | २९ | ४२ ढोंगी | ११३ |
| १५ उच्चार | ३२ | ४३ दया | ११४ |
| १६ उत्साह | ३४ | ४४ देह | ११६ |
| १७ एकाग्रता | ३५ | ४५ देव-दैव | ११६ |
| १८ कर्म | ३६ | ४६ देशभक्ति | ११९ |
| १९ कला-कलावंत | ४० | ४७ दानत | १२० |
| २० काव्य-कवि | ४६ | ४८ दानधर्म | १२१ |
| २१ कल्पना | ४९ | ४९ दान | १२२ |
| २२ कर्तृत्व | ४९ | ५० दारिद्र्य | १२२ |
| २३ कायदा | ५० | ५१ दृष्टि | १२४ |
| २४ काळ | ५१ | ५२ धर्म | १२५ |
| २५ कृति | ५७ | ५३ ध्येय-ध्येयसिद्धी | १२८ |
| २६ काम | ५८ | ५४ नवें-जुनें | १२८ |
| २७ कृत्रिमता | ६० | ५५ नशीब | १२९ |
| २८ कीर्ति | ६१ | ५६ निद्रा | १३० |

| विषय | पान | विषय |
|---|---|---|
| ५७ निसर्ग | १३१ | ८६ मित्र |
| ५८ नीति | १३२ | ८७ मैत्री |
| ५९ टीका | १३३ | ८८ मूर्ख-शहाणा |
| ६० परका | १३५ | ८९ मेन्दू |
| ६१ परीक्षा | १३६ | ९० मोह |
| ६२ परोपकार | १३७ | ९१ मौन |
| ६३ प्रतिक्षा | १३८ | ९२ यत्न |
| ६४ पाप-पुण्य | १३९ | ९३ यश |
| ६५ परिस्थिति | १४० | ९४ रसनेंद्रिय |
| ६६ पालक आणि पाल्य | १४१ | ९५ राज्य-राजकारण |
| ६७ प्रार्थना | १४२ | ९६ राष्ट्र व राष्ट्रीयत्व |
| ६८ पुरुष | १४६ | ९७ राग |
| ६९ प्रतिभा-स्फूर्ति | १४९ | ९८ लघुत्व |
| ७० प्रीति | १५० | ९९ लवाडी |
| ७१ बदल-गति | १६१ | १०० लोकशाही |
| ७२ बल-सामर्थ्य-शक्ति | १६२ | १०१ वाचन |
| ७३ बन्धन | १६३ | १०२ वासना |
| ७४ बालक | १६३ | १०३ विचार |
| ७५ बालपण | १६४ | १०४ विनाश |
| ७६ भावना | १६५ | १०५ विनोद |
| ७७ भीति | १६६ | १०६ विवाह |
| ७८ मतें व निवडणुका | १७० | १०७ विद्यार्थी |
| ७९ मन | १७० | १०८ विषय-भोग |
| ८० मनुष्य प्राणी | १७२ | १०९ व्यायाम |
| ८१ मनीषा | १७३ | ११० वृक्षारोपण |
| ८२ मरण | १७३ | १११ शत्रू |
| ८३ महत्त्व | १७४ | ११२ शास्त्र |
| ८४ मानवता-माणुसकी | १७५ | ११३ शिष्टाचार |
| ८५ मायबोली | १८० | ११४ शिक्षण |

| विषय | पान |
| --- | --- |
| ११५ शील | २२० |
| ११६ श्रद्धा | २२२ |
| ११७ श्रीमंती | २२४ |
| ११८ सत्य | २२५ |
| ११९ संधी | २२९ |
| १२० समाज | २३० |
| १२१ समता-विषमता | २३५ |
| १२२ सद्गुण-दुर्गुण | २३६ |
| १२३ साधुपुरुष | २३८ |
| १२४ साहित्य | २३८ |
| १२५ सुख दुःख | २४० |
| १२६ सौन्दर्य | २४५ |
| १२७ स्त्री | २४९ |
| १२८ संकट | २५९ |
| १२९ संकल्प-व्रतें | २६१ |
| १३० संगत | २६३ |
| १३१ संपत्ति | २६४ |
| १३२ स्वप्न | २६६ |
| १३३ स्वातंत्र्य | २६७ |
| १३४ स्वार्थ-परमार्थ | २६८ |
| १३५ हक्क | २७० |
| १३६ हात | २७१ |
| १३७ हिंमत | २७२ |
| १३८ हिंसा-अहिंसा | २७३ |
| १३९ ज्ञान | २७५ |

# ज्ञान गंगा

अनुक्रमांक २२८०९ दि. १०/८/६५
क्रमांक ११११८ नों. दि. २५/१/५८
९०६९

## १ : अनुभव

ज्ञानदेव

अनुभव राहाणीविण कायसें श्रवण ।
गर्भ-अन्ध नेणें रत्नकिरण ।।

ज्ञानेश्वर

भावेंविण देव न कळे निःसंदेह ।
गुरुविण अनुभव कैसा कळे ।।

पाळन्दे ग. द.

संसाराची पुसटते वाट । न्यायाचा ना स्पष्ट अनुभव ।।
अनुभवाचें तें रितें सिंहासन । घेई अनुमान साहाजिक ।।

राहुळ सांकृत्यायन

जोंपर्यंन्त कोणतीहि गोष्ट तुमच्या अनुभवाच्या व बुद्धीच्या कसोटीला अुतरून खरी ठरत नाहीं तोंपर्यन्त तरी, ती कोणीहि सांगितलेली असली तरी, खरी मानू नका.

साने गुरुजी

अनुभव ही अेक फणी आहे. मात्र माणसाला टक्कल पडलें कीं निसर्ग ती त्याला वहाल करीत असतो.

पै. महंमद

जो अनुभवी नाहीं, तो वैद्यच नव्हे.

– वेदान्तासारखा अनुभव नाहीं.

– अनुभवानेंच मनुष्य शहाणा होतो. अनुभवान्ती आलेलें शहाणपण हें हजारों पुस्तकें वाचून आलेल्या शहाणपणापेक्षां कितीतरी पटीनें श्रेष्ठ आहे

– अनुभव हा अुत्तम शिक्षक आहे, पण तो मोबदला मात्र जबर घेतो.

– अनुभव कसाहि असला तरी अमोलच आणि वाङमय म्हणजे अेक तऱ्हेचा मनोरंजक व सवंग अनुभव होय.

– प्राप्तिसाठीं घेतलेला कुठलाच अनुभव कधींच व्यर्थ जात नाहीं मग तो सुखकारक असो वा दुःखकारक असो.

– तुम्ही अनुभवानें शिकलेल्या गोष्टींपैकीं बहुतेक गोष्टी अशा असतात कीं, तुम्ही त्या न शिकतां तरी चाललें असतें.

* विनोबा

अनुभविकाचा अनुभव–तो प्रामाणिक असेल तर, प्रमाण मानला पाहिजे, पण म्हणून अनुभविकाचा निष्कर्ष प्रमाण मानला पाहिजे, असें होत नाहीं.

* बुद्ध

स्वानुभूति हेंच माझें मत.

* डॉ. राजेन्द्र प्रसाद

छापलेलीं पुस्तकें वाचण्यानें खरें शिक्षण मिळत नाहीं. खरें शिक्षण अनुभवाचें पुस्तक वाचल्यानेंच मिळतें.

* विनोबा

अनुभव तर्कातीत आहे. श्रद्धा अनुभवाच्या आधारानें राहाणारी पण त्याच्याहि पलीकडची वस्तु आहे,

* आचार्य अत्रे

जगाच्या बाजारांत ज्याचा त्यानें अनुभव विकत घ्यायचा असतो.

– अेकूण काय, माणसानें चुकांना अनुभव हें नांव दिलें आहे.

– चुकांची भीति बाळगूं नका, कारण कोणीच सम्पूर्ण नाहीं. परन्तु त्याच त्या चुका पुन्हा पुन्हा करूं नका

* वोऱ्ही

संभाषणावरूनच माणसाची खरी किमत होते. चांगल्या व सुसंस्कृत स्वभावाचीं माणसें सहाजिकपणें चांगलेंच बोलतात.

स्वतःच्या बुद्धीनें चालून चूक करण्यापेक्षां दुसऱ्यानें दाखविलेल्या मार्गानें चालणें अधिक चांगलें.

स्वतःच्या दोषांची स्वतः इतकीं कुणालाच जाणीव नसते; परतु प्रत्येकजण स्वतःला मोठा समजत असतो.

तुम्ही किती वृद्ध झाला आहांत, यापेक्षां कसें वृद्ध झाला आहांत, हें जाणणें महत्त्वाचें आहे.

जीवनाचा साक्षात्कार स्वप्नाळू कल्पनेनें कधींच होत नाहीं. जीवनाचें साफल्य नुसत्या गोड आभासांत नाहीं. तें कटु असलेल्या अनुभवांत आहे.

शिक्षक म्हणून मी मुलांना कांहीं शिकवलें नाहीं. मुलांनीच मला पुष्कळसें शिकविलें.

★ ★

## २ : अपशय

* यदुनाथ थत्ते

अपयश म्हणजे कांहीं आपला दोष नव्हे. योग्य मार्गावर आणणारे ते मार्गस्थ दगड आहेत.

अनेक अपयशांतूनच यशाची निर्मिती होते.

* साने गुरुजी

ज्या ज्या वेळेस प्रयोग फसणार फसणार असें वाटतें; त्या त्या वेळेस तो सफळ होणार असें समजावें. अत्यंत विरोधाच्या पोटांतूनच विकास बाहेर पडतो.

* राहुल सांकृत्यायन

अपयश हेंच दर्शवितें कीं, या कामासाठीं आणखीन पिढ्या खर्ची घालावयाची आवश्यकता आहे. आणखी साधनेची जरूरी आहे.

* वेंडेल फिलिप्स

पराभव म्हणजे काय ? केवळ शिक्षण. हातून कांहींतरी अधिक चांगलें घडण्याची पहिली पायरी !

* प्रवासी राम

पराभवाच्या अरण्यांतून मार्ग काढल्याशिवाय विजयाची पताका नाहीं मिळायची. अपयशाचें कठीण खडक फोडा. खालीं मधुर जळ मिळेल.

* विन्दा करंदीकर

रितेपणाची सरे न जाणीव......
हुंकाराचें पुन्हा उठे भय !
ठरतो ठरतो तोच पराजय
ज्यांत मानिला मी माझा जय ।

* विचार पोथी

नेहमीं अपयश येणें यांत आश्चर्य नाहीं. यश म्हणजे समाप्ति. ती नेहमीं कशी येईल ? ती अेकदांच यावयाची.

* बायरन्

जे मोठ्या कारणासाठीं मेले ते कधींच अयशस्वी होत नाहींत. आपण अुठण्यासाठींच पडतो आणि झोपतों तेंहि जागृत होण्यासाठींच.

* बॉवी

अपयशाचीं कारणें आहेत, पण कमी आत्मविश्वास म्हणजेंच खरें अपयश.

* मिलवॉकी

यशामुळें मतिभ्रष्टता आली कीं, अपयशाची गांठ पडलीच !

* स्वामी विवेकानंद

आज्ञाधारकपणा, हवें तें काम करण्याची तयारी व आपल्या कार्याबद्दल आत्यन्तिक प्रेम, अेवढे तीन गुण तुमच्याजवळ असतील तर तुमचे पाय कोणासहि मागें ओढतां येणार नाहींत.

प्रत्येक मनुष्याला अेकांतवासाचे कांहीं क्षण दिवसांतून मिळत असतात. या क्षणाचा तो कसा अुपयोग करतो, यावर त्या दिवसाचें यशापयश अवलंबून आहे.

* खाण्डेकर

कांहीं पराजय, हे विजयाइतकेंच प्रभावी असतात.

हरलों असें वाटलें कीं, हार ठेवलीच ? हरलों नाहीं असें वाटेपर्यन्त तुम्हीं खेळ जिंकितच आहांत !

काम फत्ते व्हावयाचे तें हातांनीं, बातांनीं नव्हे !

* पं. जवाहरलाल नेहरू

अितिहास घडविणारीं माणसें थोर मनाचीं, अुदार अन्तःकरणाचीं व खम्बीर मनगटाचीं असावीं लागतात. त्यांच्या पाठिशीं घर्म–धारा व अश्रुधारा गाळणारी यत्नशील जनता अुभी असेल तरच त्यांना यश येतें.

* पु. ग. सहस्त्रबुद्धे

आपल्या अपयशाचीं अधोगामित्वाची, हास्याची जबाबदारी जे दुसऱ्यावर टाकतात त्याला आपण जबाबदार नाहीं, अशीं सुखद कल्पना स्वीकारून जें मनाचें समाधान करूं पहातात, त्यांचा अुत्कर्ष कधींच होत नाहीं. आपला अपकर्ष दुसऱ्यामुळें झाला, आपल्याकडे त्याचा दोष नाहीं, हे समाधान म्हणजे मृत्यूला आमंत्रणच! कारण अपकर्षाचा दोष जर दुसऱ्याच्या माथीं, तर अुत्कर्षहि त्याच्याच कृपेंवर अवलंबून राहाणार हें अुघड आहे. आपल्या अपयशाचा, अपश्रेयाचा अल्पसा तरी वाटा मनुष्यानें स्वतःच्या माथीं घेतला पाहिजे तरच त्या भवितव्याविषयीं आशा धरतां येअील.

* टी. टी. मंगर

दुर्दैव किंवा अपयश हें दहापैकीं नअू वेळां. कर्तव्यानन्तर सौख्य याच्याऐवजीं कर्तव्यापूर्वी सौख्य असें मानण्याचा परिपाक होय.

* शेक्सपिअर

सचिंत होअून सारेंजग जिंकलें, तरी तें गमावल्यासारखेंच आहे.

* स्कोपेन हो

मित्र आणि ओळखी यामुळें हमखास दैव हातीं येतें.

* बीचर

जर तुम्ही आळशी असाल, तर विनाशाच्या मार्गावर आहांत आणि त्या मार्गावर थांबण्याच्या जागा फारच कमी आहेत.

* बेकन

तत्त्वज्ञानाचा अभ्यास वरवर केला, तर संशय अुत्पन्न होतात. पण खोल अभ्यास करतांच संशय नाहींसे होतात.

* हेन्री फोर्ड

यशाचें खरें गमक कोणतें असेल, तर हें कीं दुसऱ्याचा दृष्टीकोन समजून घेण्याची शक्ति असणें व अेखाद्या गोष्टीकडे त्याच्या व स्वतःच्या दृष्टीकोनांतून पाहाणें.

विरोध दर्शवून व भांडून तुम्ही विजय मिळवाल, तर तो व्यर्थ आहे. कारण त्यामुळें प्रतिस्पर्ध्याची शुभेच्छा तुम्हांला कधींच मिळत नाहीं.

★ ★

## ३ : अभिमान

* साने गुरुजी

अभिमानानें अलग रहाल तर, मराल.

* माडखोलकर

मनुष्य जें बंधन स्वतःवर आपल्या बुद्धीनें लादून घेतों, तें पाळण्यांत त्याला अेक प्रकारचा आनन्द असतो, अभिमान वाटतों.

गडकरी

असेल त्याचा गर्व धरावा,
अल्प–अधिक हा भेद नसावा,
स्थिरास्थिराचा विचार जावा,
सोडुनि जातां । धन, पुन्हां धरावं लघुता.

* वामन पण्डित

वृक्ष फार लवति फळभारें,
लोम्बती जलद घेऊनि नीरे,
थोर गर्व न धरी विभवाचा,
हा स्वभाव अुपकार परांचा,

* काव्यविहारी

पूर्वेचा रवि पश्चिमेस झुकला, पूर्वेस जाओी पुन्हां,
भाग्याचा मग व्यर्थ गर्व अितुका कां पश्चिमा वाहतें ?

* पै. महंमद

गर्विष्ठांना स्वर्गात प्रवेश मिळणार नाहीं आणि वाक्ताडन करणारांनाहि नाहीं.

* तुकाराम

लाज वाटे मज, मानिता हे लोक । हें तो नाहीं अेक, माझें अंगीं ।। १ ।। मोजुनि झिजलों मापाचिया परी । जाळावी हे थोरी लाभाविण । पूज्य झालों, अंगा आला अभिमान । पुढील कारण खोळंबलें ।

* विचार पोथी

सत्तेचा अभिमान, सम्पत्तीचा अभिमान, बळाचा अभिमान, रूपाचा अभिमान, कुळाचा अभिमान, विद्वत्तेचा अभिमान, अनुभवाचा अभिमान, कर्तृत्वाचा अभिमान, चारित्र्याचा अभिमान असे अभिमानाचे नअ् प्रकार आहेत; पण 'मला अभिमान नाहीं' असें भासणें ह्या सारखा भयानक अभिमान नाहीं.

* ज्ञानेश्वर

अहंभाव करी सम । तेणें पावसी विश्राम रे ।

★ ★

## ४ : अभ्यास

* सन्त तुकाराम

असाध्य तें साध्य करितां सायास ।
कारण अभ्यास तुका म्हणे ।

अखण्ड एकान्त सेवावा । अभ्यासचि करीत जावा ।
काळ सार्थकचि करावा । जनांसहित ।

रूप लावण्य अभ्यासितां नये । सहज गुणास न चळें उपायें ।
कांहींतरी धरावी सोये । अगांतुक गुणाची ।

* विचार पोथी

अभ्यास आणि वैराग्य हीं ऐकाच वस्तूचीं विधायक आणि निषेधक अंगें आहेत.

सर्व साहित्याच्या अभ्यासानें किंवा सर्व विश्वाच्या विज्ञानानें जें समाधान लाभणार नाहीं तें आत्मसंशोधनानें लाभतें.

अभ्यासांत लाम्बी, रुन्दी आणि खोली तिहींचीं अपेक्षा आहे.

* भ. महावीर

मान, मान्यता, क्रोध, अपराध, रोग व आळस या पांच कारणामुळें मनुष्य खऱ्या अर्थानें शिकू शकतो.

* फ्रॉन्सिस बेकन

अभ्यासामुळें आनन्द वाढतो. भूषण प्राप्त होतें व कार्यक्षमता वाढते.

★

## ५ : अर्थ

* ना. ह. आपटे

पशूंना द्रव्याची इच्छा नसते पण तीच इच्छा मनुष्याला पशू बनवते.

* थत्ते

पैसा जाईल आणि येईलहि; पण जीवन जाईलच पण येणार नाहीं.

– देहं वा पातयेत् अर्थं वा साधयेत् ।

– द्रव्येण सर्वे वशा ।

– करी नराला धनलोभ राक्षस ।

* भा. रा. ताम्बे

धनिका ताट रुप्याचें जरी,
पांचहि पक्वान्नें त्यावरी,
नाहिं गोडी मुखाला परी,

नको नको प्रासाद नृपांचे दूषितरक्तांनीं ।
कुवासनांचे अकाण्डताण्डव सदा नगर सदनीं ।।

* रामजोशी

जोवरि पैसा तोवरीं बैसा,
मंचकी म्हणतिल, घ्याल हवा,
भेदाभेदीं हातीं नरोटी,
शितें तोवरि भुतें भोंवतीं,
कोण कुणाचा जीव–सखा,

* संत तुकाराम

जोडोनिया धन उत्तम वेव्हारें । उदास विचारें वेंच करीं ।

अर्थ

22409 कि: निबंध ११
क्रमांक ११११० नों: दि: २२।१।८८

* मुक्ताबाई

म्हणसी सम्पदा माझीं किती । अम्बाऱ्या हत्ती ।
हत्ती घोड्याचीं होईल माती । मग तुजला नेती ।
पैशासाठीं जीव देअी । त्याचा सौदा सस्ता नाही ।

सर्वे गुणा: कांचनाश्रयंति ।

* व्होल्तेअर

पैशाचा प्रश्न आला कीं, सर्वजण अेकाच धर्माचे होतात.

* विनायक कवि

आप्तअिष्टजन, दास दासीगण धनानुगामी सारे,
मोहर झडतां आम्रतरूवर कवण पांखरूं थारे.

* शेक्सपिअर

धनकोहि बनूं नका आणि ऋणकोहि बनूं नका. कारण पैसा आणि मित्र हीं दोन्हींहि हरवाल.

* प्रवासी राम

घाम गाळल्याशिवाय दामाची खरी किंमत कळत नाहीं.
दाम करी काम !

* ज्ञानेश्वर

तंववरी रे तंववरीं मित्रत्व संवाद
जंव अर्थेसी सम्बन्ध पाडिला नाहीं बाप.

* संसार शकट

पैसा हा संसाराचा पाया आहे. संसार म्हणजे सुख नसेल, पण सुखोपभोगांचें अनुकुल वातावरण त्याशिवाय निर्माणच होवूं शकत नाहीं.

पैसा पुरुषाचें मन रिझवूं शकतो. कारण त्याच्या पराक्रमाचें तें साधन असतें.

* भ. महावीर

सज्जनांचीं सम्पत्ती ही शुद्ध न्यायोपार्जित श्रमामुळें केव्हांच वाढत नसतें. जशी नदी ही केव्हांहि स्वच्छ पाण्यानें भरून वाहात नाहीं.

न्यायानें मिळविलेल्या द्रव्याचे दोन दुरुपयोग आहेत. १ अयोग्य माणसाला दान देणें. २ योग्य त्या ठिकाणीं दान न करणें.

* अज्ञात

पैशाविषयीं परमेश्वराचं मत काय आहे हें पाहायचं असेल तर तो ज्यांना पैसा देतो त्यांच्याकडेच पहा.

* हेन्री फोर्ड

पैसा हा माणसाचें हात किंवा पाय आहे. मग तो तुम्ही वापरा किंवा वापरुं नका.

* डिकन्स

वार्षिक उत्पन्न वीस पौण्ड. वार्षिक खर्च अेकोणीस पौण्ड, अेकोणीस शिल्लींग. परिणाम—सुख. व ह्याच्या उलट दुःख.

* ओ. डब्ल्यू होम्स

पैशावर विश्वास ठेवू नका. पण विश्वासावर पैसा ठेवा.

* पोप

स्थावर जंगम करा. पण सचोटीनें. तसें न जमल्यास कशानेहि,.

* शेक्सपिअर

३०० रु. वार्षिक उत्पन्नांत हें दुष्ट आणि दुराचारी जग किती सुन्दर दिसतें

★ ★

## ६ : अलंकार

वामन पण्डित

कावळ्याचा गळा । मुक्ताफळ माळा ।
तरी काय त्याला । भूषण शोभें ?

भाग्याला सुजनत्व भूषण असें, कीं मौन शौर्यास तें ।
ज्ञानाला शम, त्या श्रुतास विनय, द्रव्यास दातृत्व ते ।
अक्रोधत्व तपा, क्षमा प्रभुपणा, धर्मास निर्दयता ।
या सर्वासही मुख्य भूषण पहा सच्छील हे तत्त्वतां ।

करीं साजे त्याग, श्रवण युगलीं सच्छ्रवण जें ।
मुखीं सत्य, सच्छाचरण विलसे, शौर्यहि भुजे ।
स्वशीर्षें थोराला नमन विभवावांचुनि पहा ।
भल्याचा कीं स्वाभाविक शुभ अलंकार विधि हा ।

कृ. चिपळूणकर

नानाविध रत्नांची कनकांची असति भूषणें फार :
परि विद्यासम अेकहि शोभादायक नसे अलंकार ।

वामन पण्डित

नरस्याभरणं रूपं, रूपस्याभरणं गुणः ।
गुणस्या भरणं ज्ञानं, ज्ञानस्या भरणं क्षमा ।

श्रोत्रं श्रुतेनैव न कुण्डलेन दानेन पाणिः न तु कङ्कणेन ।
विभाति कायः करुणापराणां परोपकारैः न तु चन्दनेन ।

हस्तस्य भूषणं दानं, सत्यं कण्ठस्य भूषणम् ।
श्रोत्रस्य भूषणं शास्त्रं, भूषणैः किं प्रयोजनम् ।

मदानें शोभतो हत्ती, न्यायित्वानें क्षितीश्वर ।
वेदाभ्यासादि कर्मानें विप्र, सत्कृतीनें नर ।

गुणो भूषयते रूपं, शीलं भूषयते कुलम् ।
सिद्धिर्भूषयते विद्या, भोगो भूषयते धनम् ।

शीणोल्लेख जया असा मणि, रणीं जो वीर घायाळला ।
संभोगे शिणली अशी नववधू, हस्ती न मस्तावळा,
ज्याच्या स्वच्छ शरदृतूंत पुलिनें त्या विम्नगा, चन्द्रही ।
बीजेचा, प्रभुपात्र देत धन जो, हे शोभ ति सर्वही ।

गंगाधर शास्त्री

पंकावांचुनि शोभे जळमय सर, दुर्जनाविना सुसभा ।
कटु वर्णाविण काव्यहि, विषयाविण साधुचित्त घे शोभा ।

काव्य प्रकाश

रात्रीविणा नच रुची विधुच्या प्रकाशा,
चन्द्राविणा नच निशातम जाअी नाशा,
रात्रीं विधूविण कधीं सुरत क्रीडेला,
शोभा न ये, सुकवि ना रसिका मनाला.

डॉ. श्रीखण्डे

वक्षोजापरि कण्ठ सुन्दर तिचा शोभे जया भोंवतीं,
मुक्ताहारहि वर्तुलाकृति दिसे शोभे न ज्यांच्या मिति,
हारातें बहू कण्ठ भूषवी तसा कण्ठासहि हार तो,
अन्योन्यान्तरि भूष्यभूषणपणा कीं तुल्य संचारितो ।

चरित्रहीन

बायका–माणसांचीं दागिन्यावर केवढी विलक्षण आसक्ती असतें !

★ ★

## ७ : अश्रू

* ग. ल. ठोकळ

अभ्र तरळतें तव नयनांवर ।
पुसू नको ते अश्रूंचे सर ।
थेम्ब स्वातिचें असेंच माझ्या पडू देत हातांत ।

* साने गुरुजी

नको माझें अश्रू । कधीं नेऊ देवा
हाचि थोर ठेवा । माझा अेक
अिवलासा अश्रू । पर्वत बूडवी
जीवाला चढवी । मोक्षपदीं
अिवलसा अश्रू । परी वज्रा चूरी
पाषाणाचे करी । नवनीत
अिवलसा अश्रू । पूर्णविरामाला
जीवन ग्रंथाला । गोडी देअी

* वि. स. खाण्डेकर

अश्रूंनीं हृदयें कळतात व मिळतात.
हास्य हें जीवन वृक्षाचें फूल आहे, पण अश्रू हें त्याचें फळ होय.

* विंदा करंदीकर

हंसणें-रडणें मुळांत अेकच; अश्रूंतील ही गम्मत !

* जॉन डेव्हिडसन

अविनाशी जें अश्रूंनीं लिहिलें
सूर तयांतून जें निघालें
तें सारें विश्वाचेच झालें

* थॉमस हूड

पुरे कर, ना आसवें ढाळ
बसेना सुई–दोऱ्याचा मेळ

* ब्लेक

हरअेक नयनाचा हरअेक अश्रू
होवूनि बसेल अनन्ताचा अेक बिन्दू

* शेक्सपिअर

जर डोळ्यांत अश्रू असतील, तर तें आतांच ढाळा.

* रॉबर्ट ग्रीन

हांस हांस रे नकोस अश्रू ढाळू
आहे तेंच वृद्धपणीं, नकोस कांहीं चिन्तू

★ ★

## ८ : आओ

* यशवन्त

स्वामी तिन्ही जगाचा आओविना भिकारी

* माधव जूलियन

प्रेमस्वरूप आओ । वात्सल्यसिन्धु आओ ।
वोलावु तूज आतां । मी कोणत्या अुपायीं ।
विद्याधन प्रतिष्ठा लाभे । आतां मला ही ।
आओविणें परी मी । हा पोरकाच राही ।
सारे मिळे परन्तु । आओ पुन्हा न भेटे ।

– जननी व जन्मभूमि स्वर्गापेक्षांहि श्रेष्ठ आहे.

साने गुरुजी

फुलांमध्यें फूल । फूल हुंगावें जाअीचें
सुखभोगावें आअीचे । बालपणीं

माऊली माऊली । कल्पवृक्षाची साऊली
तान्हे बाळालागीं दिली । देवाजीनें

* माडगुळकर

सात समिन्दरा भरूनी उरली, माया आअीची

– नको नको रे बाळा । करूं मातेची हेळणा
नयनाचा केला दिवा । तळहाताचा पाळणा

– तूं माझी माऊली । तूं माझी साऊली

– आअीसारखी मायाळू आअीच

– आअीच्या रागाच्या वादळामागें प्रेमाचा सागर उचंबळत असतो.

* पै. महंमदाचीं वचनें

– स्वर्ग माउलीच्या चरणापाशीं पडला आहे.

– कुपुत्रोजयेत क्वचिदपि कुमाता न भवति ।

– न मातुः परदैवतम् ।

* किप्लींग

उंच उंच अति उंच पर्वताच्या टोकावरहि जर मला फांशी द्यावयास नेले तर, तेथेंहि माझ्या संगति कोणती अेकच गोष्ट येणार असेल तर, ती माझ्या मातेची माझ्यावरील माया !

* पोअे

ज्या वेळेला देवदूत अत्यन्त प्रेमानें, आनंदून आपआपसांत गोड-

* थॉमस हूड

पुरे कर, ना आसवें ढाळ
बसेना सुअी–दोऱ्याचा मेळ

* ब्लेक

हरअेक नयनाचा हरअेक अश्रू
होवूनि बसेल अनन्ताचा अेक बिन्दू

* शेक्सपिअर

जर डोळ्यांत अश्रू असतील, तर तें आतांच ढाळा.

* रॉबर्ट ग्रीन

हांस हांस रे नकोस अश्रू ढाळू
आहे तेंच वृद्धपणीं, नकोस कांहीं चिन्तू

★ ★

## ८ : आअी

* यशवन्त

स्वामी तिन्ही जगाचा आअीविना भिकारी

* माघव जूलियन

प्रेमस्वरूप आअी । वात्सल्यसिन्धु आअी ।
बोलावु तूज आतां । मी कोणत्या अुपायीं ।
विद्याघन प्रतिष्ठा लाभे । आतां मला ही ।
आअीविणें परी मी । हा पोरकाच राही ।
सारे मिळे परन्तु । आअी पुन्हा न भेटे ।

– जननी व जन्मभूमि स्वर्गापेक्षांहि श्रेष्ठ आहे.

साने गुरुजी

फुलांमध्यें फूल । फूल हुंगावें जाओीचें
सुखभोगावें आओीचे । बालपणीं

माऊली माऊली । कल्पवृक्षाची साऊली
तान्हे बाळालागीं दिली । देवाजीनें

माडगुळकर

सात समिन्दरा भरूनी उरली, माया आओीची

– नको नको रे बाळा । करूं मातेची हेळणा
नयनाचा केला दिवा । तळहाताचा पाळणा

– तूं माझी माऊली । तूं माझी साऊली

– आओीसारखी मायाळू आओीच

– आओीच्या रागाच्या वादळामागें प्रेमाचा सागर उचंबळत असतो.

* पैं. महंमदाचीं वचनें

– स्वर्ग माउलीच्या चरणापाशीं पडला आहे.

– कुपुत्रोजयेत क्वचिदपि कुमाता न भवति ।

– न मातुः परदैवतम् ।

* किप्लींग

उंच उंच अति उंच पर्वताच्या टोकावरहि जर मला फांशी द्याव-यास नेले तर, तेथेंहि माझ्या संगति कोणती ओकच गोष्ट येणार असेल तर, ती माझ्या मातेची माझ्यावरील माया !

* पोओे

ज्या वेळेला देवदूत अत्यन्त प्रेमानें, आनंदून आपआपसांत गोड

गोड गाणीं गातात, तेव्हां त्या गाण्याचा विषय मातेच्या ममतेशिवाय दुसरा कुठला असूच शकत नाहीं.

* थँकरे

लहान लहान बोबड्या बाळांच्या ओठांतून व अन्तःकरणांतून दिसून येणारा थोर परमेश्वर म्हणजेच आओी.

* अॅन टेलर

मी पडतांच मला उचलायला जी धावून येते आणि मला गोड गोड गोष्टी सांगत, जी जमिनीवरची माती उचलून, 'अिडापिडा टळो' म्हणून फुंकर घालून फेकून देतें, ती माझी आओी !

* टॉलस्टॉय

जीवनांत मी माझ्या मनोविकाराशीं आणि मोहाशीं झगडतांना माझा विजय व्हावा म्हणून मीं आओीच्या आत्म्याची करुणा भाकीत असे आणि समाधानाची गोष्ट अशीं कीं, त्या प्रार्थनेनें मला फायदा होओी.

* एडिसन

आओीच्या अकृत्रिम प्रेमळपणाचा आणि सुसंगतीचा जर मला फायदा मिळाला नसतां, तर माझ्या कल्पक बुद्धीचा विकास खात्रीनें झाला नसता.

* नेपोल

माझ्या आओीच्या डोळ्यांतून दुःखाश्रुचा अेक थेंब जरी पडल तरी, पृथ्वीप्रलय झाला असें मी मानीन.

* अनामिक

परमेश्वरानें आपलें अस्तित्व सर्वत्र दर्शविण्यासाठींच जणू माता निर्माण केल्या.

डब्ल्यू. जी. ब्राऊन

मनुष्याला अत्यन्त गोड वाणी कुणाचीं अैकावयास मिळत असेल र ती त्याच्या आअीचीच !

* विनोबा

आअीला सर्व दोषासकट मुलगा गोड वाटतो.

– राजपत्नी, गुरुपत्नी, मित्रपत्नी, सासू, व स्वतःची आअी या या पाचांना स्मृतींनीं माता म्हटलें आहे.

– ऋण जन्मदेचे कधि न फिटें ।

* बर्ट मॉर हाअूस

सृष्टीकर्त्याला असें वाटलें कीं आपण निर्माण केलेल्या मानव संततीची काळजी करणारे कुणीतरी पाहिजे म्हणून निष्काम प्रेम करणाऱ्या धैर्यशाली 'आअीचें' वरदान दिलें.

– मायाळू वायको आणि चतुर माता म्हणजे दैवानें दिलेले वरदानच !

– जिला विश्वाची जननी व्हावयाचें आहे तिला अपार ज्ञान व प्रेम असावें.

– आअीला अलंकारांनीं शोभा येत नसते तर ती प्रेमानें येते.

* खलील जिब्रान

आअी असंख्य काव्यें जगते पण ती एकसुद्धां कविता लिहूं शकत नाही. मातेच्या हृदयांत जें गाणें मुकेपणानें वावरत असते तेंच मुलांच्या ओठावर नाचत राहतें.

* साने गुरुजी

अनन्त निळ्या आकाशाच्या पार्श्वभूमीवर लहानसा चन्द्र मिरवतो, त्याचप्रमाणें आमच्या स्वतःच्या कथांच्या पार्श्वभूमीवर हा मातृप्रमाचा चंद्र मिरवीत आहे.

आओीच्या दुधाची चव कांहीं न्यारीच आहे. ते नुसतें दूध नसत, त्यांत प्रेम व वात्सल्य असतें. म्हणून तें दूध बाळाला बाळसें देतें, तजेला देतें.

सूर्य-चंद्रांना माहीत असो वा नसो, त्यांच्या किरणांनीं कमळें फुलतात, ही गोष्ट खरी. आओीवापांना व अितर लोकांना माहीत असो वा नसो त्यांच्या कृत्यांनीं जीवनकळ्या फुलत असतात हें खरें.

मुलांच्या शिक्षणांत जास्तींतजास्त वांटा आओी-बापाचाच असतो त्यांतहि आओीचा अधिक. खरी शिक्षणदात्री आईच होय, आओी देह देते, मनहि देते. जन्मास घालणारी तीच व ज्ञान देणारीहि तीच.

* खाण्डेकर

समुद्रांत अनेक रत्नें असलीं तरी मोत्याचें रक्षण शिंपल्यामुळेंच होत असतें. या जगांत कोटयावधि वुद्धिमान माणसें असली तरी आपल्या फारशा न शिकलेल्या व साध्याभोळ्या आईची सर दुसऱ्या कोणालाही येणार नाहीं.

* विनोबा

आईची पूजा म्हणजे वत्सलतेनें उभा असलेल्या परमेश्वराची पूजा. माउली म्हणजे निस्सीम सेवेची मूर्ति. उत्कृष्टांतून उत्कृष्ट परमेश्वराची पूजा म्हणजे मातृपूजा आहे. आईच्या शब्दाहून आणखी उच्च शब्द आहे कोठें ?

* यशवंत

स्वामी तिन्ही जगाचा । आईविना भिकारी ॥

★ ★

## ९ : आचार

* सानेगुरुजी

सदाचार हा मनुष्याचा खरा अलंकार आहे.

– ऐकावें जनाचें ; करावें मनाचें

– जातौ जातौ नवाचाराः ।

– यद् यदाचरति श्रेष्ठः । तत् तदेवेऽतरो जनाः ।

– आचारः परमो धर्मः । आचारः परमं तपः ।

आचारः परमं ज्ञानमाचारात् । किं न साध्यते ।

* केशव नाईक

विचार आणि उच्चार या आईबापांचे एकुलते एक मूल म्हणजे आचारच !

* मॅथ्यू अर्नाल्ड

जीवनाचा तीन चतुर्थांश भाग म्हणजे आचारच.

* समर्थ रामदास

सदा बोलण्यासारिखें चालताहे ।<br>
अनेकीं सदा एक देवासि पाहे ।<br>
सगुणी भजे लेश नाहीं भ्रमाचा ।<br>
जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा ।

★ ★

## १० आशा-निराशा

– आशा नाहीं ज्याला । देव कां मारी तयाला ।

– राहील चरणांचीं हृदयीं खूण
उरतील अंतरि तेजाचे कण

* कुसुमाग्रज
रात्री मागुन रात्र येऊं द्या, कसली मग खंती

* भा. रा. तांबे
गेल्या गेल्या आशा, पडल्या भस्माच्या राशी,
त्यांवरि घिरट्या घालुनि ये का कांहीं हाताशीं

* माधव जुलियन
आशा वेडी भोळी असतें
भूवरतीं आधार जों नुरें
हवेंत बांधी उंच गोपुरें
विवेक यद्यपि म्हणे तो पुरें
पुनः पुन्हा मन अधिकच फसतें.

– आशा नाम मनुष्याणां काचिदाश्चर्य शृङखला ।
यया बद्धाः प्रधावन्ति, मुक्तास्तिठन्ति पङगुवत् ।

– लक्ष्मी, कौस्तुभ, पारिजातक अशी रत्नें निघूं लागलीं
साक्षात् अमृत ये वरी तरि कुणी नाहीं समाधानले ।

लागे हांव सुटावया, हळुहळुं आले अखेरी वरी ।
चौदावें मग रत्न तें निघुनियां तो सर्व थण्डावलें ।

– हा उन्नती अवनतीस समुद्र जातो
भास्वान रवीहि उदयास्त अखण्ड येतो

उत्कर्ष आणि अपकर्ष समान ठेले
विश्वांत आजवरि शाश्वत काय झाले ?

* कुसुमाग्रज

रात्रीच्या गर्भात असे उद्याचा उष:काल

* चन्द्रशेखर

संप्रति अवर्षणानें, तापानें कोळपून जे गेले,
त्या परिजातकावर फुलतिल वर्षाऋतूंत हो झेले.

* मोरोपंत

बहु लाजवीत होतो करि, केसरि, कीर, कोंक, हरिणा मी
हांसत कर्म करावें, भोगावें रडत तेचि परिणामी.

* माधवानुज

आशा म्हणजे काय असें ? कमळावरचा जलबिंदू ।
मानिति मौक्तिक मतिमन्, सुज्ञां परि तें जळचि दिसे ।

*विनायक

पूर्व दिव्य ज्यांचे त्यांना रम्य भाविकाल ।
हाच बोध अितिहासांचा सदा सर्वकाळ ।
कासया वहावा चिन्ता मनीं मग जहाळ ।
रात्र सरे तेव्हां उगवे दिनहि पूर्व वाटे ।

– आशा ही निराशेचीच छोटी बहीण आहे.

– या जगीं वांछित मिळेना कांहीं !

* संसारशकट

आशाच हें जग कळसूत्री बाहुलीप्रमाणें नाचवीत आहे. निराशेनें प्रगति खुण्टते.

* महावीर

आशा ही अिन्द्रियांना प्रमत्त करणारी मदिरा आहे. ती अेक

विषमंजिरी आहे. प्राण्यांना तिच्यामुळेंच दुःखभार सहन करावा लागतो.

जो आशेच्या आधीन गेला आहे. तो मनानें शुद्ध राहूं शकत नाहीं.

आशारुपी वन्हीमुळें होरपळत असलेला स्वर्गातील अिन्द्र देखील सुखी राहूं शकत नाहीं.

* बर्नस्

दुःख जर्जर हृदयान्तरीही
मिणमिणती आशेची पणती ।

* ऑस्कर वाअील्ड

प्रार्थनेचें सूर कां न निघती ?
दुःख तुज कां न टाकतीं ?
कशाची तरी उणीव आहे जाण ।
ती उणीव म्हणजे आशेचें वरदान ।

* हेवलॉक एलिस.

ज्या ठिकाणीं आशावादाला भरती येते असें ठिकाण म्हणजे वेडयाचें अिस्पितळ.

* ब्रँच कॅबेल

आशावादी म्हणतात आम्ही उत्तम अशा जगांत राहातो आणि हे खरें अशी भीति निराशावाद्यांना वाटतें.

★ ★

## ११ : आत्मा

* म. गान्धी

स्वतःच्या आणि दुसऱ्याच्या आत्मशुद्धीसाठीं अुपोषणाचे साधन प्राचीन काळापासून अस्तित्वांत आलेले आहे.

– नैनं छिद्न्ति शस्त्राणि नैनं दहति पावकः ।
न चैनं क्लेदयन्त्यापो न शोषयति मारुतः ।

* विनोबा

सोडुनिया जर्जर जीर्ण वस्त्रें ।
मनुष्य घेतो । दुसरी नवीन ।
तशीं ती टाकुनि जुनी शरीरें ।
आत्माहि घेतो दुसरी निराळी ॥२२॥

शस्त्रें न चिरिती त्यांस । ह्यांस अग्नि न जाळितो ।
पाणी न भिजवी त्यास । ह्यास वारा न वाळवी ॥२३॥

चिरवें जाळवे ना हा भीजेल वाळवेहि ना ।
स्थिर निश्चळ हा नित्य सर्व व्यापी सनातन ॥२४॥

न देखू ये न चिंतू ये बोलिला निर्विकार हा ।
जाणूनि ह्यापरी आत्मा शोक योग्य नसे तुज ॥२५॥

* गीता

उद्धरेदात्मनाऽऽत्मानम् ।

* विचार पोथी

आत्मदर्शनाशिवाय आनन्द नाहीं. आओला मुलाचा चेहेरा पाहून आनन्द वाटतो ह्याचें कारण तिला त्या मुलांत आपला आत्मा दिसत असतो.

'आत्म्याचें अस्तित्व' हे शब्द पुनरुक्त आहेत. कारण आत्मा म्हणजेच अस्तित्व.

आत्मदर्शन हें जीवनांतील काव्य होय.

* जीवन दर्शन

सहस्त्रदळ कमळाप्रमाणें आत्मा स्वत:ला प्रकट करीत असतो. तुमचें शरीर म्हणजे तुमच्या आत्म्याचीं वीणा आहे.

* भ. महावीर

आपल्या सुखदु:खाचा कर्ता आपला आत्माच आहे. योग्य मार्गावरून जाणारा आत्मा आपला मित्र आहे. व अयोग्य मार्गावरून जाणारा आत्मा आपला शत्रू आहें.

आत्मा जिंकला कीं सर्व कांहीं जिंकलें.

★ ★

## १२ : आस्तिक-नास्तिक

* ओल्ड टेस्टॅमेण्ट

केवळ मूर्खच आपल्या हृदयांत असें म्हणत असेल की " जगांत देव नाहीं."

* जॉर्ज सॅनतायन्

माझें नास्तिकत्व म्हणजे विश्वाच्या दृष्टीनें खरं मांगल्यच होय. कारण स्वत:च्या फायद्यासाठीं स्वत:च्या कल्पनेनुसार परमेश्वराच्या प्रतिमाच केवळ मीं नाकारतो.

* तुकाराम

तार्किकांचा टाका संग । पाण्डुरंग स्मरारे ।

* श्रुति

नैषा तर्केण मतिरापनेया ।

* तुकाराम

कैसी करू आतां सांग तुझी सेवा। शब्दज्ञानें देवा नाश केला।
तुका म्हणे नासी । कुतर्क्याचे कपाळीं ॥

* ऑस्कर वाअील्ड

ज्याला वस्तूचें मूल्य कळते पण त्याचें मोल कळत नाहीं. तो नास्तिक.

* साने गुरुजी

सर्वत्र मांगल्य मानणारा तो आस्तिक.

* पै. महंमद

मनुष्य जें स्वतःसाठीं अिच्छितों तें जोपर्यन्त तों आपल्या बान्धवा साठीं अिच्छित नाहीं, तोपर्यंत तो खरा आस्तिक नव्हे.

आपला जिम्मा जे पुरा करतात, आपल्या वचनाला जे जागता आणि जे आपला पण राखतात तेच खरे आस्तिक होत.

विनयशीलता आणि चारित्र्यशुध्दि ही आस्तिकतेचीं अंगें होत.

आस्तिक सुखी होय. कां कीं भाग्य प्राप्त झाल्यास तो अिश्वराची स्तुति करतो व त्याचें आभार मानतो, आणि जर विपत्ति प्राप्त झाली तर अिश्वराची स्तुति गातो व धैर्यानें सहन करतो. ह्यामुळं आस्तिकजनाची प्रत्येक गोष्ट सफळ होय.

जो व्यभिचार करतो, जो चोरी करतो, जो मद्य पितो, जो (परस्व) लुटतो अथवा गिळंकृत करतो, तो आस्तिक नव्हे.

आपण केलेल्या सत्कृत्यामुळें तुला सुख होत असेल आणि आपण केलेल्या दुष्कृत्यामुळें दुःख होत असेल तर तूं खरा आस्तिक होय.

प्रार्थना म्हणजे आस्तिकाची समाधि होय.

आस्तिकाला हा लोक कारागृह होय. परन्तु नास्तिकाला तो स्वर्ग होय.

आस्तिक पुरुषांस मरण नाहीं. बहुतकरून ते ह्या मर्त्य लोकांतून शाश्वत जीवनांच्या लोकांत रुपांतर पावतात.

तो काळ दूर नाहीं कीं जेव्हां दारिद्र्य हे निष्ठाहीनतेचें, नास्तिकतेचें कारण होईल.

★ ★

## १३ : आळस

* यदुनाथ थत्ते

आळसाच्या सेवेला जो जिंकतो–पिटाळून लावतो, निश्चयाचा झेण्डा जीवनाच्या मैदानांत रोवतो तोच झेण्डा यशस्वी होतो.

आळस हा महाभयंकर शत्रू आहे. हुशार शत्रू आहे. माणसाच्या मनाच्या किल्ल्याला त्याचा नेहमींच वेढा असतो. केव्हां हल्ला होईल त्याचा नेम नाहीं.

आळसामधून ज्ञानशून्यतेशिवाय दुसरें काय उत्पन्न होणार? कित्येक वेळां आळसाचा हल्ला व भाग्यपथाचें दर्शन अेकदमच होतें. अशा वेळीं जो 'हो ना' च्या झगड्यांत पडतो तो काळाच्या काळसागरांत गडप होतो, बेपत्ता होतो.

* रामदास

करंट्यास आळस आवडे । यत्न कदापि नावडे ।
त्याची वासना नावडे । अधर्मी सदा ।
– आलस्यं हि मनुष्याणां शरिरस्थो महारिपुः ।
नास्त्युद्यमसमोबन्धुः श्रित्वा यं नावसीदति ।

* जीवनदर्शन

आळशी राहणें म्हणजे ऋतुंना पारखे होणें.

* ओल्ड टेस्टॅमेण्ट

मुंगीपाशी जा. तिचा उद्योग शिका व शहाणें व्हा,

★ ★

## १४ . आत्मविश्वास

* वि. स. खाण्डेकर

आत्मविश्वास हें कर्तृत्ववृक्षाचें मूळ आहे. वृक्षाचीं मुळें जों जों भूमींत खोल जातात तों तों वादळाशीं झुंजण्याचे त्याचे सामर्थ्य वाढतें. आयुष्यांतील नानाविध संकटांशी टक्कर देण्याला आत्मविश्वासहि असाच उपयोगी पडतो.

* खलील जिब्रान

स्वत:ची महत्त्वाकांक्षा सिध्द व्हावी म्हणून जेव्हां माझें हृदय पड खाण्यास सिध्द झालें तेव्हां मला माझा प्रथम तिटकारा आला.

* शॉ

समंजस मनुष्य जगाशी जुळते घेतो. परन्तु हटवादी मनुष्य जगानें आपणाशीं जुळते घ्यावें यासाठीं धडपडतो. म्हणून जगाची प्रगति हटवादी माणसावरच अवलंबून असते.

* सेसिल होड्स

अवाढव्य कामाकडे पाहून घाबरूं नका. थोडं थोडं काम करायला सुरवात करा. म्हणजे कांहीं दिवसांतच सर्व काम संपेल.

* अथर्व वेद

माणसामध्यें नवी नवी रचना करण्याची शक्ति आहे. पुढें जाण्याची शक्ति आहे. आक्रमणाचा प्रतिकार करण्याची शक्ति आहे. कोठल्याहि बाबतींत आपण कमी आहोंत असे त्यानें समजूं नये. त्यानें नेहमीं पुढेपुढेंच जात राहिले पाहिजे.

* विनोबा

विश्वासामुळेंच माणसाला बळ येते.

* कुरळ काव्य

सत्यप्रिति, सुख, सम्पत्ति, आणि प्राणभय या चार मनुष्याच्या कसोट्या आहेत, या कसोटीला जे उतरतील त्यांच्यावर तूं पूर्ण विश्वास टाक.

* हेन्री फोर्ड

मनुष्य हा स्वतःच्या शक्तीनें पुढें सरकणारा असला पाहिजे. ज्यांना गति द्यायला दुसरें लोक लागतात ती कसलीं माणसें ?

* बटलर

श्रद्धेच्या बळावर मनुष्य विशेष कार्य करूं शकेल असें नाहीं. पण त्याला श्रद्धेवांचून काहींच करतां येणार नाहीं.

* स्वामी विवेकानन्द

नदी वाहून गेल्यावर पाय न भिजवितां पलिकडे जावूं; या मूर्खपणाच्या आशेवर थांबून न बसतां पाण्यांत उडी घालून आणि प्रवाह तोडून पलीकडे चला.

* जेने हॉपकिन्स

प्रतिभा ही अनन्त परिश्रमांत सामाविलेली असते.

* लो. टिळक

तुम्हीं निर्भय व्हा. भीति बाळगाल तर तरणोपाय नाहीं.

* भगवान बुद्ध

रडूं नकोस. रडायला वेळ तरी कुठे आहे ? स्वतःच्या अन्तरांत दीप चेतव. त्या दीपाच्या प्रकाशांत निर्वाणपद प्राप्त करण्याचा मार्ग शोध.

* महाभारत

या जगांत धांवपळ व गुणग्राहकतेचा अभाव जरी सर्वत्र दिसत

असला तरी माझीं अशी श्रद्धा आहे कीं अेकमेकांशीं सौजन्यानें वागल्यामुळें व मधून मधून दुसऱ्याबद्दल चांगला उद्गार काढल्यानें जीवन किती तरी सुसह्य होतें.

* रवीन्द्रनाथ टागोर.

श्रद्धा हा असा पक्षी आहे कीं पहांटेच्या गर्द काळोखांत त्याला प्रकाशाची चाहुल लागून तो गावूं लागतो.

* विनोबा

संसाराच्या खोलीला भिवूं नको. तुला पोहून पृष्ठभागावरून जायचे आहे ना ? कीं आंत बुडायचे आहे ?

* वा. म. जोशी

अलगुजाला किंवा 'फ्लूट'ला चीर गेली असली तर, चांगले सूर त्यांतून कसें निघतील ? अुत्तम गाण्याचीं देखील अशीच गोष्ट आहे. हृदयांत बिघाड झाला असला तर दुसऱ्याच्या हृदयाचा ठाव घेणारे सूर त्यांतून निघणारच नाहींत.

* बायरन

अन्धारांत चालणाऱ्या मनुष्याचें जीवन निराशामयच असते. ज्या किनाऱ्याचें आमन्त्रण येअील तिकडे केवळ धैर्यशाली मनुष्यच वळतो. तो अनन्ताप्रत जावूं शकतो. तो पुढें पुढें जाअील नि कुठेच थाम्बणार नाहीं.

★ ★

## १५ : अुच्चार

* स्वामी शिवानन्द

कर्तृत्वशून्य वक्तृत्व वांझ होय.

* तुकाराम

बोले तैसा चाले, त्याचीं वन्दावीं पाऊलें.

* काव्य रत्नावली

वाचाळता दे लघुता नराला । नेतें तसें मौन समुन्नतीला ।
पायीं पडे नूपुर मंजू शब्दे । कण्ठीं रुळे मौक्तिक हार मौनें ।

– शब्दाची धार शस्त्राहून तीक्ष्ण असतें. जपून वापरा.

– मणभर चर्चेपेक्षां कणभर आचरण श्रेष्ठ आहे.

* रामदास

स्वयें सर्वदा नम्र वाचें वदावें.

– नीचः वदति, न कुरुते, न वदति सुजनः करोत्येव

– प्रियवाक्येण सर्वेऽपि यतस्तुष्यन्ति जंतवः ।
वद तस्मात् तदेवं त्वं, वचने का दरिद्रता ।

– सत्यं ब्रूयात्, प्रियं ब्रूयात् ।

– वाणी गुणान्स्तोति कथां श्रृणोति श्रोत्रद्वयंउत्तरन्ति ते भव।

* सुश्लोक गोविंद, जयदेव

वाणी श्रृंगारखाणी अवनिवरि असे जोंवरी या कवीची,
सोडी गर्वा मधो ! तूं, तंवर कर बये ! शर्करे ! तूंहि तेची !
द्राक्षें ! भक्षूं तुला कां ? नच तुजहि सुधे ! भाससीं नीर दुग्धा !
आम्रा ! त्वां नम्र व्हावें, धर झणि अधरा ! तूं तुजा मार्ग मुग्धा

[stamp] 22८९ नि: निबंध 999४ दि: 22.1.7.4८

* चन्द्रशेखर

परी क्वचित् मौन हें प्रवचनें करी प्रीतिचीं ।
तयांत हृदयंगमे असतीहि प्रमेयें तिचीं ।
मुके कमळ बोलतें मधुर काय अुद्गार तें ।
किती भ्रमर अेकति हितगुजांतलें सार तें ।

* रेन्दाळकर

थोर कुणास म्हणावें ? लाजेना करूनि जो वचनभंग

* पै. महंमद

संभाषण करतांना ज्याचा मागून पश्चात्ताप करावा लागेल असा एकहि शब्द अुच्चारतां कामा नये.

* विचार पोथी

जी वाणी सत्याला सांभाळतें, त्या वाणीला सत्य सांभाळतें. मनुष्य आणि पशु ह्यांतील मुख्य विशेष वाणीचा आहे.

* समर्थ

मना बोलणें नीच सोशीत जावें ।
स्वयें सर्वदा नम्र वाचें वदावें ।

* मना रे, जनीं मौनमुद्रा धरावी ।

* विचारूनि बोले विवंचूनि चाले ।
तयाचेनि सन्तप्त तेही निवाले ।
बरें शोधल्यावीण बोलों नको हो ।
जनीं चालणें शुद्ध नेमस्त राहो ।

* अनिर्वाच्य तें वाच्य वादें वदावें ।

* संसार शकट

सहानुभूतीच्या शब्दानींच अश्रूंचा प्रवाह जोरानें सुरूं होवून अन्तःकरणांतील दुःख हलकें होतें.

* वि. दा. सावरकर

या जगांत थोरांच्या वक्तृत्वाअितकें अनिवार्य वक्तृत्व नाहीं.

– आपल्या शब्दाला तेव्हांच महत्त्व येअील कीं, जेव्हा त्या शब्दामागें भरपूर सामर्थ्य अुभें राहील. तें सामर्थ्य आपण अवश्य निर्माण केलें पाहिजे.

– शब्दज्ञान होण्यापेक्षां व्यवहारज्ञान आपणास झालें पाहिजे.

★ ★

## १६ : अुत्साह

* पोप

मूर्खांचा उत्साह । पाहूनि येते चीड
आणि त्यांचा काव्यांतील अुत्साह । पाहुनि येते किळस

* मॅडम स्टॉल

या जगांतील जें कांहीं अुच्च आणि आकर्षक आहे तें सर्व म्हणजे अुत्साहाचाच गौरव होय. त्याशिवाय कांहींही मिळवितां येणें शक्य नाहीं.

– तुम्हांस नावडणारे काम दुसऱ्यास करणें भाग पाडणें म्हणजेच कर्तृत्व.

* अर्नोल्ड

या जगांतील शोचनीय दिवाळखोर म्हणजे ज्यानें आपला अुत्साह घालविला आहे तो. उत्साहाव्यतिरिक्त त्यानें जरी सर्व गमावळे तरी पुन्हा त्यास यश मिळेल.

* जॉनसन्

ज्या अपेक्षां आपण पुरवूं शकत नाहीं, त्या निर्माण करूं नयेत.

* टकटमॅन

खऱ्या उत्साहाची शक्ति आणि सौन्दर्य ओळखा आणि जे

आपल्या विकासासाठीं किंवा परविकासाठीं करू त्यांत कुणाची एकहि भावना न दुखविण्याची काळजी घ्या.

– हंसण्यांत वेळ घालवा, कारण तें आत्म्याचें संगीत आहे.

* शाव

माणसांत उत्साह वाढवावा. त्यास उत्तेजित करावें व त्यामध्यें जें चांगलें आहे तें योग्य मूल्यमापनानें विकसित करावें.

★ ★

## १७ : अेकाग्रता

* थत्ते

सर्व जगाला विसरून मनाची शक्ति दृढपणें स्थिर करणें यालाच एकाग्रता म्हणतात. मन एकाग्र झाल्यावर अशक्य असें एकहि काम नाहीं. एकाग्रता यशस्वी करतें. कर्तव्य मग्नतेंत साऱ्या जगाचा विसर पडणें म्हणजेच एकाग्रता.

* चार्लस डिकन्स

ध्यान, एकाग्रता ही एक सदैव सज्ज असणारी, उपयोगी व संकट-मुक्त करणारी फायदेशीर संवय आहे. एकाग्रता आपल्या जीवनांतला एक परम आवश्यक गुण आहे.

* चार्लस किंगस्ले

मी कोणतेंच काम एकसारखें कंटाळा येईपर्यंत, चित्त द्विधा होईपर्यंत करीत नाहीं. मी माझें काम मोठ्या एकाग्रतेनें करतो.

* थत्ते

एकाग्रतेच्या अभावामुळें शक्ति विकेंद्रित झाल्यानें तिचा अपव्यय होतो.

* भाऊसाहेब देशमुख
तन्मयता नसेल तर, विद्वत्ता फुकट आहे.

* विचार पोथी
सत्त्वगुणांशिवाय एकाग्रता नाहीं.

* ज्ञानेश्वर
एकाग्र करीं मन । तेणें होईल समाधान रे ।

* जीवन दर्शन
स्वतःशीं एकरूप असतां, त्यावेळीं तुम्ही साधू असतां.

★

## १८ : कर्म

* भगवत् गीता

अेक क्षणभर सुध्दां प्राणीमात्र कर्मांविना राहूं शकत नाहीं. कारण मनुष्यास त्याच्या अंगचें गुण नाओीलाजानें त्याला कर्मास प्रवृत्त करतात.

कर्म न करण्यापेक्षां तें केलेंले बरें. तुझी जीवन यात्रा सुध्दां कर्माविना चालू शकणार नाहीं.

प्रकृतीच्या गुणाकडूनच कर्मं पूर्णपणें केलीं गेलेलीं असतात. परंतु ज्याचा आत्मा गर्वानें विमूढ झालेला आहे तो ह्या कर्मांचा कर्ता ‘ मी ’ असें मानतो.

कर्मण्ये वाऽधिकारस्ते मा फलेषु कदाचन ।

गीता प्रदीप

साध्य व साधन आणि कार्य व कारण याविषयीं मनुष्यानें निश्चित असलेंच पाहिजे. कर्म करणें, तें अुत्तम करणें अेवढेंच माझ्या स्वाधीनचें आहे म्हणून मी तें करीत राहणार हीच वृत्ती अुत्तम होय. साध्य व साधन, कार्य व कारण याचें बिनचुक ज्ञान करणाऱ्याला पाहिजे.

* साने गुरुजी

ज्या कर्तव्यांत हृदयाचा जिव्हाळा नाहीं तें कर्तव्य कितीहि चांगल्या प्रकारें केलें तरी जगाला जिंकू शकणार नाहीं.

* माडखोलकर

देशांतील प्रत्येक व्यक्तीला जोपर्यन्त कर्तव्याची जाणीव होत नाहीं. आणि ती जाणीव झाल्यावरहि तदनुसार वागण्याचें धैर्य जोंवर प्रत्येक व्यक्ति करीत नाहीं तोंवर या देशाचा अुध्दार होणें कठीण आहे.

* यदुनाथ थत्ते

कामाची वाट पाहाणें हें पतनाचें लक्षण होय. कर्तव्य सुखापुढें सारीं सुखें तुच्छ !

अुद्याचा भविष्यकाळ आजच्या त्यागांतून, आजच्या कर्मांतून निर्मावा लागतो.

— कर्मणा शुद्धिः ।

* जोसेफ मॅझिनी

कर्तव्यासाठी कर्तव्य करा. कर्तव्याच्या तत्त्वानें आत्मार्पणाचें सामर्थ्य येतें. मनुष्य अचाट कर्में करूं शकतो.

* भगवद्गीता

कर्मणो गहना गतिः ।

– निष्कर्मन्ति राहाण्यापेक्षां अुपयुक्त कर्म करून प्रकाशमान व्हावें हें बरें ?

– महाजनो येन गतः स पन्थः ।

' शान्ताराम आठवले

कर्तव्यीं परि सतत असे रत ।
कुठें दरी वा कुठे पर्वत ।
अशीं संकटें अुभी सदोदित ।
जीवन पथ मी आक्रमित ।

– उद्यमेन हि सिध्यन्ति कार्याणि न मनोरथैः ।

– अुद्यमे श्रीः प्रतिवसति ।

* साने गुरुजी

श्रमांत आत्मोध्दार आहे. फुकट घेण्यांत व फुकट देण्यांत पतन आहे. अुन्हातान्हांत काम करणारा मजूर, रस्ते झाडणारा झाडूवाला, मळमूत्र नेणारा भंगी, मेलेलीं गुरें ओढणारा ढोर, वहाणा बांधणारा चांभार, हे सारे ऐतखावू लोकांपेक्षां श्रेष्ठ आहेत.

* पाळंदे ग. द.

कर्म याच देहीं, फळ मात्र डोळां । देतसे निर्वाळा अनुभव ।

– उषःकाल कितीहि चांगला असला, तरी सूर्याला तेथें ठराविक वेळेपेक्षां जास्तवेळ थाम्बणें शक्य नसतें.

– स्वतःच्या वाटयाला दुःखाचे कांटे असले तरी दुसऱ्याला सुखद फुलें देणें हें मानवी कर्तव्य आहे.

* आत्मोन्नति

मोबदल्याची, खुशी ना खुशीची, आवडी नावडीची कल्पना साफ झुगारून देऊन जें काम मी हातीं घेतलें तें सोळा आणे सुंदर वठवीन अशी शिस्त ठेवा.

पै. महंमद

कर्माचा बरे-वाईटपणा त्याच्या हेतुवरून ठरविला जाईल.
जे आपलीं रोजीं नेकीनें मिळवितात, ते ईश्वराचें लाडके होत.

कोणतीं कर्में अुत्कृष्ट होत ? मानवी प्राण्याच्या हृदयाला आनंदित करणें, भुकेलेल्यांना खावू घालणें, संकटग्रस्ताला सहाय्य करणें, दु:खितांचे दु:ख हलकें करणें आणि पीडितांवरील अन्याय दूर करणें.

* विचार पोथी

हेतु, परिणाम आणि स्वरूप ही तिन्हीं पाहून कर्माची योग्यता ठरवावयाचीं.

* लाँग फेलो

या काळाच्या भिंतीवर
आपण कर्माचे कारागीर
सत्कृत्यें कुणि हो वीर
पद्य-पङ्क्तिचें कुणि जुळवी सूर

उमर खय्याम

ज्यानें लिहिलीं ही कपाळावरील रेषा–
कर्तृत्वानें ना पुसली जाईल अर्धीहि रेषा–
ही जाण तूं काळच्या पाषाणावरील रेखा
अश्रूधारा तरि कैशा घुतील या लेखां ?

★ ★

## १९ : कला-कलावन्त

* साने गुरुजी
कला म्हणजे परमोच्च अैक्य.

* खाण्डेकर
कला ही भूतकालाची कन्या, वर्तमान काळाची पत्नी आणि भविष्यकाळाची माता असते.

* जोफेस मॅझिनी
स्वदेशाशिवाय व स्वातंत्र्याशिवाय कोणत्याहि कलेची अुन्नति होणें शक्य नाहीं.

* माडखोलकर
कला ही जीवनाची सांवली आहे. त्याला पूर्णता आणण्यासाठीं धडपडणाऱ्या मानवी कल्पकतेचा फुलोरा आहे. दडपून टाकलेली दुःखें आवरून धरलेले अश्रू, अपुऱ्या राहिलेल्या आकांक्षा, सफळ न झालेलीं स्वप्नें यांची सारी आर्तता, सौन्दर्य व ओज कला प्रगट करतें. कलाविकासाचा सारा आनन्द आत्मविश्वासांत आहे.

* साने गुरुजी
कला म्हणजे सत्य, शिव व सुंदर यांचें सम्मेलन.

* सॉमरसेट मॉम
कलावन्त आपल्या अुच्च आणि सौन्दर्यपूर्ण सजावटीमुळें मधुलोलुप वृत्तींचें समाधान करतो. परन्तु तें समाधान वैषयिक वृत्तीला धरूनच असते. तो तुमच्या समोर स्वतःस मिळालेल्या सर्वोत्कृष्ट देणगीचेच प्रदर्शन भरवित असतो.

कला म्हणजे भावनेचा अविष्कार आणि भावना ती भाषा बोलतें जी सर्वांना समजावी.

मानव्याचा प्रसार करणं हेंच सर्व कलांचं ध्येय आहे.

* ऑस्टिन

सर्व विनाश पावतें, पण कला सर्व सहन करूनहि तशीच आपणापाशीं राहतें.

* लाँग फेलो

कला ही प्रदीर्घ आहे आणि वेळ उडती आहे.

* सिनिक

सर्व प्रकारच्या कला म्हणजे निसर्गाच्या नकला आहेत.

* शेक्सपिअर

सौन्दर्यसंपन्न वस्तु निर्माण करण्याची युक्ति म्हणजे कला.

* टॉलस्टॉय

मनाला आनन्द देणारी प्रत्येक कृति व वस्तु कलापूर्ण म्हटली पाहिजे.

* कॉलिंग वुड

कलावन्ताचें सुख वैषयिक नसतें. तें दैवी असतें.

* नीति आणि कलोपासना

कलेचा ध्येय सात्त्विक आनन्द उत्पन्न करणं हें आहे व हें ध्येय कलेचे विषय सात्त्विक, नैतिक व उच्च प्रकारचेच ठेवल्यानें प्राप्त होईल.

कलेचा जन्म व पर्यवसान उच्च कोटीच्या, सात्त्विक, शाश्वत, एकजिनसी, ज्यांत दुःख–बीजांची भेसळ नाहीं अशा व उन्नतीप्रत नेणाऱ्या, आनन्दांत झालें पाहिजे.

* कै. वा. गो. आपटे

काव्यापासून होणारा आनन्द शुद्ध व उच्च प्रतीचा असला पाहिजे. काव्यांत माणसाला पशुत्व देणारा व त्याला अधोगतीला नेणारा आनन्द नसावा. एवढी खबरदारी मात्र घेतली पाहिजे.

– मानवी जीवनाचे कला हें एक अंग आहे.

* वि. स. खाण्डेकर

जुन्या काळांत कलेची जी आवड होती, तीच आज कायम असणें शक्य नाहीं. रीतिप्रमाणें कलेविषयींच्या लोकांच्या कल्पना पालटत असतात.

* टॉलस्टॉय

मतभेदामुळे कलावन्ताचा नाश कलावन्तच करतात.

* भा. रा. ताम्बे

नीति–अनीतीच्या भानगडींत न पडतां आपल्या विलासांत स्वैर-पणें आणि निष्कामपणें गुंग असावें असा कलेचा स्वभाव आहे.

* द. के. केळकर

समग्र कृतीच साकल्यानें मनावर उमटविणारा ठसा नीतीकल्प–नेशीं विसंगत नसला म्हणने अनीतिमानांचें चारित्र्य वर्णिले तरी नीति-अनीतिचा खरा प्रश्न अुपस्थित होत नाहीं.

* नीति आणि कलोपासना

कलेला सौन्दर्यावर बहिष्कार टाकायला नको. अहंकाराचा विटाळ मानायला नको. जगांतील दुःखाकडे दुर्लक्ष करायला नको. किंवा संसार त्यागाला व अंगास राख फासायला लावून सर्व वैषयिक गोष्टीवर लाथ मारावयास सांगणाऱ्या संन्यास वृत्तीला कवटाळायला नको. तिनें आपलें सारें अस्तित्व नीतितत्वांचा स्पष्ट व हेतु पुरस्सर पुरस्कार करण्यांत वादविवादपूर्वक अनीतीचा अुच्छेद करण्यांत किंवा सत्यासत्याची व नीति अनीतीची कठीण कोडीं. अुलगडण्यांत खर्ची घालावें असा आग्रह नाहीं.

* न. चि. केळकर

वाङमयांत जरी कलेला प्राधान्य असलें तरी सद्भिरुची नसावीं असें जर कोणी म्हणेल तर तें चुकीचे होईल.

* भा. रा. ताम्बे

जेथें केवळ अेकजिनसी सम्पूर्णता मात्र आहे अशा ठिकाणीं कला संभवत नाहीं.

जग जड असतें तर कला मनोमय चैतन्य स्वरूप असतें.

* वा. म. जोशी

नैतिक तारेच्या सुराशी कलेच्या तारेचा सूर जर जुळला नाहीं तर जीविताची सतार बदसूर वाजू लागेल आणि कोणालाहि आनन्द व्हावयाचा नाहीं.

* अँण्टव्हिसल

प्रतिभासंपन्न व्यक्ति प्रचलित नियम झुगारून देतात ते त्या ठिकाणीं नवीन नियम कायम करण्यासाठींच.

* नीति आणि कलोपासना

खऱ्या कलेचा जन्म स्वतःचे हृदय अुघडें करण्याकरितां असतो.

* न. चिं. केळकर

कलारंजनाचा हेतु रंजनच. त्यापलीकडे जाता येत नाहीं.

* शॉ

कलेसाठीं कला असती तर मी अेक वाक्यहि लिहूं शकलों नसतो.

– सोन्याचीं कमळें बनविणारे पुष्कळ असतात. परन्तु त्यांत सुगन्ध निर्माण करण्यांत फक्त चतुर ब्रह्मदेवच समर्थ असतो.

* प्रा. वनहट्टी

साहित्य हे रंजनाचें साधन आहे; ही भावना हळू हळू सोडन देवून तें उन्नतीचे साधन आहे ही कल्पना दृढ केली पाहिजे.

* म. पैगंबर

परमेश्वराच्या सिंहासनाखालीं खजिनें भरलेले असून त्याच्या किल्ल्या म्हणजे कवींच्या जिव्हा होत.

* खलील जिब्रान

स्त्रीहृदय जाणणारा, प्रतिभेच्या सौन्दर्याचें पृथकरण करणारा अथवा शांतीदेवतेच्या गूढ रहस्यावर प्रकाश टाकणारा मनुष्य तुम्ही पाहिला आहे काय ? वेळेवर न्याहारी करण्याकरितां गोड स्वप्नांतून जागे होण्याचीं संवय त्या अिसमाच्या अंगवळणी पडून गेली असावी.

तुम्हाला लेखक होण्याची खरीखुरी अिच्छा आहे का ? अशीं अिच्छा माणसांच्या मनांत कां अुत्पन्न होतें, देव जाणे ? पण तुम्हांला लेखक व्हावयाचें असेल तर तुमच्यापाशीं ज्ञान हवे, कला हवी, जादू हवी ! शब्दा-शब्दांतल्या संगीताचें ज्ञान तुम्ही पैदा केलें पाहिजे. तुमच्या कलेचा प्रत्येक पदन्यास अकृत्रिम वाटला पाहिजे. आपल्या वाचकावर प्रेमाचा वर्षाव करण्याची जादू तुम्हाला साध्य झाली पाहिजे.

अेकाद्या कवितेचें प्रत्यक्ष लेखन करण्याची शक्ति आणि अेकाद्या मनांत घोळणा-या काव्य कल्पनेचा आनन्द या दोन्हींत निवड करण्याची पाळी आली तर मी दुसरीच गोष्ट नेहमी पसन्त करीन. मात्र माझी निवड नेहमींच चुकीची असतें असें तुमच्या प्रमाणेंच माझ्या शेजाऱ्याचेंहि मत आहे.

कविता म्हणजे मनुष्यानें व्यक्त केलेले आपलें अेकादें मत नव्हे, रक्तबंबाळ जखमेंतून अुगम पावणारे किंवा हंसणाऱ्या मुखांतून प्रकट होणारें तें अेक गीत आहे.

स्फूर्ति नेहमीं गात असते. ती कधी भाष्य करीत नाहीं.

* काणे

शास्त्रज्ञ हा साधारणपणें जेवढा कलाहीन समजला जातो तेवढा कलाहीन कधींच नसतो. अुलट खरा शास्त्रज्ञ अुच्च प्रतीचा कलावन्त असतो. अितकेंच नव्हें तर कांही बाबतींत कलाकारहुनहि श्रेष्ठ असतो.

– आंब्याच्या मोहोराला लाजविणारे शब्द, ज्याच्या पुढ कोकिळ-कुजित कटु वाटेल असें नादमाधुर्य, आम्रतरुच्या घनदाट छायेप्रमाणें भासणारी काव्यरचना आणि आम्रफळाप्रमाणें मधून मधून लटकलेल्या सुन्दर कल्पना यांनीं नटलेली कविता वाचकाला वासन्तिक आनन्द देण्याला निःसंशय समर्थ आहे.

* काव्यविहारी

काव्य म्हणजे वस्तुस्थितीवर कल्पनेनें चढवलेला सौन्दर्याचा साज.

* खाण्डेकर

वाङ्मय काय किंवा जीवन काय दोहोंतहि काव्य आणि तत्त्वज्ञान यांच्या जोडीनें जेव्हां खराखुरा तर्क व्यवहार प्रतिबिम्बित होतो तेव्हांच त्याच्यांत सर्वस्पर्शी आकर्षणाचें सामर्थ्य निर्माण होतें.

काव्य हे व्यवहाराच्या अनुभवानें गोठतें आणि मग त्याचं तत्त्व-ज्ञान बनतें.

* वर्डस्वर्थ

कविता हें सर्व ज्ञानपुष्पाचें अत्तर आहे.

* चॅपिन

कविता म्हणजे हृदयांतील अगम्य सत्याचें प्रकटीकरण. खरा कवि हा द्रष्टा आहे.

* गोल्डस्मिथ

ज्यावेळीं मी एकादी सुन्दर कलाकृति वाचतो त्यावेळीं अेकमित्र मिळाल्याचा आनन्द मला होतो. आणि तेंच पुस्तक मीं जेव्हां पुन्हां वाचतो त्यावेळीं जुन्या मित्राला भेटण्याचा आनन्द मला होतो.

– पाण्यांत साखर विरघळताच पाणी गोड होतें. परन्तु साखर दिसत नाहीं. तशीच खरीं कलाहि जीवन आनन्दमय करते परन्तु तिचं अस्तित्व भासत नाहीं.

* खलील जिब्रान

स्त्रीहृदय जाणणारा, प्रतिभेच्या सौन्दर्याचें पृथकरण करणारा अथवा शांतीदेवतेच्या गूढ रहस्यावर प्रकाश टाकणारा मनुष्य तुम्ही पांहिला आहे काय ? वेळेवर न्याहारी करण्याकरितां गोड स्वप्नांतून जागे होण्याचीं संवय त्या अिसमाच्या अंगवळणी पडून गेली असावी.

तुम्हाला लेखक होण्याची खरीखुरी अिच्छा आहे का ? अशीं अिच्छा माणसांच्या मनांत कां अुत्पन्न होतें, देव जाणे ? पण तुम्हांला लेखक व्हावयाचें असेल तर तुमच्यापाशीं ज्ञान हवे, कला हवी, जादू हवी ! शब्दा-शब्दांतल्या संगीताचें ज्ञान तुम्ही पैदा केलें पाहिजे. तुमच्या कलेचा प्रत्येक पदन्यास अकृत्रिम वाटला पाहिजे. आपल्या वाचकावर प्रेमाचा वर्षाव करण्याची जादू तुम्हाला साध्य झाली पाहिजे.

अेकाद्या कवितेचें प्रत्यक्ष लेखन करण्याची शक्ति आणि अेकाद्या मनांत घोळणा-या काव्य कल्पनेचा आनन्द या दोन्हींत निवड करण्याची पाळी आली तर मी दुसरीच गोष्ट नेहमी पसन्त करीन. मात्र माझी निवड नेहमींच चुकीची असतें असें तुमच्या प्रमाणेंच माझ्या शेजाऱ्याचेंहि मत आहे.

कविता म्हणजे मनुष्यानें व्यक्त केलेले आपलें अेकादें मत नव्हे, रक्तबंबाळ जखमेंतून अुगम पावणारे किंवा हंसणाऱ्या मुखांतून प्रकट होणारें तें अेक गीत आहे.

स्फूर्ति नेहमीं गात असते. ती कधी भाष्य करीत नाहीं.

* काणे

शास्त्रज्ञ हा साधारणपणें जेवढा कलाहीन समजला जातो तेवढा कलाहीन कधींच नसतो. अुलट खरा शास्त्रज्ञ अुच्च प्रतीचा कलावन्त असतो. अितकेंच नव्हें तर कांही बाबतींत कलाकारहुनहि श्रेष्ठ असतो.

– आंब्याच्या मोहोराला लाजविणारे शब्द, ज्याच्या पुढ कोकिळ-कुजित कटु वाटेल असें नादमाधुर्य, आम्रतरुच्या घनदाट छायेप्रमाणें भासणारी काव्यरचना आणि आम्रफळाप्रमाणें मधून मधून लटकलेल्या सुन्दर कल्पना यांनीं नटलेली कविता वाचकाला वासन्तिक आनन्द देण्याला निःसंशय समर्थ आहे.

* काव्यविहारी

काव्य म्हणजे वस्तुस्थितीवर कल्पनेनें चढवलेला सौन्दर्याचा साज.

* खाण्डेकर

वाङ्मय काय किंवा जीवन काय दोहोंतहि काव्य आणि तत्त्वज्ञान यांच्या जोडीनें जेव्हां खराखुरा तर्क व्यवहार प्रतिबिम्बित होतो तेव्हांच त्याच्यांत सर्वस्पर्शी आकर्षणाचें सामर्थ्य निर्माण होतें.

काव्य हे व्यवहाराच्या अनुभवानें गोठतें आणि मग त्याचं तत्त्वज्ञान बनतें.

* वर्डस्वर्थ

कविता हें सर्व ज्ञानपुष्पाचें अत्तर आहे.

* चॅपिन

कविता म्हणजे हृदयांतील अगम्य सत्याचें प्रकटीकरण. खरा कवि हा द्रष्टा आहे.

* गोल्डस्मिथ

ज्यावेळीं मी एकादी सुन्दर कलाकृति वाचतो त्यावेळीं अेकमित्र मिळाल्याचा आनन्द मला होतो. आणि तेंच पुस्तक मीं जेव्हां पुन्हां वाचतो त्यावेळीं जुन्या मित्राला भेटण्याचा आनन्द मला होतो.

– पाण्यांत साखर विरघळताच पाणी गोड होतें. परन्तु साखर दिसत नाहीं. तशीच खरीं कलाहि जीवन आनन्दमय करते परन्तु तिचं अस्तित्व भासत नाहीं.

* तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी

मूल्यांच्या जिवंत संघटनेचा प्रत्यक्ष प्रत्यय म्हणजेच कला होय.

– जीवनाची स्वच्छता हीच सर्वोत्कृष्ट व परमोच्च कला होय.

– कलेला उपयुक्ततेपासून वेगळी काढता येणार नाहीं. कलेला बुध्दीची आणि हृदयाची जरूरी आहे.

* म. गान्धी

सर्व प्रकारची अुच्च कला म्हणजे आत्म्याचें प्रगटीकरण.

कला अशी पाहिजे की जो लाखो लोकांशीं बोलू शकेल.

ज्या कलेच्या योगानें आत्मनिरीक्षण करण्यास मदत होअील तीच कला खऱ्या योग्यतेची आहे.

★ ★

## २० : काव्य-कवि

* जोसेफ मॅझिनी

कविता ही चेतना आहे. कविता ही गति आहे. कविता ही कृतिचें अन्तस्तेज आहे. भविण्याचा मार्ग प्रकाशित करणारी ती चान्दणी आहे. घोर अरण्यांतून पलीकडे जाणाऱ्या वाटसरूस वाट दाखविणारी ती ज्वलद्दीपिका आहे.

– कवि सृष्टीचा अलंकार । कवि लक्ष्मीचा शृंगार ।
सकळ सिद्धीचा निर्धार । ते हे कवि ।
कवि सभेचे मण्डन । कवि भाग्याचे भूषण ।
नाना सुखाचें संरक्षण । ते हे कवि ।

* गडकरी

प्रीतिदेवीच्या पायांमधला कवि घुंगुरवाळा.

* विनायक

काव्यें कवीचीं जगतात गावीं ।
त्याचें न त्याच्या परि चोज गांवीं ।
राष्ट्रें बुडालीं, नृप थोर गेले ।
नदी, कवी, मात्र अनन्त ठेले ।

— काव्य म्हणजे भावनांचा खळाळीं सारखा बाहेर पडणारा उद्‌गार !

* अच्युतराव कोल्हटकर

कवि हे कितीहि थोर असले तरी राष्ट्राचे अलंकार होत. राष्ट्राचे प्राण नव्हेत.

* ज्ञानेश्वर

जैसे अंगाचेनि सुन्दरपणें । लेणिया अंगचि होय लेणें ।
तेथ अलंकारिले कवणकवणें । हे निर्वचेना ।

* बी

काव्य अगोदर झालें, नन्तर जग झालें ! सुन्दर रामायण आधि, मग झाला राम.

* चन्द्रशेखर

जें जें दिव्य उदात्त उज्वल असें हेलावतें तें मनीं ।
धन्या ती कविता भवतिहि जनां जी वृत्ति दे उन्मनीं ।

माडखोलकर

काव्य हे प्रतिभेचें नर्तन आहे.

* शरच्चंद्र

कवि हा कांहीं न्यायाधीश नाहीं.

* तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी

मूल्यांच्या जिवंत संघटनेचा प्रत्यक्ष प्रत्यय म्हणजेच कला होय.

– जीवनाची स्वच्छता हीच सर्वोत्कृष्ट व परमोच्च कला होय.

– कलेला उपयुक्ततेपासून वेगळी काढता येणार नाहीं. कलेला बुध्दीची आणि हृदयाची जरूरी आहे.

* म. गान्धी

सर्व प्रकारची अुच्च कला म्हणजे आत्म्याचें प्रगटीकरण.

कला अशी पाहिजे की जो लाखो लोकांशीं बोलू शकेल.

ज्या कलेच्या योगानें आत्मनिरीक्षण करण्यास मदत होअील तीच कला खऱ्या योग्यतेची आहे.

★ ★

## २० : काव्य-कवि

* जोसेफ मॅझिनी

कविता ही चेतना आहे. कविता ही गति आहे. कविता ही कृतिचें अन्तस्तेज आहे. भविष्याचा मार्ग प्रकाशित करणारी ती चान्दणी आहे. घोर अरण्यांतून पलीकडे जाणाऱ्या वाटसरूस वाट दाखविणारी ती ज्वलद्दीपिका आहे.

– कवि सृष्टीचा अलंकार। कवि लक्ष्मीचा शृंगार।  
सकळ सिद्धीचा निर्धार। ते हे कवि।  
कवि सभेचे मण्डन। कवि भाग्याचे भूषण।  
नाना सुखाचें संरक्षण। ते हे कवि।

* गडकरी

प्रीतिदेवीच्या पायांमधला कवि घुंगुरवाळा.

* विनायक

काव्यें कवीचीं जगतात गावीं ।
त्याचें न त्याच्या परि चोज गांवीं ।
राष्ट्रें बुडालीं, नृप थोर गेले ।
नदी, कवी, मात्र अनन्त ठेले ।

– काव्य म्हणजे भावनांचा खळाळीं सारखा बाहेर पडणारा उद्‍गार !

* अच्युतराव कोल्हटकर

कवि हे कितीहि थोर असले तरी राष्ट्राचे अलंकार होत. राष्ट्राचे प्राण नव्हेत.

* ज्ञानेश्वर

जैसे अंगाचेनि सुन्दरपणें । लेणिया अंगचि होय लेणें ।
तेथ अलंकारिले कवणकवणें । हे निर्वचेना ।

* बी

काव्य अगोदर झालें, नन्तर जग झालें ! सुन्दर रामायण आधि, मग झाला राम.

* चन्द्रशेखर

जें जें दिव्य उदात्त उज्वल असें हेलावतें तें मनीं ।
धन्या ती कविता भवतिहि जनां जी वृत्ति दे उन्मनीं ।

* माडखोलकर

काव्य हे प्रतिभेचें नर्तन आहे.

* शरच्चंद्र

कवि हा कांहीं न्यायाधीश नाहीं.

खुनाच्या खटल्यांत जज्जसाहेब जेव्हां हतभागी अपराध्याला फांशीची शिक्षा देतो, त्यावेळीं तो न्यायाधीश असतो. परंतु अपराध्याच्या दुर्बळतेची जाणीव होवून तो जेव्हां शिक्षा कमी करतो तेव्हां तो कवि असतो.

कवि केवळ सृष्टि निर्माण करतो असं नाहीं. तर तो सृष्टींचं रक्षणहि करतो. जें स्वभावतः सुन्दर त्याला अधिक सुन्दर करून प्रकट करणं हें जसं त्याचं अेक कर्तव्य आहे तसंच जें सुन्दर नाहीं त्याला असुन्दराच्या हातून वांचविणं हें देखिल त्याचं एक कर्तव्यच आहे.

वाअीटाच्या विरुध्द अत्यन्त तिरस्कार जागृत करणं हे देखिल कवीचं कर्तव्य आहे. परन्तु चांगल्या संबंधांनं अतिशय लोभ जागृत करणं हें त्यापेक्षांही मोठं आणि स्पृहणीय काम नाहीं काय ?

* ॲनन

कवि हा जन्मतःच कवि असतो. तो बनवून तसा होत नाहीं.

* शेली

जो अन्धाऱ्या रात्रीं एकटाच बसून आपल्याच अेकान्तवासाला सोबत म्हणून गाणारा नाअिटिंगेल पक्षी म्हणजेच कवि होय.

* वर्डस्वर्थ

अनिवार्य भावनेचा सहजस्फूर्त उद्रेक म्हणजेच काव्य.

★ ★

## २१ : कल्पना

* चरित्रहीन

निव्वळ कल्पना कांहीं करूं शकली तरी त्यांत प्राण भरूं शकणार नाहीं. पुस्तकांत ती ठीक; पण मार्ग दाखवू शकणार नाहीं.

– परकीय लोकांच्या वर्चस्वापेक्षां परकीय लोकांच्या कल्पनेचे वर्चस्व शतपट हानीकारक असतें.

* जॉनसन

राजकुमारीच्या बाहुपाशांत जेवढं सुख, तितकंच सुख साध्या मोलकरणीच्या बाहुपाशांत मिळतं, तें केवळ कल्पनेमुळेंच नव्हे काय?

* शेक्सपिअर

मूर्ख मनुष्य, कवि आणि प्रेमि हे कल्पनेनें भारलेले असतात.

★ ★

## २२ : कर्तृत्व

* हेडगेवार

कर्तृत्वाला कल्पकतेची जोड मिळाली म्हणजे अद्‌भुत कार्यें घडतात.

– दैवाधीन कुळी जन्म । मदाधीनचि पौरुष ।
– जया अंगीं मोठेपण । तया यातना कठीण ।

* माडखोलकर

बुध्दिमान आणि कर्तबगार माणसाला व्यसनें हीं जरूर राहणार.

* ठेंगणें अस्मान

पुरुषाचं सौन्दर्य कर्तृत्वांत असतें. पोषाखांत नसतें.

* विचार पोथी

कर्तृत्वहीनतेपेक्षा कर्तृत्वश्रेष्ठ; पण कर्तृत्वापेक्षांहि अकर्तृत्व श्रेष्ठ.

* संसार शकट

अन्नवस्त्रांतील सुखापेक्षां स्वतःच्या कर्तबगारींतील, पराक्रमांतील सुखांत मनुष्य जास्त आनन्द घेतो.

– कराग्रे वसति लक्ष्मी ।

– नर करणी करे, तो नर का नारायण बन जाय ।

– कर्तृत्वाच्या विश्वासावर
सदैव आम्ही राहूं निर्भर ।
नैराश्याचें अेकूं न येईल
यापुढती तुणतुणें
यशानें दुमदुमवूं त्रिभुवनें ।

* कुसुमाग्रज

सरणांवरतीं आज आमुचीं पेटतांच प्रेतें ।
उठतिल त्या ज्वालांतुनि भावी क्रान्तीचें नेते ।

★ ★

## २३ : कायदा

* ना. ह. आपटे

कायदा आंधळा, नीति पांगळी आणि समाज बहिरा !

* माडखोलकर

कायदा हा शासनासाठीं आहे; संरक्षणासाठीं नव्हे.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ८७६९

* शेक्सपिअर

तुम्ही श्रीमंत व्हावे असा जगामध्ये कोणताहि कायदा नाहीं. तर मग गरीब तरी कां व्हावे ? आणि कायदे कां मोडू नयेत ?

* जीवन दर्शन

कायदे करण्यापेक्षां कायदे मोडण्यांतच खरा आनन्द असतो.

* थॉमस कुलर

नव्वद टक्के मालकी कायद्याची असते.

* न्यु टेस्टॅमेण्ट

माझ्या अिच्छेला येअील तेंच करणें तें कायदेशीर नव्हे.

* थोरो

प्रत्येक मूर्खाला कायदे करतां येतात.

* बर्नार्ड शॉ

सर्वोत्कृष्ट कायदा म्हणजे कायदा नसणें हेंच होय.

★ ★

## २४ : काळ

— पैशापेक्षांही वेळ काटकसरीनें खर्च करा. गमावलेली वेळ पुन्हा कधींच परत येत नाहीं. मोठे लोक नेहमींच वेळेच्या बाबतींत चिक्कू असतात. जॉर्ज स्टीफनसन् आपल्या रिकाम्या वेळेला सोनें समजत होता.

— वर्तमान काळाचा जास्तींत जास्त उपयोग करून घ्यावा.

— परमेश्वर एकावेळीं एक क्षण देतो. दुसरा क्षण देण्यापूर्वी तो पहिला क्षण काढून घेतो.

— वेळ गमावणें म्हणजे शक्ति गमावणें.

* यदुनाथ थत्ते

वेळ गमावणें म्हणजे आपल्या आयुष्यांतील सर्व संधी गमावणें.

* लॅफाटेन

मुख्य गोष्ट म्हणजे वेळींच जागे होऊन कामाला सुरुवात करणें ही होय.

* कार्लाईल

"हळू, हळू" च्या मार्गानें जाणारा मनुष्य 'अशक्यता' "अपशय" याच्याच मुक्कामाला जाऊन पोहोंचतो.

* थत्ते

जो वेळेवर जय मिळवितो तो जगावरहि जय मिळवील. जें काम आतां होईल तेंच होईल. आजचें काम आजच होईल. उद्याच्या कामांत यामुळें अडचण येणार नाहीं.

वेळेवर काम करायचीं संवय ठेवा. कांहीं करायचें असेल तर तें तत्काळ करा. शुभस्य शीघ्रं !

* बाबा भिडे

सूर्याइतका वक्तशीरपणा आणा.

* माझें रामायण

काळ हा सर्व भक्षकहि नाहीं व सर्वरक्षकहि नाहीं. तो फक्त द्रष्टा आहे. सृष्टींत चाललेल्या घडामोडीचें यथार्थ वर्णन करणारा तो अत्यन्त निःपक्षपाती इतिहासकार आहे.

* केशवसुत

प्राप्तकाळ हा विशाळ भूधर ।
सुन्दर लेणीं तयांत खोदा ।

निजनामें त्यांवरतीं नोन्दा ।
बसुना कां वाढवितां मेदां ?
विक्रम कांहीं करा, चला तर ।

* भा. रा. ताम्बे

काळाच्या गर्भान्त असति ज्या अज्ञात घटि अजुनी ।
तयांकडें बघ सख्या, अतां तूं आशाळू नयनी ।

* घे धुउनि गंगेंत वाहत्या हात तूंहि रंगुनी
पळाचा काय भरवसा तरी ? उद्याची काय रे कळे गती ।।

– दीर्घ सूत्री विनश्यति ।

* केशवसुत

दिवस बोलतो । उठाझणीं ।
रात्र विसांवा । घ्या म्हणते ।

* दादा धर्माधिकारी

वेळ कुठलीच शुभ नसतें किंवा अशुभ नसते. माणूस आपल्या पराक्रमानें एकाद्या वेळेला महत्त्व आणून देतो.

* समर्थ

बळें लागला काळ हा पाठिलागीं ।

* जिवा, कर्मयोगें जनीं जन्म झाला ।
परी शेवटीं काळमूखीं निमाला ।
महाथोर तें मृत्युपन्थेंचि गेले ।
किती एक ते जन्मले आणि मेले ।

* मरे एक त्याचा दुजा शोक वाहे ।
अकस्मात तोहि पुढें जात आहे ।

* घडीनें घडी काळ आयुष्य नेतो ।

* भ. महावीर

नदीवरील लाटा कदाचित् फिरून उत्पन्न होतील पण मनुष्याचें नष्ट झालेलें रूप, बळ, लावण्य आणि सौन्दर्य कधीं परत येत नाहींत.

* वि. स. खाण्डेकर

काळासारखा धन्वन्तरी दुसरा कोणीच नाहीं. दुभंगलेले हृदय कसें जोडावें आणि वठलेले झाड कसें पालवावें, हें त्यालाच कळत असतें.

* पेण्डसे

फेंक भविष्य फसवें, हातीं ठेव वर्तमान
ऐकलेस कां दूरचे, पडघमाचें आव्हान ?
काळ सरकतो पायाखालीं ।
कण कण जणुंही वाळु चालली ।

* विश्वाच्या आकाश दिव्यांतिल ।
सूर्यगोल ही दीपक ज्योती ।
अन्धुक आपुल्या विविध आकृत्या ।
तिच्याभोवतीं ये-जा करिती ।

* पु. य. देशपांडे

काळाच्या प्रवाहांत ज्यांनीं ज्यांनीं काळावर मात केली त्यांनीं आपला न्याय अंमलांत आणला. ज्यांचें बळ त्याचा काळ आणि ज्यांचा काळ त्यांचा न्याय.

* विनोबा

सर्वच प्रश्न सोडवून सुटणारे नसतात. कांहीं प्रश्न सोडून दिले कीं सुटतात.

* नेपोलियन

ज्या ज्या दिवशीं आपली थोडीसुद्धां प्रगति झाली नसेल तो आपला दिवस फुकट गेला असें समजावें.

– म्हातारपण व मृत्यु यांच्या वेगवान प्रवाहांत वाहात जाणाऱ्या जीवांना धर्म हा दीपगृहासारखा आहे. धर्माचरणानेंच उत्तम प्रतिष्ठा व सद्गति लाभते.

अनुक्रमांक 22209 नि: निबंध
क्रमांक ... 9998 नों. दि: 22/9/56

महाभारत

चांगल्या संवयींसाठीं वाढदिवसाचा मुहूर्त नको किंवा चारित्र्य सुधारण्यासाठीं नव्या वर्षाची पर्वणी नको. दैनन्दिन जीवनांतच तुमच्या चारित्र्याची घडण होत असतें.

– एखादे अत्यंत महत्त्वाचें नि वैशिटयपूर्ण कार्य करावयाचें असेल तर त्यासाठीं दोन गोष्ठींची आवश्यकता असते. पहिली आवश्यक गोष्ट म्हणजे निश्चित योजना आणि दुसरी अपुरा वेळ. वेळ भरपूर असला कीं, योजना पुन्हा अनिश्चित झालीच म्हणून समजा.

फोमा

मृत्यू आहे म्हणूनच जीवनसागराचं पाणी खराब होत नाहीं.

आचार्य प्रफुल्लचंद रा

रिकाम्या वेळींहि माणसानें कांहींना कांहीं कामगिरी करावी.

टेनिसन

घणघण घण्टा नाद होवू द्या
जातें वर्ष खुशाल जावू द्या
जुनें तें जुनें खूशाल जावू द्या
आणि नव्याचा रे सत्कार करा।

शेक्सपिअर

उद्याची निर्मिती–मूर्खांसाठीं–मृत्यूसाठीं–

कवि यशवन्त

असेल काळाहातीं मरणें, परि आमुच्या हातीं जगणें।

– माणसाचें श्रम वांचविण्याकरितां अनेक यंत्रांचा शोध लागला आहे. परंतु ' उद्यां ' हा शब्द आपले श्रम वांचविण्याच्या बाबतींत सर्वांत जास्त उपयोगी आहे.

* डॉ. राधाकृष्णन्

शतकांनीं इतिहास बनतो. पण अशीं कित्येक शतकें रुढी पाडण्यासाठीं खर्ची पडतात.

* प्रफुल्लचन्द्र

परमेश्वराची अत्युच्च देणगी म्हणजे वेळ. त्याचा उत्तम उपयोग करा.

* कोलरिज

जें होतें नि जें आहे यांत केवढा फरक !

* सेसिल डे लीविस

आम्ही प्रवासी आहोंत, ज्या रस्त्यानें आम्ही जातो, त्या रस्त्यालाच आम्हीं नटवतो. आम्ही थांबतो, स्थिरावतो परंतु काळाच्या प्रवाहावरील पिसाप्रमाणें आम्ही आहोंत.

* कॉंग्रीव्ह

'उद्यां' म्हणून तुम्ही निष्कारण वेळ घालवूं नका. कारण उद्यांचा सूर्य कदाचित तुमच्यासाठीं उगवणारहि नाहीं.

* अिमर्सन

जीवन म्हणजे आश्चर्याची मालिकाच. उद्यांचा रागरंग आपणांस आज कधींच समजत नसतो.

वी. सँव्हॅरिन

कधींच न करण्यापेक्षां उशीरानें कां होईना, केलेलें बरें.

युरिपिडस्

काळ हा पुढच्या पिढीला आजच्या वस्तू जाताच उघडें करील.

विवेकानन्द

सन्तानीं भूतकाळाकडे व पाप्यांनीं भविष्यकाळाकडे नजर ठेवावी.

* होरेस

जें आज अन्धारांत आहे, त्यांवर काळच प्रकाश पाडील. आणि जें आज ऐश्वर्यानें चकाकत आहे तें झांकूनहि ठेवील.

* सुभाषित

जो स्वतः महेश आहे, ज्याचा सासरा नगेश (हिमालय) आहे, ज्याचा मित्र धनेश (कुबेर) आहे, ज्याचा पुत्र गणेश आहे, तो शंकर मात्र भिक्षेकरी असावा ना ?

* ओल्ड टेस्टॅमेन्ट

प्रत्येक कृतीला कारण असतं. तसेंच काळहि असतो. जन्मायला, मरायला, अंकुरित करायला, परिपक्व व्हायला व परिपक्व झालेले तोडायला विशिष्ट काळच यावा लागतो.

★ ★

## २५ : कृति

* रामदास

क्रियेवीण वाचळता व्यर्थ आहे.

* साने गुरुजी

प्रत्येक कृतीवर प्रेमाचें अन्तर ओतीत जा.

* यदुनाथ थत्ते

मनापासून प्रयत्न करणाराला सर्व साध्य आहे.

जगाला दाखवून द्या की तुमच्याशिवाय तें काम होणं शक्यच नाहीं.

* केशव नाईक

आपली स्थिति सुधारण्यासाठीं कृति सुधारा.

* कृ. चिपळूणकर

सुकृति कोण ? जयाचे परोपकारीं शरीर नित्य झिजे ।
पापी कोण म्हणावा ? जो पीडा देउनि परास रिझे ।

* रामदास

केल्यानें होत आहे रे, आधीं केलेचि पाहिजे ।
यत्न तो देव जाणावा, अन्तरी धरितां बरे ।

* मॉम

करावें तसें भरावें यासारखीं खोटी म्हण दुसरी कोणतीच नसेल. कारण सर्वनाशास कारणीभूत होणाऱ्या गोष्टीं सदैव करणा-या व्यक्ती शेवटीं यशस्वीच ठरतात असा अनुभय आहे.

★ ★

## २६ : काम

* जॉनसन

मोठमोठीं कामें ही ताकदीनें केली जात नाहींत तर ती सहन-शक्तीनें होतात.

* गटे

अर्धातास रिकामें बसण्यापेक्षां कोणतेंहि काम केलेलें अधिक बरें.

* टेलर

मोह हा क्वचितच कामाच्या वेळीं उत्पन्न होत असतो. विश्रांतीच्या वेळींच काय तें माणसें त्यास बळी पडतात.

* व्होल्टेअर

वाद न घालतां काम करूं या. जीवन सह्य करण्याचा हाच एकमेव उपाय आहे.

जीवन समृद्ध होण्यासाठीं खालील गोष्टीं करा–

(१) कमीत कमी वचनें द्या. (२) सत्य बोला. (३) निन्दा करूं नका. (४) सुसंगत धरा किंवा संगत करू नका. (५) शब्द पाळा. (६) सट्टा करूं नका. (७) मद्य पिऊं नका. (८) शील संवर्धन करा. (९) गुपितें स्वतः जवळ ठेवा. (१०) उसनवारी करूं नका. (११) स्वतःच्या पायावर उभें राहिल्याशिवाय लग्न करूं नका. (१२) स्वतः निष्पाप रहा. (१३) बोलतांना दुसऱ्याचा चेहरा निरखा. (१४) श्रीमंत होण्याची घिसाड घाई करूं नका. (१५) अन्थरूण पाहून पाय पसरा. (१६) म्हातारपणीं खर्च करतां यावा म्हणून तरुणपणीं पैसे वांचवा. (१७) आपण टिकणार नाहीं या भीतीनें मोह टाळा. (१८) कर्जमुक्त होण्यासाठीं मार्ग माहित असेल तरच कर्ज काढण्याचें धाडस करा. (१९) लहानसहान पण सातत्य-पूर्ण असा फायदा मिळवा. (२०) चांगलें संभाषण आणि चांगलीं संगत म्हणजेच सद्गुण समजा. (२१) स्वतःच्या कृत्यामुळेंच फक्त तुमच्याच स्वभावगुणावर चिडा. (२२) जर तुमच्याविषयीं कोणी वाईट बोलेल, तर ऐकणारास विश्वास न वाटेल अशीं तुमची वागणूक ठेवा. (२३) झोपतांना दिवसाचा आढावा घ्या. (२४) आळस टाका. जर उद्योग नसेल तर मन सुधारा. (२५) वरील हे सर्व नियम उठल्याबरोबर सकाळीं लक्षपूर्वक वाचा.

कामांत वेळ घालवा. यशाची ती गुरुकिल्ली आहे.

★ ★

## २७ : कृत्रिमता

* तुकाराम

तांबियाचें नाणें न चळे खऱ्या मोलें । जरि हिंडवले देशोदेशीं ।

* लाओ-त्से

लोक जितके अधिक हुशार आणि कारगीर तितक्या कृत्रिम गोष्टी जास्त.

* शेषप्रश्न

– अनुकरण म्हणजे नुसती बाहेरची नक्कल. आकृति जुळली तरी प्रकृतीशी मेळ पटत नाहीं.

– आदर्शाचे अनुकरण करावयाचें म्हणजे त्याचे गुण आपल्या जीवनांत आणण्याचा प्रयत्न करणें होय. त्यांची नक्कल करण्यानें त्यांचे अनुकरण होणार नाहीं.

* सी. जी. किलटन्

एखाद्या गोष्टीची नक्कल म्हणजे त्या गोष्टीची मनःपूर्वक केलेली स्तुतीच होय.

* अमर्सन

नक्कल म्हणजेच आत्महत्या.

★ ★

## २८ : कीर्ति

* माडखोलकर

नालस्ती ही कीर्तिची सांवली आहे.

जगांत पैशासाठीं जितक्या लबाड्या केल्या जातात, त्यापेक्षां जास्त लबाड्या कीर्तीसाठीं व नेतृत्वासाठीं केल्या जातात.

* साने गुरुजी

कीर्ति हें उद्याचें सुन्दर स्वप्न आहे. पण पैसा ही आजची भाकरी आहे.

* रामदास

मरावें परी कीर्तिरूपें उरावें.

* माधवानुज

वैभव म्हणजे काय तरी ? ज्योत दिव्यांची केवळ ते ।
फू करितां ती मावळते, तेज निघोनि जाय दुरी ।

* माडखोलकर

बुद्धिप्रधान मध्यम वर्गच केव्हांहि क्रांता घडवून आणीत असतो.

– लोकप्रियता ही विजयांतच निवास करीत असते.

* बायरन

सकाळीं मी उठलो. पहातों तों ख्यातनाम झालेला.

* इमरसन

जर एकादा मनुष्य आपल्या शेजाऱ्यापेक्षां चांगलें लिहूं शकेल, उपदेश करूं शकेल किंवा उंदराचा पिंजरा करूं शकेल तर लोक त्याच्या दारांशीं तो जंगलांत जरी राहिला तरी येतील.

* सॉक्रेटिस

शौर्याचा अर्क म्हणजे कीर्ति.

* स्पिनोझा

कीर्ति मिळवायची असेल तर, लोकांची लहर सांभाळण्यासाठीं आपण जगलें पाहिजे. त्याना नावडेल ते टाळा आणि आवडेल तसें वागा. हा कीर्तिचा दोषच होय.

* होरेस ग्रील

कीर्ति ही वाफ आहे. विस्मृति अमर आहे.

– उद्योगप्रियता, बुद्धिमत्ता व सातत्य यामुळेंच कीर्ति व सद्-भाग्य लाभते.

– जो दुस-याच्या मृत किर्तीवर आपलीं कीर्तिमन्दिरें उभारतो त्याची मला चीड आहे.

* गटे

लाकूड जळतें कारण त्यांमध्यें जळण्याजोग्या वस्तू असतात. तसेंच मनुष्य सत्कीर्ति सम्पादितो कारण त्या लायक गुण त्यांच्यामध्यें असतात.

* खलिल जिब्रान

विजयाची गीतें सर्वच कवि गातात. पण विजयाचा उन्माद माणसाच्या अध:पाताला कारणीभूत होतो. तो त्याची विकासाची शक्ति मर्यादित करतो.

* दम्भ, कीर्ति, मान । सुखें टाकितो थूकून ।

★ ★

## २९ : क्रान्ति

* जोफेस मॅझिनी

मोठमोठ्या क्रान्त्या तरवारीपेक्षां तत्त्वांनींच घडवून आणलेल्या असतात.

क्रांति शास्त्रांतील मुख्य मुख्य तत्त्वांपैकीं प्रसृति हें एक महत्त्वाचें तत्त्व आहे. प्रत्येक क्रांतीनें प्रथम आघात पद्धतीचेंच अवलम्बन केलें पाहिजे.

– क्रान्तीच्या जीवनाला ठार मारणारें थिल्लरपणासारखें दुसरें विष नाहीं.

* मॅझिनी

क्रांतीला आरंभ तरुणांकडून व मध्यम वर्गाकडूनच होतो.

उठावणीचा जय झाला म्हणजे क्रान्तीचा प्रारंभ होतो.

– क्रान्त्या आधीं मनामध्यें होतात, मगच व्यवहारांत उतरतात.

* मॅझिनी

करान्तिही समाजानें समाजासाठींच केली पाहिजे.

* माडखोलकर

क्रान्ति म्हणजे कालदृष्ट्या निरुपयोगी व हानीकारक ठरलेली जुनी स्थिति नष्ट करून तिच्या जागी कालोचित अशी नवी स्थिति निर्मिणें. क्रांन्तीचें कार्य विध्वंसक व विधायक असें दुहेरी असतें.

* ताम्बे

पाड सिंहासनें दुष्ट ही पालथी,
ओढ हत्तीवरूनि मत्त नृप खालती

मुकुट रङ्कास दे, करटि भूपांप्रती
झाड खट्‌खट्‌ तुझें खड्ग क्षुद्रा !

* कुसुमाग्रज

गर्जा जयजयकार क्रान्तीचा गर्जा जयजयकार
अन वज्राचें छातीवरती ध्या झेलून प्रहार

* अनिर्वन्ध जीवन

भुकेनें कासावीस झालेले पोट नि अन्यायानें तडफडणारें मन यांतूनच क्रान्तीचा जन्म होतो.

* जयप्रकाश नारायण

रक्तलांछित क्रान्तीत प्रतिक्रान्तीचीं बीजें दडलेलीं असंतात आणि अनुकूल सन्धी मिळताच त्याला दवलेल्या रोगाप्रमाणें कोंब फुटूं लागतात. इतिहासाची साक्ष अशी आहें कीं, आपल्यांत लागेल तेवढें वाह्य परिवर्तन जरी झालेलें असलें तरी आंतून जोपर्यन्त वाईटांचीं-मुळें नष्ट होत नाहींत तोपर्यन्त शोषणाचा नाश होऊं शकणार नाहीं.

* शेलें

क्रान्तीमुळें मिळालेला विजय हा युद्धामुळें मिळालेल्या विजयापेक्षां स्थिर आणि दृढ विजय होय.

* जॉर्ज वाशिंग्टन

क्रान्तीमुळें सुख होते कीं दुःख होतें हे लोकांच्या वागणुकीवरून ठरेल.

* विनोबा

गौतमबुद्ध, महावीर, जनक आणि महात्मा गान्धी यांच्या या भूमीमध्यें भूदान यज्ञांतून रक्तहीन क्रान्ति होईल यांत मला कांहीहि संदेह वाटत नाहीं.

* गोविंदाग्रज

उत्क्रान्तींत अिश्वरता आहे. कर्मशून्यतेंत किंवा उद्योगांत नाही.

– मानवी जीवन हें गतिमान असल्यामुळें कालचा क्रान्तिकारक आजचा सुधारक ठरतो. व आजचा सुधारक हा उद्याचा सनातनी होण्याचा संभव असतो.

– दुसऱ्याच्या स्वातंत्र्याच्या आड येत नाहीं तेंच खरे स्वातंत्र्य.

– क्रान्ति ही स्वप्नाळू रसिकांच्या सुगन्धी फुलांना भाळणारी देवता नाहीं. त्यागी भक्तांच्या सर्वस्व दानानें उफाळणाऱ्या अग्नि ज्बाळाच तिला प्रसन्न करूं शकतात.

★ ★

## ३० . गति

* न्यायरत्न विनोद

गति ही अपरिहार्य आहे. प्र–गति न झाली तर पुच्छ प्रगति सुरु होते.

सदैवं गच्छति अिति जगत् ।

गति म्हणजेच प्रगति; हा भ्रम पाश्चिमात्य सस्कृतीचा विशेष आहे. आणि निष्क्रीयता म्हणजेच शान्ती हा पौर्वात्य दोष आहे.

दसऱ्याचें सीमोलंघन झाल्यावरच दीपवालींचें दर्शन होऊं शकतें.

* लोकमान्य टिळक

तुमच्यानें पुढें जाववत नसेल तर पुढें जाऊं नका. पण पुढें जाणाऱ्याला मागें खेंचू नका.

मुकुट रङ्कास दे, करटि भूपांप्रती
झाड खट्खट् तुझें खड्ग क्षुद्रा !

* कुसुमाग्रज

गर्जा जयजयकार क्रान्तीचा गर्जा जयजयकार
अन वज्राचें छातीवरती ध्या झेलून प्रहार

* अनिर्बन्ध जीवन

भुकेनें कासावीस झालेले पोट नि अन्यायानें तडफडणारें मन यांतूनच क्रान्तीचा जन्म होतो.

* जयप्रकाश नारायण

रक्तलांछित क्रान्तीत प्रतिक्रान्तीचीं बीजें दडलेलीं असतात आणि अनुकूल सन्धी मिळताच त्याला दवलेल्या रोगाप्रमाणें कोंब फुटूं लागतात. इतिहासाची साक्ष अशी आहे कीं, आपल्यांत लागेल तेवढें बाह्य परिवर्तन जरी झालेलें असलें तरी आंतून जोपर्यन्त वाईटांचीं मुळें नष्ट होत नाहींत तोपर्यन्त शोषणाचा नाश होऊं शकणार नाहीं.

* शेलें

क्रान्तीमुळें मिळालेला विजय हा युद्धामुळें मिळालेल्या विजयापेक्षां स्थिर आणि दृढ विजय होय.

* जॉर्ज वाशिंग्टन

क्रान्तीमुळें सुख होते कीं दुःख होतें हे लोकांच्या वागणुकीवरून ठरेल.

* विनोबा

गौतमबुद्ध, महावीर, जनक आणि महात्मा गान्धी यांच्या या भूमीमध्यें भूदान यज्ञांतून रक्तहीन क्रान्ति होईल यांत मला कांहीहि संदेह वाटत नाहीं.

* गोविंदाग्रज

उत्क्रान्तींत अिश्वरता आहे. कर्मशून्यतेंत किंवा उद्योगांत नाही.

— मानवी जीवन हें गतिमान असल्यामुळें कालचा क्रान्तिकारक आजचा सुधारक ठरतो. व आजचा सुधारक हा उद्याचा सनातनी होण्याचा संभव असतो.

— दुसऱ्याच्या स्वातंत्र्याच्या आड येत नाहीं तेंच खरे स्वातंत्र्य.

— क्रान्ति ही स्वप्नाळू रसिकांच्या सुगन्धी फुलांना भाळणारी देवता नाहीं. त्यागी भक्तांच्या सर्वस्व दानानें उफाळणाऱ्या अग्नि ज्वाळाच तिला प्रसन्न करूं शकतात.

★ ★

## ३० . गति

* न्यायरत्न विनोद

गति ही अपरिहार्य आहे. प्र–गति न झाली तर पुच्छ प्रगति सुरु होते.

सदैवं गच्छति अिति जगत् ।

गति म्हणजेच प्रगति; हा भ्रम पाश्चिमात्य सस्कृतीचा विशेष आहे. आणि निष्क्रीयता म्हणजेच शान्ती हा पौर्वात्य दोष आहे.

दसऱ्याचें सीमोलंघन झाल्यावरच दीपवालींचें दर्शन होऊं शकतें.

* लोकमान्य टिळक

तुमच्यानें पुढें जाववत नसेल तर पुढें जाऊं नका. पण पुढें जाणाऱ्याला मागें खेंचूं नका.

* डल्लेस

यश मोजण्याचें साधन म्हणजे तुमच्या पुढें दुस्तर अडचण आहे किंवा नाहीं हें नव्हे तर तुमच्यापुढें मागच्याच वर्षीची अडचण आहे किंवा नाहीं हें होय.

* म. गांधी

सुधारणा म्हणजे ज्याच्यामळें मनुष्य आपलें कर्तव्य बजावीत राहतो तें आचरण.

* साक्रेटीस

बौद्धिक स्वातंत्र्य संपादणें व धैर्यानें त्याचा उपयोग करणें हें प्रगतीचें मूळ होय.

* खलील जिब्रान

पायीं चालणाऱ्यांच्या बरोबर चालत जाण्यांतच मला आनंद आहे. रस्त्याच्या कडेला उभें राहून त्या चालणाऱ्या माणसांचीं चाल पाहाणारा प्रेक्षक होणें मला कधींच आवडणार नाहीं.

★ ★

## ३१ : गणित

* साने गुरुजी

ज्याचें गणीत चांगलें तो बुद्धिमान समजला जातो. जगांतील सारे तत्त्वज्ञ गणिती होते व सारे गणिती तत्त्वज्ञ होते.

* विचार पोथी

गणितासारखें शास्त्र नाहीं.

## ३२ : गरज

* तुकाराम

पोटापुरतें देई । मागणें लई नाहीं, लई नाहीं ॥ धृ० ॥
पोळी साजुक अथवा शिळी । देवा देई भुकेच्या वेळीं ।
वस्त्र नवें अथवा जुनें । देवा देई अंग भरून ।
देवा कळणा अथवा कोण्डा । आम्हां देई भुकेच्या तोण्डां ।

– गरजवन्ताला अक्कल नसते.

– अडला हरी । गाढवाचें पाय धरी ।

– गरज सरो । वैद्य मरो

* विनोबा

गरज ती खरी किंवा काल्पनिक, निवाडा अचूक कोण करी

* संयमाची मात्रा वाढवीत जावी
चाळणी करावी अहर्निशीं
गरजा अनेक आटोपतां येती
सोडिल्या सुटती क्रमें क्रमें.

– गरज हीच खरी शोधांची (नवनिर्मितीची) जननी होय.

* विचार पोथी

पोटभर अन्न आणि आंगभर वस्त्र ह्यापेक्षां अधिकाची गरज नाहीं.

आपल्या अन्नवस्त्रादि प्राथमिक गरजांचा भार दुसऱ्यावर टाकणारे गुलाम किंवा लुटारूलोक 'राष्ट्र' या संज्ञेस पात्र नाहींत.

* चरित्रहीन

ज्या सत्याचा माणूस प्रचार करतो, जरूरीच्या वेळीं त्याच सत्याचा तो मुलाहिजाही राखीत नाहीं.

* डल्लेस

यश मोजण्याचें साधन म्हणजे तुमच्या पुढें दुस्तर अडचण आहे किंवा नाहीं हें नव्हे तर तुमच्यापुढें मागच्याच वर्षींची अडचण आहे किंवा नाहीं हें होय.

* म. गांधी

सुधारणा म्हणजे ज्याच्यामळें मनुष्य आपलें कर्तव्य बजावीत राहतो तें आचरण.

* साक्रेटीस

बौद्धिक स्वातंत्र्य संपादणें व धैर्यानें त्याचा उपयोग करणें हें प्रगतीचें मूळ होय.

* खलील जिब्रान

पायीं चालणाऱ्यांच्या बरोबर चालत जाण्यांतच मला आनंद आहे. रस्त्याच्या कडेला उभें राहून त्या चालणाऱ्या माणसांचीं चाल पाहाणारा प्रेक्षक होणें मला कधींच आवडणार नाहीं.

★ ★

## ३१ : गणित

* साने गुरुजी

ज्याचें गणीत चांगलें तो बुद्धिमान समजला जातो. जगांतील सारे तत्त्वज्ञ गणिती होते व सारे गणिती तत्त्वज्ञ होते.

* विचार पोथी

गणितासारखें शास्त्र नाहीं.

## ३२ : गरज

* तुकाराम

पोटापुरतें देई । मागणें लई नाहीं, लई नाहीं ।। धृ० ।।
पोळी साजुक अथवा शिळी । देवा देई भुकेच्या वेळीं ।
वस्त्र नवें अथवा जुनें । देवा देई अंग भरून ।
देवा कळणा अथवा कोण्डा । आम्हां देई भुकेच्या तोण्डां ।

– गरजवन्ताला अक्कल नसते.

– अडला हरी । गाढवाचें पाय धरी ।

– गरज सरो । वैद्य मरो

* विनोबा

गरज ती खरी किंवा काल्पनिक, निवाडा अचूक कोण करी

* संयमाची मात्रा वाढवीत जावी
चाळणी करावी अहर्निशीं
गरजा अनेक आटोपतां येती
सोडिल्या सुटती क्रमें क्रमें.

– गरज हीच खरी शोधांची (नवनिर्मितीची) जननी होय.

* विचार पोथी

पोटभर अन्न आणि आंगभर वस्त्र ह्यापेक्षां अधिकाची गरज नाहीं.

आपल्या अन्नवस्त्रादि प्राथमिक गरजांचा भार दुसऱ्यावर टाकणारे गुलाम किंवा लुटारुलोक 'राष्ट्र' या संज्ञेस पात्र नाहींत.

* चरित्रहीन

ज्या सत्याचा माणूस प्रचार करतो, जरूरीच्या वेळीं त्याच सत्याचा तो मुलाहिजाही राखीत नाहीं.

महाभयंकर तहान लागली असतां माणूस गटारांतील काळकुट्ट घनदाट पाणीहि ओंजळीच्या ओंजळी भरून तोंडांत ओततो.

* ऑगस्टीन

गरज कायदा ओळखत नाहीं

* सॉक्रेटीस

गरज नसणें हेंच दैवीपणाचें लक्षण आहे, असा माझा विश्वास आहे.

– जरुरीपेक्षां अधिक वस्तु जवळ ठेवण्याची इच्छा मनांत धरूं नका. ज्याच्याजवळ एक घड्याळ असते त्याला किती वाजले हें कळते. परंतु ज्याच्याजवळ दोन घड्याळें आहेत त्यांला किति वाजले आहेत हें नक्की कधींच कळत नाहीं.

– जें मिळण्यासारखें आहे तें पुरुषाला हवें असतें.

जें मिळण्यासारखें नसतें तें स्त्रीला हवें असतें.

* हेन्रीं फोर्ड

एकत्र येणें म्हणजे प्रारंभ. एकत्र राहाणें म्हणजे प्रगति. आणि एकत्र चिकाटीनें व नातत्यानें काम करीत राहाणें हें यश होय.

* लो. टिळक

टीका करतांना ज्यावर ती करायची त्याबद्दल आदर पाहिजे.

* खाण्डेकर

तरवारी शोभेसाठीं नसतात. पराक्रमासाठीं असतात.

* मा. स्टॅलिन

धोका पत्करण्यास जो कचरतो तो लढाई काय जिंकणार? सैन्यानें लढाईत रक्ताची संवय केली पाहिजे.

* खाण्डेकर

धान्याच्या कणाकडे कोंबड्याचें लक्ष जातें. पण त्यांत सांपडलेले मोती राजहंसच वेंचु शकतो.

म. गांधी

दिव्य दृष्टीचा एकच मनुष्य लाखो आंधळ्यांना मार्ग दाखविल. पण लाखो आंधळे एकत्र आले तरी एका आंधळ्याला मार्ग दाखवू शकणार नाहींत.

ॉ

खरा धर्म ही बड्या लोकांच्या चैनीची वस्तू नसून सर्व लोकांची ती मूळभूत गरज आहे.

* डेमॉस्थेनिस

चुका काढणें हें फार सोप आहें. कोणीहि करूं शकतो. पण योग्य अशी दुरुस्ती किंवा उपाय दाखवून देण्यावरूनच खऱ्या सल्लागाराची परीक्षा होते.

* विनोबा

जो शक्ति माणसाच्या जीवनाला गति देते तिला श्रद्धा म्हणतात. ती प्राणांतून निर्माण होतें. दुसरीं शक्ति त्याच्या जीवनांची दिशा दाखवितें. तिला बुद्धि म्हणतात. हीच माणसाची ज्ञानशक्ति होय. या दोन्ही शक्तीची माणसाला जरूरी आहें.

समता ही आजची हांक आहे. ती आपणास आवडो वा नावडो, समता आजचा युगधर्म आहे याची जाणीव ठेवली पाहिजे.

* अमर्सन

जर माझ्या आयुष्यांत कशाचा अत्यन्त गरज असेल तर ती म्हणजे मला जें कांहीं करणें शक्य आहे तें सर्व करावयास लावणारे मला कोणी तरी हवें आहे.

* गो. ग. आगरकर

वृद्ध हे समाज चौकोनाचें भरताड होत. तरुण शिडे आहेत. पहिल्याशिवाय समाजांत स्थिरता येणार नाहीं. आणि दुसऱ्याशिवाय गति येणार नाही.

* साने गुरुजी

स्वच्छ होण्यासाठी फाटावे लागतें. पवित्र होण्यासाठीं जाळून घ्यावें लागते आणि अंकुरित होण्यासाठीं गाडून घ्यावें लागते.

* कॉन्फ्युशियस

जगाची सुधारणा करण्यांस धावण्याऐवजी प्रथम स्वतःस सुधारा म्हणजे सर्वकांही यक्षिणीची कांडी फिरवल्याप्रमाणें आपोआप सुधारेल.

नुसत्या गमतीला किंमत नाहीं, तर हिंमतीला आहे.

— आवड असली म्हणजे सवड आपोआप होते.

बोलून विचार करण्यापेक्षां बोलण्यापूर्वीच विचार केलेला बरा.

— जगांतील कोणत्याहि चांगल्या गोष्टींच्या कळसाकडे प्रथम पाहूं नका. आधीं पायाकडे पाहा. कळसाकडे पाहून फार तर तुम्हांला आश्चर्याचा धक्का बसेल पण पायाकडे पाहून स्फूर्तीचा साक्षात्कार होईल.

★ ★

## ३३ : गनिमी कावा

* जोसेफ मॅझिनी

गनिमि काव्याचे उपयग (१) सुटसुटीतपणा येतो. (२) तयारी डोळ्यावर येत नाहीं. (३) पांगल्यामुळें शत्रुस मोठें भासतें. (४) मोठें नुकसान कधीं येत नाहीं. (५) थोडें लष्करी शिक्षण पुरतें. (६) प्रसृति करतां येतें.

पारतंत्र्यांतील सर्व दाबादाबीला गुण्डाळुन ठेऊन राष्ट्राला लष्करी शिक्षणांत तरबेज करण्यास गनिमिकावा हा एकच एक मार्ग आहे. गनिमिकाव्यानें पितृभूमीस प्रत्येक पावलाला देशवीर्यत्वाच्या दृष्टीनें

मानवता येते. शत्रूस जन्मात माहीत नसलेल्या युद्ध पद्धतीनें घाबरून सोडतां येते. कितीहि पराभव झाले तरी गनिमि काव्यानें लढत असतां नामशेष होण्याची भीति नाहीं. गनिमि काव्यानें राष्ट्रीय युद्धास विश्वासघातापासून संरक्षण होतें.

परकीय जोखडाला झुगारून देण्याची ज्यांची इच्छा असेल त्या राष्ट्रांनीं गनिमि काव्याचा युद्ध पद्धतीचाच आश्रय केला पाहिजे.

★ ★

३४ : ग्रंथ

– ग्रंथ म्हणजे कल्पनांची गाठोडी घेऊन येणाऱ्या मालबोटीच जणू. दूरदूरच्या देशांतून आणि चिरकाळाच्या प्रवाहांतून या मालबोटी प्रवास करून येत असतात.

* काका कालेलकर

जेथें अक्कल चालत नाहीं तेंथें संस्कृत वाचावे.

सरस्वतीच्या कृपाप्रसादाचा प्रभाव असो, अगर निसर्गाची योग्य योजना असो, तलवार, तागडी, व नांगर यांच्यापेक्षां टीचभर लेखणीच अधिक भारी ठरते. रणांगणांवरील रक्ताचें पूर थोडे पावसाळें गेले नाहींत तोंच धूवून जातात. पण कागदाच्या कपट्यावरील शाईचा थेंब शेंकडों उन्हाळें लोटले तरी ओलाच राहातो. सोन्याची तागडी मालकाच्या पश्चात मातीमोल होऊन जाते. पण लाकडाच्या लेखणींतून प्रकट होणारे नारसिंहरूप देव्हाऱ्यांत जाऊन बसते. नांगराचें करास चार दिवसांत बुझतात आणि त्यांच्या श्रमाचें पीक वर्षभरांत दृष्टीआड होतें. पण लेखणीच्या रेषा कधींच पुसल्या जात नाहींत आणि तिची सोन्याची पिकें कधींच कमी होत नाहींत.

* साने गुरुजी

जीवनाच्या अभ्यासांतूनच ग्रंथ निर्माण होतात,

* यशवन्त

दु:खाच्या रोगावर काव्य हीं जडीबुट्टी आहे.

* फोमा

शाळेच्या पुस्तकांत कांहीं अर्थ नसतो. सुताराला जशी तासणी व गुण्या हीं हत्यारें लागतात. तशी तुम्हांला हीं पुस्तकें लागतात, तीं नुसतीं हत्यारें आहेत. पण आपला उपयोग कसा करायचा हें त्यांची तींच काय शिकवणार ?

केवळ पुस्तकीज्ञान हें अगदीं गौन आहे. त्या ज्ञानाचा फायदा घेण्याची पात्रता अंगी आणली पाहिजे. ही पात्रताच कोणत्याहि पुस्तकांपेक्षां जास्त हिकमती असते.

हृदयाला जें फार फार हवं असतं तें पुस्तकात कांहीं सांपडत नाहीं, अन् पुस्तकांत जें आहे त्यांतलें बरेंचसं समजत नाहीं.

* वा. म. जोशी

जो ग्रंथ कितीदां वाचला तरी पुहा: पुहा: जवळ ठेवून घ्यावासा वाटतो तोच उत्तम ग्रंथ.

ग्रंथासारखा मित्र नाहीं. पण कर्तव्यें सोडून या मित्रांबरोबर गप्पा मारण्यास जो येईल त्याच्याशीं हा मित्र हितगुजाच्या खऱ्या गोष्टीं बोलत नाही.

आंधळ्यास जसा प्रकाशाचा अर्थ कळत नाहीं त्याचप्रमाणें स्वत: विचार न करणाराला ग्रंथाचा अर्थ कळत नाही.

समुद्राकांठीं गेल्यावर मुलें मुलीं, शिंपल्या, कवड्या वगैरें गोळा करतात. त्याप्रमाणेंच अभिजात ग्रंथ वाचून अल्पज्ञानी लोक क्लिष्ठ शब्द, कोट्या वगैरेच ध्यानांत ठेवतात.

गिरीश

ग्रंथ उजळितो मार्ग आपुला फेकुनि किरणें
वाचन म्हणजे प्रियजनसंगें विमानांतून फिरणें

ग्रंथ आपुल्या चिर संस्कृतीचे अमोल भाण्डागार
पुरोगामीचा सागर मानव देई मुक्ताहार

ग्रंथ आपुल्या अन्तः सौंदर्याचा ताजमहाल
सत्य शिवाचे शाश्वत जणू दीपगृह विशाल

माडखोलकर

पुष्कळ ग्रंथाचें वाचन करण्यापेक्षां थोड्या ग्रंथाचें मनन केलेलें अधिक चांगलें.

* खाण्डेकर वि. स.

मनुष्याची मुद्रा म्हणजे त्याचा जीवनग्रंथ. जीवनाच्या अनेक अनुभवाच्या रेषा तेथें उमटलेल्या असतात. काहीं रेषा अस्पष्ट तर कांहीं खोल असतात.

— अखिल विश्वच माझा ग्रंथ होय.

* बेकन

कांहीं पुस्तकें केवळ वरवर वाचावयाचीं असतात. कांहीं ग्रहण करण्यालायक असतात. आणि कांहीं थोडीच अशी असतात कीं, त्यांचें वारंवार मनन करावें लागतें.

* हरमन मेल्विली

महत्वपूर्ण पुस्तक लिहावयाचें असेल तर त्याचा विषयहि तसाच महत्वाचा पाहिजे.

* ऑस्कर वाईल्ड

कुठलेंहि पुस्तक श्लील अथवा अश्लील नसतें. फक्त तें चांगल्या किंवा वाईट तऱ्हेनें लिहिलें गेलेलें असतें.

* आचार्य अत्रे

आयुष्य जगून समजतें. नुसतें पुस्तकें वाचून समजत नाहीं.

★ ★

## ३५ : गुरु-शिष्य

* मॅड. डेल्यूझी

जर मी खरोखरीच शिक्षक झालो तर शिकवण्यापेक्षां मला शिकावेंच जास्त लागेल.

* गोल्डस्मिथ

सर्व देशाचा तो आवडता होता. वार्षिक उत्पन्न चाळीस पौण्ड असून देखील तो श्रीमंत होता.

* सर्वन्टस

जो उत्तम तऱ्हेनें जगू शकतो, तोच उपदेशू शकतो.

* जॉन्सन

स्त्रीनें उपदेश करणें म्हणजे कुत्र्यानें मागील दोन पायांवर चालण्याची कसरत करणें होय.

* प्लेटो

तुमचा उपदेश प्रथम कृतींत उतरवा.

* शेक्सपिअर

कृतींत उतरण्याइतकें चांगलं कोणतं आहे हें कळण्याइतकं कृतींत उतरवणं सोपं असतं तर देवळाचं रूपांतर धर्ममठांत नि झोपड्याचं रूपांतर राजवाड्यांत नसतं कां झालं ? लाख गोष्टीं शिकवणं सोपं पण लाखांतील एक कृतींत उतरणं बिकट.

* विचार पोथी

शिष्याच्या ज्ञानावर सही करणें एवढेंच गुरुचें काम. बाकी शिष्य स्वावलंबी.

विद्यार्थ्यांपासून मी जितकें शिकलो; त्या मानानें मी त्यांना कांहींच शिकविलें नाहीं.

गुरुचा शोध करण्याची आवश्यकता नाहीं. कारण गुरु स्वतःच शिष्याचा शोध करीत आहेत.

शिष्याची योग्यता मिळविणें एवढेंच आपलें काम आहे.

गुरु तीन प्रकारचे असतात.

(१) अविकार तसा उपदेश करणारे. (२) उपदेशाचा पाऊस पाडणारे. (३) मौनानें उपदेश करणारे.

जो गुरु असेल तो शिष्य असेलच. जो शिष्य नसेल तो गुरु नसेलच. गुरुला शिष्याविषयीं पूज्यभाव असला पाहिजे. कारण शिष्यत्व हे गुरुत्वाला मातृस्थानीं आहे

* ज्ञानेश्वर

गुरुविण देव दुजा । पाहतां नाही त्रैलोकीं

* गुरु हा सुखाचा सागरु । गुरु हा प्रेमाचा आगरू
गुरु हा धैर्याचा डोंगरु । कदाकाळीं डळमळी ना

— मनुष्य हा मरेपर्यन्त विद्यार्थी असतो,

* शेषप्रश्न

कोणताहि आदर्श पुष्कळ काळपर्यन्त टिकून राहिला म्हणून तो चिरस्थायी ठरत नाहीं.

* ना. ह. आपटे

गुरुवांचून विद्या नाहीं, संगतीवांचून शील नाहीं आणि पुढाऱ्यावाचून कार्यप्राप्ती नाहीं.

– गुरुनें दिलेला मार पित्याच्या लाडापेक्षां जास्त हितकर असतो

* केळकर

ग्रंथाइतका प्रांजळ व निष्कपटी गुरु दुसरा मिळणार नाहीं.

– अनुभव हा सर्वांत उच्च शिक्षक आहे. मात्र तो मोबदला जबर घेतो.

* रामदास

मुख्य सच्छिष्याचे लक्षण । सद्‌गुरुवचनीं विश्वास पूर्ण
अनन्यभावें शरण । त्या नांव सच्छिष्य ।

* गीता

शिष्यात् अिच्छेत् पराजयम् ।

* विनोबा

उत्तम गुरु कोण ? 'भृंगी'
उत्तम शिष्य कोण ? 'पक्षी'

* साने गुरुजी

दुसऱ्याच्या सुखदुःखांत भागीदार व्हावयास शिकणें हेंच खरें शिक्षण.

★ ★

## ३६ : घर

* ठोकळ

जाईन कधीं मी आतां माझ्या घरीं !
स्वर्ग लाभला तरी नको मला, घरचि न त्याला सरी.

* तळवलकर

नको सूर्य चन्द्रावर जाया नको जगाची सफर कराया
नेई विमाना, मज त्या ठाया जेथं माय मम वास करी.

22/09 ... किंवर्द ... ७७
... ११११८ ... २२.११.५६



ज्ञानेश्वर

हें विश्वचि माझें घर । ऐसी मति ज्यांची स्थिर
किंबहुना चराचर । आपण झाला ।

अनिल

चिमुकलें घर । फुलें जागोजाग । छोटिशींच बाग ।
डोले आनन्दात । घरापाशीं येतां–घराशीं पोचतां– ।
आम्ही दोघेजण । आमचा हा बाळ । सुखें जाई काळ ।
हासतां, खेळतां । घरीं विसावतां । घरीं आनन्दला ।

माधव ज्युलियन

जाई घरट्याभवतीं घिरट्या घालीत उंच चण्डोल ।
न चुकें ये निजधामीं शेवटीं उमजुनि तेच अनमोल ॥

पैं. महंमद

घरांविषयींचें ममत्व हेंच सर्व अनर्थाचें मूळ होय.

रॉबर्ट फ्रॉस्ट

ज्या ज्या वेळी तुम्हीं घरीं जातां त्या त्या वेळीं तुम्हांला घरांत घेणं जिला भाग पडतं ती जागा म्हणजे घर होय.

: जान पायनी

सौख्यानन्दी राजदरबारीं जरी विहरलो ।
घराविना उणे सर्व त्या सुखा अन्तरलो ।

: वि. स. खाण्डेकर

घर हें बालकाचें पहिलें जग. या जगांत कोणताहि अपराध घडला तरी न्यायाधीश प्रेमळ असल्यामुळे शिक्षेचें स्वरूप बक्षिसारखें असतें.

– घर हीं स्वातन्त्र भूमि आहे. जगांमध्यें ह्याच जागेवर मनुष्य वाटेल ते प्रयोग करूं शकतो.

* ॲलिस हेथॉरन

आईशिवाय घराला अर्थच काय आहे ?

* केशवसुत

आले भरुनि हे रिते हृदयहि
देवु कुणाच्या करीं ?

आला दाटूनि कण्ठ-हाय ।
रडुनि कोठें करूं मोकळा ?

जी माझ्यास्तव, मी जिचे सकळहि
आधार जी जीवनीं

देवा भेटवी दाखवी तरि मला
ती कोण देवी जनी

* कुणास्तव कुणी तरी
सभय वाट पाहीं घरीं

★ ★

## ३७ : चांगलें-वाईट

* ऑगस्टीन

स्वतःच्या गुणांत कांहींतरी अवगुण जाणणं हीच गुणाची खरी पूर्णता.

* सॅफो

जें चांगलें असतें तें सुन्दरहि असते व जें सुन्दर असते तें चांगलेंच असतें.

* रिचर्ड बर्टन

बरें आणि वाईट असें जगांत कांहींच नसतें. मर्त्य विचारशक्तीचीं ही मुळें आहेत. जें उपयुक्त तें चांगलें व जें घातक तें वाईट असें आपण म्हणतो.

शेक्सपिअर

प्रत्येक वाईटामधून कांहींतरी चांगलें निघतेच,

टेनिसन

चांगलें व्हावयाचें असेल तर उदार व्हा.

मार्क ट्वेन

चांगले व्हा आणि दुःखी व्हा.

ओल्ड टेस्टॅमेन्ट

न्यायाचा नि शहाणपणाचा अतिरेक करूं नका.

डेव्हिड क्रॉकेट

तुम्ही बरोबर आहांत कां हें अगोदर पहा. नन्तरच पुढें चला.

ओव्हिड

मी जें योग्य तें पाहातो. व ग्रहण करतो. अयोग्य टाकून देतो. तरी तें वाढतेंच.

* ब्यूमन्ट अण्ड फ्लेचर

जें एकाचें विष तेंच दुसऱ्याचें अन्न ठरते.

* माझें रामायण

चांगल्या गोष्टींचा मार्ग नेहमींच अकुंचित व निसरडा असतो.

* साने गुरुजी

वाईटपणा हा वरचा पापुद्रा आहे.

* भा. रा. ताम्बे

कुवासना घालिति धिंगा तो महाल मी टाकितो–
गाईसंगे हवेंत ताज्या नित्यचि मी राहतो–

* रामदास

आपुली चुकी जाणावी । साण्डावी ते एकीकडे
विवेकें साजिरा झाला । येर उदण्ड मिळती

* करावे तेंचि पावावें ! हें आलें आपणाकडे
आपले आपणापाशी । जनाशीं काय बोल हा ?

– ज्याचें दर्शन नेई ओढुनि मना पापीं विचाराकडे
आपोआप टळेल तें मम गमे सद्भाग्य हें केवढें !

जें बीभत्स तसेंच निन्द्य जगतीं जें दृश्य घाणेरडे
दुष्टांचेहि मुखावलोकन तसें होईल ना पुढें !

* रघुवीर सामंत

इमले चढले गगनी पोकळ । जगांत जीवन नुरले निर्मळ ।
सारी उरली हुरहुर, हळहळ ।

* महात्मा कीं मोहात्मा

बरें–वाईट कर्म घडणें हें माणसाच्या हातीं नाही. अशीच माझी समजूत आहे, कारण या दोन्ही गोष्टीं निरपेक्ष व अस्तित्वशून्य आहेत. तत्कालिक प्रचलित असलेल्या लोकमतावर त्याचें बरेवाईट पण अवलंबून असतें.

* ज्ञानदेव

भावेविण भक्ति भक्तीविण मुक्ति। बळेविण शक्तीं बोलो नये ।

* हॅझलिट

जे जें अशुभ त्यावरि असें उपाय–
किंवा तेंथें असेलहि निरुपाय
शोध, जर असेल तरणोपाय
नसेल तर स्वस्थ बसुनि लांबव हातपाय ।

* थॉमस हूड

अविचार आणि अहृदयता यामुळेंच वाईट घडतें.

* बरटन

चांगले वा वाईट नसतें जगांत,
परि आहे तें सर्व नीतिसूत्र–लहरींत ।

शेक्सपिअर

अशुभांतहि असतो शुभाचा अंश
मन्थन करुनि शोध तो अवशेष

कोणतीहि वस्तु चांगली वा वाईट नसते. फक्त आपले विचार तिला तसें रूप देतात.

* अनामिक

जशी दृष्टि तशी सृष्टि.

* समर्थ

जगीं निंद्य तें सर्व सोडून द्यावें ।
जगीं वन्द्य तें सर्व भावें करावें ।

* जीवन दर्शन

जीवन अन्धारमय आहे–जर तें प्रेरणाहीन असेल तर
प्रेरणा अन्ध आहे–जर ती ज्ञानयुक्त नसेल तर
ज्ञान मिथ्या आहे–श्रमशून्य असेल तर
श्रम निरर्थक आहेत–प्रेममय नसतील तर
प्रेम मिथ्या आहे–त्यागहीन असेल तर

* चरित्रहीन

चांगलं वाईट तोलून देण्यापूर्वी तुमच्या तागडीचा दांडा अगदीं ठीक बिनचूक असला पाहिजे.

– जांभई देणें हें असभ्यपणाचें लक्षण असेल, पण तें प्राणाणिक मत आहे.

* धम्मपद

जोपर्यन्त दुष्कृत्याला फळें आलीं नाहींत तोपर्यन्त दुष्कृत्य करणाराला त्यापासून संतोष वाटतो. परंतु त्याचे वाईट कृत्य परिपक्व होऊन त्यास फळें आलीं कीं मग त्याला तें वाईट कृत्य आहे असें कळतें.

जोपर्यंन्त सत्कृत्यास फळें आलीं नाहींत तोपर्यंत सज्जनाला सुद्धां वाईट दिवस भोगावे लागतात, परंतु त्याच्या चांगल्या कृत्यास फळें आली कीं त्या सज्जनास सुदिन प्राप्त होतात.

आपणाला त्यापासून उपसर्ग होणार नाहीं असें मनांत म्हणून कोणीही पापकर्माकडे दुर्लक्ष करूं नये. थेंब थेंब पाणी पडून पाण्याचे भांडे भरते. त्याप्रमाणें थोडे थोडे पापकर्म करून मूर्ख पूर्ण पापी बनतो.

– सुन्दर व सुरेख रंगाचें फूल असून त्याला सुवास नसला कीं ते जसे व्यर्थ. तद्वत जो बोलण्याप्रमाणें वागत नाहीं, त्याचे शब्द मधुर असले तरी निष्फळ होत.

– परंतु सुन्दर फूल चांगल्या रंगांचे आणि सुवासिक असलें म्हणजे तें जसें उत्तम होय. तद्वत जो मनुष्य बोलण्याप्रमाणें आचरण करतो त्याचे मधुर शब्द सफळ होत.

* गो. नी. दाण्डेकर

चांगलं पसरायला वेळ लागतो. वाईट पटकन पसरतें. अगदीं पाण्यांत टाकलेल्या तेलाच्या थेंबासारखं.

– मिळालेल्या आनन्दाचा आस्वाद घेण्याऐवजीं गमावलेल्या सुखासाठीं हळहळण्यांत माणसाचं मन गुन्तलेलं असतं.

* खलील जिब्रान

कठिण आणि सोपा असे दोन मार्ग समोर आले असतां माझ्या हृदयानें भ्याडपणें सोपा मार्ग पत्करला, तेव्हा मला तिसऱ्यानदां स्वतःची शिसारी आली.

जेव्हां माझ्या हातून अपराध घडला तेव्हां इतर लोकहि असाच अपराध करीत असतात असें म्हणून जेव्हां मी माझें सान्त्वन करूं लागलें तेव्हां चौथ्यान्दा मला स्वतः संबंधीं तुच्छता वाटली.

दुबळेपणानें अन्याय सहन करीत असतां, सहन करण्याची कला हीहि एक शक्ति आहे असें म्हणून जेव्हा मी स्वतःची आत्मवंचना केली तेव्हां पांचव्यानदां मला स्वतःची कींव वाटू लागली.

कोण्या एकाचा कुरूप चेहेरा पाहून आपला स्वतःचाच तो एक मुखवटा आहे हें ओळखण्याऐवजीं कुरुपतेचा तिरस्कार करण्यास जेव्हां मी प्रवृत्त झालो तेव्हां सहाव्यानदां मला माझी लाज वाटली.

आणि दुसऱ्यांचे स्तुतीस्तोत्र गातांना हा सुद्धां एक सद्‌गुणच आहे, असें स्वतःला भासविण्याचा जेव्हां मीं प्रयत्न केला तेव्हां सातव्यानदां माझें पाणी पाणी झालें.

– आशावादी विसरण्याकरता हसतो, निराशावादी हसण्याचें विसरून जातो.

* टर्किश

जो तुमच्याजवळ दुसऱ्यासम्बधीं टीका करतो तो तुमच्यासम्बधी दुसऱ्याजवळ कां बरें टीका करणार नाही ?

– ईश्वरानें पृथ्वीवर अन्न निर्माण केले–आणि सैतानानें आचारी.

– गुलाबाला कांटे असतात म्हणून पिरपिरत बसण्यापेक्षां कांटयांना गुलाब असतो म्हणून मजा मारावी हें उत्तम !

– खोटें बोलणें हा बाळपणांत दुर्गुण समजला जातो. आणि मोठेपणी कला !

– ध्येयासाठीं मरण्यापेक्षां ध्येयासाठीं जगणें अवघड असतें.

– आपल्या मागें आपल्या संबधीं कोण काय बोलतें हें जर प्रत्येकाला कळेल तर जगांत कोणीच कोणाशी बोलणार नाहीं !

* न. चिं. केळकर

मनुष्य विचारी असेल तर तत्त्वज्ञ बनतो. व विकारी असेल तर बेताल बनतो.

लो. टिळक

तुमच्यानें पुढें जाववत नसेल तर जाऊं नका. पण पुढें जाणरांना मागें खेचू नका.

* न. चिं. केळकर

मनुष्यप्राणी जें जें करतो तें त्याच्या पूर्व–वासनेच्या जोरावर, पराधीनतेनें करतो. स्वाधीनतेनें नव्हे.

* खाण्डेकर

नीतीचा खून समाजाला पाहावत नाहीं. पण माणसाचे खून तो हंसतमुखानें पाहातो. माणसासाठी नीति असतें. नीतिसाठीं माणूस नसतो.

* लो. टिळक

मनुष्य कितीहि शहाणा असला तरी अधिकाराचे चष्मे त्याच्या डोळ्यास लावल्यावर पूर्वीचें जग निराळें दिसू लागतें.

* म. गान्धी

जो आपला नामर्दपणा कबूल करतो तो कोणत्या ना कोणत्या दिवशीं मर्द होणें शक्य आहे. पण उगाच मर्दपणा असल्याचा जो आव आणतो तो कधींच मर्द होत नाहीं.

* म. गांधी

बाळांनो, कोणत्याही धर्माचें रक्षण तरवारीने होत नाहीं. जे नेहमीं हातांत तरवार घेऊन उभें राहातात त्यांचा नाश तरवारीनेंच होतो.

* लो. टिळक

गरीबांच्या चुकापेक्षां मोठ्यांचीं पातकें लोकांस अधिक भोगावीं लागतात.

* गोल्डस्मिथ

गौरव हा पडण्यांत नाहीं; पडून उठण्यांत आहे.

– जो पापभीरु पंच पापें, सप्त व्यसनें यापासून दूर असतो, तोच माणूस असतो.

लो. टिळक

कायदा जुलमी असेल तर शिक्षा सोसूनच प्रतिकार केला पाहिजे. एरवीं इलाजच नाहीं. नीति आणि कायदा यांची फारकत होते तेव्हां असेच प्रकार घडून यावयाचे.

* भ. महावीर

गर्व ज्ञानाचा नाश करतो. खुशामत बुद्धीचा नाश करतें. स्वार्थ प्रतिष्ठेचा नाश करतो. परंतु लोभ तर ज्ञान, बुद्धि, प्रतिष्ठा या तिन्हींचाहि नाश करतो.

* जोसेफ रोक्स

ज्याचीं मातापितृ गमाविली आहेत, अशाला 'पोरका', पत्नी गमाविलेल्याला 'विधुर' अशीं नांवें आपण देतो. परंतु खऱ्या मित्र-त्याचें सौख्य अनुभवल्यानंतर तें ज्यानें गमावलें आहे, त्याला काय नांव द्यावें याविषयीं मात्र प्रत्येक मानवी भाषा मुग्धताच स्वीकारतें.

– इतिहास म्हणजे खऱ्याखोटयांची गल्लत झालेली एक अड-गळीचीं खोली होय.

सुभाषित

पुस्तक, कविता व वित्त या गोष्टीं परहस्तांत पडल्या कीं काय-मच्या गेल्या म्हणून समजावें.

मूर्ख माणसें आपापसांत संभाषण करूं लागलीं म्हणजे शहाण्या माणसानें मौन धारण करावें हेंच योग्य !

मुंग्यांनीं वारूळांत जमवून ठेवलेलें धान्य, मधमाशांनीं पोळ्यांत जमवून ठेवलेला मध आणि लोभी माणसानें सांठवून ठेवलेलें द्रव्य ही तिन्ही समूळ नाश पावतात. सांठवून ठेवणाऱ्याच्या ऐवजीं तिसऱ्याच कुणाच्या तरी तीं कामाला येतात.

हें कोकिळा, कानाला अमृताप्रमाणें गोड लागणारें तुझें गोड गाणें रसिक लोक आनंदानें ऐकतात. पण तुला तें कांहींच देत नाहींत. झाडांचीं पानें खावूनच तूं जगतोस. अन् जे कावळे 'काव काव' असा कर्कश रव करून कान टिकवतात, त्या कावळयांना काकवलि द्या असें विद्वानसुद्धा सांगतात.

* मनुस्मृति

सन्मानपूर्वक दिल्या जाणाऱ्या देणग्या स्वीकारण्याचें टाळा: कारण अशा देणग्यामुळेंच स्वतंत्र माणूस गुलाम होतो.

– दुर्जन आणि साप यामध्यें साप पुरवला पण दुर्जन नको. कारण साप एकदांच दंश करून जीव घेतो. पण दुर्जन मात्र पावलोंपावलीं दंश करीत राहातो.

– काम–विकारासारखी दुसरी व्याधि नाहीं. मोहासारखा दुसरा शत्रू नाही. कोपासारखा अग्नि नाहीं आणि ज्ञानासारखें सुख नाही.

– घासून, कापून, ताववून आणि ठोकून ज्याप्रमाणें सोन्याची परीक्षा केली जाते; तद्वतच त्याग, शील, गुण व कर्म या चार गोष्टींनी पुरुषांची कसोटी पाहिली जातें.

– राज्यांत झालेले पाप राजाला भोगावे लागते, राज्याच्या हातून घडलेले पाप त्याचा पुरोहित भोगतो, स्त्रीचें पाप पति भोगतो व शिष्याचे पाप गुरुला भोगावें लागतें.

– स्वतः गटारांत उतरल्याशिवाय दुसऱ्याला गटारांत धरून ठेवणं कोणाला कसें शक्य आहे?

* येशू

तुम्ही तुमचें सत्कार्य गुप्त ठेवा. आपल्या उजव्या हातानें दिलेलें दान डाव्या हाताला समजूं देऊं नका.

– ज्यावेळीं तुमचें म्हणणें बरोबर असतें, त्यावेळीं तुम्हाला चिड-ण्याचे कांहींच कारण नाहीं आणि ज्यावेळीं तुमचें म्हणणें चूक असतें त्यावेळीं चिडण्यासारखा दुसरा मूर्खपणा नाही.

* फोमा

इभ्रत हीच धन्याची उत्कृष्ठ जाहिरात आहे.

धन्दा हा जिवन्त दणकट पशू आहे. त्याला तू आपल्या कर्तब-गारीच्या जोरावर ताब्यात ठेवला पाहिजेस.

रडणं ही एक मानवी प्रवृत्ती आहे. रडण्यामुळें अन्तःकरणें हलकीं होतात.

मूर्खानं आपल्याला मध जरीं दिला तरी त्यावर आपण थुंकावं. अन् शहाण्या माणसानं विष जरी दिलें तरी तें खुशाल घ्यावें.

जो शिकवितो तोच प्रेम करतो.

जीवन्त कुत्रा हा मेलेल्या सिंहापेक्षां जास्त चांगला.

वडिलांचं छत्र गमावून बसणें म्हणजे मोठीं दुःखद आपत्ति.

ज्याअर्थी आपण या भूतळावावर जगत आहोंत त्या अर्थी आपल्या भोंवतीं घडत असलेल्या प्रत्येक गोष्टींबद्दल विचार करणें हें आपलं कर्तव्य आहे. कां म्हणशील तर, आपल्या मूर्खपणापायीं आपल्यालाच त्रास होऊं नये म्हणून आणि आपण मूर्खपणा करून दुसऱ्याला त्रास देऊं नये म्हणून.

सुन्दर माणसाचं जीवन कसं पाक असावं.

* खाण्डेकर

दोन गोष्टीं कधीच वाईट नसतात. एक आपली आई व दुसरी जन्मभूमि.

– दुष्ट पत्नी, लबाड मित्र, प्रत्युत्तर देणारा नोकर आणि सर्प ज्या घरांत आहेत त्या घरांत राहणें म्हणजे मरण यांत शंका नाहीं.

* विनोबा

माझें तें खरें म्हणूं नका, खरें तें माझें म्हणा.

* लो. टिळक

समोर अन्धार असला तरी त्यापलीकडे उजेड आहे हें लक्षांत ठेवा.

* शि. म. परांजपे

खरें असेल तेंच बोलावें, उदात्त असेल तेंच लिहावें, उपयोगी तेंच शिकावें. देशाचे हित ज्यांत असेल तेंच करावें.

* अिमर्सन

तुम्ही दुसऱ्याचें वाईट करा, तुमचेंच वाईट होतें.

* वि. स. खाण्डेकर

दुःख ही देवानें मोठेपणाला दिलेलीं देणगी आहे.

* तुकाराम

संगतीनें होतो पंगतीचा लाभ.

चन्दनाचे हात पायहि चन्दन । परिसा नाहीं हीन कोणी अंग ।<br>
दीपा नाहीं पाठीपोटीं अन्धःकार। सर्वांगे साकर अवघी गोड ।

चोराशीं चांदणें, वेश्येशी शेजार। परिसेसी खापर काय होय।<br>
दुधाचे आंधणी वरिले पाषाण । कदा काळीं जाण पाक नव्हे ।

* म. गान्धी

दुष्टपणाचा बदला दुष्टपणानें घेऊन कांहीहि फायदा नाहीं. दुष्टपणाला सद्वर्तनानें उत्तर देणें हाच खरा मार्ग.

* फिले मॉन

दुसऱ्यांना ओळखण्यांत भयंकर धोका असतो. त्याबाबतींत चूक होण्यामुळें नव्हे तर स्वतःस उघडे करण्यामुळें.

* वि. स. खाण्डेकर

ज्याला जेवायची जरूरी पडत नाही, तो भुकेसाठीं केव्हांच चोरी करणार नाहीं; पण जो भुकेनें तडफडत असेल तो चोरी पवित्र आहे कीं अपवित्र आहे याचा तात्त्विक विचार करीत बसणार नाहीं.

– जखम करणारा ती विसरेल पण ज्यावर ती झाली तो कसा बरें विसरेल ?

* डेमॉस्नेन्स

प्रत्येक मोठी गोष्ट चांगली असेलच असें नव्हे. पण प्रत्येक चांगली गोष्ट मात्र मोठी असतें.

* हेल्प्स

लक्षांत ठेवा कीं या जगांत दुय्यम प्रतीचें लोकच यशस्वी होतात प्रथम श्रेणींतील नव्हे.

* शेख सादी

तसूभर ढिलाईनें सुरू झालेला अन्याय पुढें फोफावून साऱ्या देश-भरच्या लोकांना चिरडून टाकू शकतो.

जो गर्वानें, उद्धटपणानें मान वर करून चालतो त्याला शेवटीं हालअपेष्टा सहन करून धूळ खावी लागते.

– गुलाबाला फळें येणार नाहींत व अंजीराला फुलें येणार नाहींत म्हणून त्यांचें आहेत तें गुण कमी महत्वाचें समजावयाचें काय ?

* केफर

चांगली वर्तणूक ही वाईट विचार प्रसृत करण्यापेक्षां वाईट वर्तणुक वाईट विचार प्रसृत करण्यास अधिक सामर्थ्य संपन्न असते.

* स्वामी बिवेकानन्द

राजकीय किंवा सामाजिक स्वातंत्र कोणीहि मिळवू शकेल. पण तो जर का आपल्या भावनांच्या किंवा वासनांचा गुलाम असेल तर त्या स्वातंत्र्याचा खराखुरा आनंद त्याला उपभोगतां येणार नाहीं.

– एखादी वाईट गोष्ट स्वीकारली तर ती थोडीच चांगली होणार आहे ?

– परमेश्वरानें मनुष्याला आपल्याप्रमाणें बनविले. पण आपण आपल्या दुर्भाग्यानें परमेश्वरालाच आपल्यासारखें केलें.

* जॉय

जरी चांगल्यामुळें वाईटाला पावित्र्य येत नाहीं. तरी वाईटामुळें चांगल्या गोष्टीं जरूर नाश पावतात.

* अॅकीन

प्रतिस्पर्ध्याचा पराभव हा थंडपणें पाहाणें हीच हृदयाची कसोटी.

* बेकन

मोठ्या ठिकाणचीं माणसें तीन गोष्टींचीं नोकर असतात. एक राज्याची, कीर्तीची व धन्याची.

* पब्लिलियस सायरस

स्वतःच्या बाबतींत स्वतःचा न्यायाधीश कोणीच होऊं नये.

* जॉनसन

आपलींच गुपितें सागणें म्हणजे मूर्खपणा होय. परंतु तो गुन्हा नव्हे.

* कीथ

वाईट गोष्टीच्या मोहाला देखील सत्यापासून मिळालेल्या गुप्त सौन्दर्याची झळक असते.

– जगाच्या रंगानें रंगल्याखेरीज जगांत वावर.

– प्रामाणिकपणानें हृदयाचें समाधान झालें तरी पोटाचीं खळगीं कशी भरणार ?

– रस्त्यांत चालतांना मी मागें वळून पाहात नाहीं.

आयुष्याकडे मी मागें वळून पाहात नाहीं.

* विवेकानन्द

तोण्डपूजा करणें हें दरबाऱ्याचें काम आहे आणि स्पष्ट बोलणें हें संन्याशाचें कर्तव्य आहे.

* कॉन्फुशस

ज्यावेळीं संभाषणाची जरूरी असेल त्यावेळीं मौन व्रताने माणसें तुटतात आणि ज्यांवेळीं मौनव्रत धारण करायचें असतें त्यावेळीं संभाषणानें आपले शब्द वाया जातात.

★ ★

## ३८ : चिता-चिन्ता

* समर्थ

मनीं मानव व्यर्थ चिन्ता वहातें
अकस्मात होणार होवूनि जातें

– चिता ही एकदम भस्म करील पण चिन्ता ही झिजवून झिजवून क्रमानें प्राण घेईल.

* माडखोलकर

दहनाशिवाय दीप्ती नाहीं

* बी

होतो मागें कोण तदा तें आतां आहों कसें
फिकीर न याची आम्हा असे

* केशव नाईक

'आग' हीं अशी एकच वस्तू आहे कीं जी जीवनाची सांथ अखेरपर्यंन्त करूं शकतें.

* तुकाराम

हरिचिया भक्ता नाहीं भय चिन्ता ।
दु:ख निवारिता नारायण ।।

* हरीच्या दासा चिन्ता । अघटित ।

* ज्ञानेश्वर

रात्रंदिवस वाहतसें चिन्ता । केधवां धडौता होईन मी ।
खिरजट घोंगडे फांटकें तें कैसे । वेंचिले तैसें भोगिजे गा ।

वित्त नाहीं गांठीं, जोवित्वा आटी । उघडी पाठीं हींव वाजे ।
घोंगडी देईल तो एक दाता । रखुमादेवी–वरा मागों रे आतां ।

* केशव नाईक

हें चिते ! तूंच आतां ह्या चिन्तेला जाळून भस्म कर. इतकं कीं, निदान स्वर्गान्त तरी हिचा विटाळ मला न व्हावा. कारण ह्या चिन्तेच्या भूतानें तुलाच मला बोलवावें लागेल.

– चिन्ताग्रस्त माणसाचें दोनच प्रकार आढळतात. एक जें कर्जान्त बुडलेलें आहेत असें लोक, आणि दुसरें ज्यांना कर्ज मिळूं शकत नाहीं असें.

## ३९ जीवन

* वि. स. खांडेकर

जीवन ही लढाई आहे, जीवन हा यज्ञ आहे. ज'वन हा सागर आहे.

प्रीति आणि पराक्रम हेंच जीवनाचे डोळे ?

* साने गुरुजी

जीवनाला मरणाचें फळ येतें व मरणाला जीवनाचें कोंब फुटतात. जीवनांतील बऱ्या वाईट प्रसंगांतून शेवटीं सत्यच प्रकट होईल.

* माडखोलकर

जीवन विफल होण्याच्या भीतिसारखा दुसरा शाप नाही.

* यदुनाथ थत्ते

फुलपांखरासारखें जीवन नसावें.

जीवन म्हणजे बुद्धिमत्ता. त्यांत बुद्धिमत्तेची एकच गोष्ट आहे. ती म्हणजे एकाग्रता. आपली वृत्ती इतस्ततः पसरून ठेवणं म्हणजे जीवनाचा नाश.

* अमर्सन

मनापासून आणि एकाग्रतेनें काम केलें कीं जीवन यशस्वी होतें.

* रॅले

जीवनाची दौड कठीण आहे. दुराराध्य आहे. काळजीपूर्वक आणि वेळेवर कामें केल्यानेच तिच्यांत यश मिळतें.

जोसेफ मॅझिनी

आयुष्य ही चैन नसून तें एक कर्तव्य आहे.

गुलामगिरींत जीवन्त राहण्यापेक्षां तिचें तुकडे उडवितांना मरणें हें जास्त श्रेयस्कर होय.

* साने गुरुजी

मनुष्याची मुद्रा म्हणजे जीवनग्रन्थ. डोळे म्हणजे तर जीवनांतील अनुभवानें भरलेले डोह.

जीवनाची शेती ही सर्वान्त कठीण शेती.

जीवनाचें सोनें होईल अशी खटपट करा.

– नाहीं निर्मळ जीवन । काय करील साबण ?

* भा. रा. ताम्बे

जन पळभर म्हणतिल हायहाय।
मी जातां राहिल कार्य काय।

* गिरीश

तुफान दर्या आयुष्याचा, खवळुनि गेला अस्मानीं।
शिडावीण हें तारूं भडकें, दुर्दैवाच्या लाटांनीं।

* कुसुमाग्रज

कोंठे ना जिवास मायेची ओढ। नाहीं वा मुळींहि ध्येयांची जोड
सार्थता जीविता नाहीं। भकास दिशा या दाही।
कशास आयुष्य देवा, इतुकें। शतका मागुनीं जातीं शतकें

* मर्ढेकर

स्वप्नावरतीं धूर साण्डणें
क्वचित् विडिचा वा पणतीचा
मिणमिण जळत्या; आणि लेटणें
वाचित गाथा श्रीतुकयाची

* माधवानुज

तुझ्या मार्गीं जें दगड आड येतीं
घाव त्यावर आपुल्या घाल हातीं
काढ त्यांतूनि रमणीय दिव्य मूर्ती
करील मग ती तव सर्व कामपूर्ति !

* यशवन्त

काय जगावें जगतांवरतीं नुसतें कुजण्यासाठीं
देव्हारे व्हा, देवमूर्ति व्हा, येवुनि जगतापाठीं

* खाण्डेकर

त्याग हा जीवन मन्दिराचा कळस आहे.

– जीवन्तोऽपि मृताः पंच व्यासेन परिकीर्तिताः ।
दरिद्रो, व्याधितो, मूर्खः, प्रवासी, नित्यसेवकः ॥

* रघुवीर सामन्त

शैथिल्य आज ये हृदयां–नेत्रां–गात्रां ।
तोचतोपणाची झाली जीवन यात्रा ।

केवळ मी त्यांत बुडबुडा–
वरि रंग विविध, आंत कोरडा–

* केशव नाईक

जीवन हा एक घडविला जात असलेला सोन्याचा दागिना आहे. तो जितका काळजीपूर्वक घडविला जाईल तितका अधिक शोभेल.

* महात्मा की मोहात्मा

भलोकीचें जीवन स्त्रीपुरुषांचें रतिविषयक प्रेम, त्यांच्यातील अकृत्रिम आकर्षण यांच्याशिवाय नाहीं.

* जय यौधेय

जीवन म्हणजे गति. गति दर क्षणाला नव रूप निर्माण करते. प्रत्येक रूप आपापल्या परी सुन्दर नि सफळ असतें. पूर्ण वाढ झाल्या नंतर हळूहळू निःशेष होणं हाही जीवनाचा धर्मच आहे.

– सुखदुःखाच्या चौकटचा आणि जन्म व मृत्यू यांच्या सीमा असलेला सारीपट म्हणजेंच जीवन.

* माडखोलकर

जीवनांतील सगळी गोडी आपुलकीच्या जिव्हाळयानें केलेल्या लहानसहान गोष्टींत असतें.

* माडखोलकर

जीवनासाठीं जीवावर उदार होऊनच झगडावं लागतं.

* पै. महमद

संसारिक जीव वाढतो तशा त्याच्या बरोबर दोन वस्तू वाढतात· धनासक्ति व दीर्घ जीवतासक्ति.

हें जीवन म्हणजे भावीं जीवनाची मशागत होय. तिथें पीक घेतां यावें म्हणून भली लागवड करा.

* विचार पोथी

जगण्याच्या इच्छेंत मरणाचें बीज आहे. ती इच्छा गेली म्हणजे मरण मेलें.

जीवन हें विचार, अनुभव आणि श्रद्धा यांचें घनफळ आहे.

* ब्राउनिंग

आत्म्याच्या शक्तिपुढें जीवन म्हणजे कःपदार्थ.

* इमिली डिकन्सन

मी जीवनाचा एकच घोट घेतला. नि त्या मोबदल्यादाखल मी अस्तित्वहीन झालो.

* ड्रायडन

जीवन म्हणजे फसवणुक ! आशेनें मूर्खान्त काढल्यामुळें ह्या फसवणूकीला आपण कौल देतो. उद्यां हा कालच्यापेक्षां जास्तच फसवणूक करतो.

* जॉन गे

जीवन म्हणजे थट्टा आहे. प्रत्येक वस्तूंत ती दिसतें.

होमर

माणसाचें जीवन झाडावरच्या पानांप्रमाणें आहे. कधीं हिरवींगार तर कधीं जमिनीवर गळून पडलेलीं. प्रत्येक वर्षी वसन्त नवीन पालवीं देतो व ती पुन्हां गळून पडते.

* होरेस

आज तर मीं माझें मिळवलें आहे. आज मी जगलों आहे. उद्यां काय वाईट व्हावयाचें तें खुशाल घडो.

* चार्लस किंग्जले

मीं झगडलों, जगलों आणि दारूचा वाटाहि प्यालो. आतां माझ्या सारखा मीच सुखी.

* लाँग फेलो

जीवन सत्य आहे, श्रेष्ठ आहे आणि मृत्यू हें त्याचें ध्येय नाहीं.

जीवन हें एक स्वप्न आहे. असें रडक्या सुरांत मला सांगू नका कारण झोपलेला आत्मा मर्त्य आहे नि त्याला आहेत तशा वस्तू दिसत नाहीं.

माडखोलकर

संध्या रागांत ज्याप्रमाणें प्रकाश आणि छाया यांची सरमिसळ झालेली असते त्याप्रमाणें सुखदु:खाच्या समप्रमाण मिश्रणानें मानवी जीवनाला एक प्रकारची उदात्त माधुरी येते.

– जीवन म्हणजे या जगरूपी अफाट सागरांतील नौका.

* माथन

मानवाचें जीवन ही ईश्वरानें आपल्या बोटानें लिहिलेलीं सुन्दर गोष्ट आहे.

झाडाच्या पानावरील दंवबिंदुप्रमाणें मानवीजीवन हें काळाच्या किनाऱ्यावर नाच करीत असतें.

जीवन म्हणजे न सुटणारें कोडें होय. जगणें म्हणजे कल्पनेंत रमणें नव्हे, अनुभव घेणें म्हणजेच जगणें.

* जोशी

विघात्याच्या पुष्करिणींतील पाण्यावरील बुडबुडा म्हणजेच क्षण-भंगुर जीवन.

* वेंती

✓ जीवन हा एक सागर आहे. त्याच्या तुफान लाटांना पाहून मनुष्य घाबरतो. परंतु तळाशीं असलेल्या रत्नांना शोधून काढण्याचा मात्र तो प्रयत्न करीत नाहीं.

– जीवन हा एक पाण्याचा प्रवाह आहे. समुद्र गांठायची इच्छा असेल, तर तो गाठेपर्यन्त अनेक खांचखळगे व अनेक वळणें घ्यावीं लागतीलच.

जीवन म्हणजे–

(१) एक किल्ला–नेपोलियन
(२) परीकथा– हॅन्स अँडरसन
(३) शोकान्तिका–जोनेथन स्थिफ्ट
(४) धूर– हेन्ले
(५) ज्वाला– शॉ
(६) शिडी–बर्टन
(७) गम्मतजम्मत–जॉन गे
(८) स्वप्न– कॉल्डेरॉन

* साळवी

आज ‘ अिथें ’ तर उद्यां ‘ तिथें ’ यांचेच नांव जीवन.

* देशपाण्डे

प्रश्नचिन्ह हें ज्याचं खरंखुरं प्रतीक व पूर्णविराम हा ज्याचा मृत्यु त्याचं नांव जीवन.

* पाक्सकर

लतेवरील फूल एकटें उमलतें, एकटें प्रफुल्लित होतें आणि शेवटीं एकटेंच अलगद जगाच्या सेवेसाठीं माळ्याच्या झोळींत उडी मारतें, तद्वत जीवन हें एकाकी आहे.

* विष्णु पुराण

अन्यायानें कां होईना उदरभरण करणें हेंच जीविताचें ऐकमेव ध्येय ठरेल. कपटानें वागणारा कुटिल मनुष्य सभ्य म्हणून ओळखण्यांत येईल. सारे पुरुष सासऱ्याचें परमभक्त बनतील. बिचारे आईबाप मात्र तुच्छ ठरतील. खोटें बोलणें हेंच व्यवहारज्ञान मानलें जाईल.

* पारखी

मृगजळाप्रमाणें आभास ठरविणारें एक मोहमय स्वप्न म्हणज जीवन.

* जैनेन्द्र कुमार

जीवन ही एक जबाबदारी आहे. क्षणाक्षण।ला दुसऱ्याला सांभाळत न्यावं लागतं. जो आपल्या मनाला मारूं शकत नाहीं, ज्याला नम्र होतां येत नाहीं, लहान बनतां येत नाहीं, ज्याला दुसऱ्याच्या कल्याणासाठी, हितासाठीं नम्र होतां येत नाहीं किंवा आपला मार्ग सोडून दुसरा मार्ग पत्करतां येत नाहीं, तो आपल्या जीवनांत कांहींच मिळवूं शकत नाहीं, आनंद देखील मिळवूं शकत नाही.

* खाण्डेकर

मानवी जीवन मुळांतच अपूर्ण आहें. मृत्यूच्या छायेंतच त्याला वावरावं लागतं. काळोखांतल्या चान्दणीसारखं.

* आचार्य अत्रे

आयुष्याला जीवन म्हणतात तें उगाच नाहीं. जीवन म्हणजे पाणी. आयुष्य हें पाण्यासारखें प्रवाही असतें. तें सारखें वाहावें तरच जीवन. जे एका ठिकाणीं सांचून राहातें तें कसलें जीवन.

* वि. स. खांडेकर

जीवन हें साधें समरांगण नाहीं. या समरांगणावर शत्रूंशी लढून भागत नाहीं. मित्रांवरहि हत्यार उचलावें लागतें. इतकेंच नव्हे तर प्रसंगीं स्वतःशीहि झुंजावें लागतें.

* तामिळ साहित्य

गृहस्थ माणसाचें जीवन तपस्व्याच्या जीवनापेक्षांहि जास्त जबाबदारीचें व महत्वपूर्ण असतें. कारण गृहस्थ हा आपल्या धर्माचें आचरण करीत असतां तपस्व्यानांहि स्थिर ठेवतो.

* एक सुभाषित

हरीण गवतानें, मासे जलानें आणि सज्जन माणसें सन्तोषानें आपली उपजीविका करतात. परन्तु जगामध्यें व्याध, कोळी आणि आणि दुष्ट माणसें विनाकारण त्यांच्याविषयीं वैर बाळगतात.

* डॉ. राधाकृष्णन

इतराकडे बघतांना स्वतःचेंच प्रतिबिम्ब पाहाण्यास शिकणें ही गोष्ट खरोखर फार अवघड आहे. परन्तु अशी संवय झाली तरच इतराबरोबर जीवन घालविणें शक्य होईल.

* वीर वामनराव जोशी

सुखदुःखाच्या आडव्या उभ्या धाग्यांनीं विणलेल्या या जीवनात बरें-वाईट प्रसंग नेहमीं येतच असतात. बऱ्या प्रसंगाचे जसें आनन्दानें स्वागत करायचे तसेंच वाइटाचेंहि करायला मनुष्यानें सदैव सिद्ध असलें पाहिजे.

* वीर सावरकर

प्रिय आणि अप्रिय गोष्टी एकाच देहांत घालून प्रकृतीनें काय मौज उडवून दिली आहे ! अन्नाची विष्ठा, विष्ठेचे खत, पुन्हा त्याचें अन्न. जीवन म्हणजे गम्मत आहे.

ग्रा. क्र. ८०६९

* एमिल झोला

जीवन म्हणजे नानाविध सवयींचे शिवलेलें वस्त्र.

* साने गुरुजी

जीवन सुन्दर व यशस्वी करण्याकरतां तीन गुणांची जरूरी असतें. पहिली गोष्ट म्हणजे प्रेम पाहिजे. दुसरी गोष्ट म्हणजे ज्ञान व तिसरी गोष्ट शक्ति.

* खाण्डेकर

आयुष्य हें कांहीं पुनवेचें चान्दणें नव्हे, कीं ज्यांत कमलांनीं फुलून एकमेकांचें स्पर्शसुख अनुभवतीं वाऱ्याच्या झुळुकेबरोबर स्वच्छंद डुलावे ! आयुष्य हें कितीतरी बिकट आहे.

* खलिल जिब्रान

जीवन हें मृत्युपेक्षां दुबळें आहे.

* शॉ

सारें आयुष्य हें अथांग शून्य आहे. एकें दिवशीं मृत्यूच्या थंडगार हातानें जगाच्या पाठीवरून हें शून्य पुसलें जाईल.

* टागोर

आयुष्य हा एक कोरा चेक आहे. त्यावर वाटेल तेवढी सुखाची रक्कम लिहिणें माणसाच्या मनावर अवलंबून आहे. मात्र ती आशेच्या शाईनें लिहून हास्याच्या टिपकागदानें टिपली पाहिजे.

एस. एम. जोशी.

आपल्या जीवनांत सद्भावना नित्य नव्या जोमानें अंकुरित होऊ पहातें. परन्तु त्या अंकुराची जोपासना करण्याचें सामर्थ्य आपल्या अंगीं नसल्याने ती कोमेजून जातें. त्या अंकुराची जोपासना करून तें वाढविलें तरच आपला जीवनवृक्ष डंवरून येतो, बहरतो-समृद्ध होतो.

* वा. म. जोशी

आंब्याला खूप मोहोर येतो; पण फळ थोडें लागते. आयुष्याचे झाडहि तसेंच आहें. त्याला आशेचा मोहोर खूप येतो.

* खाण्डेकर

✓ जीवनाची सफलता बुद्धीच्या विलासापेक्षां भावनांच्या विलासांतच आहे. व्यक्ति म्हणून चैनीनें जगण्यापेक्षां समाजांतला एक घटक म्हणून शौर्याने मरण्यांतच अर्थ आहे.

* अनन्त काणेकर

जीवन म्हणजे झगडा. जीवन म्हणजे एकसारखी लांबत जाणारी माळ नव्हे. जीवन म्हणजे परस्परविरूद्ध प्रवृत्तींचा ना आदि ना अन्त असा दोन पदरी गोफ.

* आचार्य अत्रे

जगाच्या चिरंतन नाविन्याची जाणीव म्हणजेज जीवन.

* आचार्य भागवत

ज्ञान, सौन्दर्य आणि साधुत्व हीं जीवनाची त्रिविध मूल्यें आहेत.

* डॉ. दाण्डेकर

निरपेक्ष निस्वार्थ काम, सात्त्विक सोज्वळ सेवा, राष्ट्रोन्नतिकारक सर्वोदयकारी उद्योग म्हणजेच जीवन.

* खाण्डेकर

जीवन ही मानवतेची पूजा आहे.

* विवेकानन्द

जीवन ही एक चैनीची वस्तु नसून कर्तव्याची भूमि आहे.

* खलिल जिब्रान

आज वाईटांतून चांगलें व चागल्यांतून वाईट काढण्यांतच आपलें जीवन संपतें.

–डॉक्टर रोग्यांना जगवतात, यापेक्षां रोगी डॉक्टरना जगवतात हेंच अधिक खरे आहे

– जीवनाचा अर्थ केवळ श्वास घेणें नव्हे तर पुरुषार्थ गाजवणें होय.

* साने गुरुजी

ध्येयाचा वारा आपल्या जीवनांत भरपूर शिरूं दे. आपलीं जीवनें मग सतेज दिसतील.

* फोमा

जीवन हे आपणांपैकीं सर्वांनाच मायाळू आईसारखे वागवीत नाहीं. तें मालकिणीसारखा कडक अंमल गाजवतं.

केव्हां केव्हां मरण हें एखाद्याला सुटीसारखं सुखकारक होतं. केव्हां केव्हां तें सर्वांनाच वरदान ठरतं.

तुम्ही अशा रीतीनें जगलें पाहिजे कीं तुम्हांला आपल्या ज्वानीची आठवण करून देणारं कांहीं तरी तुमच्या म्हातारपणीं तुमच्याजवळ राहील.

* पं. नेहरू

विशाल विश्वांतील वस्तुमात्राजवळ सहानुभूतीचे डोळे घेऊन जा.

– जीवन हें सुखाने भरलेला प्याला नसून कर्तव्यानें भरलेले माप आहे.

* डॉ. आईन्स्टीन

जीवनाच्या या धकाधकींत खरोखरी मोलाचें जतन करून ठेवण्यासारखें जर कांहीं असेल तर, तें माणसाचें सर्जनशील, संवेदनाक्षम व्यक्तित्व होय.

* शेक्सपिअर

कांहीं माणसें जन्मतः मोठीं असतात. कांहीं मोठेपणा मिळवतात. व कांहींच्यावर मोठेपणा लादलेला असतो.

* पेप

प्रामाणिक मनुष्य ही परमेश्वरी सृष्टींतील सर्वोत्कृष्ट देणगी आहे.

* खलिल जिब्रान

धुळींत झोपणाराच्या स्वप्नापेक्षां परांच्या गादीवर लोळणाऱ्याची स्वप्नें कांहीं अधिक मधुर अथवा अधिक सुन्दर असत नाहींत. मग जीवनांत न्याय नाहीं असें मी कसें म्हणू !

आपणापैकीं कांहीं माणसें शाईसारखीं असतात. कांहीं कागदासारखीं असतात. काळेपणा आणि शुभ्रपणा यांच्या धाग्यानीच जीवनाचा पट तयार होतो. जगांतील काहीं माणसें कृष्णहृदयाची नसती तर, आपणांपैकी अनेक मुके झाले असतें आणि आपणांपैकीं कांहीं माणसांचीं हृदयें बर्फासारखीं पांढरी शुभ्र असती तर आपणापैकीं अनेकावर आंधळे होण्याची पाळी आली असतीं.

जीवनाला अनुभूतीचें संगीत गाणारा गायक मिळाला नाहीं म्हणजे त्याचीं जागा तत्त्वज्ञानी मनुष्य घेतो. तो जीवनाचें मन उघडें करून दाखवितो. पण त्याचे हृदय त्याला व्यक्त करतां येत नाहीं.

सुलभतेनें जीवन जगावयाचें असेल तर खालील नऊ गोष्टीं लक्षांत घ्या– (१) स्तुतीनें आणि प्रामाणिकपणें केलेल्या गुणग्राहकतेनें बोलण्यास सुरवात करा. (२) अप्रत्यक्षपणें त्याच्या दोषाकडे त्याचें लक्ष वळवा. (३) दुसऱ्यावर टीका करण्यापूर्वी स्वतःच्या दोषांचे विवेचन करा. (४) हुकुम करण्यापेक्षां तत्संबन्धी प्रश्न विचारा. (५) दुसऱ्यास संरक्षणाची मुभा द्या. (६) थोड्या सुधारणेची व प्रत्येक सुधारणेची भरमसाट स्तुती करा. (७) त्याला चांगला नांवलौकिक मिळवून द्या. (८) उत्तेजन द्या. दोष हें सुलभ रीतीनें घालवितां येतील असें दाखवा. (९) तुम्ही सुचलेल्या गोष्टीं करतांना त्याला शक्य तितके सुखी ठेवा.

* मादाम क्युरी

जीवन म्हणजे दीर्घोद्योगी आणि आत्मविश्वास यांच्या जोरावर परिस्थितीशी अहर्निश झगडून घडवून आणलेला आत्मविकास व अखण्ड ज्ञानार्जनासाठीं केलेलें आत्मार्पण. जीवनाचा तो एक भव्योदात्त आदर्श आहे.

* सोपानदेव चौधरी

क्षण प्रीतिचा । क्षण भीतिचा । क्षण सौख्याचा । क्षण दुःखाचा । क्षण मोहाचा । क्षण खेदाचा । क्षणाक्षणांचा हार गुम्फिला । जीवन म्हणती ज्याला ।

* उमर खय्याम

अवघेंचि असत्य । सत्य एकच मात्र
पुष्प एक वेळ विकसलें । तें निर्माल्य ठरतें सदाचें

* खाण्डेकर

जीवन हा हास्य आणि अश्रू यांचा सुरेख संगम आहे.

* कार्लाईल

मनुष्य म्हणजे काय ? तर एक मूर्ख पोर. विनाकारणच तें धडपडतें, लढतें. सर्व गोष्टींचा हव्यास धरते; पण कशाच्याच योग्यतेचें ते नसतें. शेवटीं जें त्याला मिळतें तें म्हणजे थडगेच !

* जॉनसन

जीवनांत विलंबाला जागा नसते. सुख दिसलं कीं ते उपभोगावं. प्रत्येक तास हा आपल्या सुखद गोष्टीचें व आपल्या सुखाचें शोषण करीत असतो.

* व्होल्टेअर

जीवन हें काटेरी असतं. आणि त्यावरून चालण्याची घाई करण्याव्यतिरिक्त दुसरा कोणताच उपाय नाहीं. दुःख जितकें अधिक आपण चघळू तितकें तें हानीकारक !

* ब्रुवेर

एखादा दोष घालविण्याच्या प्रयत्नापेक्षां इतर अनेक सद्गुण मिळवून आपणास श्रीमंत होता येईल.

– जगण्यासाठीं वेळ वापरा. वेळ तेवढ्यासाठींच आहे. व्यर्थ वेळ खर्चणें म्हणजे आत्महत्याच होय.

* शॉ

तुम्ही माणसाला कांहीं शिकवाल तर तो बिलकूल शिकणार नाहीं.

– अनुकूलता हेंच जीवनाचें सार आहे.

* ना. सी. फडके

जीविताच्या बाजारांत इतरांचे सौदे चांगले जमले अन आपला मात्र आपल्य योग्यतेप्रमाणें झाला नाहीं असें प्रत्येक मनुष्याला वाटते.

★ ★

## ४० तारुण्य

* जुलियन

जितक्या सहजपणें तुम्हीं जीना चढाल, तितक्याच सहजतेंने तो उतराल तर, तुम्ही तरुण आहांत. जर उलट झाले तर तुम्ही म्हातारे झालांत असे खुशाल समजा.

* किपलिंगर मॅगॅझिन

उपदेश ऐकण्यास तयार नसण्याची वेळ म्हणजे तारुण्य !

* विनोबा

तरुणांचें हें लक्षण आहे कीं, तें नवेंनवें विचार जगांत आणतात आणि शूरपणानें त्यांचा अंमल करतात; पण तरुणांना धीराची गरज आहे. धीर असा पाहिजे कीं, जें काम हातीं घेतलें तें पूर्ण

करूनच सोडलें; त्यालाच सातत्य म्हणतात. तरुणांना धीर असेल तरच ते क्रान्ति करू शकतील.

* फ्रँकलिन रूझवेल्ट

ज्वलन्त तारुण्य हा एक ज्वलन्त प्रश्नच उपस्थित झाला आहे. त्यांना त्रास देणाऱ्या समाजाबद्दल तुम्ही काय करावयाचें ठरवलें असे विचारण्यासाठीं ते आमच्याकडे वारंवार येत असतात.

* पर्च

हें तरुणांनो संगीत, हर्ष उधळू नका.....
गुलाब हा विनाशीं, नका, विसरूं नका–

* होसमन

विद्वान म्हणती–

तरुणपणीं रे, दे खुशाल धन, मान, राज्य पर-करीं
परि हृदय तुझे रे ठेव तुझ्या करीं, ना पर-करीं ।

* बायरन

काळ तारुण्याचा । यश–वैभवाचा.

* जॉन बॅरिमूर

स्वप्नांची जागा जोपर्यन्त पश्चात्ताप घेत नाहीं तोपर्यन्त मनुष्य कधींच म्हातारा होत नाहीं.

* विनोबा

नवीन शिकण्याची उमेद ज्याची गेली तो म्हातारा.

* खाण्डेकर

पाहिलेल्या पावसाळ्यापेक्षां अनुभवलेल्या उन्हाळ्यांवरच वय अवलम्बून असते.

तारुण्यांतील दहा वर्षे आकांक्षेचें हिमाच्छादित पर्वत, आशेची

रम्य वनश्री आणि कर्तृत्वाचीं फळ-पुष्पें यांनीं नटलेल्या प्रदेशांतील ते पर्यटनच !

यौवन आणि आशा यांची जोडी अभंग आहे.

म्हाताऱ्यांचीं मनें तळघरासारखीं असतात. तर तरुणांची मनें गच्चीसारखीं असतात.

तारुण्य म्हणजे अद्‌भुतरम्य अविचार.

* ना. सी. फडके

माणसाची जवानी अखण्ड टिकवणारं 'पोरखेळ' हें एकच रसायन आहे.

— चाळीशी म्हणजे तारुण्याचे वृद्धापकाळ व पन्नाशीं म्हणजे वृद्धापकाळाचे तारुण्य.

— अशक्याला शक्यतेप्रत नेण्यांतच तारुण्याची बहादुरी व शोभा आहे.

— जें आम्हांला हवें तें म्हणजे उसळणारे रक्त, पोलादी स्नायू आणि खम्बीर हृदय.

* ना. ह. आपटे

तारुण्यकालांत घडणाऱ्या एकाद्या क्षुल्लक चुकीचे घोर परिणाम घडून तें आपणांस जन्मभर भोगावें लागतात.

* ब्रह्मचर्य हेंच जीवन

तरुणांचा संहार म्हणजेच राष्ट्राचा संहार ; कारण तरुण स्त्री-पुरुष हेंच राष्ट्राचे पंचप्राण होत.

* यदुनाथ थत्ते

प्रत्येक तरुणास दृढ इच्छाशक्ति पाहिजे. तो आपल्या निश्चयावर हिमालयासारखा दृढ, अढळ, निश्चळ राहिला पाहिजे. हजारों संकटें आलीं तरी त्यांनी हातीं घेतलेलें काम तडीस न्यावयास पाहिजे.

* तारुण्याचा काळ म्हणजे जीवनाचा रचनाकाळ.

* जोसेफ मॅझिनी

तरुणांना कर्तव्यबुद्धीनें उद्दीपित करा. ध्येयाची भक्ति शिकवा म्हणजे त्यांच्या अंगांत काय सामर्थ्य आहे हें तुम्हांस कळेल.

तारुण्य हें अवसान, धाडस, करारीपणा व आत्मत्याग यांनीं भरलेलें आहे.

* लक्ष्मणशास्त्री लेले

बाल्यासवें गमन मन्थरतेस गेलें,
चित्तासवें अधरबिम्ब सुरक्त झाले,
तैसा नितम्ब मृगबालक लोचनेचा,
कामासवे अखिल गौरव दावि साचा,

* बायरन

आमच्या तारुण्याचें दिवस वैभवाचें होते.

* चार्लस किंग्जे

तारुण्यामुळें मोलकरीण देखील राजकन्येप्रमाणें भासतें.

* चार्लस कॉटन

तारुण्यांतील बेछूट वर्तन ही वृद्धापकाळाच्या नांवावरचें कर्ज असते. तीस वर्षानंतर हे सव्याज फेडावें लागतें.

* काव्यप्रकाश भाषांतर

नेत्रीं चंचलता, तशी मधुरता तीं लाडक्या भाषणीं,
जंघीं मन्थरता विलास जनिता, कान्ती बहु आननीं,
गात्रीं भाव मृगाक्षीच्या स्फुरति जे हे यौवनाच्यामुळें,
त्यांही तें मधुपानहीं युवतीचें कोणासही ना कळे ।

* जोफेस मॅझिनी

तरुण हा शब्द राष्ट्रीय पुनरुज्जीवनाचा द्योतक आहे.

★ ★

## ४१ : त्याग

* म. गांधी

संपूर्ण त्याग जरी आपणांस करतां आला नाहीं तरी चालेल. पण स्वतःचा चरितार्थ चालविण्यासाठीं तुम्ही प्रामाणिक शारिरिक कष्ट करतां ना ? तर मग ध्येय कांहीं फार लांब नाही.

त्याग व सेवा यामुळेंच जगाचे व्यवहार चालू आहेत. कारण त्याग व सेवा यासाठीच मानवाचा जन्म आहे असे गीता म्हणते.

प्रत्येकजण स्वतःच्या पोटापुरतेच श्रम करील तर प्रत्येकांस भरपूर अन्न मिळेल, भरपूर विश्रान्ती मिळेल, अति लोकसंख्येची हांकाटीं राहणार नाहीं. दुःख रोग शिल्लक राहणार नाहींत. असा परिश्रम करणें म्हणजे सर्वान्त मोठा स्वार्थत्याग होय.

* कृष्णाबाई दिक्षित

जगांत ध्येयवाद साधण्याकरतां कर्तव्याच्या कठोर वेदीवर उभे-राहून, जीवन्त कोमल भावनांचा बळी द्यावा लागतो–हंसत मुखानें द्यावा लागतो.

* खाण्डेकर

त्यागाची शक्ति हेंच अलौकिकत्व.

* राधाकृष्णन

देव, देश व मानव यांची सेवा करतांना जो सर्व देतो तो कृतार्थ होतो. त्यागांतच वैभव आहे, संचयांत नाही.

– जो निर्लेप काम करतो तो श्रेष्ठ ठरला जातो.

– त्यागासाठीं त्याग करणें अशक्य आहे. पण सेवेसाठीं त्याग करणें सुलभ आहे.

– जो दुसऱ्याचें ओझें हलकें करतो तो निरुपयोगी नव्हे.

– त्यागी जेवढें जास्त निपजतील तेवढा राष्ट्रास फायदा होईल.

– त्यागी माणसाचें जीवन म्हणजे कलेचें शिखर आणि संपूर्ण आनंद ह्यांचा मिलाफ असतो.

* विवेकानन्द

जगामध्यें नेंहमीं दात्याची भूमिका घ्या. सर्व कांहीं दान करा व परतीची अपेक्षा करूं नका.

– बुद्धीवादाचा ध्वज तरुण पीढीनें अवश्यमेव हातांत घ्यायला हवा. पण त्याग हीच त्या निशाणीची काठी आहे.

अेक सुभाषित

कर्मानें, प्रज्ञेनें वा धनानें नव्हे त्यागानेच अमृतत्वाचा लाभ होईल.

– म. गांधी

त्याग हा सर्व प्रकारच्या कलेचा परमोच्च बिंदूच आहे.

– वेश्या धनहीन पुरुषाचा, प्रजा पराजित राजाचा, पक्षी फळ–हीन वृक्षाचा आणि अतिथि जेवण झाल्यावर घराचा त्याग करतात.

– दयाहीन धर्म, विद्याहीन गुरु, क्रोधमुखी भार्या, व स्नेहशून्य. बन्धूजन यांचा त्याग करणेंच उचित होय.

* ब्युटिफुल

कळकळ ही जीवनाची सुरवात करते तर त्याग हा त्याचा शेवट करतो.

* खांडेकर

अलौकिक व्हावयाला माणसांत काय हवें ? पैसा ? छेः ! नुसती श्रीमन्ती म्हणजे सांठलेल्या तळ्यांतील पाणी ? विद्वता ? केवळ विद्वता म्हणजे पोकळ नगारा ! मोठ्या आवाजापेक्षां जगाला त्याचा काय उपयोग ? कीर्ति ? सौन्दर्य ? छे: ! त्यागाची शक्ति हेंच खरें त्याचें अलौकिकत्व !

* अेक सूत्र

त्यागाशिवाय समता नाहीं. समतेशिवाय शान्ति नाहीं आणि शांतिवांचून प्रगति नाहीं.

* म. गांधी

त्याग करून दाखविणाऱ्या माणसानें दुर्मुखलेलें असणें हें दृश्य विद्रूप होय. ज्या त्यागांत आनन्द नाहीं तो त्यागच नव्हे.

* खलील जिब्रान

जो तुमची सेवा करतो त्याच्या ऋणांतून तुम्ही केवळ पैसे मोजून मुक्त होऊं शकत नाहीं, सेवेचें ऋण फक्त दोनच मार्गांनीं जगांत फेडतां येतें. एक प्रेमानें व सेवेनें.

* वि. स. खाण्डेकर

मोती होण्याकरतां जलबिंदूला आकाशांतून आपला अधःपात करून घ्यावा लागतो. लोकांना दिपविण्याकरतां विजेला मेघमण्डळाचे मन्दीर सोडावे लागते. सन्ध्यावन्दनें मिळविण्याकरतां सूर्याला आकाशाच्या मध्यभागापासून क्षितिजापर्यन्त खालीं उतरावे लागते.

* रवीन्द्रनाथ टागोर

पायदळीं चुरगळलेलीं फुलें, चुरगळणाऱ्या पायाला आपला सुगन्ध अर्पण करतात. खऱ्या क्षमेचें कार्य हेंच आहे.

* काका कालेकर

दिग्विजयापेक्षां धर्मजय श्रेष्ठ, बाह्य शत्रुना मारण्यापेक्षां षड्रिपूंना मारण्यांत मोठा पुरुषार्थ आहे.

* महाभारत

अभिमानाचा त्याग करणारा माणस लोकांच्या प्रेमास पात्र होतो. राग सोडलेल्याला दुःख होत नाहीं. अभिलाषा सोडलेला माणूस श्रीमन्त होतो व लोभ सोडलेला खरा सुखी होतो.

★ ★

## ४२ : ढोंगी

* गीता

जो कर्मेंद्रियांवर ताबा ठेऊन मनानें इंद्रियांच्या विषयाचें चिन्तन करतो तो ढोंगी व मूर्ख समजला जातो.

* गडकरी

शास्त्राचें तोण्डांत फवारे
रूढीचें परि गुलाम सारे ।
स्वतन्त्रयतेचें उसनें वारें
पक्षी सदनीं बसलें कोण्डुनी, गाति यशाचें गान

* रघुवीर सामंत

या सार्‍यांना निज स्वार्थ हवा ! मग रक्ताचा हेवा–दावा !
बघ, ओठि शान्ततेचा बकवा !–मग पोटिं हानतेचा कावा.
हो ! दंभाचा उडबा धुव्वा ! अन खर्‍या शांतिला फूल वहा

* इमर्सन

तुमचें खरें स्वरूप तुमच्या चेहेर्‍यावर स्पष्ट लिहिलेलें असतें म्हणून दंभ करूं नका.

* पै. महंमद

वायफळ बोलणें आणि थाटमाट करणें ह्या दोन दांभिकतेच्या शाखा होत.

* विचार पोथी
दम्भ सूक्ष्म आहे. तो ज्ञानरूपानेंच राहातो असें नाहीं. अज्ञानरूपानेंहि राहूं शकतो. पुष्कळ वेळां मनुष्य न कळतहि दम्भ करीत असतो.

* लिंकन
कांहीं वेळां कांहीं लोकांना किंवा कांहीं लोकांना कांहीं वेळां तुम्ही फसवाल पण सर्वच वेळीं तुम्हीं सर्वच लोकांना फसवूं शकणार नाहीं.

* एस जॉनसन
आपल्या सुज्ञामध्यें कोणीच ढोंगी नसतो.

* ला रॉचे फॉकल्ड
दंभ म्हणजे दुर्गुणांनीं सद्‌गुणांना दिलेला मान होय.

★ ★

## ४३ : दया

– दुष्टांचें निर्दालन व सज्जनांचें परिपालन म्हणजेच दया.

– आतां दया ते ऐसी । पूर्ण चन्द्रिमा जैसी ।
निववितां न कडसी । सानथोर ।

* गडकरी

– अवेळ येथें कसली बाई ?

दु:ख सांत्वना गा केव्हांही !
अनुकम्पेला नियम न कांहीं !
रित्या मनीं या ओत सूर, त्या जावूं दे अति खोल.

* तुकाराम

क्षमाशस्त्र जया नराचिया हातीं । दुष्ट तयाप्रति काम करी ।

दया, क्षमा, शांति । तेथें देवाची वसति.

भूतांचीं दया, हेंचि भाण्डवल सन्ता ।
अवतार तुम्हां धराया कारण ।
उद्धरावें जन जड–जीव ॥

* महावीर

द्वेषाला सहानुभूतीनें आणि निष्कपटतेनें जिंका.

* ब्लेक

अनंत कालापर्यंत मी तुला क्षमा करीन
आणि तूहि मला क्षमाच कर

* रॉबर्ट ब्राऊनिंग

क्षमा करणें चांगलें
विसरणें तर त्याहून उत्तम.

* बुक ऑफ कॉमन प्रेअर

आम्ही केलेल्या अतिक्रमणाची तूं क्षमा कर, जसं आमच्यावर झालेल्या अतिक्रमणाची आम्ही क्षमा केली आहे.

* तुलसीदास

दया हाच धर्म (दया धरमका मूल है )

★ ★

## ४४ : देह

* गीता

देह हा उपभोगाकरितां नसून केवळ कर्तव्याकरितांच आहे. कोणतेंहि मोठें कार्य साधावयाचें म्हणजे देहाला मृत्यू पुढें ठेवावेच लागतें

* श्रीसमर्थ

तनुत्यागिता कीर्ति मागें उरावी

– पिण्डी तें ब्रह्मांडीं ।

* यशवन्त

नाहीं रूप, रूबाब, सौष्ठव, तसें आरोग्य नाहीं जरी
देहाचा मग लोभ काय म्हणूनि चित्ती असावा तरी ?

* समर्थ

विवेकें देहबुद्धि सोडून द्यावी । विदेहीपणें मुक्ति भोगीत जावी ।

★ ★

## ४५ : देव–दैव

* आल्गर

देव सज्जनांचा मित्र, शहाण्यांचा मार्गदर्शक, मूर्खांचा जुलमशहा आणि वाईटांचा शत्रू असतो.

– साहसे श्रीः प्रतिवसति ।

– देव बदलले, जडलेल्या संवयी बदलत नाहींत.

साने गुरुजी

दैव हे समुद्राप्रमाणें खोल व विस्तीर्ण आहे. पण आपल्या कर्तबगारीची भाण्डीच लहान असतात.

– परमेश्वराच्या न्यायबुद्धीवर ज्याचा विश्वास नाहीं तो संशयात्मा असतो.

– जो परमेश्वराला आपल्या जवळ आणतो त्याचा पराजय कधींच होत नाहीं.

– मनुष्य हाच आपल्या भाग्याचा कारागीर असतो.

* म. गान्धी

ज्याचें वर्णन करतां येत नाहीं परंतु ज्याचे अस्तित्व आपणांस पदोपदीं जाणवतें पण ज्याच्याविषयीं आपणांस कांहींच माहित नाहीं, तोच परमेश्वर होय.

परमेश्वर म्हणजे सद्सद्विवेक, अनिश्वरवाद्यांचा अनिश्वर तोच, शब्दातीत आणि तर्कातीत तोच गरजवन्ताचा तोच एकमात्र.

मी देव मानीत नाही. सत्य हाच माझ्या दृष्टीनें परमेश्वर.

माझ्यामध्यें परमेश्वर नाहीं असें मला वाटेल तर दुःख आणि निराशेनें मी अगदीं वेडा होईन.

परमेश्वर ही काहीं मेधांत राहाणारी शक्ति नव्हे. ती आपल्यामध्यें आणि आपल्या जवळपास वावरणारी शक्ति आहे.

तुम्ही आणि मी अिथें बसलों आहोंत या वस्तुस्थितीपेक्षांही परमेश्वराचें अस्तित्व अधिक सत्य समजतों. मला अन्नपाण्याशिवाय जगतां येईल. परंतु त्याच्या शिवाय नाहीं. तुम्ही माझें डोळें काढून घेतले तरी मला तुम्ही मारूं शकणार नाहीं. पण परमेश्वरावरील माझा विश्वास तुम्ही हिसकावून घ्या की मी मेलोंच.

* असॉनियस

दैवानं हात दिला तर हुरळून जाऊं नका. दैवानें आठ्या चढविल्या तर कोळपून जाऊं नका.

* ना. सी. फडके

देवावर अगर दैवावर विसम्बून राहाणारा माणूस परावलम्बी असतो. अर्थात् त्याच्या हातून कोणताहि पराक्रम होणें अशक्य होऊन बसतें.

* तुकाराम

आलिया भोगासी असावे सादर । देवावरी भार घालूं नये ।।

* समर्थ

धातु पाषाण मृत्तिका । चित्रलेप काष्ठ देखा ।
तेथें दैव कैचा मूर्खा । भ्रान्ती पडली ।

– देवाच्या कल्पनेचा उगम प्रेम आणि भय या भावनांमध्यें असतो. दूध देणाऱ्या गोमातेला आम्ही देव मानतो. आणि फूत्कार करणाऱ्या नागदेवाचीहि पंचमी पाळतो.

* पं. जवाहरलाल नेहरू

मी आतां छोट्या देवालयांतील एकट्या दुकट्या मूर्तीची उपासना करण्याचें सोडून दिलें आहे. माझें आराध्यदैवत एकाच मन्दिरांत आहे. हे मंदिर हजारों मैल विस्ताराच्या प्रदेशावर उभें राहिलें आहे. या भव्य मंदिराचें नांव भारत आहे. आणि या भारतांतील ३६ कोटी देवतांचा मी पुजारी आहे.

★ ★

## ४६ : देशभक्ति

* लो. टिळक

ईश्वरानें क्षणभर जरी मला म्हटलें कीं, तुला साक्षात् मोक्ष देतो तर तो लाथाडून मी म्हणेन कीं, मला मोक्ष नको. मला माझ्या देशाला गुलामगिरीच्या बेड्यांतून मुक्त झालेला पहावयाचें आहे. व्यक्तीगत मोक्ष कितीहि उच्च कोटीचा असला तरी तो पराकाष्टेचा व्यक्तीगत स्वार्थ आहे.

* गो. ग. आगरकर

वृद्ध हे समाज नौकेचें भरताड होत. तरुण शिडें होत. पहिल्याशिवाय समाजांत स्थिरता राहाणार नाहीं आणि दुसऱ्याशिवाय त्याला गति येणार नाहीं.

* ब्रॅन

रिकाम्या पोटानें कोणीहि मनुष्य देशभक्त होऊं शकत नाही.

* डेमंड बर्क

जो मातृभूमीवर प्रेम करीत नाहीं त्याला कशावरच प्रेम करतां येणार नाहीं.

* थॉमस कॅम्पवेल

देशभक्ताचं रक्त म्हणजे स्वातंत्र्य वृक्षाचें बीजच होय.

* ड्रेक

जे कोणी राष्ट्रासाठीं मृत्यू स्वीकारतील ते अजरामर होतील.

* जॉनसन्

बदमाश लोकांचं शेवटचं आश्रयस्थान म्हणजे देशभक्ति.

* होप

जो स्वदेशावर प्रेम करतो नि दारिद्र्य पत्करतो असा कोण आहे?

* स्कॉट

ही माझो मातृभूमि, जन्मभूमि आहे. असे ज्याच्या तोंडांतून कधींच उद्‌गार निघत नाहींत असा मुर्दाड मनाचा कोणी आहे काय ?

– कोणत्याहि उत्कर्षेच्छु राष्ट्राचें आद्यकर्तव्य म्हणजे आपल्या इतिहासाचें संशोधन करणें हें होय.

* लो. टिळक

एकाद्या तळ्यांत सभोंवारच्या वस्तूचें जसें प्रतिबिंब पडतें त्याप्रमाणें प्रत्येक देशांतील लोकांच्या आचार विचाराचें, धर्माचें, नीतीचें, तत्त्वज्ञानाचे, व्यापाराचें, व समाज–स्थितीचे चित्र त्याच्या भाषेंत उतरलेलें असतें.

* ओतुरकर

खरें स्वातंत्र्य हा स्वैराचार नसून व्यक्तीस निसर्गदत्त प्राप्त झालेल्या विविध गुणांचा विकास करून घेण्याची व तद्वारा समाज–सेवा करण्याची सन्धी आहे.

★ ★

## ४७ : दानत

* रघुवीर सामंत

या दुनियेमन्दी दानत खोटी ।
मर्दाच्या हातांत नरोटी ।

* पोप

सचोटीचा मनुष्य निर्माण करणें हीच परमेश्वराची उदात्त कलाकृति होय.

* महावीर

जो स्वप्नामध्यें देखील दानतीपासून भ्रष्ट झाला नाहीं तो युवकामध्येंहि वृद्ध आणि वृद्धामध्येहि महात्मा समजला जातो.

★ ★

## ४८ : दानधर्म

* पै. महंमद

दोघांतील वादांत न्याय देणें हा दानधर्म होय.

प्रत्येक सत्कृत्य दानधर्म होय.

* जीवन दर्शन

जेव्हां जीवनाचा अंश द्याल तेंच खरेंखुरें दान होय.

प्रथम हें बघा कीं आपण स्वतःच दाता होण्याला नि दानाचें साधन होण्याला पात्र आहोंत काय ?

* शेषप्रश्न

ज्यांनीं भरपूर मिळविलें आहे, त्यांना सहज देतां येतें.

* भ. महावीर

जो शक्तिशाली असूनहि क्षमा करतो आणि दरिद्री असूनहि दान करतो असें दोन पुरुष स्वर्गाच्याहि वर रहात असतात.

* ओल्ड टॅस्टॅमेण्ट

जो गरिबाचा विचार करतो तो आशिर्वाद मिळवतो.

अन्धाचा मी नेत्र बनतो आणि पांगळ्याचें पाय !

* लिंकन

नको दुष्टता परि, दया त्यांप्रति–

★ ★

## ४९ : दान

* टागोर

आपलें जीवन हें आपणास मिळालेलें एक दान आहे. त्याचें दान करीत राहिल्यानेंच त्याचे मोल वाढतें.

* शेख सादी

ज्याच्या अंगीं दातृत्व आहे, त्याला शौर्यांची जरूरी वाटणार नाहीं. दातृत्वाची शक्ति शरीर बळापेक्षां अधिक आहे.

* ज`र्ज इलियट

दाता गरीब असला तरच त्याला दानांतलें खरें सुख कळतें.

* पै. महंमद

तेंच दान श्रेष्ठ कीं, जें उजव्या हाताने दिलें असतां डाव्या हाताला कळत नाहीं.

गुप्त दान परमेश्वराचा कोप शान्त करते.
दानधर्म हें आस्तिकतेचें प्रमाण होय.

★ ★

## ५० : दारिद्रय

* मृच्छकटिक

पैशानं सर्व कांही गोष्टी करतां येतात, असं ज्याचं मत असतं ती माणसें पैशासाठीं कांहींही, करतील.

* सर्वन्टस्

दरिद्री आणि श्र`मंत अशी जगामध्यें दोनच जमाती आहेत.

* विल्यम कॉबेट

दरिद्री राहून स्वावलम्बी राहणें म्हणजे जवळजवळ अशक्य आहे.

* जॉन फ्लॉरिओ

दारिद्र्य हा दुर्गुण नव्हे. गैरसोय किंवा अडचण आहे.

* सॅम्युअेल जॉनसन

दारिद्र्यांत रुतलेलें कर्तृत्व हळूहळू वाढतें हें एक करुण सत्य आहे.

* न्यू टेस्टॅमेन्ट

हे दरिद्री माणसा ! तू भाग्यवान आहेस. कारण परमेश्वराचें सारें राज्य तुझेच आहे.

* ओल्ड टेस्टॅमेन्ट

जो दरिद्र्यावर दया दाखवितो तो परमेश्वराप्रत जातो.

* ऑगिन ओनेल

दारिद्र्य हा सर्वांत अधिक प्राणघातक आणि गलिच्छ रोग आहे,

* साने गुरुजी

पैसा हें मद्य आहे. सेवा हें अमृत आहे.

* ज्ञानेश्वर

श्रीमन्ताच्या हवेल्या चांगल्या आहेत म्हणून आपल्या लहान झोपड्या कोणीं पाडतात काय ?

★ ★

## ५१ : दृष्टि

* केशवसुत

साध्याहि विषयांत आशय कधीं मोठा किती आढळें ।
नित्याच्या अवलोकनें जन परी होती पहा आंधळें ॥

* हरिंद्र चटोपाध्याय

मी प्रथम डोळे झांकले तेव्हां उघडया डोळयांचा आंधळेपणा मला प्रथम दिसला.

* विचार पोथी

हिमालय उत्तरेस कां आहे ? मी त्याला उत्तरेस राहूं दिलें आहे म्हणून. मी उद्यां त्याच्या उत्तरेस जाऊन बसलों म्हणजे तो दक्षिणेकडे फेकला गेलाच.

ज्ञानापेक्षां दृष्टि थोर.

ज्या रंगाचा चष्मा त्या रंगाचें जग.

– जशी ज्यांची दृष्टि बरी किंवा वाईट असेल, तशी त्याला जगांतील कोणतीहि वस्तु बरी किंवा वाईट दिसेल.

* साने गुरुजी

आपलें लक्ष मंगलाकडे कमी असतें, अमंगलाकडे जास्त असते.

खरें शिक्षण म्हणजे एक प्रकारची दृष्टि !

* विनोबा

ठेंच दोन तऱ्हांनीं लागतें. मुळींच न पाहिल्यामुळें किंवा फार दूर पाहात राहिल्यामुळें.

★ ★

## ५२ : धर्म

* म. गान्धी

खरा धर्म आणि खरी नीति अेकमेकांत विभक्त न करतां येतील अशा रितीनें गोंवलेल्या असतात. जमिनींत पेरलेल्या बीयांना जसे पाणी तसेंच नीतिमत्तेची बीजें अंकुरण्यास धर्माची जरूर असते.

सत्य आणि न्याय ह्याहूनहि कोणताच धर्म मोठा नसतो.

निरनिराळे धर्म हें शेवटी अेकाच बिन्दूकडे वळून अेकत्रित येणारे बिन्दू आहेत, प्रत्यक्ष पाहातां, जितक्या व्यक्ति तितकेच धर्म असतात.

ज्यांत व्यवहार नाहीं व जो व्यवहारोपयोगी नाहीं तो धर्मच नव्हे.

नैतिक पाया ठांसळला कीं धार्मिकता लोपलीच.

* डॉर्सि

स्वभावधर्म हा जन्मतःच नसतो. बनवावा लागतो.

* सिडने स्मिथ

चालीरिती म्हणजे सद्गुणांच्या पडछाया.

* अिमर्सन

चालीरितीना वेळ लागतो आणि त्या बाबतींत घाई इतकी मोठी घोडचूक कुठलीच नसतें.

— धर्माच्या मुळाशी श्रद्धाच असते. जेथें श्रद्धा नाहीं तेथें धर्म नाहीं.

— धर्महीन धन त्याज्य आहे व धर्महीन राजसत्ता राक्षसी आहें.

— दुःखांतच खरी धर्माची परीक्षा होतें.

— आत्म्याची सुधारणा हा सर्व सुधारणांचा आत्मा आहे.

* विचार पोथी

स्वधर्म सहज प्राप्त असतो. मुलाला दूध पाजण्याचा धर्म आई मनूस्मृतींतून शिकत नाहीं.

स्वधर्मविषयीं प्रेम, परधर्मविषयीं आदर आणि अधर्मविषयीं उपेक्षा मिळून धर्म.

दोन धर्मांचा कधींहि झगडा नसतो. सर्व धर्मांचा अधर्माशीं झगडा आहे.

जगांत नीति आणि भक्ति नान्दावी हा धर्माचा उद्देश आहे.

(१) बुद्धीची स्थिरता. (२) निष्काम सेवा. (३) इंद्रिय निग्रह (४) भक्तीचा जिव्हाळा. (५) आत्मज्ञान. (६) दैवी संपत्तीचा विकास आणि (७) संन्यास या सात अंगांनीं धर्म पूर्ण होतो.

(१) श्रुति (तत्त्व–सिद्धांत), (२) स्मृति (सामाजिक धारा) (३) पुराण (पूर्व सन्तांचीं चरित्रें) (४) भक्ती (उपासना) (५) नीति (अहिंसा–सत्यादि सिद्ध पंथ) हें सर्व धर्मांचे पंचांग आहे.

* भ. समंतभद्र

धर्मामुळें कुत्र्याला देखील देवपण येतें आणि अधर्मामुळें देव देखील कुत्र्यासारखा होऊन बसतो.

– राष्ट्र, धर्म यांच्यासाठीं रणीं झुंजतांना
मृत्यू ज्यांस येईल त्याचें भाग्य थोर जाणा ॥

* फ्रेडरिक दि ग्रेट

प्रत्येक धर्माबद्दल सहिष्णुता बाळगली पाहिजे. कारण ज्याच्या त्याच्या मार्गानेंच मनुष्यानें मोक्ष गांठला पाहिजे.

* कार्ल मार्क्स

धर्म ही अफूची गोळी आहे.

* गीता

सोप्या रितीनें आचरला गेलेल्या परधर्मापेक्षां कमी प्रतीचा स्वधर्म बरा. स्वधर्मांत मरण परवडतं. परन्तु परधर्म हा महा–भयंकर असतो.

* समर्थ रामदास

धर्मासाठीं मरावें । मरोनि अवघ्यासि मारावें ।
मारितां मारितां घ्यावें । राज्य अपुलें ।

* मार्क्स रामायण

प्रत्येक धर्माला तीन बाजू असतात. एक ऐतिहासिक, दुसरी तात्त्विक व तिसरी व्यवहारिक किंवा नैतिक. कोणता धर्म केव्हां कसा आणि कोणत्या परिस्थितींत स्थापन झाला व त्याची वाढ कशी होत गेली ही धर्माची ऐतिहासिक बाजू झाली. परमेश्वराचें व आत्म्याचें स्वरूप व त्यांचा एकमेकांशीं असलेला संबंध ही तात्त्विक बाजू झाली व व्यवहारात कसें वागावे, कोणतीं बंधनें पाळावीत, वर्जावर्ज अशा कोणत्या गोष्टीं मानाव्यात, ही धर्माची व्यवहारिक किंवा नैतिक बाजू आहे. या तिन्हीं दृष्टीनें प्रत्येक धर्माचा विचार करावयास पाहिजे.

* म. गांधी

राजकारण आणि धर्म यांची फारकत करतां येणार नाहीं.

* पै. महंमद

लीनता आणि विनयशीलता ह्या धार्मिकतेच्या दोन शाखा आहेत.

* भ. महावीर

ज्यांचं मन सदा धर्मरत राहातं त्याला देव देखील नमस्कार करतो.

★ ★

## ५३ : ध्येय–ध्येयसिद्धी

हेडगेवार

राष्ट्र व समाजरूपी विराट पुरुषाचें कल्याण हेंच आपलें ध्येय असावें.

महनीय महत्त्वाकांक्षेनें प्रेरित झालेली दुबळी शरीरें देखिल जगांत आश्चर्यानें तोंडांत बोट घालण्यास लावणारी प्रचंड उलथा पालथ करतात.

* माझें रामायण

आपल्या उच्चत्तम कल्पनेला किंवा ध्येयाला भरधांव दौड करावयास लावून भागायचें नाहीं, तर त्याला व्यवहाराच्या कांटेरी लगामांत अडकवून धरून खांचखळगे पाहातच चालविले पाहिजे.

* साने गुरुजी

एका ध्येयानें बांधलेलें कोठेहि गेलें जरी तें जवळच आहेत.

★ ★

## ५४ : नवें जुनें

* केशवसुत

जुनें जावुं द्या मरणा लागुनि
जाळुनि किंवा पुरुनी टाका

* भा. रा. तांबे

जुनें जुनें ते सर्व हि द्या द्या
नवें नवें ते पाहूनि घ्या घ्या

* गडकरी

जुन्या मनांचा जाळा कचरा
जुन्या ऋषीना सलाम ठोकुनि
करा तयारी छाती ठोकुनि
आजकालच्या ऋषी मागनि
जा तिकडे नेईल हा पसरा

* वसन्त बापट

जुन्या घराच्या थडग्यावरतीं
नव्या घराचा बान्धु अिमला
त्याच्या थडग्यावरती माझा
पणतू बान्धिल हिरवा मजला

★ ★

## ५५ : नशीब

* सुभाषित रत्नकार

रात्रिर्गमिष्यति भविष्यति सुप्रभातम्
भास्वा नुदेष्यति हसिष्यति चक्रवाकम्
अित्थं विचिन्तयति कोषगते द्विरेफे
हा हन्त हन्त नलिनी गज अुज्जहार

* वेणीसंहार

दैवायत्तं कुले जन्म मदायत्तं तु पौरुषम् ।

– दैवपरा नरा विनश्यन्ति ।

– मनोरथानामगतिर्न विद्यते ।

– लोके गुरुत्वं विपरिततां वा स्वचेष्टितान्येव नरं नयन्ति ।

– साहसे श्रीः प्रतिवसति ।

– सर्वं दैवाधीनं आयतम्–

– विना पुरुषकारेण दैवं न सिद्धति ।

– कर्मणो गहना गतिः ।

– ईश्वरेच्छा बलीयसि ।

* वि. वि. बोकील

दुर्दैवाचें तडाखे सहन करण्याची ताकद सर्वांनाच नसते. ज्याच्या सहनशक्तीची तार तुटण्यांइतकी ताणली जातें, ते खोटचा वैभवाला भुलन सोपा वाटणारा मार्ग जवळ करतात.

* होमर

जो स्त्रीपासून अुत्पन्न झालेला आहे, असा कोणताहि माणूस मग तो शर असो वा भेकड असो, आपलें नशीब कधींच बदलू शकणार नाहीं.

★ ★

## ५६ : निद्रा

* महात्माजी

जोपर्यंन्त माझा झोपेवर ताबा आहे, तोपर्यंन्त माझें जीवन आहे.

* रसमंजरी, विठ्ठल

निद्रा करीन तरी, कान्तमुखा न पाहे
जागीं असेन तरि, कामुक भोगताहे
अैसी सरोज नयना, मनि चिन्तिताहे
निद्रा नये, नयनि जागरही न साहे–

' शेक्सपिअर

ज्या ठिकाणीं चिन्ता आहे, त्या ठिकाणीं निद्रा कधींच वास करीत नाहीं.

* पै. महंमद

झोप हें मृत्यूचें भावण्ड होय.

* विचार पोथी

गाढ झोपेंत विचारांचा विकास झाल्याचा मला पुष्कळ वेळां अनुभव येतो. पेरलेलें बी मातीनें झाकलें म्हणजे झोपलेसें भासतें. पण विकसत राहातें.

* सर्वंण्ट

ज्यानें झोप प्रथम शोधून काढली, त्यालाच आशीर्वाद.

· बालकवि

ये ये रजनी, ये फिरफिरूनी, येशील ग तूं जेव्हां
ब्रह्मांडांचा भार मावुली तुजविण वाहील कोण ?

★ ★

## ५७ : निसर्ग

* अमर्सन

निसर्गानें एखादा प्रतिभावन्त मनुष्य उत्पन्न केला कीं ज्या मुशींतून त्यानें तो निर्मिलेला असतो ती तो मोडून टाकतो.

* बापूसाहेब माटे

सृष्टि ऐखाद्याला देणग्या देऊं लागली म्हणजे ती फिदा होऊन ्षाव करतें.

* सिडनेस्मिथ

निसर्ग तुम्हांला जें बनवूं इच्छितो तेंच बना.

शेक्सपिअर

निसर्ग हा सन्मानीय खलपुरुष आणि कु–साधुपुरुष आहे. कारण तो जसा दिसतो त्याच्या उलट असतो.

★ ★

## ५८ नीति

* नीति आणि कलोपासना

खरें पाहूं गेल्या केवळ नीति या जगांत नाहींच असें म्हटलें तर अतिशयोक्ति होणार नाहीं.

सरड्यासाखें नीति आपले रंग पालटीत असतें.

सर्व सामान्य व सनातन अशीं कांहीं नीतितत्त्वें असल्याशिवाय मानवी व्यवहार चालणेंच शक्य नाहीं हें उघड आहे.

* स्वामी शिवानंद

वयाबरोबर नीतिमत्ताहि वाढली पाहिजे.

* जोसेफ मॅसिनी

नीतिशिवाय नागरिकत्त्व शक्य नाहीं.

* मॅक्स्विनी

सशस्त्र माणसापेक्षा नैतिक अधिष्ठान असणारा माणूसच अजिंक्य असतो.

– सत्पुरुषाच्या गोष्टीं ऐकणें किंवा वागणें यासारखा नीति शिक्षणाचा दुसरा मार्ग नाहीं.

हेन्रीॲडम्स

नीतिमत्ता ही खाजगी आणि खर्चिक चैन होय.

ॲलिस

ज्याला आपण 'नीतिमत्ता' म्हणतो ती म्हणजे शक्तिशाली शब्दांची अन्ध धारणा होय.

* हेमिंग्वे

जें नन्तर चागलें वाटतें तेंच कृत्य 'नैत्तिक' आणि जें नन्तर दुःखकारक ठरतें तेंच 'अनैतिक'.

★ ★

## १९ : टीका

* लो. टिळक

टीका करतांना ज्यांवर ती करावयाची, त्याबद्दल आदर पाहिजे. पण ती ज्या हेतूनें केली असेल तो हेतूहि सफळ झाला पाहिजे.

* राज गोपाळाचारी

अन्तराळांतसुद्धां फुलणारी एकच विषारी वेल आहे. तिचें नांव कुटाळकी !

* मॅथ्यू अर्नोल्ड

जें ज्ञात आहे नि जें उत्तम ठरवलें गेलें आहे तें शिकण्याचा नि प्रसृत करण्याचा निष्काम प्रयत्न म्हणजेच टीका होय.

खरें पाहिले असतां जे टीकाकार आहेत त्यांना कवि, लेखक वगैरे होता आलें असतें. त्यासाठीं त्यांनीं प्रयत्न केला पण निष्फळ ठरला म्हणूनच ते टीकेकडे वळले.

* ॲनातोले फ्रान्स

आपल्या कसबी कामांतून जो आत्म्याचें प्रकटीकरण करतो तोच खरा टीकाकार होय.

* कूपर

विषारी जिभेला नि कडक टीकेला त्याचें एकमेव उत्तर म्हणजे शुद्ध निष्कलंक चारित्र्य होय.

* अेल. पी. स्मिथ

आपल्याविषयीं लोक जें बोलतात तें खरं आहे असा विचार करणं किती दुःखदायक आहे.

* वि. स. खाण्डेकर

आपण सामान्य माणसें आहोंत, जीवनाच्या मर्यादा आपण ओळखल्या पाहिजेत.

* सानें गुरुजी

जगांत दुसऱ्याला हंसण्या इतकें सोपें व दुसऱ्यासाठीं रडण्या इतकें कठीण काम नाही.

* डॉ. राधाकृष्णन

इतरांकडे बघतांना स्वतःचेच प्रतिबिंब पाहाण्यास शिकणें ही गोष्ट खरोखर फार अवघड आहे. परन्तु अशी संवय झाली म्हणजे इतरांबरोबर जीवन घालविणें शक्य होईल.

* पं. नेहरू

तुम्हांला सज्जन व्हावयाचे आहे ना ? तर मग प्रथम आपण वाईट आहोंत ह्यावर विश्वास ठेवा.

* केशव नाईक

स्वतःला लपविण्याचा एकमेव मार्ग म्हणजे दुसऱ्यावर टीकाअस्त्र सोडणें.

* मॅथ्यू अरनॉल्ड

जगांत जें ज्ञान आणि विज्ञान आहे त्याचा अ–भावितपणें प्रचार करणें आणि शिकणें याचेच नांव टीका होय.

* एस्. टी. कॉलरिज्

जे कवि, इतिहासकार, चरित्रकार आपल्या कलेमध्यें अयशस्वी झालेलें असतात, तेंच बहुतांशीं टीकाकार बनतात.

* ॲनातोले फ्रान्स

ख्यातनामाच्या आधारांतून जो आपल्याच आत्म्याची अनुभूति कथन करतो तोच खरा टीकाकार होय.

* केशव नाईक

टीकेच्या नांवाखालीं टवाळी करूं नका.

* चरित्रहीन

तुमचं हे सुपवित्र–अपवित्र ज्ञान हा नुसता संस्कार आहे.

* ओल्ड टेस्टॅमेण्ट

टीका करुं नका, नाहींतर प्रतिटीका होईल.

★ ★

## ६० : परका

– दुसऱ्यास हलका लेखणारा मनुष्य स्वतःच हलक्या मनाचा असतो.

* तुकाराम

विटाळ तो परद्रव्य, पर-नारी। येथुनि जो दूरी सोंवळा तो ।

– पर-उपकारीं नेणें । पर निन्दा ।

* विचार पोथी

परकाया-प्रवेश म्हणजे दुसऱ्याचें मानस समजणें.

* पोप

परक्या करवीं मरणकाळीं नेत्र मिटावें लागती ।
परक्या करवी रें तुझें अवयव सर्व आकारती ।
परक्याकरवी दारिद्र्यास तुझ्या भूषणें येती ।
परकेंच तुला स्तवती परकेंच तुझ्यासाठीं अन्तीं रडती ।

* किपलिंग

आऔ, बाप आणि मी
तुझ्या सारखेच रे मानवी
परि परके ते तुझ्याहूनहि

★ ★

## ६१ : परीक्षा

– जीवनांतल्या सर्व परीक्षेंत सत्त्वपरीक्षा सर्वांत अवघड असतें. तिच्यांतून पार पडायला असामान्य आत्मबळ असावें लागतें.

* पोप

आपण केलेल्या परीक्षा आणि आपलीं घड्याळें नेहमींच सारखीं बदलतात आणि प्रत्येकजण स्वत:वर विश्वास ठेवून चालतो.

★ ★

## ६२ : परोपकार

* डिकन्सन

भग्न हृदयां झाला जरी मी करीन
दु:ख एकाचें तरी हलकें करीन
क्षीण चण्डोला घरट्यामाजीं ठेवीन
तरी व्यर्थ ना जाईल मज्जीवन

* अेगर ए. गेस्ट

जे उभें दोषी माझ्या भोंवतीं
होऊं दे मज अन्ध दयाळू त्यांप्रति

– ना अुपदेश, व दया मी देतसे

* डॉ. आंबेडकर

ज्या लोकांमध्यें आपला जन्म झाला, त्या लोकांचा अुद्धार करणें हें आपलें कर्तव्य आहे. ही जाणीव ज्यांना आहे, तें धन्य होत.

* रामदास

मना चन्दनाचें परि त्वां झिजावे
परी अन्तरी सज्जना नीववावे

* पै. महंमद

घायाळाचें घांव, त्याच्या वेदना, हलक्या करण्यासाठी जें हृदयांतून अुचम्बळणें आणि ओठांतून अुच्चारलें जाते, तोंच सर्वोत्कृष्ठ परोपकार होय.

★ ★

## ६३ : प्रतिक्षा

* तुकाराम

वाटुली पाहातां सिणले लोळुले ।
दाविसी पाउले कै वो डोळां ।

तुका म्हणें माझ्या आंखावल्या बाह्या ।
तुज क्षेम द्यावा पांडुरंगा ॥

भेटी वांचुनियां दुजे नाहीं चित्तीं ।
येणें काकुळती यांजसाठीं ॥
भेटोनिया बोले आवडीचे गुज ।
आनन्दाच्या भोगें जेवूं संगें ॥
तुका म्हणे ऐसे अन्तरीचे आर्त ।
यावे जी त्वरित नारायणा ॥
भेटी लागी जीवा लागलीसें आंस ।
पाहे रात्रंदिवस वाट तुझी ॥
पूर्णिमेचा चन्द्रमा चकोरा जीवन ।
तैसे माझें मन वाट पाहे ॥

* चार्लस

भुताप्रमाणें माझ्या लहानपणाच्या जगाभोंवती मी हिंडलो ती पूर्व परिचित माणसें भेटावीं ती चिरपरिचित तोण्डे दिसावी म्हणून मी साऱ्या पृथ्वीस प्रदक्षिणा करायला निघालो; परन्तु सारी पृथ्वी म्हणजे ओसाड वाळवंट वाटलें.

* क्लोन

वयापेक्षां किंवा दुःखापेक्षां उत्सुकताच अधिक रक्त आटवतें.

★ ★

## ६४ : पाप–पुण्य

* चोखामेळा

पापाचा विटाळ एकाचिये अंगा ।
सोंवळा तों जगामाजी कोण ॥

* संत तुकडोजी

दुसऱ्यांस उगीच मारणें हे जेवढें पाप तेवढेच अन्याय डोळ्यांनीं पाहाणं व सहन करणें हें महापाप आहे.

– लोभः पापस्य कारणम् ।

* वामन पण्डित

न कळतां पद अग्निवरी पडे ।
न करि दाह असे न कधीं घडे ।
अजित नाम वदों भलत्या मिसें ।
सकळ पातक भस्म करितसें ।

* पाळन्दे ग. द.

एका जन्मामध्ये–बीज जें पेरावें ।
दुजानें भोगावें–फळ त्याचे ।
उभ्या आयुष्याचा एक ताळेबंद
नफा तोटा सिद्ध–नव्या जन्मीं ।
पापपुण्याचा हा हिशेब–दिसतो अजब ।

– लबाडी ही तोकड्या चादरीसारखी असते. तोडांवर ओढून घ्यावी तर इकडे लगेच पाप उघडे पडतात.

* सुभाषचन्द्र बोस

सर्वात मोठें पाप म्हणजे अन्यायाशीं तडजोड करणें.

* जॉन गटे

पाप हें असा सुन्दर पोषाख घालून येते कीं, ते पाप आहे असे माहीत असूनहि आपण त्याला हृदयाशीं कवटाळतो अगर धरतो.

* आन्द्रे जीद

प्रत्यक्ष पाप करण्यापेक्षा पापाचा विचार करणें हें अधिक भयंकर पाप आहे.

★ ★

## ६५ : परिस्थिति

* माझें रामायण

परिस्थितीच्या आधीन होण्यापेक्षां त्या परिस्थितीलाच आपण आपल्या इच्छेप्रमाणेंच वाकाविलें पाहिजे.

* केशव नाईक

परिस्थिति निरपेक्ष बना.

– स्थितीचा असे किंकर प्राणिमात्र,
स्थिती त्या करी पात्र किंवा अपात्र

* संसार शकट

कोणत्याहि परिस्थितींतून पार पडण्याकरितां शिकस्तीनें प्रयत्न करण्याची संवय ज्याला आहे. त्याला काळजी शिवत नाहीं.

## ६६ : पालक आणि पाल्य

* ना. ह. आपटे

मुलें अत्यंत अनुकरणशील असतात. तेव्हां घरांतील वडील माणसांनीं सद्‌गुणी, सदाचारी आणि प्रेमळ असावे. त्यांच्या मनाला वाईट वळण लागेल अशी कोणतीहि गोष्ट त्यांच्यापुढें न घडेल अशी अत्यंत खबरदारी घ्यावी. शक्य तितकी त्यांस स्वतंत्रता द्यावी. त्यांच्या इच्छा पुरवाव्या, त्यांच्याशीं शांतपणें वागावे, ताडणाचा प्रसंग सहसा आणूं नये.

* यदुनाथ थत्ते

आपल्याप्रमाणेंच आपल्या मुलाला बनविण्याचा प्रयत्न करणें म्हणजे शुद्ध स्वार्थ.

– स्वतोक पितरां रुचे जरीहि कर्दमीं रांगलें।

– माता कापी गळां ; तेथें कोण राखी बाळा !

– आत्मा वै पुत्र नामासि ।

* तुकाराम

शुद्ध बीजापोटीं फळें रसाळ गोमटीं ।

वरमेको गुणी पुत्रो नच मूर्खशतान्यापि ।

ऐकश्चन्द्रतमो हन्ति न तारानियुतान्यपि ।

– प्राण ज्याच्यावर गुंतले सदाचे । कोड किंचित पुरवतां न ये त्यांचे ।
तदा बापाचें हृदय कतें होतें न ये वदतां अनुभवी जाणती ते ।

लालयेत् पंचवर्षाणि दशवर्षाणि ताडयेत् ।
प्राप्ते तुषोडशे वर्षे पुत्रे मित्रवदाचरेत् ।

प्रार्थनेमुळें तुमच्या सर्व आशा–आकांक्षा सफळ केल्या जातील. असा विश्वास बाळगा.

* शॉ

सर्व सामान्य माणूस प्रार्थना नाहीं करीत तर भीक मानतो.

* शेक्सपिअर

विचाराविना शब्द कधींच स्वर्गापर्यन्त जात नाहींत.

* टेनिसन

ज्या गोष्टीं स्वप्नांत देखील कोणाच्या येणार नाहींत अशा प्रार्थनेमुळें साध्य होतील.

जे अन्धः श्रद्धाळू आहेत, त्यांचे जीवन शेळ्या-मेंढ्यापेक्षां अधिक चांगलें तें काय आहे ? कारण परमेश्वराची आठवण ठेवून त्यांनीं त्यांच्यासाठीं व त्याच्या मित्रासाठीं प्रार्थना करीत नाहींत.

* व्हिटियर

स्वर्गीय सुखाची गुरुकिल्ली म्हणजे प्रार्थना.

* ऑस्कर वाईल्ड

ज्यावेळीं परमेश्वराला तुम्हांस शिक्षा द्यावयाची असते त्याच वेळीं तो तुमच्या प्रार्थना ऐकतो.

* अिमली डिकन्सन

मी प्रार्थना केली पण परमेश्वरानें ऐकली काय ? जणू कांही एकाद्या पाखरानें हवेंत पाय जोरात आपटावा आणि म्हणावे द्या मला तशीच झाली माझी गत !

* चार्लस डिकन्सन

पुण्यवंतांनीं पाप्यासाठीं प्रार्थना केली पाहिजे. पाप्यांनीं स्वतः-साठींच करावयाला हवी.

* मिल्टन

प्रार्थनेंमुळें जर मी माझी अिच्छापूर्ति बदलू शकतो, तर सारखी प्रार्थना करून मी त्याला छळणार नाहीं काय ?

* टिळक

जेथें बुद्धीचें क्षेत्र संपतें तेथें श्रद्धेचें क्षेत्र सुरू होतें.

– महान ध्येयें मौनांतून निर्माण होतात.

– ज्या वेळीं तुम्ही अतिशय दुःखांत असाल त्या वेळीं मागील अितिहास आठवा. कदाचित यापेक्षांहि मोठें दुःख तुम्ही पूर्वी अनुभवलें असेल.

* म. गांधी

शरीराला जशी अन्नाची जरूरी, तशी आत्म्याला प्रार्थनेची.

प्रार्थना म्हणजे मागणें नव्हे. ती आत्म्याची अिच्छा आहे.

प्रार्थनेमध्यें हृदयाविना शब्दापेक्षां शब्दहीन हृदय अधिक चांगलें.

सम्पूर्ण अुपवास म्हणजे 'मी' त्वाचा सम्पूर्ण आणि अक्षरशः त्याग होय. तीच खरी प्रार्थना

माझा असा विश्वास आहे कीं, अुपवासाशिवाय कोणतीच प्रार्थना करतां येत नाहीं आणि प्रार्थनेशिवाय अुपवासहि करतां येत नाहीं.

* विल्यम लॉ

प्रार्थना ही परमेश्वराच्या अधिक जवळ जाण्याची शक्ति आहे. परमेश्वरास आपण ह्या जीवनांत तेंच एक त्याचें आवडीचें देऊं शकतो. प्रार्थना म्हणजे आत्म्याचा अुदात्त व्यायाम.

* मार्टिन टपर

प्रार्थना ही अशी नाजूक किल्ली आहे की, त्यामुळे परमेश्वराचे स्नायु हलूं लागतात.

* राजगोपाळाचारी

स्वच्छ आणि स्पष्ट विचार करण्याची देणगी आम्हांला देवो, मायेंचे पटल दूर सारण्याला तो आम्हाला सहाय्य करो.

— स्वार्थरहित व खरीखुरी सेवा हीच खरी प्रार्थना.

— मी अशीं प्रार्थना करतो की, माझ्याकडून कोणासही खोटा रस्ता दाखविला जाणार नाहीं.

— धर्मांची विस्मृति न होवो अशी परमेश्वराजवळ प्रार्थना करा.

प्रार्थनेचा अर्थ सदाचरण करणें होय.

★ ★

## ६८ : पुरुष

— पुरुषामुळेंच स्त्रिया बिघडतात.

* जोफेस मॅझिनी

धाडसाच्या प्रसंगांनीं माणसें निर्माण केलीं. माणसांनीं प्रसंग निर्मिले नाहींत.

* माडखोलकर

पराक्रमी पुरुषांचें समाधान नुसते त्याचें स्वतःचें जीवन यशस्वी झाल्यानें होत नाहीं तर, त्या यशाची परंपरा आपल्या वंशजानें अधिक उज्वलतेनें पुढें चालवावी अशी त्याची अिच्छा असतें.

पुरुष एकदां हट्टाला पेटले कीं, संसाराची राखरांगोळी झाल्याशिवाय त्यांचें डोळे उघडत नाहींत.

पुरुष धनासाठीं, सत्तेसाठीं, कीर्तिसाठीं किंवा ध्येयासाठीं जगतो आणि झगडतो.

* तुकाराम

धिक् जिणें ज्याचें बाधीलें आधीन ।
परलोक मान नाहीं दोन्ही ॥

* वामन पण्डित

विपत्कालीं धैर्य, प्रभुपणि सहिष्णुत्व बरवें ।
सभे पाण्डित्याचा प्रसर, समरीं शौर्य मिरवें ॥
स्वकीर्तीच्या ठायीं प्रचुर रति, विद्याव्यसन जें ।
तयांचें हे स्वाभाविक गुण सहा सत्पुरुष जें ॥

* ज्यांचीं देहमनें तशीच वचनें पुण्यामृतें ओतिलीं ।
कीं ज्याही स्वकृतोपकार विभवें सर्वत्र विस्तारिलीं ॥
लोकांचें परमाणुतुल्य गुण जें मेरु परी वानिती ॥
चित्ती तोषहि पावती सुजन ते नेणो किती नांदती ॥

* तुकाराम

मऊ मेणाहूनी आम्ही विष्णुदास । कठीण वज्रास भेदू ऐसे ॥
नाहीं तरी देऊ ढुंगणाची लंगोटी । नाठाळाचें काठीं हाणू माथां ।

* वामन पण्डित

सन्मार्ग टाकुनि भले न जाती ।

* कृ. चिपळूकर

कोण दरिद्री ? ज्याच्या हृदयीं तृष्णा सदा विशाल असे ।
श्रीमान कोण म्हणावा? जो नर सन्तुष्ट चित्त नित्य असे ।

* महात्मा की मोहात्मा

आत्मिक आणि शारिरीक दोषांनीं जें कलंकित झालेले आहेत, अशा माणसांच्या अंगीं निरोगी प्रकृतीच्या माणसांत आढळून न येणारें असें अकल्पित सामर्थ्य कधीं कधीं निर्माण झाल्याचें आढळतें.

* बर्नस

माणसांनीं माणसाला दाखविलेली असहिष्णुताच हजारों माणसांना रडवतें.

* ड्रायन

पुरुष म्हणजे वाढलेलीं लहान मुलेंच.

* विल्यम जेम्स

प्राणीशास्त्राच्या दृष्टीनें पाहिलें असतां मनुष्य हा सर्व प्राण्यामध्यें जास्तींत जास्त हिंस्र प्राणी आहे. पद्धतशीरपणें तो आपल्याच जातीची शिकार करतो.

* पोप

स्वतःला जाणा. मनुष्य जातीचा खरा अभ्यास म्हणजे खुद्द मनुष्यच.

* पायथॅगोरस

सर्व वस्तूचे परिमाण म्हणजे मनुष्य.

* मार्क ट्वेन

जो लज्जाशील आहे किंवा असावयास पाहिजे असा प्राणी म्हणजे मनुष्य.

* जॉर्ज अलियट

बायका मूर्ख असतात. याबद्दल वाद नाहीं; पण परमेश्वरानें तशा त्या बनविल्यात. तें पुरुषाला योग्य व्हाव्यात म्हणूनच.

★ ★

## ६९ : प्रतिभा–स्फूर्ति

* थत्ते

प्रतिभेची चमक म्हणजे विजेची चमक.

* ना. सी. फडके

सरस्वती पुराणिकाच्या व्यासपीठावर बसली नसून प्रमत्त मयूर–पिच्छांच्या सुबक सिंहासनावर बसलेली आहे हे प्रतिभा साधकानें कधींहि विसरूं नये.

* गु. ह. देशपाण्डे

भाव अन्तरी उठती ! शब्द वाचेतुनी येती !
भावशब्दांची संगती ! कैसी कळेना.

* राजशेखर

प्रतिभाव पांडित्य यांचा संगम सर्वश्रेष्ठ होय.

* हॅमलेट

कल्पकता सर्वोत्कृष्ट वरदान होय.

* इमाओील

दुसऱ्याला जें कठीण तें सहजरित्या करून दाखविणें म्हणजे बुद्धि-मत्ता. आणि बुद्धिमंताला जें अशक्य आहे तें करून दाखविणें म्हण-जेच प्रतिभावन्त असणें.

* थॉमस अेडिसन

स्वयंस्फूर्तता म्हणजे एक टक्का प्रतिभा आणि नव्याणव टक्के घाम.

* हॉपकिन्स

स्फूर्तींची देणगी म्हणजे कष्ट उचलण्याचें सामर्थ्यच.

* वोव्हन मेरिडिथ

उत्स्फूर्त मनुष्य म्हणजे मनुष्याचा राजाच. स्फूर्तीतला माणूस जें करायला पाहिजे तेंच करतो आणि प्रज्ञावन्त जें शक्य तेंच करतो.

* आस्कर वाईल्ड

माझ्याजवळ जाहीर करण्यासारखं माझ्या प्रतिमेशिवाय कांहीच नाहीं.

★ ★

## ७० : प्रीति

* काळीं राणी

प्रीतीच्या विश्वांत प्रतारणेशिवाय दुसरं कुठलंच महापाप नाही. अन्तर्बाह्य प्रांजलपणा हाच प्रीतीचा प्राण.

* विरहतरंग

प्रेमाची भावना ही हृदयाच्या अत्यंत महत्वाच्या भावनेपैकीं एक आहे.

प्रेम हें पुण्य आहे कीं पाप आहे, हें हेतुवरून ठरवलें पाहिजे.

* शेषप्रश्न

स्त्रीचं प्रेम जसं हृदयाला कवटाळून बसतं तसंच तिच्या रूपाचा मोहहि बुद्धीला अचेतन करून टाकतो.

* प्र. के. अत्रे

आईच्या प्रीतींत गाईच्या दुधाची मधुरता असते तर तरूणीच्या प्रेमांत द्राक्षासवाची मादकता असते. एकानें बुद्धीचे समाधान होतें तर दुसऱ्यानें हृदयाची व्याकुळता वाढतें.

* अॅनन

प्रीतीमुळेंच जग फिरत राहते.

* बटलर लिटन

प्रीति हा निरुद्योगाचा उद्योग आणि उद्योगींचा निरुद्योग होय.

* टॉलस्टॉय

एकावरच आयुष्यभर प्रेम करणें म्हणजे एकच मेणबत्ती जन्मभर पुरेल असं म्हणणें होय.

* पैं. महंमद

तुमचें प्रेम करणें तुम्हांला बहिरे आणि आंधळे बनविणें.

* ज्ञानेश्वर

रूपाचा दर्पण रूपेंविण पाहिला ।
द्रष्टा हि निमाला नवल काई ।।

* जिकडे जाये तिकडे दर्शन सांगाती ।
उदो ना अस्तु हें नाहीं द्वैत–स्थिति ।।

* ठेंगणें अस्मान

खरं प्रेंम तें हेंच कीं, जें हजार अपराध पोटांत घालतें.

* जीवन दर्शन

जेव्हां प्रेम संकेत करीत असेल, तेव्हां त्यांच्या पाठीमागून जा. जरी त्याचें मार्ग बिकट आणि सुळचासारखें आहेत आणि जेव्हां तें आपलें पंख पसरील तेव्हां त्यांच्या आधीन व्हा. जरी त्यांच्या पंखांत लपून राहीलेली तरवार कदाचित तुम्हाला जखमी करील आणि जेव्हां ते तुमच्याशीं बोलेल तेव्हां त्यांच्यावर विश्वास टाका जरी त्याचा शब्द उद्यान उध्वस्त करणाऱ्या उत्तरेकडील वायुप्रमाणें तुमच्या स्वप्नांचा कदाचित चक्काचूर करील. प्रेम जसें तुमच्यावर मुकुट चढवील तसेंच तें तुम्हांला शुळावरहि चढवील. प्रेम स्वतः

शिवाय अन्य कांहीं देत नाहीं आणि दुसऱ्याकडूनहि स्वतःशिवाय कांहीं घेत नाही. प्रेम कोणाला अंकित करीत नाहीं. कोणाचें अंकित होत नाहीं. कारण प्रेमाची परिपूर्ति प्रेमांतच आहे.

तुम्ही परस्परांवर प्रेम करा. पण तुमच्या प्रेमाची बेडी बनवूं नका. आपलीं हृदयें परस्परांना द्या. पण ती परस्परांच्या आधीन करूं नका.

* ना. ह. आपटे
प्रेम वसे जेथें जेथें । जंगलहि मंगल होतें.

* वि. स. खाण्डेकर
प्रेम हें शारिरीक आहे म्हणावे तर नुसत्या सौन्दर्यानें त्याचे समाधान होत नाहीं. प्रेम हे मानसिक आहे म्हणावे तर आत्यन्तिक त्यागानें त्याची तृप्ती होत नाहीं.

* साने गुरुजी
प्रेमाच्या प्रसन्न वातावरणांत मोकळेपणा असतो. प्रेमाची किल्ली घेऊनच मुलांच्या हृदयांत शिरलें पाहिजे.

प्रेमाचें नातें हें सर्वांत थोर नातें आहें.

प्रेम म्हणजें प्रिय वस्तुंत बुडून जाणें.

* थत्ते
ज्या वस्तूबद्दल आम्हांला प्रेमभाव–आदर वाटतो तिच्यासाठीं बलिदानाला आम्ही सहज तयार होतो.

* माडखोलकर
प्रेम हा पुरुषाच्या जीननाचा एक भाग आहे. पण स्त्रींचे मात्र जीवन सर्वस्व आहे.

प्रेम आणि मोह ह्या दोन भिन्न वस्तू आहेत. प्रेमाचा संबंध हृदयाशीं असतो. तर मोहाचा शरींराशीं. अन्तःकरणांतील गूढ नि

गाढ भावनेपासून प्रेमाला स्फूर्ति मिळते. तर शरीराचे विकार व वासना या मोहांना चालना देतात. प्रेम म्हणजे जें कधींहि दूषित होत नाहीं असे गंगाजल. जें कधीहि कोमजत नाहीं असें कल्पलतेचं फूल. तर मोह म्हणजे जात्याच कलुषित असलेल्या हंगामी ओहोलाचं पाणी !

* साने गुरुजी

प्रेम शेवटीं कर्तव्यांत परिणत झालें पाहिजे. पिकलेलें प्रेम म्हणजे कर्तव्य. व पिकलेलें कर्तव्य म्हणजे प्रेम.

* आत्मोन्नति

प्रेमानें मन:स्वास्थ्य लाभेल व प्रेमळ मनास्वास्थ्यानें आपला एकंदर दृष्टीकोनच बदलून जाईल.

– प्रेमें बोले, प्रेमे डोलें, प्रेमें जग हाले !
प्रेमाखातर जगीं आजवर काय नाहीं झालें ?

– प्रीतिमुळें मनाच्या सर्व शक्ति आपोआप एका ठिकाणीं केंद्रीभूत होतात.

* अनन्त काणेकर

प्रेमस्थळ अमुचे एक । त्यासाठीं विसरूनि भूक । दाहि दिशा मागुनि फिरणें । जीवाभावानें जपणें । ही आमुची वेडी प्रीति । झिडकारा मारा लाथ ।

* केशवसुत

प्रीति या जगती कण्टकयुता ही एक वल्ली असे ।

* माडखोलकर

प्रीति ही अधोगामी असतें.

खरं उत्कट प्रेम एकदांच करतां येते.

* विनायक
प्रेम लाभें प्रेमळांना त्याग ही त्याची कसोटी !

* ताम्बे
गुलाब माझ्या हृदयीं फुलला । रंग तुझ्या गालावर खुलला ।

* गडकरी
वर्षांव घडो मरणाचा, क्षण एक पुरें प्रेमाचा ।

* केशवसुत
प्रीति मिळेल का बाजारी ?
प्रीति मिळेल कां शेजारी ?

* गडकरी
प्रेमानें मग एक जीव बनतां भूमींवरीं स्वर्ग ये !

* होनाजी बाळ
जगीं सांगतात प्रीत पतंगाची खरी ।
झडप घालून प्राण घेतो दीपकाचें वरी ।

* येशू ख्रिस्त
तुमच्या शत्रूवरहि प्रेम करा. जें तुम्हांस शाप देतात त्यांना तुम्ही आशिर्वादच द्या. जें तुमचा द्वेष करतात, त्याचें कल्याणच चिन्ता.

* चन्द्रशेखर
एका क्षण प्रभावे बनलीं अन्योन्य मित्र जिवलग ती ।
लगबग ती भेटाया, भेट न होतां मनात तगमगती ।

* माधव ज्यूलियन
ज्वानीच्या अरुणोदयीं मज तुवा, मी तूजला पाहिलें ।
माझें प्रेम मला पुढें उमगलें, आधी तुला वाहिलें ।

* केशवसुत
नाडि माझी तव करीं वाहताहे ।
हृदय माझें तव उशीं हालताहे !

' महात्मा की मोहात्मा

गुणाच्या अभावाची नि अपूर्णत्वाची तीव्र संवेदना निर्माण झाली कीं मनुष्य दुसऱ्यावर प्रेम करून आपली मानसिक भूक भागवीत असतो.

* मौलाना आझाद

प्रेमाची एकूण कथा एका शब्दाहून अधिक नाहीं; परन्तु गम्मत अशी कीं, ती कधीं सम्पतच नाहीं.

* साने गुरुजी

बर्फाच्या राशी सूर्याच्या किरणानें वितळतात; तद्वतच अहंकाराच्या राशी प्रेमाच्या ओलाव्यानें वितळतात.

* माधव जुलियन

प्रीतीच्या धनसंपदे भरूनी, त्यागात्मता राहिली ।

—प्रेम म्हणजे जीवनाला चालना व बुद्धीला प्रेरणा.

* अमृत

प्रेम म्हणजे मानवी जीवनाचा सम्पूर्ण विकास.

लोहाला परिसाचा स्पर्श होतांच जसें तें सुवर्णमय होतें; तसेंच प्रीतीच्या आविष्कारानें जीवन सोनेरी होऊन जाते.

सात्त्विक प्रेमांत नन्दनवनांतील पुण्याचा सुगन्ध सुटतो.

प्रेम म्हणजे जुगार.

प्रीतीची पहिली संवेदना ही वर्षाऋतूतील पहिल्या इंद्रधनुष्यासारखी असते.

प्रेमानें पाषाणाचीं फुलें होतात; काट्याचें मुकुट होतात. मरणाचें जीवन होतें.

खरें प्रेम हें सक्तीचें वाण आहे, ते अग्निदिव्य आहे.

* नेपाळी विरहगीत

तारुण्याच्या ऐन बहरांत प्रीती जडणें स्वाभाविकच आहे; परंतु प्रिये, मीलन हें केवळ परिस्थितिवरच अवलंबून आहे.

* शुक्ल

स्वर्गीय द्युतीने स्मशान फुलतें प्रीति मिळाली तर ।
स्वर्गाचिंहि वनें स्मशान अवघें प्रीति निमाली तर ।

– प्रेम हा भावनांचा सागर असला तरी सोन्याचान्दीच्या चन्द्राच्या आकर्षणाशिवाय तो हेलावला जात नाहीं.

– अगदीं अनपेक्षितपणें एखाद्या मुलींचें तुम्ही चुम्बन घेतलें, अशी गोष्ट कधींच खरी नसतें; कारण तुम्ही ते घेण्यापूर्वी एकदोन क्षण आधींच तिनें तें ओळखलेलें असतें.

* अन्तरकर

अपूर्व हीं धनुर्विद्या । महात्म्या मदनाची. ।
तो तनुला भेटल्यावीण । आंतील मन भेदितो ।।

* जुलियन गार्डन

प्रेम कधींच आन्धळे नसतें. उलट तें अधिक चौकसपणें पहात असतें. हें चौकसपणें पाहाणें इतरांना समजू नये म्हणून तें आन्धळे-पणाचें फक्त सोंग घेतं इतकंच.

* साने गुरुजी

कडू घोट प्रेमळ माणसाच्या हातून दिल्यास तो कमी कडू लागतो।

* टॉलस्टॉय

प्रेम कोणत्याहि प्रतीचें असलें तरी त्याचे पर्यवसान शोकांत होणें शक्य नाहीं.

✓ – दोन अपूर्ण माणसांना एकमेकांना पूर्ण करण्याची जी विलक्षण तळमळ लागतें तिचेंच नांव प्रीति ।

– मृत्यू हा मानवाला निसर्गानें दिलेला शाप आहे. तर प्रीति हा उःशाप होय.

* बेंजामिन फ्रँकलिन

मनुष्य स्वतःच स्वतःच्या प्रेमांत सांपडला तर त्याला प्रतिस्पर्धी मुळींच भेटणार नाहींत.

– प्रेम झाडाच्या सांवलीसारखें असतें, उन्हांतून जाणाऱ्या प्रवाशाला झाडाची सांवली मिळाली तर ती हवी असते. परंतु रस्त्याच्या कडेला झाडें नाहींत म्हणून काय कुणी प्रवास करण्याचे सोडून देतो ?

* लाओत्से

प्रेम करायलाहि स्वस्थता लागते.

* बुद्ध

एकमेकांतील द्वेषाची भावना सूडानें नष्ट होत नाहीं. प्रेमानेंच तीं नष्ट होते.

* ना. सी. फडके

कसोटीची वेळ येण्यापूर्वी प्रेमाचा केवढाहि विलास झाला तरी त्याचा काय उपयोग ?

कलेचें पराक्रम, विद्येंतील यश, लौकिक या साऱ्या गोष्टीं कोंदणासारख्या आहेत. त्यांत सफळ झालेल्या प्रेमाची हिरकणी चमकत असेल तरच त्या कोंदणाची शोभा.

* केशवसुत

नन्दन वना मधीं आला ।
कल्पलतेला बहर भला ।
तिची हृदयिं बीजें पडलीं ।
प्रीति त्यांतुनी अवतरली ।

* भा. रा. ताम्बे

हृदयीं तुझ्या सखी दीप पाजळे
प्रभा मुखावरि माझ्या उजळे
नवरत्नें तूं तुज भूषविले
मन्मन खुललें आंतिल कां ?

माझ्या शिरीं ढग निळा डंवरला
तुझ्या नयनीं पाऊस खळखळला
शरच्चन्द्र या हृदयिं उगवला
प्रभा तुझ्या उरि शीतल कां ?

* माधव जुलियन

प्रेम आधी सांग कोणी लाविले
प्रेम कोणी याचिलें कोणी दिलें
नेणता पंछी मला जाणोनीं तूं
भोंवतीं जाळें खुपीनें टाकिलें

– प्रेमी लोक समजतात त्याहिपेक्षां जग जास्त रसिक असतें.

– प्रीति ही विजेसारखी आहे. तिची चमकण्याची जागा कोण निश्चित करणार ?

–प्रीति कुसुमापेक्षांहि कोमल व वज्रापेक्षांहि कठोर असतें.

– मनुष्याला आपणाकडे खेचून घेणारा जगांतला खरा चुम्बक म्हणजे प्रीति.

– मैत्री ठेवणें याचेच नांव प्रीति.

– या जगांत प्रेम हीच शक्ति सर्वांत सूक्ष्म आहे.

गोविंदाग्रज

प्रेम नसे तर जीव नको हा !
प्रेमें जग चालें !

प्रेमावाचुंनि धिक् जीवन हें
असें आज झालें

क्षण एक पुरे प्रेमाचा । वर्षाव घडो मरणाचा ।
केल्या जगाच्या पायघड्या
मी तुझ्या पावलासाठीं
त्या हृदयाच्या तुडवुनि गेलीस
नटव्या थाटासाठीं

– प्रेमांत काय किंवा राजकारणात काय सर्व कांहीं चांगलेंच असतें.

– पसंत केलेल्या गोष्टीवर प्रीति करा आणि प्रिय गोष्टींच पसन्त करा.

– आज प्रेम करून उद्यां दूर होण्यापेक्षां प्रेम न केलेलेंच बरें.

– आयुष्य हा बाजार आहे. त्यांच्यांत प्रेमाची देवाण–घेवाण करावी लागतें.

* म. गांधी
जेथें खरें प्रेम आहे, तेथें हक्काचा प्रश्नच संभवत नाहीं.

* पोप
जेथें ज्ञान आहे तेथें प्रीति वाटयास जात नाहीं.

– प्रेम करण्यांत आणि मिळविण्यांत वेळ वापरा कारण ती दैवी देणगी आहे.

* डिझरेली
मी आयुष्यांत अनेक घोडचुका करीन पण प्रेमासाठीं कधींच लग्न करणार नाही.

– जितकें आपणांस वाटतें तितकें आपण कधींच प्रेमांत नसतो.

* माधव जुलियन

प्रीति पंचविशींतली प्रथम ती, जीते न सीमा उरी ।
तीतें वेड म्हणो कुणि परि, तिची न्यारींच ती माधुरी ।।

* बालकवि

सहज जिवाला होय जाहला परि विद्युत्पात
परिप्रीतिचा धात भयंकर दुसरा कल्पांत
जीवन्तपणीं मरण घेऊनि फिरणें जगतात
सांठविली ब्रम्हांण्ड दाहिनी दाहकता यांत

* जिब्रान

प्रीति आणि संशय यांत नेहमींच ३६ चा आंकडा असतो.

* खलील जिब्रान

माझें हृदय भग्न झाल्याशिवाय त्याला लागलेलें कुलूप कसें निघेल.

* खाण्डेकर

प्रेम हा जगांतला मोठा जादूगार आहे.

* मेघदूत

प्रेमवेडे लोक हा चेतन व हा अचेतन असा विवेक करण्यास असमर्थ असतात.

* खाण्डेकर

परिचय, स्नेह, प्रेम, लग्न–अवधी चार मजली अिमारत !

प्रीतिसुद्धां मनुष्याच्या पशुत्वाला पायबन्द घालूं शकत नाहीं.

प्रेमाच्या पोटींच काळजी उत्पन्न होतें.

हलाहलाची दाहकता आणि अमृताची मादकता मिसळून तर निसर्गानें ही प्रीति निर्माण केली आहे.

* हॉवेल

अन्तरामुळें आणि विरहामुळें प्रीति दुणावतें. कारण त्यामुळें आपण त्यांच्या प्रीतिची खरी किंमत जाणतो.

* हार्वे

दैवी प्रीति पवित्र फुलासारखी असते. ती ज्या वेळीं कळीं असते त्या वेळीं सुख लाभते व पूर्ण विकसिताच स्वर्ग सुखाची प्राप्ती होतें.

★ ★

## ७१ : बदल–गति

– बदलत नाही अशी एकहि वस्तू नाहीं.

* राहुल सांकृत्यायन

संसार आपल्या गतीमुळें, प्रवाहामुळें, परिवर्तनामुळेंच अधिक वैचित्र्यपूर्ण–आकर्षक होत असतो. परिवर्तन हेंच विश्वाच्या कणां–कणांतून आहें. परिवर्तनाचं आपण स्वागत करूं तर दुःखी व निराश व्हावयाचं कारणच राहणार नाहीं. परिवर्तनाच्या या वियमामुळंच साऱ्यांचें हात मोकळ राहिले आहेत. साऱ्यांना कांहीं ना कांहीं तरी निर्माण करतां येतंय.

* थोरो

वस्तू बदलत नसतात. बदलतो ते आपणच.

* ज्ञानेश्वर

इवलेसें रोप लाबियेले द्वारीं । तयाचा वेल गेला गगनावरी ।
मोगरा फुलला, मोगरा फुलला। फुलें वेचितां भार कळियांसी आला ।

★ ★

## ७२ बल–सामर्थ्य–शक्ति

– निर्बलांना रक्षण देणें हीच बळाची खरी सफलता.

* साने गुरुजी

सामर्थ्याच्या पाठीमागें शील हवें.

– निश्चयाचें बळ तुका म्हणे तेंचि फळ ।

* यशवन्त

कोणी अंवतीं–भंवतीं माझ्या
जमलें किंवा जमवियले ज्या
पुरवायातें त्यांच्या गरजा
द्या सामर्थ्य निदान–प्रभो मज अन्य नको वरदान.

* म. गांधी

सर्वांभूती प्रेम ही विश्वांतली सर्वांत मोठी शक्ति आहे व सामर्थ्य आहे. पण त्या बरोबर तें अत्यन्त नम्र आहे. त्यांत अधिकार नाही. सेवा आहे.

* राहुल सांकृत्यायन

ज्याच्या हातांत धारदार तरवार असते त्याच्याच नशीबीं मद्याचें प्याले व सुन्दरी असतात.

* केशव नाईक

सामर्थ्यवान माणूस काम करीत राहतो. दुबळा माणूस बहुधा उपदेश करतो.

* शेक्सपिअर

राक्षसासारखी ताकद असणें हें केंव्हांहि चांगले पण तिचा उपयोग राक्षसी वृत्तीनें करणें वितकेंच वाईट.

★ ★

७३ : बन्धन

* केशवसुत

खादाड असे माझी भूक चतकोरानें मला न सूख ।
कूपांतील मी नच मण्डूक मळयास माझ्या कुंपण पडणें ।
अगदीं न मला साहे ।

* विचार पोथी

वर्तनाला बंघन असावें म्हणजे वृत्ति मोकळी राहते.

गंगा आपल्या नियत मार्गानें वाहाते म्हणून तिचा उपयोग लोकांना जास्तीत जास्त होतो.

स्वरूप सोडू नको. सिद्धांत सोडू नको. निदान मर्यादा तरी सोडू नको.

* अनिर्बन्ध जीवन

बन्धन येताच कमान वर न चढतां खाली उतरते.

★ ★

७४ : बालक

* रविन्द्रनाथ टागोर

प्रत्येक नूतन बालक असा सन्देश घेऊन येते कीं, मनुष्याविषयीं ईश्वर अजून निराश झालेला नाहीं.

* हर्डर

मूल कुरूप असो कीं सुरूप असो मातेच्या अक्षय प्रेमाचें तें वाटेकरी होय.

* साने गुरुजी

मुलें म्हणजे परमेश्वरानें आपल्याकडें फुलविण्याकरितां दिलेल्या कळयाच,

* अॅन्थनी पेटिटो

मुलांचें संगोपन अधिक चांगल्या तऱ्हेनें कसें करावें हेंच मुलांपासून पालकांना शिकतां येण्यासारखें आहे.

* खाण्डेकर

घर हें बालकाचें पहिलें जग. या जगांत कोणताहि अपराध घडला तरी न्यायाधीश प्रेमळ असल्यामुळेंच शिक्षेचें स्वरूप बक्षिसारखें असते.

* लो. टिळक

प्रजेचें हक्क काय असतात व त्यांपैकीं आपल्याला किती आहेत हे मुलांनाहि समजलें पाहिजे.

* पं. नेहरू

मला धाकानें वाटेल तें ऐकणारी मुलें आवडत नाहींत. आशेनें व उत्साहानें ओंथवलेलीं बण्डखोर मुलें मला आवडतात. मुलांना धाकानें आज्ञाधारक बनवूं नका.

* डॅनियल वेबस्टर

मुलांना आत्मनिग्रह, भावनानिग्रह, कुमार्ग प्रवृत्ति व पूर्वग्रह याविषयीं सुशिक्षित केले तर तुम्ही तुमच्या पिढीचे दुःख, गुन्हेगार प्रवृत्ति नष्ट केल्याचे श्रेय तुम्हांस मिळेल.

★ ★

## ७५ : बालपण

* तुकोबा

लहानपण देगा देवा । मुंगी साखरेसा रवा ।

* कोलते

सर्व्या जगाचें कौतुक । अिच्या झांकल्या मुठींत ।
कुठें ठेवुं ही साळुंकी । माझ्या डोळयाच्या पिंजऱ्यांत

कसें हांसेल ग ! खुदकन् । माझ्या बाअीचें हे ओठ ।
नजर होअील कोणाची । लावू द्या ग गालबोट ।।

– नीचपणा बरवे देवा । न चलें कोणाचाहि हेवा ।
महापुरे झाडें जाती । तेथें लव्हाळें वाचती ।।

* तुकाराम

कोठें देवा आलें अंगा थोरपणा ।
बरें होतें दीन होतो तरी ।
न पुसतें कोणी कोठेंहि असतां ।
समाधान चित्ताचिया सुखें–

★ ★

७६ : भावना

* सर राजेर लाईस्टरन्स

अग्नि आणि पाणी सारख्या आपल्या भावनाहि चाकर या दृष्टीनें उत्तम; पण मालक या दृष्टीनें घातक.

* शेक्सपिअर

जो भावनेचा गुलाम नाहीं असा एक तरी मनुष्य मला दाखवा. मी त्याला माझ्या हृदयांतल्या हृदयांत जतन करीन.

* साने गुरुजी

कोणतीहि भावना पराकोटीला गेली कीं इतर भावना आपोआपच नष्ट होतात.

* माडखोलकर

ज्याला एखाद्या कल्पनेचे वेड लागतें त्याच्या हातून भचाट कृत्यें घडत असतात.

सृष्टींतील कोणत्याहि प्रचण्ड वादळापेक्षां भावनांचा आवेग प्रबळ असतो.

– असे हो जया अन्तरीं भाव जैसा ।
नसे हो तयां अन्तरीं देव तैसा ।

* ताम्बे

कुभावनेनें विटाळतां मन । प्रीति जाईल पळून तेथून ।
विषमय होईल जीवन त्याहून । मरण बरें किती तरी ।

* चोखामेळा

शुद्ध भाव, शुद्ध मति । ऐसें पुराणें वदति

* महात्मा कीं मोहात्मा

जसें मीठ अन्नाला रुची आणते; तशी व्यक्तीची भावना ही निर्गुणाला गुणाचे पुट चढवीत असते.

वस्तूचें स्वरूप हें पहाणाऱ्या व्यक्तीच्या भावनेस अनुसरून भिन्न भिन्न दिसते. एकच वस्तू भावनेच्या भिन्नत्वामुळें अनेक रूपें धारण करते.

★ ★

## ७७ : भीति

* बेकन

थोड्याच गोष्टींची इच्छा असणें आणि पुष्कळ गोष्टींची भीति असणें ही मनाची केवढी दुर्दशा होय.

* जॉन क्लार्क

ज्यांना भीतीचें कारण नाहीं त्यांना नुकसानीची भीति नाहीं.

* यंग

जो दुसऱ्यांच्या जागीं उभा राहूं शकेल, त्यांच्या मनाचें कामकाज ओळखूं शकेल, त्याला भविष्य काळांत काय लिहिलें आहे याची भीति बाळगण्याचें कारण नाहीं.

– शहाणीं माणसें लहान सहान गोष्टींकडे बिलकुल दुर्लक्ष करीत नाहीत.

* लो. टिळक

तुम्ही निर्भय व्हा.

आतां नव्या युगांत आमच्या वतीनें काम करण्यास जी मण्डळी आम्हाला हवी आहेत ती निर्भय, जोरदार व स्वार्थांत लुब्ध न झालेली आणि कडव्या उमेदीचीं अशी पाहिजेत.

– माणसानें माणसाला भ्यावे ही शरमेची गोष्ट आहे.

– भीति नाहींशी झाली तर नकारहि नाहींसा होईल.

– आपलें सामर्थ्य, सत्यवादित्व, साहस, संकल्प आणि विचार व संयम यामुळेंच भविष्यकालाची भीति वाटत नाहीं.

– मोहरहित अवस्था म्हणजेच निर्भयता.

* म. गांधी

भित्र्याला राष्ट्रीय शब्दकोशांत स्थान नको.

बाह्य शत्रूंची भीति आपण सोडून दिली पाहिजे व आंतरिक शत्रूंची भीति बाळगलीं पाहिजे. कारण बाह्य शत्रू आपोआप नाहींसे होतात.

ज्या ठिकाणीं भीति आहे तेथें धर्म नाहीं.

* नेहरू

तर्कशास्त्र व रुक्ष बुद्धिवाद हीं शस्त्रें भय व अविश्वास दूर सारण्यास असमर्थ आहेत. श्रद्धा व उदारता यांनींच तें काम होऊं शकेल.

* क्रॉनीन

काळजी केल्यानें उद्याचें दुःख कमी होत नसतें. तर आजच्या दिवसाची ताकद नाहींशी होतें.

* आयरिश डायजेस्ट

माणसानें चहासारखें असावें. संकटांत सांपडले कीं त्यांस नव चैतन्य यायला पाहिजे.

* जवाहरलाल नेहरू

लष्कराच्या किंवा सम्पत्तीच्या दृष्टीनें जरी आम्ही मजबूत नसलों तरी आमच्या लोकावरील आमची श्रद्धा बळकट आहे. भयानें आणि चिंतेंनें काळवंडलेल्या या जगांत मी अत्यन्त नम्रपणानें सांगूं इच्छितो कीं आम्ही निर्भय आहोंत. इतराशीं जर आम्ही मैत्री जोडूं इच्छितो तर आम्हांला भय कशाचें ? आमच्या लोकांत जर आत्मश्रद्धा आहे तर आम्हाला भय कां म्हणून वाटावें ?

* म. गांधी

जनतेनें पोलिस आणि लष्कर यांची भीति धरूं नये. कारण जनता कोटयावधि आहे. तर पोलिश आणि लष्कर मूठभर आहेत. जर जनता बरोबर असेल तर पोलिसांना आणि लष्करांसहि बरोबर वागण्यावांचून गत्यंतर नाहीं.

* रूझवेल्ट

आपण जर कशाची भीति बाळगावयाची असेल तर ती खुद्द भीतीचीच होय.

* स्टेशस

जगांत परमेश्वरानें प्रथम काय उत्पन्न केले असेल तर ती भीति होय.

* संसार शकट

ज्याचें शरीर, बुद्धि, उद्योगांत गढली आहे, त्याला काळजी

शिवत नाहीं.

– मनाच्या निर्मळतेशिवाय निर्भयता उत्पन्न होत नाहीं.

– भीतिशिवाय नीति नाहीं.

– लोकनिन्देची भीति अवश्य बाळगिली पाहिजे.

* साने गुरुजी

भीतिमुळें खोटेपणा वाढतो.

* कृ. चिपळूणकर

कोण महाशूर ? मना जो आकलुनी सदा स्ववश ठेवी ।
भीरू कोण ? भयानें मूढजनांचा कुमार्ग जो सेवी ।

* महात्मा कीं मोहात्मा

सूज्ञ माणसाला लोकमत सांभाळण्याची अक्कल असली कीं त्याला कशाचीहि भीति बाळगण्याचें कारण नाहीं.

* हॅम्लेट

सावधगिरी हीच मनुष्यास भीति बनवितें.

* साने गुरुजी

जग भित्र्याला भिववतें व भिवविणाऱ्यास भितें.

* विचार पोथी

जीवनांत भीति राखली म्हणजे मरण निर्भय होईल.

* जुलियन सीझर

भित्रे अनेकदां मरणापूर्वीच मरतात. शूर मरतात पण ते एकदांच.

★ ★

## ७८ : मतें व निवडणुका

* जॉन न्यूटन

परमेश्वर जगावर कसें राज्य करतो हें पाहाण्याकरितां मी वर्तमानपत्रें वाचतो.

* विनोबा

लोक आणि तुम्ही, त्यांचे प्रतिनिधि या तीघांचा आवाज एक असला पाहिजे. दरिद्री मतदार आपल्या झोपडींत अगतिकपणें जे कष्ट भोगतात ते तुम्ही स्वतःच्या राजीखुषीनें अंगिकारून भोगले पाहिजेत; तरच या दोषाच्या भोळ्या भाबड्या गरीब लोकांनीं तुमच्यावर टाकलेल्या विश्वासाला तुम्ही पात्र ठराल.

– लोक शाहींत अल्पसंख्यकांना शून्य किंमत असते.

उत्तम शासनसंस्था कोणती ? आपणच आपलें स्वतःचें नियंत्रण कसें करावें हें जी नागरिकांना शिकवतें ती.

★ ★

## ७९ : मन

– मन विकारी झालें कीं विचार गढूळ होतात.
विचार गढुळ झाले कीं विवेक नष्ट होतो.
विवेक नष्ट झाला कीं आचार भ्रष्ट होतो.
आचार भ्रष्टाची किंमत जग दुष्टांत करते.

– जो मनाचा दास होतो तो संपूर्ण जगाचा दास होय.
जो मनाचा स्वामी तो संपूर्ण जगाचा स्वामी होय.

– मन चिन्ती तें वैरी न चिन्ती.

* यदुनाथ थत्त

जें तुम्हाला आवडत नाहीं तें तुम्ही मनापासून करणार नाहीं. अन्तर्व्दंव्दांत तुमची शक्ति खर्च होईल. मनाविरुद्ध गोष्ट म्हणजे हृदयस्थ परमेश्वराविरुद्ध गोष्ट.

– चित्र ही हाताची कृति आहे आणि चरित्र ही मनाची कृति आहे. चित्र ही मूर्तिपूजा आहे तर चरित्र ही मानसपूजा आहे-

* तुकाराम

मन करारे प्रसन्न । सर्व सिद्धीचें कारण ।

* ज्ञानेश्वर

व्यापक आणि उदास । ऐसे कां आकाश ।
तैसे जयाचे मानस । सर्वत्र गा ।

* बहिणाबाई

मन मोकाट मोकाट, त्याले ठायी ठायीं वाटा ।
जशा वाऱ्यानें चालल्या पानावरल्यारे लाटा ।
मन पाखरूं पाखरूं, त्याची काय सांगू मात ?
आता व्हतं भुईवर, गेलें गेलें आभाळांत

* तुकाराम

अन्तरीचे द्यावें स्वभावें बाहेरी धरितांहि परी आवरेना.

– मनाच्या चाळणींतून कृतज्ञतेचा सुवास तेव्हांच निघून जातो पण दुःखाचे कांटे मात्र तिच्यांत अडकून रहातात.

* पै. महंमद

जें मनोजयासाठीं केलें जातें, तेंच सर्वोत्कृष्ट धर्मयुद्ध होय.

★

## ८० : मनुष्यप्राणी

* अमृत

माणूस म्हणजे गैर समजांचा धनी आणि अन्यायाचा बळी ! जगाला त्याचें मोल त्याच्या हयातींत काय पण त्यानंतरही उमजणं मुष्कील !

जगाच्या दृष्टीनें माणूस हा बाळपणीं देवासमान अवखळ, तरुण– पणीं सैतान अन् म्हातारपणी हट्टी नादान समजला जातो.

जीवनांत उपभोग घेण्यासाठीं माणूस खर्चिक औदार्यानें वागला कीं उधळ्या ठरतो आणि विचारानें वागला कीं कवडीचुम्बक ठरतो.

तैल बुद्धीचा असला तर तो हुशार पण लुच्चा समजला जातो आणि तैल वुद्धीचा असला तरी निरुपद्रवी सज्जन गणला जातो.

भोळ्या भाविक बुद्धीनें वागला की जग त्याला ढोंगी समजतो. आणि देवाधर्मापेक्षां स्वतःच्या कर्तव्यांत निमग्न राहिला कीं तो पाखंडी ठरतो.

बाळपणीं त्याला मांडीवर कौतुकानें त्याच्या लाथा खाण्यांत आनन्द मानणारे जग मोठेपणीं त्याला लाथा मारण्यांत धन्यता मानतें.

जीवन्तपणीं लत्ताप्रदान आणि मेल्यावर मात्र पिण्डप्रदान हीच त्याच्या बाबतींत आजुबाजूच्या जगाची रीत.

– दुनियेच्या अजबखान्यांतील माणसाच्या दृष्टीनें माणूस ही चीज अजब अशी आहे.

* शॉ

समंजस मनुष्य जगाशीं जुळतें घेतो. परंतु हटवादी मनुष्य जगाला आपणांशी जुळते घ्यावयास लावण्यासाठीं धडपडतो. म्हणून जगाची प्रगति हटवादी व्यक्तिवर अवलंबून आहे.

★ ★

## ८१ : मनीषा

* रे. टिळक

होईन नीचाहुनि नीच, करीन अवघ्यांना उंच.

* माडखोलकर

मनुष्याच्या डोळ्यांसमोर तरंगणाऱ्या नाना प्रकारच्या महत्त्वाकांक्षा या निव्वळ मृगजळाच्या उर्मी आहेत. त्याच्या मागून धांवतां धांवतां उरी फुटून मरावें हेंच महत्त्वाकांक्षी मनुष्याचें भवितव्य.

* विचार पोथी

टेकडीसारखा उंच होण्याची मला मौज वाटत नाहीं. माझीं माती आसपासच्या जमिनीवर पसरली जावी ह्यांत मला आनन्द आहे.

★ ★

## ८२ : मरण

* पै. महंमद

तुमच्यापैकीं कोणीच मरणाची इच्छा धरूं नये.
थडगें हें अनन्ताच्या प्रवासांतील पहिला टप्पा होय.

* ओल्ड टेस्टॅमेण्ट

माती असशी मातीस मिळशी ।

* ताम्बे

ढळला रें ढळला दिन सखया–
संध्या छाया भिवविती हृदया ।

* शेक्सपिअर

हे मृत्यो ! तुझ्या प्रदेशाचा शोध कुणी लाविला नाहीं किंवा तुझ्या प्रान्तांत गेलेला प्रवासीहि कुणि परत आला नाहीं.

* भा. रा. तांबे
मरणांत खरोखर जग जगतें.

* हेडगेवार
जेव्हां मरूं तेव्हां संभाजीसारखें नाहीं तर भाऊसारखें.

* गडकरी
मरण हें झूट, चल उघड झांकली मूठ ।

* वामन पण्डित
अमर तो मरतो, अति लौकरीं.

* यशवन्त
नको गंजु गंजुनी नष्ट होणें.

* गडकरी
जीवनाचा मार्ग मरणाच्या मैदानातून जातो.
जगण्यांत जोंवर कांहीं अर्थ आहे–तोंवर मरण्यांत मौज आहे.

★ ★

## ८३ महत्त्व

* गीता प्रदीप
वर्गातील मन्द बुद्धीच्या मुलामुळेंच कुशाग्र बुद्धीच्या मुलांस महत्त्व येतें.

* गडकरी
रंगाखातर रंगू.

★ ★

## ८४ : मानवता–माणुसकी

– जो आपणासाठीं मार्गांत कांटे पसरील त्यासाठीं आपण फुलें पसरावीत.

* साने गुरुजी

गरीबांचें शिव्याशाप मिळविण्यापेक्षां त्याचें मंगल आशीर्वाद मिळवा. तीच खरी सम्पत्ति.

* वि. स. खाण्डेकर

दुसऱ्यासाठीं डोळ्यांत उभे राहिलेले अश्रू हे मनुष्याच्या आत्म-विकासाच्या वेली वरील फुललेली फुलेंच होत.

– स्वहित परायणो मा भुः

* म. का. देशपांडे

माणसाला मोह होणं नैसर्गिक आहे. पण त्या मोहाचा प्रतिकार करणें यांतच माणुसकी आहे.

* गान्धीजी

मला नन्दनवन नको आहे. स्वर्गांत जाण्याची माझी इच्छा नाही. मला केवळ मानवतेची दुःखें दूर करायची आहेत. दलितांचें अश्रू तेवढे पुसावयाचे आहेत.

– जो अन्याय सहन करतो तोहि गुन्हेगार असतो. कारण असा मनुष्यच जगांत अन्याय निर्माण करतो. नुसते सहनशील असणें हा धर्म नव्हें. त्यामुळें दुष्टांना उत्तेजन मिळणार नाहीं. अशी वागणूक म्हणजे धर्म होय.

* टॉलस्टॉय

मनुष्य जन्माला आला आहे तो त्याच्याकरितां अितरांनी कष्टावे यासाटीं नव्हे, तर त्यानें अितरासाठीं कष्टावे म्हणून.

* काका कालेकर

तिखट झणझणींत बोलण्यांत, निःसंकोचपणें कोणाचा अपमान करण्यांतच कितीजण तरी भूषण मानतात. क्षमा, नम्रता, सर्वांशीं जुळते घेंऊन वागण्याची वृत्ति इत्यादि सद्‌गुणांची वाढ आम्ही केली नाहीं तर समाज टिकेल तरी कसा ? मानवतेशिवाय मानवाचा उद्धार होणार नाहीं.

* साने गुरुजी

माणुसकीची वाढ म्हणजेच सुधारणा.

* डॉ. राधाकृष्णन

आपण पक्षाप्रमाणें आकाशांत विहार करावयास शिकलों; माशाप्रमाणें पाण्यांत तरंगावयास शिकलों; परन्तु अद्याप माणसाप्रमाणें जगांत वावरण्यास मात्र शिकलों नाहीं.

* म. गांधी

स्वातंत्र्य, समता, बन्धुभाव ही फ्रेंच राज्यक्रांतीच्या वेळीं घोषित झालेलीं तत्त्वें अुदात्त आहेत. त्यांतून सूचित होणारा ध्येयवाद कांहीं एका देशापुरतां नाहीं तर तो सर्व मानव जातीचा वारसा आहे.

* साने गुरुजी

मोती होऊन सुवर्णाच्या संगतींत राहाण्यापेक्षां दंवबिंदू होवून एखाद्यां चातकाची तहान भागवणें अधिक श्रेष्ठ होय.

* कुरल

कावळ्यालाहि खाण्याची वस्तु मिळते. पण तो ती लपवून ठेवीत नाहीं. तर ओरडून ओरडून आपल्या अितर साथीदारांना बोलावतो आणि मग ते सर्व मिळून खातात. अशा तऱ्हेची वृत्ति बाळगणारे लोकहीं आपल्या जीवनांत फुलतात.

* लक्ष्मणशास्त्री जोशी

सहजीवनाच्या सिद्धातांची आवश्यकता अणुयुगानें निर्माण केली

आहे. हेंच अणुयुग सर्वांना गंभीरपणें अिषारा देत आहे कीं, पुढें चला ! विश्वव्यापी मानवतेकडे चला.

* खाण्डेकर

शरण जायला आणि पायावर डोकें ठेवायला देवता बरी. पण हितगुज सांगायला आणि हृदयाशीं धरायला माणूस पाहिजे.

– माणसें जन्माला येतात पण माणुसकी निर्माण करावी लागते.

* रवीन्द्र

मनुष्य दयाळू आहे. पण माणसें क्रूर आहेत.

– तत्त्वज्ञान गौरी–शंकरासारखें उच्च आणि दुर्लभ असते पण माणुसकी गंगेसारखी सुलभ झाली पाहिजे.

* विनोबा

लक्ष्मी, शक्ति आणि सरस्वती ह्या अनुक्रमें वैश्य, क्षत्रिय आणि ब्राह्मण यांच्या राखीव देवता आहेत. सेवादेवी ही एकच सार्वजनिक देवता आहे.

* म. गांधी

मानवाच्या सेवेनें ईश्वराच्या साक्षात्कार व्हावा असा मी प्रयत्न करीत आहे. कारण मला ठाऊक आहे कीं परमेश्वर स्वर्गांत नाहीं किंवा पाताळांत नाहीं. तो प्रत्येकाचे हृदयांत आहे.

* बर्नार्ड शॉ

जग आपणासाठीं कांहीं करीत नाहीं वगैरें तक्रारी करीत बसण्या-ऐवजीं स्वतःच्या कल्याणार्थ झगडणें यांत जीवनाचा खरा आनंद आहे.

* गटे

पीडित हृदयाचा दाह शान्त करणाऱ्या आत्मीयतेच्या एकाच दृष्टिक्षेपाची किंमत कुबेराच्या सम्पत्तीपेक्षां जास्त आहे.

* राधाकृष्णन

देव, देश व मानव यांची सेवा करतांना जो सर्व देतो तो कृतार्थ होतो. त्यांतच वैभव आहे.

* टागोर

माझें प्रेम मानवतेच्या कारणी लागेल असे बळ मला दे. गरीबांना कधींहि अन्तर देणार नाहीं व पाशवी शक्तिपुढे मान तुकविणार नाहीं या कृत निश्चासाठीं माझें मन खंबीर बनव.

* बोरकर

अश्वत्थामा तेल मागतो, ख्रिस्त मागतो पाणी धनिक मागतो प्रेताच्या टाळूवरचें लोणी, रक्त मागतो सुभाष, आणि सूत मागतो गान्धी, खादी घालून लांच मागती वजीर.

* खाण्डेकर

माणुसकीला लाथाडून जिवंत राहण्यापेक्षां माणुसकीचें रक्षण करतां करतां मत्यूला कवटाळण्यांतच आनन्द वाटतो.

* केशवसुत

जिकडे जावें तिकडे माझीं भावण्डें आहेत ।
सर्वत्र खुणा माझ्या घरच्या मजला दिसताहेत ॥

* माधव जूलियन

हा जाति विध्वंसक काळ आला । समानतेच्या उभवा ध्वजाला
राष्ट्रीय जो सर्व जनाभिमानी । न जाति तो वा उपजाति मानी

* वा. ना. देशपांडे

रंजल्या गांजल्या । दीनांचे शरीर
आम्हां देवतांचे । हेंच रे मंदीर

* खाण्डेकर

घरि एकचि पणती मिणमिणती
म्हणू नको, उचल, चल लगबग ती

– नरेंचि केला हीन किती नर !

* महात्मा की मोहात्मा

पाशयुक्त झाल्यानेंच मनुष्याला मनुष्यत्व प्राप्त होतें.

* पै. महंमद

मजुराला त्याचा घाम वाळण्याच्या आंत मजूरी देऊन टाका.

* बोरकर

यज्ञीं ज्यांनीं देऊनि निजशिर
घडिलें मानवतेचें मंदिर
परि जयांच्या दहनभूमीवर
नाहीं चिरा, नाहीं पणती
तेंथें कर माझें जळती ।

* रे. टिळक

जियें नाहीं अभिमान कुणा ठावा ।
एकमेकांची जिथें सौख्य ठेवा
जिथें परहित तें स्वहित मानवातें
जगीं उपमा कोणतीं त्या गृहातें ?

* तुकाराम

भूतदया ज्याचें मनीं । त्याचे घरीं चक्रपाणी.

★ ★

## ८५ : मायबोली

* ज्ञानदेव

माझा मऱ्हाटाचि बोलु कौतुकें ।
परि अमृतातेंही पैजा जिंके ।।
ऐसी अक्षरें रसिकें । मेळवीन ।

* दासोपंत

प्राकृत म्हणोनि दूषिती । तेचि ह्या ज्ञाना वंचिति ।
भाषाच केवळ भजती । तें मूर्ख कीं ना ? ।।
हातीं देतां नवरत्नें । मऱ्हाटे न बोले, न घेणें ।
आतां हानी तया कारणें । तें दूरी नसें ।।

* फादर स्टीफन

जैसी पुस्पांमाजी पुस्पमोगरी। कीं परिमळामाजी कस्तुरी ।
तैसी भासांमाजि साजिरी । मराठिया ।

* श्रीधर

प्राकृत आणि संस्कृत । दोनीमाजी एकचि अर्थ ।
जैसा दोन स्त्रियांचा एक नाथ । दोन्ही हस्त एकाचेचि ।।
अबळांस न कळे संस्कृतवाणी । जैसे आडांतील पाणी ।
परी दोरपाया वाचूनी । अशक्त जनीं केंवि निघें ? ।।
ते तडागासि येतां त्वरें । तात्काळचि तृषा हरें ।
भोळे जन तारावया ' ईश्वरें। प्राकृत ग्रंथ निर्मिले ।।
संस्कृत इक्षुरस अपार । त्याची प्राकृत हें साखर ।
सूज्ञ जन सुकुमार सेवणार । प्रेमरसी मिळवूनियां ।।

* एकनाथ

संस्कृत ग्रंथकर्ते ते महाकवि । मा प्राकृति काय उणीवी ।
नवी जुनीं म्हणावी । कैसे कधीं सुवर्ण सुमनें ।।

कपिलेचें म्हणावें क्षिर। मा इतरांचे काय नीर ?
वर्णास्वादें एकचि मधुर । दिसे साचार सारिखें ॥२॥
संस्कृत वाणी देवानें केली । प्राकृत काय चोरापासोन आली ।
असो या अभिमान भुली । वृथा बोली काय काज ॥३॥

मयूरपन्त

प्राकृत म्हणोनि निर्भर हांसतील अतज्ज्ञ नीच मत्कृतिला ।
परि जाणशील बा तूं रसिक कविवरा मनी चमत्कृतिला ॥
ग्रंथ प्राकृत दिसतों परि न प्राकृत विलोकिता नीट ।
गोपांत गोप भासें कृष्ण परि नयेचि पाहतां वीट ॥

मोरोपन्त

गीर्वाणें राघवाचें यश रसिकजनां लागते फार मिष्ट ।
तैसें न प्राकृतानें अचतुर म्हणती मानिती तें न शिष्ट ॥
पीतां गोक्षीर कतिस्वरमणिचषकें देतसे जेवि गोडी ।
सारज्ञाला पलाशद्रुम–दल–पुटकें सेविता न सोडी ॥

माधव ज्युलियन

मराठी असे आमुची मायबोली ।
जरी आज ती राष्ट्रभाषा नसे ॥
हिचे पुत्र आम्ही हिचे पांङग फेडूं ।
जगन्मान्यता हीस अर्पू प्रभावें ॥

शिरीष

मराठी मराठी मराठी मराठी
सदाची महाराष्ट्र भाषा असे !

★ ★

## ८६ : मित्र

* डॉ. माधवराव पटवर्धन

मित्राच्या मृत्यूपेक्षांहि मैत्रीचा मृत्यू अधिक दु:खकारक असतो.

* ना. सी. फडके

मैत्री ही स्फुलिंगासारखी आहे. ती केव्हां प्रकटते सांगतां येत नाहीं. कित्येक वर्षांच्या सहवासांतही ती अप्रकट राहील. अत्यन्त सहवास घडलेला नसूनहि ती प्रकट होऊन दोन अन्त:करणें प्रदीप्त करील.

* प्ल्यूटार्क

सुस्थिति हें कांहीं मित्राचें योग्य माप नाहीं. मित्राचें खरें मूल्य ठरवायला आपत्तीच हवी.

* वुल्यम पेन

खरी मैत्री मोकळ्या हृदयानें बोलते. न्याय्य सल्ला देते. केव्हांहि मदत करण्यास तयार असते. शांतपणें सहन करते. धैर्यानें मार्ग हुडकते. धीटपणानें बाजू घेते आणि मित्रत्वाचें नातें कायम ठेवतें.

* सॉक्रेटीस

नवीन मित्र जोडायचा असतांना आपण फारच थोडी खबरदारी घेतो. खरा मित्र हा सर्वथा निरुपम आहे. हें केव्हांहि नाकारतां येणार नाहीं. एकाच शब्दांत सांगायचे म्हणजे कोणत्याहि प्रसंगीं मित्रापेक्षां अधिक उपयोगीं पडेल असें जगांत कांहीच नाहीं.

* सिसरो

तुला जर खरोखर माझा मित्र व्हावयाचे असेल तर तूं माझ्या परिस्थितीवर प्रेम करण्याऐवजी तें माझ्या स्वत:वरच केलें पाहिजेस.

— प्रसंगीं थोडें नुकसान सोसावें लागलें तरी हरकत नाहीं पण शत्रु निर्माण करूं नयेत.

* शेषप्रश्न

स्नेहाच्या बळावर दुबळ्या माणसांबद्दलहि लोभ वाटतो.

* अमर्सन

ज्याला हजारो मित्र आहेत त्याला मित्र अपुरे वाटतात; पण ज्याला एकच शत्रू आहे तो मात्र त्याला सगळीकडे दिसतो.

* शेक्सपिअर

बहुतेक मैत्री म्हणजे ढोंगीपणा आणि प्रीती म्हणजे गाढवपणा.

– आपत्काली साहाय्यक होणें हीच खरी मित्रता.

– आळशी व बेकार लोकाशीं मैत्री करूं नका.

* साने गुरुजी

हृदयांत अपार सेवा भरली कीं सर्वत्र मित्र दिसतात.

– पुस्तकांसारखा मित्र नाहीं. त्याला जवळ करण्याचा अवकाश कीं तें आपलें अन्तरंग खुलें करतें. तें कधीं फसवत नाहीं. चुकवत नाहीं. नेहमीं आपल्या सेवेंत तत्पर असतें,

* जय योधेय

स्नेह वाईट नसतो. कारण तो माणसाला त्याग करावयास शिकवतो. संकुचित नात्याची सीमा तोडावयास शक्ति देतो.

– अति स्नेहः पापशंकी !

मैत्री ही नात्यापेक्षां कितीतरी श्रेष्ठ आहे.

– हल्ला करणाऱ्या शत्रूला भिऊ नकोस, तर स्तुति करणाऱ्या मित्राविषयीं सावधगिरी बाळग.

– दुसऱ्यामध्यें सहभागी होण्यानें तुम्ही दोन महिन्यात अनेक मित्र मिळवू शकाल. तितकें मित्र तुम्हीं इतरांना आपसांत समाविष्ट करून घेण्यानें करूं शकणार नाहीं.

* नेपोलियन

इतर कुणीहि नसेल इतका आज मी पृथ्वीवर भाग्यवान आहे; पण यावेळीं हे जोसेफिन, जगामध्यें तूंच अशीं आहेस कीं केवळ तुझ्यावर मी विसंबून राहूं शकतो.

– ज्याचा मित्र अतिशय समजुतदार असतो, तो मनुष्य खराखुरा भाग्यवान होय.

– चांगला मनुष्यच चांगला मित्र होवूं शकतो.

* कोलरीज

मैत्री मागूं नये. परीक्षा करावी.

* अिमर्सन

आपणास हवे असलेले मित्र म्हणजे स्वप्न व गोळ्या आहेत.

* टेलर

मित्रत्व हा पाश जगांतील सर्वांत मोठा पाश आहे.

* व्होल्टेअर

आत्म्याचें लग्न म्हणजे मित्रत्व.

* अिमर्सन

मित्रत्वाला समारंभानें वा आदरानें पुजिलें पाहिजे. कोपऱ्यांत कुजवून काय उपयोग ?

* *

## ८७ : मैत्री

* सॉक्रेटिस

घाईघाईनें मैत्री जोडूं नका. पण एकदां मैत्री जुळली कीं तिच्याशीं एकनिष्ठ रहा. मुळींच मित्र नसण्याइतकेंच वारंवार मित्र बदलणें हेंहि अश्लाघ्य आहे.

* बायरन

मी मृत्यु सहन करूं शकतो. एकाद्याचा विरह सहन करूं शकत नाहीं.

* म्हण

कुत्रं शेपटीं हालवतं तें तुमच्यासाठीं नव्हे. भाकरीसाठीं.

* फोमा

मैत्रिशिवाय एकलकोण्डं आयुष्य आपल्याला कण्ठतां येणं शक्य नाहीं.

★ ★

## ८८ : मूर्ख–शहाणा

* रेन्दाळकर

कोण शहाणा! नर जो द्रविणोद्धत चरण सेवनी दंग ।
मूढ कवण ! सत्यास्तव जो स्वार्थाची वृथाचि हानि करी ।

* महात्मा कीं मोहात्मा

वाच्यार्थ उमजणारा बुडेल. निश्चन्यर्थ उमजणारा तरेल.

* माडखोलकर

प्रामाणिक माणसांइतकें मूर्ख जगांत कोणीच नाहीं.

* केशव नाईक

शहाणपणाचें प्रदर्शन करणारा पोपट कायमचा बन्दिवान होतो.

* ठेंगणें अस्मान

मुलुखावेगळे विचार तोंडानें बोलून दाखवेल पण कृतींत न आणतां त्यांना बगल देईल तो माणूस विचारी, व्यवहारचतुर अतएव शहाणा ठरतो. पण मुलुखावेगळे विचार बोलून दाखवून न राहतां जों तें प्रत्यक्ष आचरील तो विक्षिप्त, अर्धवट व चक्रम ठरतो.

– वेड्या लोकांची आपण पूर्ण शहाणें असल्याची वालंबाल खात्री असतें. नि उलट आपल्याला वेडबीड तर नाहीं लागले अशीं शंका घेणारे लोक खरे शहाणे असतात.

* पै. महंमद

जें आपलें ज्ञान कृतींत उतरवतात ते विज्ञानी होत.

* न्यू टेस्टॅमेण्ट

शहाणपणाची परीक्षा परीणामावरून केली जाते.

रत्नांपेक्षांहि शहाणापणा मूल्यवान आहे.

* वॉल्ड व्हिटमन

हाणपणा हृदयांत असतो, त्याला साक्षी पुरावा लागत नाहीं. तो स्वतःच साक्षीपुरावा आहे.

* *

## ८९ : मेन्दू

– रिकामा मेन्दू म्हणजे सैतानाचें घर. मेन्दू म्हणजे सदैव चालू राहाणारी एक चक्की ! सूर्य जसा सदैव प्रकाशत असतो तसा मेन्दू सदैव विचार करीत असतो.

पै. महंमद

ईश्वरानें बुद्धिहून उत्तम अथवा अधिक पूर्ण अथवा सुन्दर असें दुसरें कांहीं निर्मिलें नाहीं.

* विचार पोथी

बुद्धीनें कळतें पण कृतिशिवाय वळत नाहीं.

बुद्धी हे आत्मदर्शनाचें महाद्वार आहे. बुद्धि उघडली कीं आंत आत्मा उघडा आहे.

बुद्धि आणि भावना यांचा समन्वय म्हणजेच विवेक.

* समर्थ

अति मूढ त्या दृढ बुद्धि असेना।
प्रकृति व डोकें यांचें सहसा जुळत नाहीं

* यदुनाथ थत्ते

आपल्या बुद्धीला पटलेला मार्ग सोडून बुद्धीचा, परमेश्वरानें दिलेल्या या दिव्य शक्तीचा अपमान करूं नका.

* साने गुरुजी

बुद्धीचा डोळा बन्द करणें हें सर्वांत मोठें पाप आहे.

– पिण्डे पिण्डे मतिः भिन्ना।

– यस्य नास्ति स्वयं प्रज्ञा शास्त्रं तस्य करोति किम्।
लोचनाभ्यां विहीनस्य दर्पणः किं करिष्यति।

– फुलासमान कोमल। देवापरी सुनिर्मळ।
विनम्र या तृणासम। सदैव हो मति मम।

## ९० : मोह

– चांगले दिसण्याचा मोह धरण्यापेक्षां चांगले होण्याचा प्रयत्न करा.

* ना. ह. आपटे

– एका मोहापासून मनाला जिंकले कीं ते दुसऱ्या मोहाला जिंकू शकतें व आपली आपल्यालाच धन्यता वाटते. परन्तु तेंच आपण ‘ एकवार ’ म्हणूच जर एक वेळ एका मोहाला बळी पडलों तर दुसरा मोह त्यातूनच उत्पन्न होतो.

* ऑस्कर वाईल्ड

मोहाव्यतिरिक्त मी कशाचाहि प्रतिकार करूं शकेन.

* शेषप्रश्न

मोह क्षणिक कां असेना; पण तो क्षण कांहीं खोटा नव्हे. क्षण–काळच्या सत्याची पुन्हा पुन्हा आवृत्ति होत असते.

* भ. महावीर

जेथें मोह नाहीं तेथें दुःख नाहीं व जेथें हांव नाहीं तेथें मोह नाहीं.

क्रोधामुळें प्राप्तीचा, मानामुळें विनयाचा, मायेमुळें मित्राचा व मोहामुळें सर्वांचा नाश होतो.

अनेक मूल्यवान पदार्थांनें भरलेले विश्व जरी मनुष्याला दिले तरी त्याचें समाधान होणार नाहीं, कारण मोह हा अनिवार्य आहे.

जसा जसा फायदा होईल तसतसा लोभ वाढत जातो.

★ ★

## ११ : मौन

म. गांधी

ओठ शिवून धारण केलेलें मौनव्रत हे मौनव्रत नव्हे. स्वतःची जीभ कापूनहि तें एखाद्यास करतां येईल. तोच खरा मौनव्रती कीं ज्याला बोलावयाची शक्ति असूनहि जो वाष्कळ बडबड करीत नाही.

मौनव्रती हा क्वचितच संभाषणांत अविचारी असू शकेल. कारण तो प्रत्यक्ष शब्द तोलून बोलेल.

सत्यशोधकाला मौनव्रत अतिशय साहाय्यक होणारें आहे. मौन-व्रतामध्यें आत्म्याला प्रकाशाचा मार्ग स्पष्ट दिसतो.

मौनव्रत ही सत्य-सेवकाची दैवी शिस्त आहे. अतिशयोक्तीला बळी पडणें, सत्य सोयीनुरूप बदलणें ही माणसांची नैसर्गिक दुर्बलता आहे. त्या दुर्बलतेवर मात करण्यासाठीं माणसाला मौनव्रताची आवश्यकता आहे.

* कार्लाईल

भाषण हें चंदेरी तर मौनव्रत हें सोनेरी आहे.

* डिझरेली

मौनव्रत ही सत्याची जननी आहे.

* बेकन

मौन ही अशी निद्रा आहे कीं जीमधून शहाणपणा प्राप्त होतो.

* डिसरेली

समाजाचा कौल हा पुष्कळवेळां भाषणापेक्षां मौनव्रतानेंच अधिक प्रभावीपणें व्यक्तवला जातो.

* शेक्सपिअर

मौनव्रत म्हणजे आनन्दाची ललकारी.

* *

## ९२ : यत्न

कष्टानें व नीतीनें मिळविलेल्या मीठ–भाकरींत असलेली गोडी अन्यायाच्या पक्वान्नांत नसते.

* समर्थ रामदास

केल्यानें होत आहे रे, आधि केलेंचि पाहिजे.

* गारफील्ड

जोपर्यंत एखाद्या वस्तूसाठीं मनुष्य प्रयत्न करीत नाहीं, तोपर्यंत त्याला ती वस्तू मिळू शकत नाहीं.

– एक आवाज मला ऐकू येतो. तो तुम्हांला ऐकू येत नाहीं. तो आवाज मला सारखा बजावून सांगतो आहे, थाम्बू नकोस.

* यशवन्त

उद्योगी शरीर म्हणजे परमेश्वराचें निवासस्थान.

– परी यत्नास जो राजी ठरे तो सर्वदा गाजी.

* रामदास

यत्नाचा लोक भाग्याचा । यत्नेवीण दरिद्रता ।

* विनोबा

प्राप्तीच्या आनन्दापेक्षां प्रयत्नाचा आनन्द अधिक आहे.

* समर्थ

माणसाचें श्रम कमी करण्याकरितां अनेक यंत्रांचा शोध लावण्यांत आला आहे; परंतु 'उद्यां' हा शब्द आपले श्रम वांचविण्याच्या बाबतीत सर्वांत जास्त उपयोगी आहे.

★ ★

दाखल 22407 दि:
क्रमांक ... 9994 नों. दि: 22/7/50

१३ : यश

– चिकाटी यशाची गुरुकिल्ली होय.

– आत्मविश्वासी माणसें सदैव यशस्वी होतात.

* फेल्फस

सतर्कतेनें संधीची वाट पाहणें, साहसानें आणि कौशल्यानें संधी प्राप्त करणें, शक्ति आणि दृढतापूर्वक व संधीचा फायदा घेऊन कार्य यशस्वी करणें हेंच मनुष्याला यशस्वी करणारे गुण !

– जोपर्यंत मनुष्य आपल्या आवडीचे काम करीत नाहीं तोपर्यंत याला यश मिळणार नाहीं.

* मॅथ्यू अर्नाल्ड

चांगली वागणूक हा यशोमार्गाचा पहिला टप्पा आहे.

* गोळवलकर गुरुजी

तपाशिवाय यश नाही.

* जोसेफ मॅझिनी

एकवटून व एकसारखें प्रयत्न करीत रहाणें यांतच विजयाचें रहस्य भरलेलें आहे.

– अपेक्षा पुऱ्या करतो तोच खरा यशस्वी.

* हिटलर

योग्य आणि अयोग्य याची परीक्षा करण्याचें खरें साधन म्हणजे यशच.

★ ★

## ९४ : रसनेंद्रिय

* भ. महावीर

रसनन्द्रिय सांभाळलें कीं जननेंद्रियहि सहज सांभाळतां येतें.

जीभ जिंकणारा जग जिंकू शकतो.

* चॉसर

स्वतःच्या जीभेपेक्षां सांवरून धरण्याला अवघड अशी गोष्ट नाहीं

– मन मोकळें असले तरी जीभ मोकळी सुटतां कामा नये.

– परमेश्वरानें आपणांस दोन कान व एक तोंड दिलें आहे. त्याचप्रमाणांत आपण त्याच्या उपयोग केला पाहिजे.

* पै. महंमद

शिवराळ जीभेच्या अपराधाचें प्रायश्चित्त धार्मिक कर्तव्याचया पालनानें व्हावयाचें नाहीं.

* फ्रॅंकलिन

घसरलेला पाय तुम्हांला सांवरतां येईल, पण गेलेला शब्द कांहीं सांवरतां येणार नाहीं.

* वॉशिंग्टन आरविंग

जहाल जीभ तें असं एकच हत्यार आहे कीं तें जितकं वापरावं तितकं तीक्ष्ण बनत जातें.

* *

## ९५ : राज्य–राजकारण

* शेक्सपिअर

तरवारीच्या जोरावर मिळविलेलें राज्य तरवार असेंपर्यंत टिकतें.

* गडकरी

राजा म्हणजे जगाचा उपभोग्य शून्य स्वामी ? राज्य–उपभोग म्हणजे राजसंन्यास ?

ना विष्णु: पृथिवीपति: ।

* राहुल सांकृत्यायन

जगावर राज्य तर्कांचे नसतें तरवारींचें असतें.

* लाओत्से

राज्य करावयाचें असेल तर सद्वर्तनीं व्हा. जर सर्व जगावर राज्य करावयाचें असेल तर आत्मिक उन्नति करा.

* ब्लॅक स्टोन

अिंग्रजांच्या राज्य–घटनेंतील प्रमुख आणि आद्य तत्त्व म्हणजे राजा हा दुष्कृत्य करूं शकत नाही हें होय.

* अिमर्सन

देव म्हणाला–कण्टाळलो राजाला ।
साहवेना मज त्याचीच बला ।
सकाळपासुनीं क्रोध कानीं पडला ।
गरीबांचा हा क्रोध येअिल फळाला ।

* ॲरिस्टॉटल

माणूस हा राजकारणप्रिय प्राणी होय.

* डॉ. अर्नाॅथ

स्वत:च्या खोटेपणानेंच राजकीय पक्ष सरतेंशेवटीं नामशेष होतो.

* बर्नस्

जर तुला राजकारणांत पडायचें असेल; आणि तुला त्यांत नशीब काढावयाचें असेल; तर प्रथम बहिरा आणि आंधळा हो आणि समाज कांहींहि बोलो वा ऐको पर्वा करूं नकोस.

* हेन्री जॉर्ज

राजकारण राजकारणी पुरुषाच्या हवाली आणि राजकीय आर्थिकता कॉलेज प्राध्यापकांच्या हवाली आपण सुरक्षितपणें देऊं शकत नाहीं.

* रूदर फोर्ड

जो आपल्या देशाची सेवा नेकीनें करतो तोच आपल्या पक्षाचीहि सेवा करू शकतो.

* हिटलर

तुम्हांला जर समाजाचा पाठिंबा हवा असेल तर त्यांना तुम्ही अगदीं ठराविक आणि मूर्खपणाच्या गोष्टी सांगा.

★ ★

## ९६ : राष्ट्र व राष्ट्रीयत्व

– सांस्कृतिक एकता असणाऱ्या समाजांचेच राष्ट्र बनत असतें.

* गोळवलकर

एका परंपरेनें, एका इतिहासानें, एका आचार–विचारानें व एका धर्मानें जे प्रेरित झालें आहेत अशाच लोकांचे राष्ट्र होतें व तेंच खरें राष्ट्रीय होत.

– एकदां शक्तीशाली असें केंद्र निर्माण झालें म्हणजे त्याच्या द्वारा राष्ट्राची प्रभा आपोआप फाकूं लागतें.

– व्यक्तिजीवन व राष्ट्रजीवन यांचे सुन्दर संमिश्रण झालें पाहिजे.

– आपल्या राष्ट्राचा भविष्यकाळ उज्जल व्हावा अशी आपली इच्छा असेल तर, प्रत्येकानें आपल्या वाट्याला आलेलें काम खंत न मानतां तें उत्साहानें आणि उत्तम रितीनें व ते राष्ट्रोपयोगी कसें होईल या दृष्टीनें करावें.

* कार्लाईल

खाण्यापिण्याच्या गोष्टीं सर्वांनाच पटतात. त्याहून वरच्या थराच्या गोष्टीं सर्वांना पटूं लागल्या तरच राष्ट्रांचा उत्कर्ष होतो.

* ॲनीबेझण्ट

ऐकत्वाची भावना हें राष्ट्रीयत्वाचें गमक होय.

* रमेशचन्द्र दत्त

हिंदुस्थानांतील खेडेगांव हें राष्ट्राचें प्रतीक होय.

– लोकशाही म्हणजे असंख्य लोकांची बेजबाबदार बडबड नव्हे' तिथें अनुभवावांचून कुणी बोलत नाहीं आणि उक्तीपेक्षां कृति शतपटीनें श्रेष्ठ मानली जातें तिथेंच खरोखरी लोकशाही नान्दू शकतें.

* म. गांधी

राजकारण किंवा धर्मकारण यांतून ' मी व माझें ' या शब्दाचें जर उच्चाटन होईल तर जनता अधिक सुखी होईल.

ग्रामोद्धारावांचून राष्ट्रोद्धार होणें अशक्य आहे.

* डॉ. शामाप्रसाद मुकर्जी

ज्या राष्ट्राची परंपरागत विशिष्ठ संस्कृति आहे त्या संस्कती-मुळें ते एकात्म आहे.

* पर्ल बक

मला वाटतं आज मानव जातीची जो अवस्था अगर अनवस्था ाली आहे तिला प्रत्यक्ष कारण पुरुषाच्या आणि स्त्रीच्या सहज

प्रेरणेतील समतोलपणाचा अभाव होय. लोकशाहीचें ध्येय आपण साध्य करूं शकलों नाहीं, कारण या समतोलपणाचीं आवश्यकताच आपण जाणून घेतलेली नाहीं. जेव्हां पुरुष आणि स्त्रिया जीवनाच्या विविध क्षेत्रांत आपला नैसर्गिक व पारंपारिक भेदभाव न मानतां एकत्र काम करूं लागतील तेव्हांच राष्ट्रात खरी लोकशाही अस्तित्वांत येईल.

* म. गांधी

सत्तांधतेनें मनुष्य आन्धळा आणि बहिरा होतो. अगदीं नाकाखालच्या गोष्टी देखील त्यांना दिसेनाशा होतात आणि त्यांच्या कानांत आलेल्या गोष्टी त्यांना ऐकूं येत नाहींत; म्हणून देशभक्तानें मृत्यूस नेहमीं सिद्ध झालें पाहिजे. तुरुंगवास पत्करला पाहिजे व कष्ट केलें पाहिजेत.

– न्याय हेंच तें साधें तत्व सरकारच्या यशाचें गमक आहे.

* स्माईल्स

राष्ट्राची प्रगति म्हणजे अनेक व्यक्तींनीं चालविलेल्या उद्योगधंद्याचीं, उत्साहाची आणि न्यायीपणाची बेरीज. आळशीपणा, स्वार्थीपणा आणि दुर्गुण म्हणजे राष्ट्राची पिछेहाट.

* डिझरेली

व्यक्ति ह्या जमाती करू शकतील; पण संस्था ह्या राष्ट्रें बनवतात.

व्यक्ति स्वातंत्र्य व समाज संघटना यांचा योग्य तो संगम झाल्यानेंच राष्ट्रकार्य होतें.

– जननी जन्मभूमिश्च स्वर्गादपि गरियसि ।

* बाबा भिडे

समष्टीं जीवन गेलें कीं राष्ट्रवैभव गेलेंच.

जोफेस मॅझिनी
नाहीं नाहीं राष्ट्रें कधींहि मरत नाहींत.

जो स्वदेशासाठीं मरतो, तो चिरंजीव होतो.

कोणतेंहि राष्ट्र सत्यनिष्ठेशिवाय केव्हांहि वर येणार नाही. राष्ट्र निर्माण करावयाचें असेल तर, राष्ट्रनिष्ठा निर्माण करावयास पाहिजे.

* ताम्बे

तेथें त्या रत्नमय दिव्य सिंहासनीं ।
लखलखे भरतभूजननि बघ विजयिनी ।
प्रणय नय सत्य हे सज्ज गण रक्षणीं ।
बघ भविष्याचिया दिव्य त्या मन्दिरा ।

* रामदास

देशद्रोही जितुके कुत्ते । मारुनि घालावे परते ।

* वि. दा. सावरकर

नभिं नक्षत्रें बहुत एक परिप्यारा । मम भरतभूमीचा तारा ।

* विनायक

देशभक्ता प्रासाद बन्दीशाळा,
श्रृंखलांच्या गुम्फल्या पुष्पमाला,
चिता, सिंहासन, शूळ, राजदण्ड,
मृत्यू दैवत दे अमरता उदण्ड.

* कार्लाईल

राष्ट्रांतील विभूतीचा ज्या मानातें जनता गौरव करतें त्या मानानें राष्ट्राचा उत्कर्ष जवळ आला आहे असें मानावें.

संघटना हीच खरी राष्ट्राची शक्ति आहे. ज्या राष्ट्रांत संघटना नसते त्या राष्ट्राच्या आकांक्षा सफल होत नाहींत.

* डॉ. राजेन्द्रप्रसाद

राष्ट्राचें कल्याण हेंच ज्याचें एकमेव ध्येय आहे अशा प्रामाणिक लोकांची आज देशाला गरज आहे.

* डॉ. शामाप्रसाद मुखर्जी

पूर्वजांचा गौरव करणें, त्याचें वर्षातून एकदां स्मरण करणें हें भावी उत्कर्षाचें चिन्ह होय. उदयोन्मुख राष्ट्राला याची जरूरी आहे.

* विनोबा

एकपक्षीय सरकार; सर्वपक्षीय सरकार; पक्षरहित सरकार आणि सरकाररहित सरकार ह्या राजनैतिक क्रान्तीच्या शिडीच्या वरच्या पायऱ्या आहेत. पक्षरहित सरकार ह्या प्रक्रियेतील एक अनिवार्य स्थित्यन्तर आहे.

कसलें तरी देशी राज्य म्हणजे स्वराज्य नव्हे. स्वराज्य म्हणजे सर्वांचें राज्य म्हणजे दरएकाचें राज्य. ' हें राज्य माझें आहें ' हें दरएकाला वाटलें पाहिजे तेव्हांच तें स्वराज्य होतें.

* डॉ. मुखर्जी

या राष्ट्राची विशिष्ट परंपरागत संस्कृति आहे व त्या संस्कृति-मुळेंच तें एकात्म आहे.

म. गांधी

लोकांनी निवडलेल्या मूठभर लोकांच्या हातो सत्ता जाणें हें स्वरा-ज्याचें गमक नसून अधिकाराचा यत्किंचितही दुरुपयोग होतांच सत्ताधिकाऱ्याचा हात धरण्याची पात्रता व निर्भयता बहुजनामध्यें निर्माण होणें हें स्वराज्याचें गमक आहे. सत्तेचें नियन्त्रण व नियमन करण्याचें चातुर्य व सामर्थ्य सर्व नागरिक स्त्रीपुरुषामध्यें निर्माण करणें ही स्वराज्याची किल्ली आहे.

* विवेकानन्द

गवताची दोरी वळली म्हणजे तिनें मत्त हत्तीसुद्धां बांधला जातो, हें लक्षांत ठेवा.

* पं. नेहरू

जगांत जोपर्यंत सर्वजण सुखी नाहींत तोपर्यंत देश स्वतंत्र नव्हे.

* आगरकर

लोकमताच्या बागुलबोवांस न भितां समाजांतील दोषस्थळें दांखवून लोकांस अप्रिय परंतु पथ्यकारक असें विचार देणारे ज्या समाजांत आहेत त्या समाजाला ऱ्हास होण्याची फारशीहि भीति नाही.

आजच्या समाजांत विचार करणारे, उपभोग घेणारे व काम करणारे असे तीन वर्ग आहेत.

★ ★

## ९७ : राग

* बायबल

सरळ उत्तर, रागाची हकालपट्टी करतें.

* खलील जिब्रान

माझा पेला रिकामा असला तरी, त्याचे मला मुळींच वाईट वाटणार नाहीं; पण तो अर्धा भरलेला दिसला म्हणजे मात्र त्यांच्या अर्धवटपणाची मला चीड येते.

* ॲडिसन

सौन्दर्यदृष्टि मौनाचें रूपांतर शब्दांत करते. दर्याद्रदृष्टि विरो-

* डॉ. राजेन्द्रप्रसाद

राष्ट्राचें कल्याण हेंच ज्याचें एकमेव ध्येय आहे अशा प्रामाणिक लोकांची आज देशाला गरज आहे.

* डॉ. शामाप्रसाद मुखर्जी

पूर्वजांचा गौरव करणें, त्याचें वर्षातून एकदां स्मरण करणें हें भावी उत्कर्षाचें चिन्ह होय. उदयोन्मुख राष्ट्राला याची जरूरी आहे.

* विनोबा

एकपक्षीय सरकार; सर्वपक्षीय सरकार; पक्षरहित सरकार आणि सरकाररहित सरकार ह्या राजनैतिक क्रान्तीच्या शिडीच्या वरच्या पायऱ्या आहेत. पक्षरहित सरकार ह्या प्रक्रियेतील एक अनिवार्य स्थित्यन्तर आहे.

कसलें तरी देशी राज्य म्हणजे स्वराज्य नव्हे. स्वराज्य म्हणजे सर्वांचें राज्य म्हणजे दरएकाचें राज्य. ' हें राज्य माझें आहें ' हें दरएकाला वाटलें पाहिजे तेव्हांच तें स्वराज्य होतें.

* डॉ. मुखर्जी

या राष्ट्राची विशिष्ट परंपरागत संस्कृति आहे व त्या संस्कृति-मुळेंच तें एकात्म आहे.

म. गांधी

लोकांनी निवडलेल्या मूठभर लोकांच्या हातीं सत्ता जाणें हें स्वराज्याचें गमक नसून अधिकाराचा यत्किंचितही दुरुपयोग होतांच सत्ताधिकाऱ्याचा हात धरण्याची पात्रता व निर्भयता बहुजनामध्यें निर्माण होणें हें स्वराज्याचें गमक आहे. सत्तेचें नियन्त्रण व नियमन करण्याचें चातुर्य व सामर्थ्य सर्व नागरिक स्त्रीपुरुषांमध्यें निर्माण करणें ही स्वराज्याची किल्ली आहे.

* विवेकानन्द

गवताची दोरी वळली म्हणजे तिनें मत्त हत्तीसुद्धां बांधला जातो, हें लक्षांत ठेवा.

* पं. नेहरू

जगांत जोपर्यंत सर्वजण सुखी नाहींत तोपर्यंत देश स्वतंत्र नव्हे.

* आगरकर

लोकमताच्या बागुलबोवांस न भितां समाजांतील दोषस्थळें दाखवून लोकांस अप्रिय परंतु पथ्यकारक असें विचार देणारे ज्या समाजांत आहेत त्या समाजाला ऱ्हास होण्याची फारशीहि भीति नाही.

आजच्या समाजांत विचार करणारे, उपभोग घेणारे व काम करणारे असे तीन वर्ग आहेत.

★ ★

## ९७ : राग

* बायबल

सरळ उत्तर, रागाची हकालपट्टी करतें.

* खलील जिब्रान

माझा पेला रिकामा असला तरी, त्याचे मला मुळींच वाईट वाटणार नाहीं; पण तो अर्धा भरलेला दिसला म्हणजे मात्र त्याच्या अर्धवटपणाची मला चीड येते.

* ॲडिसन

सौन्दर्यदृष्टि मौनाचें रूपांतर शब्दांत करते. दयार्द्रदृष्टि विरो-

धाला अनुकूल करून घेतें आणि क्रोधांधदृष्टि सौंदर्यास कुरुपता आणतें.

* जॉन वेबस्टर

निसर्गामध्यें क्रोधाव्यतिरिक्त अशी एकहि गोष्ट नाहीं कीं जी माणसाला पशू बनवतें, विकृत करतें.

* बायबल

मूर्खांपोटीं क्रोध असतो.

* पं. नेहरू

निवाऱ्याच्या जागी ठेवलेल्या ज्योतिप्रमाणें माणसानें शांत असावें.

– राग गिळणें म्हणजे माणुसकी.

* शेक्सपिअर

संतापाच्या वेळी विरोध करूं नका. त्याला वाव द्या. तो थोडा शांत होऊं द्या.

– संयम हा कितीहि प्रभावी गुण असला तरी सामान्य मनुष्यावर तो सक्तीनें लादून जग सुधारणार नाही.

★ ★

## ९८ : लघुत्व

* चेस्टरफील्ड

विनम्रता म्हणजे दुसऱ्यांनीं आपणांस कसें वागवावें अशी आपली इच्छा असतें तसें आपण दुसऱ्यांना वागविणें.

* मॅगुन

विनम्रतेसारखे दुसरें धोरण नाहीं. कारण ज्याठिकाणीं वक्तृत्व हतप्रभ होतें त्याठिकाणीं सभ्य वागणूक यशस्वी ठरते.

– विनयशील होण्यांत वेळ घालवा. कारण सभ्यतेचें तें मानचिन्ह आहे.

– मारामारीपेक्षां तुम्ही नम्रतापूर्वक अनुकूलता दर्शविली तर तुम्हांला अपेक्षेच्या पलीकडे यश येईल.

* चिनी म्हण

जो पायाचा आवाज न करतां चालतो तो खूप दूर चालू शकतो.

– मित्रत्व आणि लघुत्व हे केव्हांही राग व जुलूम यापेक्षां श्रेष्ठ असते.

– विनयशीलता, सहनशीलता व चांगुलपणा हे तीन गुण दैवी आहेत,

* रामकृष्ण परमहंस

खरोखरच मी कोणीं नाहीं असें जो म्हणतो त्याच्याच हृदयांत परमेश्वर वास करतो.

– नम्रता म्हणजे अहंभावीपणाचा अत्यन्तिक क्षय.

– मुंग्यांना पंख फुटले म्हणून त्यांना गरुडाबरोबर कधीं आभाळात उडतां येईल काय !

* तुकाराम

लहानपण देगा देवा । मुंगी साखरेचा रवा ।
ऐरावत रत्न थोर । तया अंकुशाचा मार ।
जयां अंगीं मोठेपण । तया यातना कठीण ।
तुका म्हणे जाण । व्हावे लहानाहुनी लहान ।

* म. गांधी

जेव्हां मनुष्य स्वतःला धुळीकणांहून क्षुद्र मानतो तेव्हां देव त्याला मदत करतो.

* खलील जिब्रान

अन्तीम सत्याचें ज्ञान मला नाहीं पण मला माझ्या अज्ञानाची जाणीव मात्र आहे. या जाणीवेनें माझें मस्तक नेहमीं नम्र राहाते. माझें मोठेपण यांतच आहे असें मला वाटतें.

* म. गांधी

सत्यशोधक हा मातीपेक्षांहि विनम्र हवा. जग मातीला पायदळी तुडवते. परन्तु सत्यशोधकानें इतके विनम्र व्हावयास हवे कीं त्यास मातीनेहि तुडवावे तरच त्याला सत्याचें ओझरतें तरी दर्शन होईल.

* गटे

धैर्य आणि विनयशीलता हे असे गुण आहेत की ढोंगी लोकांना त्यांची नक्कल करतां येत नाहीं.

* सर्व्हण्टस

हृदयांत वज्र वागविण्यापेक्षां चेहऱ्यावर लाज असलेली ठीक.

* स्टोव्ह

सौन्दर्यसंपन्न वस्तू ही विनयीलोकांच्या हाती असावी.

★ ★

## ९९ : लबाडी

* श्री. कृ. कोल्हटकर

संसारांत काय, खेळांत काय, किंवा कोणत्याहि गोष्टींत काय खोटेपणापासून यश नसतें.

* लाओ–त्से

लोक जितकें हुषार आणि कारागीर तितक्या कृत्रिम गोष्टी जास्त.

* अिसाप

मनुष्याला एकदां बोललेलें खोटें पचविण्यासाठीं अनेकदां खोटें बोलावें लागतें.

* येश फुको

जगाच्या डोळ्यादेखत जें करतां येईल तें निमूटपणें करण्यास उच्चत म धैर्य लागतें.

★ ★

## १०० : लोकशाही

* लिंकन

जें सरकार जनतेकडून निवडलें गेलें आहे, जें जनतेचेच बनलेलें असून, जनतेकरितांच आहे ते कधींच नष्ट पावणार नाहीं.

* सिंक्लेअर लुअी

लोकशाहीनें सामान्य मजुराला त्याला पूर्वी कधींहि नसलेली प्रतिष्ठा प्राप्त करून दिली आहे.

* मुसोलिनी

राजाहीन परन्तु अनेक राजे असलेले राज्य म्हणजे लोकशाही होय. जर ते राजे जुलमी असतील तर कधीं कधीं ते राज्य अत्यन्त विघातक, एककल्ली व जुलमी होते.

* विल्सन

लोकशाहीसाठीं प्रथम जग सुरक्षित ठेवलें पाहिजे.

– लोकशाही आलीं कीं मतभिन्नता आलीच.

★ ★

## १०१ : वाचन

* फ्रॅन्सिस बेकन

वाचनानें मनुष्याला आकार येतो. सभेमुळें तो प्रसंगावधानी, तत्पर होतो आणि लिखाणामुळें तो सर्वांगीण होतो.

* जरमी कोलर

वाचावें तसतसें शहाणपण येतें.

* अमिरसंन

वाचनासंबंधींचें तीन नियम मला द्यावेसें वाटतात.

(१) जें पुस्तक वर्षाचें जुनें झालें नाहीं, तोपर्यंत तें कधींहि वाचू नका. (२) उत्कृष्ठ आणि सर्वमान्य पुस्तकाशिवाय अितर वाचू नका. (३) जें आवडेल तेंच फक्त वाचा.

* हॅमरटन

वाचनाची कला म्हणजे चतुराईनें यशस्वी होण्याची कला.

* चार्लस लॅम्ब

दुसऱ्या माणसाच्या हृदयांत सामावल्याचें मला आवडते. ज्या वेळीं मी चालत नाहीं त्यावेळीं मी वाचतो. मला बसणें आणि विचार करणें शक्य नाहीं, कारण पुस्तकेंच माझ्यासाठीं विचार करीत असतात.

* थॉमस नॉर्थ

जें खूप वाचतात आणि थोडेच काम करतात ते ज्याचा नाद दुसऱ्यांना बोलावतो पण स्वत: मात्र कधीच देवळांत प्रवेश करीत नाहींत अशा घंटेप्रमाणें असतात.

★ ★

## १०२ : वासना

* ज्ञानेश्वर

तैसे आरंभीं विषयसुख, गोड वाटे इंद्रिया ।
फळ–पाकी पापिया, दु:ख भोगी ।

* समर्थ

मना कल्पना तें नको विषयाची ।
विकार घडे हो जनीं सर्व ची चीं ।

* जीवन दर्शन

वासना मोकाट सुटली तर ती स्वत:च स्वत:ची राखरांगोळी करून टाकणारी ज्वाला बनतें.

* टॉलस्टॉय

अग्नि हा अग्नीनें शमत नाहीं तसें पापाचें परिमार्जन पापानें होत नाहीं.

* साने गुरुजी

स्वार्थाचा, वासनांचा, अहंकाराचा व सुखोपभोगांचा होम केला पाहिजे. जेथें असे होम पेटतात तेंथेंच स्वातन्त्र्य फुलतें.

* जपानी सुभाषित

जीभ ही तीन इंच लांबीची खरी ! पण तिच्यांत सहा फूट माणसाला मारण्याचें सामर्थ्य असतें.

* खलील जिब्रान

एका कोल्हयानें सूर्योदयाच्या वेळीं आपल्या सावलीकडे पाहिले व तो स्वतःशीच म्हणाला, आज दुपारच्या जेवणाला मला सबन्ध उंटच लागणार ? आणि सारी सकाळ त्यानें उंटाचा शोध करण्यांत घालविली परन्तु दुपारच्या वेळीं जेव्हां त्यानें पुन्हां आपल्या सावलीकडें पाहिले तेव्हा तो म्हणाला एक उंदीरसुद्धां मला पुरेसा होईल.

तूं माझ्या हृदयांत लपलीस तर तुला शोधून काढणें फारसें अवघड नाही. पण तूं आपल्याच शरीरांत लपवून राहिलीस तर तुला शोधून काढल्याचा निष्फळ प्रयत्न करण्यांत काय अर्थ ?

– दोन व्यक्तींनी एकाच वेळीं खिडकीवाटे पाहिलें. एकानें जमीन पाहिली व दुसऱ्यानें चकाकणारे तारे.

★ ★

## १०३ : विचार

* समर्थ

विवेक आणि वैराग्य । तेचि जाणावे महद्‌भाग्य ।
विवेकें कुडी आपुलीं पालटावी ।
विवेकें क्रिया आपुली पालटावी ।
तुटे वाद संवाद तेथें करावा ।
विवेकें अहंभाव हा पालटावा ।

* जीवन दर्शन

तुमचीं बालकें हीं तुमचीं नव्हेत. त्यांना प्रेम द्या विचार नको.

एकट्या विवेकाचें अधिराज्य असेल तर ती एक मर्यादा घाल-णारी शक्ति बनते.

* एम. पी. स्मिथ

आपल्याविषयीं जें बोललं जातं तें खरं आहे असें मानणें केवढें महाभयंकर आहे.

– दुर्विचार म्हणजे दुष्कीर्तीची जननी. संकल्प म्हणजे ज्यांत पूर्ण श्रद्धा व दृढनिश्चय भरलेलला आहे असा विचार.

* जोफेस मॅसिनी

जुलुमाने विचार मरत नाहींत तर सुदृढ केले जातात.

आपटे

विचार हा जनक आणि शब्द त्याचा पुत्र.

ट्रायन एडवर्ड

विचार हेतूकडे नेतो. हेतू कृतिकडे, कृतीमुळें सवय लागतें. संवयींमुळें स्वभाव बनतो व स्वभावामुळें साध्य प्राप्त होतें.

* लाँग फेलो

भूतकाळ निरखूं नका. कारण तो परत येत नसतो. वर्तमानकाळांत सुधारणा करा. कारण तो तुमचा आहे आणि असंदिग्ध भविष्याकडे निर्भयतेनें आणि शूरपणानें जा.

* ऑलियस

तुमचें सौख्य तुमच्या विचारावर अवलंबून असतें.

* अलकॉट

विचारामुळेंच माणूस बनतो,

* मोस्ले

जितकें निरीक्षण सूक्ष्म तितकी समजूत अधिक आणि म्हणून जास्त सखोल आणि अचूक विचार करा,

* म्हण

मधमाशीसारखे बना मध प्या. कांटे टाका.

* फुल्लर

सद्‌गुणासाठीं दुसऱ्याकडे बघा. व दुर्गुणासाठीं स्वत:वर नजर ठेवा.

* बेकन

वैचारिक घुमट म्हणजे स्वर्गातला राजवाडा.

* अिमर्सन

कांही विचार आपणास नेहमींच तरुण आढळतात.

– छापखाना म्हणजे विचारांचा तोफखाना नव्हे काय ?

– वृत्तपत्र हें उद्यान नसून ते रणमैदान आहे.

* सदे

लहान सहान गोष्टींत मतभेद असूनहि महत्त्वाच्या बाबतींत सह-

मत होणें हें विचारी माणसाला मित्र बनवतें; पण अविचारी माण-सांत वितुष्ट उत्पन्न करतें.

* अॅझॅक टेलर

मनुष्याची वाढ ही अवयवानें होत नाहीं तर विचारानेंच होतें. विचारांना वाचनानें सहजच सहकार्य मिळतें.

★ ★

## १०४ : विनाश

– नदी तीरावरील वृक्ष, परगृहीं जाणारी पत्नी, सल्ला न ऐकणारा राजा या गोष्टी अत्यन्त शीघ्रतेनें नाश पावतात. यांत संदेह नाहीं.

* तुकाराम

परद्रव्य परनारीचा अभिलाश । तेथुनि ऱ्हास सर्व भाग्या ।

★ ★

## १०५ : विनोद

– विनोदासारखें मनाला उत्साह देणारें, जागृत करणारें, तरतरीत ठेवणारें दुसरें टॉनिक नाहीं असें लिंकनचें मत होतें.

– विनोद सूर्यप्रकाशासारखा आहे. तो जिथें प्रकाशील तिथला औदासिन्याचा अन्धःकार संपलाच.

विविध प्रकारचें दुःख हा विनोदाचा एकमेव विषय आहे.

– विनोदामुळेंच मराठी साहित्याचें तेज निःसंशय वाढलें आहे. आणि समाजाच्या प्रगतीला उपयोगी पडणारें एक परीणामकारक शस्त्र पुरोगामी ललित लेखकांच्या हातीं आज पडलें आहे.

– विनोद हा जीवनांतील कष्टमय प्रवासासाठीं ठिकठिकाणीं ठेवलेल्या पाणपोयीसारखा उपयोगी पडणार आहे.

– विनोद हा दु:खमय जीवनांत गारवा निर्माण करणारी मृदु फुंकर आहे.

– विनोदानें माणसाला चातुरी येते.

– पृथ्वीवरील जीवन अस्थिर, संघर्षमय व दु:खानें परिपूर्ण असतांनाहि त्यांत विरंगुळा प्राप्त करून घेण्याचें प्रचण्ड सामर्थ्य विनोदांत आहे.

– विनोद वाङमयांतील अहिंसा आहे. मनुष्याचा तो उपकारी मित्र. कित्येक वेळीं विनोदानें रक्तपातासारखें गंभीर प्रसंग टाळतात
* खाण्डेकर

– विनोद हें जीवन वृक्षाचें फूल असलें तरी अश्रू हे त्या वृक्षाचें फळ आहे.

* *

## १०६ : विवाह

* पै. महंमद

जे समर्थ आहेत, त्या सर्वांस विवाह कर्तव्य आहे.

एकाद्या स्त्रीशीं विवाह करण्यांत चार हेतू असू शकतात. एक– तिचें धन, दुसरे तिचें थोर घराणें तिसरें तिचें सौन्दर्य आणि चौथें तिचें चारित्र्य. तेव्हां जिच्याठायीं चारित्र्य असेल तिचाच शोध करा. परंतु तुम्ही जर दुसऱ्या कोणत्याहि अपेक्षेनें तसें कराल तर तुमचें हात कलंकित होतील,

* फ्रँकलिन

प्रीतिशिवाय विवाह जेथें असेल, तेथें विवाहाशिवाय प्रीति असतेच.

* मौन्टेन

आंधळी बायको आणि बहिरा नवरा यांचेच लग्न उत्तम ठरेल.

* रणजीत सी. पण्डित

दोन व्यक्तींतील प्रेम व त्याचे सहजीवन यांपेक्षां लग्न बंधनाला फार मोठा अर्थ आहे. विवाहित स्त्री आणि पुरुष त्या मग निव्वळ दोन व्यक्ती म्हणून उरत नाहींत. तर जुन्या आणि नव्या पिढीला सांधणाऱ्या दुव्याचें प्रतिकच जणू काय त्या बनतात. विवाह म्हणजे नव्या पिढीचा ताटवा बहराला आणणारी विशुद्ध हवाच होय.

* अँनन

मनुष्यानें विवाह केला कीं त्याच्या त्रासास सुरवात होतें.

* प्रार्थना पुस्तक

या आंगठीनें मी तुझ्याशीं विवाह करतो.. शरीरानें पूजा करतो. आणि माझ्या लौकिकदृष्टीनें जें चांगलें आहे त्याची देणगी देतो.

* थॉमस कुलर

विवाह–मूल्यांत सुखाची भलतीच अपेक्षा करून स्वतःची फसवणूक करून घेऊ नका, लक्षांत ठेवा कीं वसन्तऋतूंत कांहीं महिनेंच गाणारे चण्डोल पक्षी अण्डीं घालू लागताच शांत होतात.

* टॅशमॅथ्यू

जे लग्न करणार आहेत त्यांना म्हणा, ' लग्न करू नका. '

* न्यू टेस्टॅमेण्ट

जळत रहाण्यापेक्षां लग्न केलेलें उत्तम.

* ओल्ड टेस्टॅमेण्ट

मनुष्य एकटा राहाणं हें केंव्हाहि चागलं नव्हे.

मनुष्य आपल्या आईबापांना सोडून चालता होतो नि आपल्या बायकोच्या रक्तांत सामील होतो.

* शेक्सपिअर

जो तारुण्यांत विवाहबद्ध होतो तो कुचकामी ठरतो.

फाशी जाणं नि बायको करून घेणं ही विचित्र कर्मगति आहे. ह्या जुन्या म्हणीत बिलकुल पाखंडीपणा नाहीं.

* रोझ पास्टर स्ट्रोक्स

प्रियकराशीं विवाहबद्ध होवूं दे अशी लोक प्रार्थना करतात. माझी प्रार्थना निराळी आहे. ज्याच्याशीं मी विवाहबद्ध होईन तिच्यावर मी प्रेम करीन.

* लिफ्ट

स्वर्गांत काय चाल आहे तें माहीत नाहीं. पण जी चाल नाहीं ती मात्र माहीत आहे. ते लग्न करीत नाहींत किंवा लग्नांत कुणाला देत नाहींत.

* माडखोलकर

विवाह मोहांत जर खरोखरी कसली आहूति द्यावी लागत असेल तर ती जीविताकडे पाहाण्याच्या साहसी वृत्तीची.

* संसार शकट

आपल्या बौद्धिक, मानसिक आणि नैतिक विकल्पाचा मार्ग सुलभ व्हावा म्हणूनच स्त्रीपुरुषांनीं लग्न करायचें असतें.

* द मॅन नेक्स्ट डोअर

वैवाहिक सुख दाम्पत्याच्या वादविवादावर अवलंम्बून नाहीं तर वादविवादाच्या विषयावर अवलम्बून आहे. पैशाविषयक मत–भेदांत अपयशयाचें गमक आहे. तर उद्यां बागेंत गुलाबावर फुलें कोंणतीं लावावयाची यांत सौख्याचें गमक आहे.

* विल ल.रेन्स

मी जेवायला उशीरा येईन व तुमचें जेवण शीतगृहांत ठेवलें

आहे. अशीं उत्तरें प्रत्युत्तरें सुरू झाली कीं " मधुचन्द्र " संपला असें समजावें.

* अण्ड्री मॉरिस

वैवाहिक वादविवादांत भाषा अतिशय काळजीनेंच वापरली पाहिजे.

– विवाहांतील एकच हितकर गोष्ट म्हणजे विवाहामुळेंच तरुण माणसें लौकर झोंपावयास जातात.

* श. का. बवें

माझ्या मतें लग्न हा एकदांच खेळतां येण्याजोगा डाव होता, तो पुन्हां खेळतां येत नाहीं आणि खेळण्याचं सुख किंवा दुःख जन्मभर डावलतां येत नाहीं, असा तो डाव आहे.

* खाण्डेकर

संसाराच्या नौकेला नवरा शिडासारखा तर बायको सुकाणूसारखी असते.

– शान्तचित्तानें झालेला विवाह म्हणजे पृथ्वीवरचा स्वर्ग आणि अशान्तीचा विवाह म्हणजे नर्क.

* ट्राल

विवाह हा नीट समजून घेतला तर शहाण्या व सज्जन माणसांचा स्वर्ग होतो.

– विवाहपूर्वी स्त्रीची स्तुति करणें म्हणजे हौस. विवाहानन्तर स्त्रीची स्तुति गरज व सुरक्षितता म्हणूनच करावी लागते.

– विवाहांतील सौख्य योग्य इसम शोधण्यापेक्षां योग्य इसम होण्यांतच आहे.

लग्न हा करार नसून संस्कार आहे.

★ ★

## १०७ विद्यार्थी

* विनोबा

विद्यार्थ्यांनी सर्व प्रकारचा भेदभाव नाहींसा केला पाहिजे. दुसरी गोष्ट परिश्रम निष्ठा. तिसरी गोष्ट म्हणजे तरुणांनीं अन्यायाच्या प्रतिकाराचें व्रत घेतले पाहिजे.

* व्हाईट ली

जो आपल्या मुलाबाळांना उद्योगप्रियता शिकवतो तोच मुलाबाळांना मागें पैसा ठेवण्यापेक्षां आपल्या मुलाबाळांची अधिक चांगली सोय करतो.

* विनोबा

मुलांना पुस्तकें शिकण्याची सक्ति करूं नका.

– मुलांशीं खेळण्यांत वेळ घालवा कारण तो आनन्दाचा आनन्द आहे.

* वर्डस्वर्थ

लहान मुलेंच मोठ्या माणसांना मार्गदर्शक होतात.

– सद्‌गुणी मुलें म्हणजे घराची शोभा.

आईबापाच्या सुखाची रास मिळाल्याशिवाय मुलांच्या जीवन लतिका फुलत नाहीं.

★ ★

## १०८ : विषय-भोग

* बोधिचय

सर्व भूमीचें आच्छादन करण्यास पुरेसें कातडें मिळणार नाहीं; पायांत वाहाणा घातल्यानें सर्व भूमि चर्मांच्छादित होतें. त्याप्रमाणेंच मला बाह्य विषयाचें निवारण किंवा विरोध करतां येणार नाहीं. म्हणून मी आपल्या चित्ताचेंच त्या विषयापासून निवारण करतो.

* ओल्ड टेस्टॅमेण्ट

दोघेहि नवराबायको नागवींच होतीं; पण त्यांना त्याचें वाईट वाटत नव्हतें.

* सॅम्युअल हॉफस्टीन

द्विलिंगजगत अपुरें आहे असें म्हणणारा कोणी तरी आहे काय ?

* साने गुरुजी

हा देह ध्येयाचें साधन आहे. हें ज्याला कळलें त्यानें अमृतत्त्व मिळवलें. लाकूड ज्याप्रमाणें चुलींत घालावयाची असतें, त्याप्रमाणें हा देह ध्येयाच्या आगींत घालावयाचा असतो.

डोळें म्हणजे जीवनांतील अनुभवाचें भरलेले डोह.

★ ★

## १०९ : व्यायाम

* ना. ह. आपटे

व्यायाम ही अमृतवल्ली आहे.

– शरीरमाद्यं खलु धर्म साधनम् ।

– व्यायाम हाच सुखाचा मूलमंत्र आहे.

* प्रवासी राम

धडपडून श्रम केल्याशिवाय कडकडून भूक नाहीं लागायची.

★ ★

## ११० : वृक्षारोपण

* पद्मपुराण

रस्त्याच्या बाजूस झाडें लावणाऱ्या माणसाला त्या झाडास जितकीं फळें–फुलें आणि पानें असतील तितकीं वर्षे स्वर्गांत आनंद अनुभवाला मिळेल.

* अग्नि पुराण

आपलें कुटुम्ब, धनदौलत आणि भावी सुख यांत वाढ व्हावी अशी तुमची अिच्छा असल्यास उत्तम फुलें येणारीं झाडें कधींहि तोडू नका.

झाडें लावणाऱ्या माणसाच्या तीस हजार पितरांना मुक्ति मिळतें.

* मत्स्यपुराण

दश सद्‌गुणी पुत्रास जन्म देणें ही गोष्ट एक झाड लावण्याइतकीं पुण्यप्रद आहे.

* खलील जिब्रान

वृक्ष म्हणजे पृथ्वीनें आकाशाच्या विशाल भुर्जपत्रावर लिहिलेलीं काव्यें होत.

एकाद्या वृक्षानें आपलें आत्मचरित्र लिहिलें तर एकाद्या मोठ्या घराण्याच्या इतिहासा इतकेंच तें मनोरंजक होईल.

## १११ : शत्रू

* भगवद् गीता

इंद्रियाचें विषय म्हणजे इंद्रियांचें राग व द्वेष हेंच मुख्य असतात. त्यांना वश होवूं नकोस. कारण तेंच ह्या मानवांचे शत्रू आहेत.

* ना. ह. आपटे

आळस हा मनुष्याच्या प्रत्येक चांगल्या कामांत आड येणारा प्रबल शत्रू आहे.

स्त्रियासक्त पुरुष देशाचा एक प्रकारें शत्रूच होय.

* माडखोलकर

दाबून ठेवलेल्या मनोविकारासारखा माणसाचा शत्रू नाहीं दुसरा.

* विनोबा

माणसाचे सर्वांत मोठें तीन शत्रू आहेत. आळस, अज्ञान व अश्रद्धा.

* ज्ञानेश्वर

उपजोनि संसारीं, आपुला आपण वैरी
'मीं, माझें' शरीरी घेऊनि ठेले ।

* ऑस्कर वाईल्ड

चांगलीं पुस्तकें वाचावयास मिळावीत म्हणून मी चांगले मित्र गोळा करतो. चांगल्या स्वभावासाठीं मी अनेक ओळखी करतो आणि चांगल्या बुद्धिमत्तेसाठीं म्हणून मीं माझें शत्रू पत्करतो. मनुष्य आपल्या शत्रूच्या बाबतींत यापेक्षां अधिक चांगलीं निवड केव्हांहि करूं शकत नाहीं.

* गीता

आत्माच आत्म्याचा शत्रू !

★ ★

## ११२ : शास्त्र

* गीता प्रदीप

शास्त्र हें नियमनाकरितांच आहे.

* गडकरी

शास्त्रांना हा कसा कळावा हृदयाचा खेळ ।

* रघुवीर सामंत

चमत्कार शास्त्रांचा भूवर । शास्त्रें बनला मानव खेंचर ।
भावना सरे! सुकला पाझर । हृदय फाटले उठले काहूर ।
स्वर्ग न सृष्टी !—ना त्याला घर ! तळमळतें तळमळतें अन्तर.
जीवन निर्मळ साधे सुन्दर! दुर्मिळ करिती शास्त्रें—हुन्नर !
शास्त्र जोडते जगांत मानव । शास्त्र करीवरी देवा दानव.
शास्त्रें केला भूवर मानव.

* विचार पोथी

शास्त्र ज्ञापक आहे. कारक नाहीं. ही शास्त्राची मर्यादा आहे. आणि हाच शास्त्राचा महिमा.

आधीं जग कसें आहे तें पहावयाचें मग त्यावरून सिद्धान्त ठरवावयाचा. ही वैज्ञानिक विचार पद्धति.

* समर्थ

बहु शास्त्र धुडाळितां वाड आहे
जया निश्चियांयेक तोही न साहे
मती भाण्डती शास्त्र बोधें विरोधें
गती खुण्टती ज्ञान बोधें प्रबोधें

* मागेल मुनॅमण्ड

संशय घ्यायला आणि अज्ञानी रहायलाच आजचीं शास्त्रें शिकवितात.

★ ★

## ११३ : शिष्ठाचार

– सदाचार व शिष्ठाचार यांवाचून जीवनयात्रा म्हणजे होका–यंत्रावाचून जहाजाचा प्रवास.

शिष्ठाचार म्हणजे शिष्ठ संमत आचार.

★ ★

## ११४ : शिक्षण

* लोकहितवादी
विद्या म्हणजे ज्ञान, जेणें करून मनुष्य निर्मळ होतो, विचारी होतो, समर्थ होतो.

* डॉ. जॉन
आयुष्यांतील अडचणी सोडविण्यास समर्थ असतें तेंच शिक्षण होय.

* हरबर्ट स्पेन्सर
शिक्षणाचा उदात्त हेतु केवळ ज्ञान नसून कृति होय.

– वाचनानें मनुष्य सुशिक्षित होतो. पण शिक्षणाने मनुष्य पक्का होतो.

* खाण्डेकर
पुस्तकी किडा म्हणजे तुतीचीं पानें खावून रेशीम देणारा कीडा अशी माझी समजूत होती.

– ज्या बुद्धीला भावनेची जोड नाहीं ती जीवन सुखमय करायला असमर्थ ठरते.

* डॉ. प्रसाद
सर्व देशाच्या कोनाकोपऱ्यांतून चांगल्या कल्पना प्रसृत करणारीं प्रकाश केन्द्रे म्हणजे विश्वविद्यालयें आहेत.

* अेच. बाळ

शिक्षण हें मातेच्या अंकापासून सुरू होतें. आणि त्यावेळी बोलला जाणारा प्रत्येक शब्द मुलाच्या स्वभाव बनविण्यास कारभीभूत होतो हें पालकांनीं लक्षांत ठेवावें.

* रामजोशी

लोक रंजनांतूनच लोकशिक्षण होत असतें.

* प्रो. राऊत

एखादी कल्पना मनावर बिम्बवणें मनाला वळण लावणें किंवा ज्ञानाचा प्रसार करणं ह्या शिक्षणाच्या मर्यादा असू नयेत. परन्तु त्याचे ध्येय जीवनास परिपूर्णता आणणें, समजूतदारपणा वाढविणें, स्वभावाला योग्य आकार देणें आणि खरी मैत्री वाढवणें आणि बुद्धिसामर्थ्य वाढविणें हें असावें.

★ ★

## ११५ : शील

* वि. वि. बोकील

पतंगासारखी माणसाची स्थिति असतें. शीलाची दोरीं जोपर्यंत मजबूत आहे, तोवर दिमाखानें वरवर जावें, अनंतात स्वैर भरारी मारून सूर्यबिंबाला स्पर्श करण्याची उमेद धरावी; पण ती दोरी कचकली तर त्याचा अधःपात कुठल्यातरी खातेऱ्यांत होणार हें निश्चित.

* गोळवळकर

चारित्र्याचा अभाव असलेलीं माणसें दुर्गतीच्या वाटेला परम सीमेस जावून पोहोंचतील. चारित्र्य सम्पन्नता हें उत्थानाच्या मार्गावरील पहिलें पाऊल आहे.

* हेन्री अ‍ॅडॅम्स

शील ही अत्यन्त खाजगी बाब असून ती अतिशय महागाची चैनदाजी आहे.

* हॅवलॉक एलिस

नीति म्हणजे वेदवाक्याचें अन्धानुकरण होय.

* अर्नेस्ट हेमिंग्वे

अन्ती चांगलें ती नीति व अन्ती वाईट तें अनितिकारक होय.

* पोप

प्रामाणिक माणूस ही परमेश्वराची उत्कृष्ट कलाकृति होय.

* पं. जवाहरलाल नेहरू

उच्चारावरून विद्वत्ता, आवाजावरून नम्रता व वर्तनावरून शील समजतें.

* मॅथ्यू अर्नोल्ड

जीवनाच्या यशस्वीतेचा तीन चतुर्थांश आधार चांगली वागणूक-आहे. चांगली वागणुक हा यशोमार्गाचा पहिला टप्पा आहे.

– शील ही अशी हिरकणी आहे कीं, तिचा ओरखडा कोणत्याहि दगडावर पडू शकतो.

* ना. ह. आपटे

मनुष्याचें शील चांगलें असेल तर, त्याला कशाचीहि वाण पडणार नाहीं.

* थत्ते

सुशीलता ही मरेपर्यंत कधींहि नष्ट न होणारी सम्पत्ती आहे.

* माझें रामायण

अडीअडचणीच्या व संकटाच्या वेळींच आपलें शील व दानत कायम ठेवलीं पाहिजे.

– लोक कल्याणार्थ देह झिजविण्याचें व्रत एकदां स्वीकारलें कीं मनुष्याचें शील अधिकाधिक चोख होऊं लागतें.

– शीलं परं भूषणम् ।

* भ. महावीर

सुन्दर पो ख केलेला सभेला वश करतो. गाणारा माधुर्याला वश करतो; पण शीलवान मनुष्य सबंध विश्वाला वश करतो.

* हेर हिटलर

शीलाच्या अभावीच आमचा पराभव झाला.

★ ★

## ११६ : श्रद्धा

* पै. महंमद

श्रद्धासपन्न झाल्याशिवाय स्वर्गांत तुमचा प्रवेश होणार नाहीं आणि तुमच्या श्रद्धेची पूर्णता तुम्ही एकमेकांवर प्रेम करीपर्यन्त होणार नाहीं.

* न्यू टेस्टॅमेण्ट

आपण श्रद्धेनें वागतो, दृष्टीनें नव्हे.

* गोळवलकर

श्रद्धेशिवाय शिस्त नाहीं.

* भ. महावीर

जे श्रद्धाविहीन झाले ते कायचेच भ्रष्ट झाले.

* म. गांधी

श्रद्धा तर्कातीत आहे. वैचारिक पद्धतीनें दुष्टकृत्यें थाम्बवितां येतील असें मला वाटत नाहीं.

आपल्यामध्यें परमेश्वर आहे अशा भावनेनीं सदैव जागृति म्हण-जेच श्रद्धा.

श्रद्धेशिवाय जग क्षणामध्यें असार होईल. शून्य होईल.

जें वादळी हवेंत कोमजतें तितके नाजूक फूल म्हणजे श्रद्धा नव्हें. तर श्रद्धा म्हणजे कधींहि न बदलणारा हिमालय आहे.

जी व्यक्ति माझ्याइतकी आशा, प्रयत्न आणि श्रद्धा धारण करू शकेल ती व्यक्ति मी जें मिळवलें आहे तें सहज मिळवू शकेल.

भ्रांति म्हणजेच श्रद्धेच्या अभावाचें चिन्ह होय.

बुद्धि सामर्थ्याच्या जोरावर श्रद्धा सम्पादन करतां येत नाही. खोल विचारांती आणि अविश्रांत संवयींनेंच ती साध्य होतें.

* व्यूअण्ट

क्रियाशून्य श्रद्धा म्हणजे केवळ पंख.

* जॉनसन

वादविवाद केलांत तरी त बरोबर होणार नाहीं. दोन अधिक दोन मिळून पांच असें म्हटलें तरी तें शेवटीं चारच राहातील.

– ज्याच्यापाशीं श्रद्धा आहे. त्याला कशाचेंच भय किंवा चिन्ता बाळगण्याचें कारण नाहीं.

– आज जर कशाचीं अत्यंतिक जरूर असेल तर, ती असीम श्रद्धा व निष्कलंक चारित्र्य.

– अनेक माणसांकडून काम करून घ्यावयाचें झालें तर अवि-श्वास ही नीति होणार नाहीं.

तुम्ही मला शब्द द्या व हुंकार भरा मी जग जिंकून दाखवितों.

* विल्यम नेव्हिन्स

कर्तव्यापेक्षां इतर कांहीं सुरक्षितेचा दुसरा कांहीं मार्ग आहे अशी कल्पना करणें म्हणजे घोडचूक करणें होय.

* म. गांधी

अहिंसा ही माझी पहिली श्रद्धा होय.

★ ★

## ११७ : श्रीमंती

– धट्टीकट्टी गरिबी बरी; पण लुळीपांगळी श्रीमंती नको.

* कुमार संभव

आहे दरिद्र, परि कारण संपदाचें
रूपें भयंकर तरी 'शिव' नाम त्याचे
त्रैलोक्यनाथ वसतो जरी तो स्मशानी
जाणें महेश्वर यथार्थ असा न कोणी

* कृ. रा. चिपळूणकर

कोण दरिद्री ? ज्याच्या हृदयीं तृष्णा सदा विशाल वसे,
श्रीमान् कोण म्हणावा ? जो नर सन्तुष्ठचित्त नित्य असें।

ज्याचें सुख अत्यंत थोडक्या खर्चांत असतें तोच अधिक श्रीमंत म्हटला पाहिजे.

* पै. महंमद

हे प्रभो ! मला गरीबच जगूं दे आणि गरीबच मरूं दे आणि गरीबांतच जन्म दे.

* साने गुरुजी

गरीबाचें शिव्याशाप मिळविण्यापेक्षां त्यांचें मंगल आशिर्वाद मिळविणें हीच खरी संपत्ती !

* संसार शकट

दारिद्र्यामुळें प्रेमी जीवांचें मीलन जास्त सुलभ होतें. सहकार्यांची व सान्निध्याची उपयुक्तता अधिकच कळते.

* महावीर

श्रीमंत सत्यमार्ग कधीं ऐकून घेत नाहींत किंवा समजून घेत नाहींत; त्याप्रमाणें आचरण करीत नाहींत आणि जरी आचरण केलें तरीं त्यांतील उद्दिष्ट सफळतेप्रत नेत नाहींत.

★ ★

## ११८ : सत्य

सत्यापेक्षां असत्यालाच लौकर कोम्ब फुटतो.

सत्य असेल तर ते कालाच्या ओघांत टिकेल. असत्य असेल तर ते अदृश्य होईल.

* खलील जिब्रान

अनेक सिद्धांत खिडक्यांना लावलेल्या कांचेच्या तावदानासारखे असतात. त्यांतून आपणांस सत्य दिसतें. पण आपण त्याला स्पर्श करू शकत नाहीं.

* म. गांधी

सत्य हीच परमेश्वराची खरीखुरी पदवी आहे.

सत्यामुळें असत्य, प्रेमामुळे राग, व आत्मत्यागानें जुलूम नाहींसा होतो, हा अविनाशी नियम सर्वांनाच लागू अ हे.

माझ्यासारखें हजारों मरूं द्या. पण सत्य जगूं द्या. माझ्यासारख्या मर्त्य आणि दोषहि व्यक्तिवरून सत्याची कसोटी लावूं नका.

जसें चांगलें आणि वाईट तसेंच सत्य आणि असत्य हें एकत्र असतात.

सत्यावर ज्याचा सम्पूर्ण अधिकार त्याचा अधिकार स्वर्गावर देखील चालतो.

* लाओफ

सत्य बोलाल तर तुमचे शब्द अंकुरतील. सत्यानें वागाल तर, तुमचीं जीवनें उदात्त व श्रेष्ठ होतील.

* म्हण

मुलें आणि दारुडेच फक्त सत्य बोलतात.

* रस्कीन

सत्याला लहान मुलें मुठींत जितके घट्ट पकडून ठेवतात तितकीं मोठीं माणसें धारण करूं शकत नाहींत.

* मॅन

शास्त्रीयसत्य आश्चर्यकारक असेल. पण नैतिक सत्य दैवी असतें. व जो त्याप्रमाणें चालतो त्यास स्वर्गप्राप्ती होते.

* म. फुले

प्रत्येकास धार्मिक व राजकीय स्वातंत्र्य आहे. राजकीय व धार्मिक मतांमुळें कोणतीहि व्यक्ति उच्च किंवा नीच मानून तिचा छळ करणें म्हणजेच सत्याचा द्रोह करणें होय.

* स्वामी रामतीर्थ

जर तुम्ही सत्यापासून ढळला नाहींत तर भविष्यकाळ तुमचाच आहे.

* अमर्सन

वास्तविकता व प्रामाणिकपणा ह्या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत.

* तुकाराम

सत्य आठवितो देव । जातें भय पळोनीं ॥
न लगे कांही करणें चिन्ता । धरी सत्ता सर्व तो ॥

– जीवन असो की कला असो, सत्याच्या अधिष्ठानानेंच त्यांना मोल चढत असतें.

– अर्धवट सत्य हें असत्यांतील असत्य आणि वाईटांतील वाईट होय.

– सत्याची परीक्षा मरणाच्या द्वारीं होत असतें.

* म. गांधी

सौन्दर्यांत सत्य शोधण्याची दृष्टि आपण सामान्य माणसांत उत्पन्न करूं शकत नाहीं म्हणून त्यांना सत्य दाखवा म्हणजे सौन्दर्य आपोआप दिसेल.

हजार सूर्य एकत्र केलें तरी त्यांना सत्यरूपी सूर्याची बरोबरी करतां येणार नाहीं.

* विवेकानंद

सत्याकडे नरकांतून देखील जाण्याचें धैर्य करा.

* विनोबा

सत्य शोधून काढणें ही फारशी अवघड गोष्ट नाहीं; पण एकदां तें शोधून काढल्यावर त्यापासून पळून न जाणें ही गोष्ट खरी अवघड आहे.

* कार्लाईल

असत्य चिरडून टाकावें, विझवून टाकावें, धूर करून रोगजंतू मारतात तसें नष्ट करून टाकावें. नाहीं तर तें सपाटून पसरूं लागतें

– सत्य हें पुष्कळ वेळां कल्पनेंपेक्षां अनपेक्षित असतें.

– सत्यापुढें शहाणपणा रद्द आहे.

– सत्य हें कादंबरीपेक्षांहि अद्‌भुत असतें.

– सत्याकरितां भाण्डायला तयार झालांत तरच तें पात्र ठरेल.

– पूर्ण नम्रता अंगीं असल्याशिवाय सत्य सांपडत नसतें.
– भावनेपेक्षां सत्य कठीण असतें.

* म. गांधी

माझ्या आत्तापर्यंतच्या विविध अनुभवामुळें माझी अशी पक्की खात्री झाली आहे कीं, जगांत सत्याखेरीज दुसरा परमेश्वर नाहीं. सत्याचा पूर्ण साक्षात्कार झाल्याशिवाय खऱ्याखुऱ्या अहिंसेचें दर्शन होणें शक्य नाहीं.

कुणाच्याहि रागालोभाची पर्वा न करतां सत्य गोष्टींचा उच्चार करणाऱ्या माणसाजवळ मृत्यूची पर्वा न करतां रणांगणांवर जाणाऱ्या सैनिका इतकेंच धैर्य लागतें.

सत्याग्रहाच्या कोशांत अपयश नाहीं.

– सत्यापरता नाहीं धर्म । सत्य तेचि परब्रह्म ।
सत्यापाशीं पुरुषोत्तम । सर्व काळ तिष्ठत ॥

* रेन्दाळकर

व्यवहार कोणता वद ? गोपन ज्यामाजीं होय सत्याचें
– सत्य हें थोडं फार कुरुप असतंच !

* म. गांधी

मी सत्याचा उपासक आहे, म्हणूनच माझें जनतेवर वजन पडत असावें.

* विन्दा करंदीकर

टळेना अहंकार साध्या वृत्तीचा,
गळेना महापुच्छ साध्या स्मृतीचे,
कधीं घेतलें सोंग तें सत्य वाटे,
कधी सत्य तें वाटतें सोंग साचे.

* पै. महंमद

जगाच्या अन्तापर्यंत लोक खोटें बोलणार.

सत्यवादी पुरुषाला लोकांना शिव्याशाप देणें शोभत नाहीं.

लोकांना कटू वाटलें आणि नापसन्त असलें तरी तें खरें असेल तेंच बोला.

– सत्या–असत्याचि मन केलें ग्वाही
मानियेले नाहीं बहुमानां

* विनोबा

सत्याची कसोटी निरपेक्ष निश्चित
सांगेल त्वरित कार्याकार्य
सत्याचें तें मुख हिरण्मय–पात्रें
झांकिलें विचित्र माया मोहें

* *

## ११९ : संधी

* रूसो

मोठीं माणसें आलेल्या सन्धीचा दुरुपयोग कधींहि करणार नाहींत

* ओ. हेन्री

भाग्य म्हणजे जिकावयाचीं बक्षिसें ! त्याचा रस्ता म्हणजे धैर्य ! आणि सन्धी म्हणजे रस्त्याच्या बाजूला सावलींत जें दडलेलें असतें तें.

* व्होल्टेअर

सन्धी हा निरर्थक शब्द आहे. कारण कारणाविना कोणतेंच कृत्य घडत नसतें.

– सन्धी ही दगा देणारी सोबतीण असते.

– सन्धीची वाट पाहू नका. स्वतःच सन्धी शोधा व कामी लावा.

* डिझरेली

आलेल्या संधीचा उपयोग करून घ्यायचा हें कळणें जितकें महत्त्वाचें आहे तितकेंच आपल्या फायद्याच्या गोष्टींवर पाणी सोडावयास केव्हां तयार व्हावयाचें हें समजणें ही महत्त्वाची गोष्ट आहे.

* ॲनातोले फ्रान्स

ज्यावेळीं परमेश्वरास सही करायची नसते त्यावेळीं सन्धी हे त्यानें उपनांव धारण केलेलें असतें.

— नकां दवडू सन्धी वाया, अशी अमृताची पर्वणीहि मांगल्याची आली या क्षणाला

* जॉन प्लेबेल

मनुष्याचा अन्त म्हणजे परमेश्वराची सन्धी.

* अि. गॉल्स

सर्वांची अधिष्ठात्री मी ! अनाहूतपणें द्वारीं मी उभी राहतसे ।

* शेक्सपिअर

आहे भरती रे हरप्रयत्नीं, तापला तवा घे पोळी तुझी भाजुनी ।

★ ★

## १२० : समाज

* विनोबा

मी जेव्हा जेव्हां 'भेद दूर करा' म्हणतो तेव्हां वैशिष्टयें नाहीशी करा असें मला म्हणावयाचें नाहीं. 'सरगम'च्या स्वर भेदांतून ज्याप्रमाणें सुन्दर संगीत निघत असते. त्याप्रमाणें आपल्या येथिल असंख्य वैशिष्ठयांतून एक सुन्दर संगीत निघालें पाहिजे. हिंदुस्थानांत अनेक धर्म, अनेक जाति अनेक भाषा, अनेक पन्थ भरले

आहेत. लोक विचारतात हा काय गोन्धळ आहे. मी म्हणतो, ह गोन्धळ नव्हे. हे वडाचें झाड आहे." रविन्द्रनाथांनीं तर याला सागराची उपमा दिली आहे. महासागरावर ज्याप्रमाणें असंख्य लाटा उसळत असतात त्याप्रमाणें येथें अनेक मानव समाजाची आन्दोलनें होत आहेत, हें आमचें वैभव आहे.

* रस्कीन

भौतिक वैभव हें समाजाचें खरें वैभव नव्हे. सद्गुणी सम्पत्ति हीच समाजाची खरी सम्पत्ति आहे आणि भौतिक सम्पत्ति ही समाजाच्या जीवनशक्तीचा विकास व उन्नति करण्याचें साधन या दृष्टीनेंच महत्त्वाची आहे.

– "लोक, लोक, म्हणजे कोण ? जे आपली नेहमीं निंदा करतात ते. बर्नार्ड शॉ याने आपल्या खोलीच्या भिंतीवर एक वाक्य लिहून ठेवलें आहे तें असे कीं त्यांना जे कांहीं म्हणावयाचे असेल तें खुशाल म्हणू द्या."

* माधव जुलियन

जुलुमी, भेकड, मत्त समाजा !
वरच्या लत्ता झेलित माथां,
सवें झाडणें खालीं लाथा,
पराक्रमाची ही तव गाथा
का ठेवावा तुझा मुलाजा ?

– लोकांना अंकित करावयाचें असेल तर, त्याला जें पाहिजें तेंच बोला.

* आगरकर

लोकमताच्या बागुलबोवास न भीतां समाजांतील दोषस्थळें दाखवून लोकांस अप्रिय परंतु पथ्यकारक असें विचार देणारें ज्या समाजात आहेत; त्या समाजाचा ऱ्हास होण्याचीं फार भीति नाहीं.

आमच्या समाजांत असलेलें विचार करणारें, उपभोग घेणारें व काम करणारे तीन वर्ग हे कायमचें नव्हेत. हळूहळू प्रत्येक व्यक्तिलाच विचार, उपभोग व काम ही समप्रमाणांत करावी लागून सार्‍यांच्या अनुभवाची इयत्ता सारखी होत जाणार आहे व जों जों ती तशी होईल; तों तों मनुष्याची खरी उन्नति होऊं लागली असें म्हणतां येईल.

समाज ही कांहीं स्वतंत्र मूर्तिमंत वस्तु नाहीं. समाजांतील घटक, हलले तरच समाज हलतो. हे हलण्याचे कार्य म्हणजेच क्रांति. तें समाजांतील तरुणांनीं करावयाचें आहे. तरुण हें समाज नौकेला गति आणणारी शिडें आहेत.

– समाज आपणास बनवत नाहीं; तर आपण समाजाला बनवितो.
– जर समाज पवित्र बनेल तर बाहेरील आक्रमण कितीहि भयंकर असले तरी तो सुरक्षित राहील.

– समाज जर आपली ताकद व धैर्य जाणू शकेल तर सर्वकांहीं आपोआप ठीक होईल.

* जयप्रकाश नारायण

नवसमाज निर्माण करण्यासाठीं अगोदर नवमानव निर्माण केला पाहिजे. मनुष्य जोपर्यंत आंतून बदलत नाहीं; त्याचे विचार आणि संस्कार बदलत नाहींत तोपर्यंत कोणतीहि समाजक्रांति यशस्वी होवूं शकणार नाहीं.

* तुकाराम

पवित्र तें कुळ । पावन तो देश ।
जेथं हरीचे दास जन्म घेती ।

– कोणतेंही तत्त्व जोपर्यंत स्वतःच्या आड येत नाहीं तोपर्यन्त त्याची पूजा करायला लोक तयार असतात पण ज्या क्षणी तें त्यांच्यावर उलटतें त्या क्षणीं ते त्याला दूर भिरकावून देतात.

– सामाजिक यश म्हणजे त्रास करून घेण्याची अमर्याद शक्तीच.

हरबर्ट हूव्हर

एक गमतीदार विरोधाभास असा आहे कीं प्रत्येक हुकूमशहा हा भाषण स्वातंत्र्यामुळें यशाच्या शीडीच्या पायऱ्यां चढतो व शेवटच्या पायरीवर येतांच त्यानें स्वतःशिवाय इतरांच्या भाषण स्वातंत्र्यावर बन्दी घालतो.

* विनोबा

जनता जड असली तरी थर्मामीटरप्रमाणें अचूक योग्यता मापक आहे.

– बहुता छंदाचे बहू असें जन । नये वाटे मन त्यांच्यासंगे

– आपलें पोट भरण्याइतकें अन्न जवळ बाळगण्याचा हक्क प्रत्येकाला आहे; परंतु जो पोटाला लागणाऱ्या अन्नापेक्षा अधिक अन्न जवळ बाळगतो तो समाजाचा गुन्हेगार होय.

* चरित्र हीन

सर्व कामांत मनुष्य स्वतःचीच बुद्धि चालवूं लागला तर जसा समाज टिकणार नाहीं. तसंच समाजही जर सगळ्या गोष्टींत सर्वकाळीं आपलंच मत चालवायला गेला तर मनुष्यहि टिकणार नाहीं. दोघांचीहि मर्यादा ठरलेली आहे आणि ही मर्यादा नेहमी फिरत असते.

* महावीर

जो समाजास नेत्रानें–मनानें–वचनानें व आचरणानें खुष करतो त्याच्यावरच समाज खूष असतो.

– ज्यांत लोक एक जिनसी नाहींत तो समाज कसला ?

* हेडगेवार

' मी समाजासाठीं आहे ' व्यक्तीमत्त्वाची व कुटुम्बापुरते पाहाण्याची भावना पार नष्ट झाली पाहिजे.

– दुसऱ्याला देणें व दुसऱ्याचें घेणें अशा दोन प्रकारच्या वृत्तीच्या लोकांचा भरणा मानवी समाजांत आहे.

* अनिल

जेथें माणसा काम न मिळे
काम करतांहि पोटापुरतें मिळें न मोल
आहे तो समाज मतलब्यांचा
पर दुष्टांचा नफेबाजांचा !
रक्त शोषक जळवांचाच.

* खांडेकर

अवनत समाजाचें मोठें दुर्दैव म्हणजे त्याची बुद्धि व भावना यांत एक गगनचुम्बी भिंत निर्माण होतें.

* केशवसुत

देव दानवा वरें निर्मिलें,
हे मन लोकां कळवूं द्या ।

★ ★

## १२१ : समता–विषमता

* साने गुरुजी

समानता म्हणजे ज्याच्या विकासाला जें पाहिजे तें देणें.

* भा. रा. तांबे

समुद्रीं चहुंकडे पाणी, पिण्याला थेम्बही नाहीं
जनांच्या कोरड्या गप्पा, असे सारे जगत्बंधू ।।

* रे. टिळक

मी ब्राम्हण वा महार मी, गणीं न कवणालाच कमी !
या सृष्टीतिल दिव्यपण, तेंच तेंच हें मनुजपण
मांगल्यांची ही ठेव, हीस्तव देईल मी जीव

* केशवसुत

लहान मोठे मज न कळे । साधु–अधम हें द्वयहि गळे,
दूर जवळ हा भाव पळे । सर्वच मोठे साधुजवळ,
त्या सकलीं मी भरुनी राहे

* रघुवीर सामन्त

येथं तेथं चहुंकडे......विषमताच नान्दते !
दलित दीन मानवांस हें जिणेंहि बोंचतें ।

★ ★

## १२२ : सद्गुण-दुर्गुण

* हॅम्लेट
दुष्टास शक्ति असते आणि तो मोहक स्वरूप धारण करूं शकतो.

* केशव नाईक
मनुष्यामध्यें दैवी गुणापेक्षां पाशवी आणि राक्षसी गुणच स्वभावतः प्रभावी असतात. क्रौर्य हा तर लाडका गुण आहे.

सद्गुणांचे सर्वस्व चहाते असतात; पण अनुयायी फारच कमी असतात, ही खेदाची गोष्ट आहे.

– आपण मधमाशाप्रमाणें गुणग्राही बनलें पाहिजे.

* पै. महंमद
दुर्जन मण्डळींत बसण्यापेक्षां एकटें बसणें बरें आणि एकटें बसण्यापेक्षां सज्जन मण्डळींत बसणें बरें.

* विचार पोथी
गुण आणि दोष सहकुटुम्ब सहपरिवार येऊन कार्यसिद्धी करीत असतात.

* कार्लाईल
आपला सर्वात मोठा दोष म्हणजे कशाहिविषयीं अवधान न बाळगणें हा होय.

* शेक्सपिअर
दोष नसें आपल्या ग्रहाचा । परि या शरीररूपी गृहाचा ।

– त्याचे सद्गुण हें आपोआप त्याची वकिली करतील आणि विजयाची तुतारी वाजवतील.

* जे. के. बॅंग्ज
सद्गुणाकरितां नेसलेली चिन्धी देखील बादशाही थाटाची बनते.

* सिसरो

सद्गुण आपोआप फलदायी बनतात.

* जॉन फेचर

जन्मामुळें नव्हे तर केवळ सद्गुणामुळेंच आपण थोर बनतो. थोर कृति हीच थोर मनाची साक्षीदार असते.

– ज्याची माझ्या मागे येण्याची इच्छा असेल त्यानें सद्गुणांवर प्रेम करावें, कारण तेच एक स्वतंत्र आहे. व तेच तुम्हांला अधिक वर चढविण्यास शिकवेल.

* थॉमस पेन

भरभराटीसाठीं आपण ज्या ज्या वेळीं विचार करतो त्या त्या वेळीं आपण लक्षांत घ्यावयास हवे कीं सद्गुण हे कांहीं वंशपरंपरानुसार नसतात.

* पोप

सद्गुणांतच सुख आहे.

* टॉलस्टॉय

सत्य कृतीनीच फैलावतां येतें.

– माणसें दोन प्रकारचीं असतात एक आज केलेलीं सत्कृत्यें उद्यां विसरून जाणारीं आणि दुसरी उद्यां कांहीं तरी सत्कृत्यें करूं असें म्हणून काहींच न करणारी.

* लो. टिळक

मनुष्य कितीहि शहाणा असला तरी अधिकाराचे चष्मे त्याच्या डोळयास लावल्यावर पूर्वींचें जग त्याला निराळें दिसू लागतें.

★ ★

## १२३ : साधुपुरुष

– पुरुषांचा परिमळ वाऱ्याच्या उलट बाजूनें वाहात नाहीं. चंदनाचा वाहात नाहीं. तगर किंवा मोगरा याचाहि वाहात नाहीं; परन्तु ते सज्जन आहेत. त्यांचा किर्तीपरिमल वाऱ्याच्या उलट बाजूनेंहि वाहातो. मनुष्याचा चांगुलपणा चारहि दिशांनीं संचार करतो.

* हेरिक

साधुपुरुषाचें अश्रू हे खलपुरुषाच्या संगतीपेक्षांही अधिक श्रेष्ठ होय.

* टेस्टॅमेण्ट

परमेश्वराच्या दृष्टीनें अत्यंत मौल्यवान क्षण म्हणजे साधुपुरुषाचा अन्त होय.

★ ★

## १२४ : साहित्य

* जोसेफ मॅझिनी

वाङमय हें देशोन्नतीचे मुख्य साधन.

– साहित्य सोनियाच्या खाणीं । उधडवी देशियाच्या श्रोणी ।।
विवेक वल्लीचीं लावणी । हो देही सैन्ध ।।

* प्रा. वनहट्टी

वाङमय हें रंजनाचें साधन आहे ही भावना हळूहळू सोडून देऊन तें उन्नतीचें साधन आहे. ही कल्पना दृढ केली पाहिजे.

* विचार पोथी

मराठी साहित्यांचा जन्महि ॐकारांतूनच आहे. ॐकाराच्या साडेतीन मात्रांना अनुलक्षून ज्ञानदेवांचीं साडेतीन चरणीं ओवीं निर्माण झाला आहे.

* विरहतरंग

प्रेमवाङमय हें आबाल–वृद्धांसाठीं नाहीं. तथापि देशाच्या संस्कृतीत त्याला उच्चस्थान असावें; आहे व राहीलहि.

आदर्शभूत वाङमय हें पैलू पाडणाऱ्या हिऱ्याप्रमाणें असते. मूळचा विचार हिऱ्याप्रमाणें मूल्यवान व सतेज असावयास पाहिजे.

उत्कृष्ट आदर्शभूत वाङमयांत भाषेची सफाई, शब्दाची काटकसर अवयवांची प्रमाणबद्धता, नाद, गौरव, अर्थ, सूचकता विचारांची उदात्तता, दृष्टीची व्यापकता आणि शिवाय पृथगात्मता इत्यादि गुण असावयास हवेत.

वाङमय फार निर्माण झालें आहे. चटकदार नांवाखालचे छचोर वाङमय मन उथळ बनवितें.

* डी क्विन्सी

प्रथम ज्ञान साहित्य तयार झालं आणि नंतर बल साहित्य. पहिल्याचे कर्तव्य म्हणजे शिकवणें व दुसऱ्याचें म्हणजे प्रगति करणें.

* तिसरा पोप

श्रेष्ठ साहित्य म्हणजे सम्पूर्णतया अर्थवाही साहित्य.

* ऑस्कर वाईल्ड

साहित्य हें जीवनाची नक्कल नव्हे तर तें भावी दर्शन होय. जीवनाच्या हेतुसाठीं तें जीवनाला अनुरूप बनवतें.

* पोप

लिखाणांतील सुबोधता साधनेंतूनच प्रकट होते. एकाएकीं नव्हे.

जसें नृत्यकला ज्यास अवगत आहे तोंच सफाईच्या हालचाली करूं शकतो.

* प्रायर

लिखाणापासूनि त्यास परावृत्त करा.

* जुवेनल

पुष्कळांना लिखाणाची दुर्दमनीय खाज असतें.

* न. चिं. केळकर

खरी सात्विक समाधी उत्पन्न करूं शकतें तें वाङमय.

★ ★

## १२५ : सुखदुःख

* गट

जगांत सुखी कोण ? तर दुसऱ्याचे गुण मूल्यमापन करतो आणि त्याच्या सुखांत जणू काय तें सुख आपलेंच आहे अशा भावनेनें आनन्द मानतो तोच.

* जी. एम.

जो मनुष्य सौन्दर्यस्थळें आणि जीवनांतील सूक्ष्म भावना शोधण्यासाठीं सवडीची मागणी करतो तोच सुखी होय.

* श्री. अरविन्द

अपरिहार्य अशी गरज आपणास कोणतीच नसेल.

* क्लार्क

राजकारणी दुसऱ्या निवडणुकीची वाट पहातो तर मुत्सद्दी दुसऱ्या पिढीची.

मानवी मनाच्या क्षुद्रपणानेंच जगांतील दुःखें अनंतपटीनें वाढलीं आहेत. मनुष्याच्या स्वार्थी स्वभावानें आणि अनुदार वृत्तीनेंच जगांतल्या विषमतेची भयंकर वाढ केली आहे.

– जगांतली दुःखें जीवनांत नाहींत तर जीवनाकडे संकुचित दृष्टीनें पाहाणाऱ्या मानवी मनांत आहेत.

– रडल्याखेरीज आई देखील आपल्या मुलाला स्तनपान देत नाहीं.

* नेपोलियन

पॅरिसमधील एकच रात्र रणांगणावरील सर्व भयानकतेचा विसर पाडण्यास समर्थ आहे.

* म. गांधी

आपण जें खातो पितो तें केवळ सेवेच्या उद्देशानेंच. हा दृष्टिकोन तुम्हाला नक्की सुखी करील.

* अिमर्सन

सुख हा असा सुगंध आहे कीं, तो दुसऱ्यावर शिंपीत असतां स्वतःवरही शिंपला जातो.

* लॉर्ड आरबरी

संपत्ति आपणांस सुखी करूं शकणार नाही. यशामुळें आपण सुखी होणार नाहीं. मित्र आपणांस सुखी करूं शकणार नाहीं किंवा आरोग्य वा सामर्थ्यहि आपणास सुख देऊं शकणार नाहीं. ही सारी सुखासाठीं आहेत; पण एकामध्येंहि सुख देण्याचें सामर्थ्य नाहीं. कारण सुख हें आपणामध्येंच आहे.

* बायबल

सुखापेक्षां दुःख बरें. कारण दुखामुळें हृदय अधिक चांगलें होतें.

* अॅनॉनिमस

शहाण्यानें केलेल्या चुका ह्या मूर्खानें सांगितलेल्या सत्यापेक्षां जास्त मार्गदर्शी असतात.

* गटे

सर्व सुखी कोण ? जो दुसऱ्याची योग्यता ओळखतो, त्यांच्या आनन्दांत सहभागी होतो आणि जणू तो आनंद आपणासच झाला आहे असें दर्शवितो.

* कन्फ्युशस

जें दूर आहें त्याचा विचार तें दूर आहें म्हणून केला नाहीं तर दु:ख दोनच हातावर आहे.

* जॉनसन

ज्या ठिकाणीं आपण हुडकूं त्या ठिकाणीं हटकून सुख सांपडणार नाहीं. बहुतेक वेळीं अनपेक्षित घटनेमुळेंच आपणांस परमोच्च हर्ष प्राप्त होतो.

* सरव्हटी

दु:खांतील दु:खिताला सुख म्हणजे त्याच्या दु:खांतील सहभागीत्व होय.

* चेस्टरफील्ड

सुख हें आत्यंतिक सापेक्ष आहे. जो सुख देतो त्याला हें माहीत नसतें.

* लॉमार्टन

सुखापेक्षां दु:खामुळेंच दोन हृदयें अधिक जवळ येतात. समदु:ख हें समआनंदापेक्षां अधिक बलशाली असतें.

* जॉनसन

जो पृथ्वीवर भटकतो त्यास मनुष्याची नवी नवीं दु:खें आढळून येतात आणि मित्राला भेटणें त्यानें बदललें तर त्या दु:खानें काळवण्डलेला चेहेरा पहावा लागतो.

* जेनी टेलर

ज्यावेळीं इतर आपल्या आनन्दांत सहभागी आहेत अशाच वेळीं उदात्त माणसें स्वतास सुखी समजतात.

* गॅलोदोरो

सुखी व्हावयाचा उत्तम उपाय म्हणजे आत्मनिग्रह.

* शेले

विश्रांति घ्यावी तर स्वप्नें झोप बिघडवतात. जागृती असावी तर एकादा भटका विचार दिवस बिघडून टाकतो.

* शॉ

आयुष्यांत दोन प्रकारचीं दुःखें आहेत. एक जें हवें तें मिळणें आणि दुसरें जें हवें तें न मिळणें.

* वि. स. खांडेकर

मनुष्य मोठा विचित्र आहे. तो सुख घटघटां पितो. पण दुःख चघळीत बसतो.

* पं. जवाहरलाल नेहरू

आमच्या देशांतील उलथापालथीमुळें माझें जीनन दुःखमय झालें असेल असें मानू नका. अशा उत्पातामुळें जीवनांतील शैथिल्य निघून जाते. ज्यांनीं मला पूर्वीं विरोध केला त्यांच्याविषयींसुद्धां माझ्या मनांत कटु भावना नाहीं. जेव्हां मी गिरीशिखरावर आरूढ झालो. तेव्हांही खालच्या दरीकडे मी लक्ष देत असतो. जेव्हां आम्ही दुःखाच्या दरीत फेकले जातो तेव्हांही आम्ही सूर्य प्रकाशांत चमकणाऱ्या पर्वतमाथ्यावर नजर लावतो.

संस्कृति म्हणजे दुसऱ्याच्या दुःखाची जाणीव व आपल्या मनांवरील ताबा होय.

* वि. दा. सावरकर

सरोवरांत कमळें जन्मतात. तशी स्वातंत्र्यलक्ष्मी ज्यावर विराजमान होते तें कमळ रक्ताच्या सरोवरांत जन्मास येते.

* खलील जिब्रान

इतराच्या आनन्दाशी समरस होऊन सुखपूर्ण गीत गाणारे दुःखी हृदय हें उदात्ततेचें सर्वांत उत्तुंग शिखर आहे.

* फोमा

उद्या आपण काम करणार आहोंत हे ज्यांना ठाऊक नसतं तो दुःखी असतो.

सुख भोगणं म्हणजे माणसाचा स्वभावच नाहीं का ? सुखोपभोग ही माणसाची आवश्यक आणि हक्काची बाब नव्हे काय ?

दुःख हें असं असतं कीं तें बैलाला सुद्धां कोकिळेसारखं गायला लावील.

– दुसऱ्यापेक्षां अधिक सुखी होण्याची इच्छा बाळगली नाहीं तर प्रत्येक माणूस सुखी होऊं शकेल.

* वॉलपोल

जो विवेकी आहे त्याला जीवनांत सुखच दिसेल. अविवेकी व्यक्तीला जीवनांतील दुःखच दिसलें तर त्यांत नवल कोणतें ?

* फ्रॅंकलिन

जें करायला नको तें जर तुम्ही केलंत तर जें तुम्ही सहन करू शकणार नाही तें तुम्हांला सहन करावें लागेल.

* मरकस ऑरेलियस

आपल्या जीवनांतील सुख आपल्या विचारांच्या उच्चतेवर अधिष्ठित असतें. म्हणून सावधान !

* ॲपिफ्टीस

जर कोणी मनुष्य खिन्न राहात असेल, तर तो दोष त्याचा आहे. कारण परमेश्वरानें सर्वांनीं आनन्दी राहावें यासाठींच जन्म दिला आहे.

* म. गान्धी

पावलागणिक स्वतःच्या ज्ञानांत भर टाकीत जाणें यापेक्षां अधिक सुखाचें काय असूं शकणार ?

* खलील जिब्रान

नुसता विवेक ही एक जीवनाला नियंत्रित करणारी शक्ति आहे. आणि नुसतीं वासना ही जीवनाला जाळणारी ज्वाला आहे.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. संदर्भ
अनुक्रमांक ........................ वि: ....................
क्रमांक ........................ नों: दि: ....................

## १२६ : सौन्दर्य

* बाम गार्टन

बुद्धीनें आकलन केलें म्हणजे त्याला सत्य म्हणावें व त्यालाच नैतिक इच्छाशक्तिनें प्राप्त करून घेतलें म्हणजे शिवं म्हणावें.

* हेगेल

सत्य बाल्यरूपानें प्रकट होऊन इंद्रियांना दृग्गोचर झालें म्हणजे त्याला सुन्दर असें म्हणतात.

* रा. आपटे

अितकीं वर्षें विचार व शोध चालला आहे; पण सौन्दर्या–

भिरुचीची योग्य, व सर्वांना समाधानकारक अशी उपपत्ती कोणाहि तत्वज्ञानाला अद्याप लावता आली नाहीं. ही आश्चर्य करण्या–सारखी गोष्ट आहे.

* प्रतिभासाधन

सौन्दर्यांत वस्तुत: नीति–अनीति कांहींच नाहीं.

* फ्रान्सिस थॉम्पसन

अति सुन्दर वस्तूंना मरणहि अति लौकर येतें. मरणोत्तरहि त्यांचा सुगन्ध राहातो; परंतु गुलाबावर ज्यानें प्रेम केलेलें असतें त्याला तो सुगंध दु:खद वाटतो.

* अिमर्सन

शुद्ध स्वरूपांत सौन्दर्याची ज्ञानाची व प्रीतिची अतिशयोक्ति होऊ शकत नाहीं.

सुन्दर चेहेऱ्यापेक्षां सुन्दर आकृति बरी. सुन्दर आकृतिपेक्षां सुन्दर वर्तणूक बरी. कारण पुतळे किंवा चित्रें यापेक्षां त्यात आनंद देण्याचें सामर्थ्य अधिक असतें. तीच सर्वोत्कृष्ठ कला होय.

– बाह्य सौन्दर्यावर लुब्ध होण्यापेक्षां आन्तरिक सौन्दर्य पाहाणें आवश्यक आहे.

* अत्रे

सौन्दर्य हें स्त्रीचें सामर्थ्य आहे तर; सामर्थ्य हें पुरुषाचें सौन्दर्य आहे.

* म. गांधी

उत्तम सौन्दर्य म्हणजे मनाचें पावित्र्य.

खरें सौन्दर्य म्हणजे कामाची योग्य ती स्फूर्ति. ही स्फूर्ति जीवनांत तुरळक असेल तर; ती कलेमध्येहि तुरळकच ठरेल.

* हॅनेन खाफर

ज्यांच्यांत जीवन किंवा मृत्यू यांतील सुप्त सौन्दर्य शोधण्याची पात्रता नाहीं त्यांच्या लेखी मृत्यू म्हणजे मृत्यू व जीवन म्हणजे जीवन एवढेंच रुक्ष गणित असतं. त्यांना स्वतःचं सुखहि कळत नाही वा दुःखहि कळत नाहीं.

* नीति व कलोपासना

मनाला आनन्द देण्याचा कोणत्याही पदार्थाचा गुण म्हणजे सौन्दर्य.

* प्रो. अळतेकर

अनीतिचे संनिधान असलेलें सौदर्न्य, सौदर्न्य नसून सौन्दर्याचा भास असतो. व तेथें खरोखर असुन्दरतेनें कृत्रिम उपायांनीं सौन्दर्याचें सोंग आणलेलें असतें.

* रविन्द्रनाथ टागोर

जें खरोखर मंगलमय तेंच सौन्दर्य.

* कान्ट

सत्य हेंच सौन्दर्य आणि सौन्दर्य हेच सत्य.

* बेकन

सौन्दर्य हे सद्‌गुणांना प्रकाशविते व दुर्गुणांचा नाश करते.

– अन्तीम पूर्णत्वाचे इन्द्रियांनीं ग्रहण केलें म्हणजे त्यास सौन्दर्य म्हणावें.

* म. गांधी

आपल्या चुकीची कबुली ही केर काढणाऱ्या केरसुणीसारखी आहे. तिच्या योगानें आपली मनोभूमिका पूर्वीपेक्षां अधिकच शुद्ध होते.

* लो. टिळक

भक्ति हें ढोंग नसून मन सुधारण्याचा एक मार्ग होय.

* सॉक्रेटिस
जें जें सुन्दर तें तें उपयुक्तहि असावें.

* डायोटिमा
माणसाच्या जन्माच्या वेळीं त्याचें भवितव्य ठरविण्यांत दैवा–प्रमाणेंच त्याचें रूपहि भाग घेतें.

* ॲरिस्टॉटल
खुजीं माणसें प्रमाणबद्ध असतील तर त्यांना सुन्दर म्हणतां यावयाचें नाहीं.

* चार्लस डिकन
आनंदीवृत्ती आणि समाधान ही फार मोठी सौंदर्यवर्धक साधनें आहेत.

* भर्तृहरी
स्त्रियांचें सौन्दर्य काय करीत नाहीं ? तें पुरुषाला मोहित करते, उन्मत्त करते, निर्लज्ज करते, फजित करते, रमवितें आणि खिन्नहि करते.

* माधव जुलियन
सौन्दर्य दर्शनापासून जीवाला विश्रांति आणि मनाचीं उन्नति झालीच पाहिजे.

– सारे प्रमाणांत असावें. प्रमाणांत सौन्दर्य हवें.

* म. गांधी
जेव्हां मनुष्य स्वतःला धूलिकणाहून क्षुद्र मानतो तेव्हां देव त्याला मदत करतो.

* गटे
पाप अितका सुन्दर पोषाख घालून येतें कीं, तें पाप आहे असें माहीत असूनहि आपण त्याला हृदयाशीं कवटाळतों.

* कालिदास

सोन्याचीं सुन्दर कमळें निर्माण करणारे कारागीर पुष्कळ असतात; परन्तु त्यांत जीवंत सुवास उत्पन्न करणारा कारागीर एकच असतो.

★ ★

## १२७ : स्त्री

– ढग चंद्राचें शत्रू आहेत, जाळें माशाचें शत्रू आहे. स्त्रीचे शत्रू तिचें दोन डोळे आहेत. कारण ते तिच्या हृदयांतील गुपित उघडें करतात.

* फडके

स्त्रीचा लौकिक, तिची सुरक्षितता, तिचं सुख म्हणजे एखाद्या सुन्दर कांचेच्या भांड्यासारखं आहे. तें अभंग आहे तोंवर त्याची शोभा मोठी पाहाण्यासारखी ! पण त्याच्यावर खडा मारून ते खळकन फोडणं किती सोपं ! तिला दुराचरणीं ठरवणें अवघड नाही

* वोकील.

मुलीं म्हटल्या म्हणजे कितीहि दगडाच्या हृदयाचा बाप असला तरी विरघळलाच पाहिजे.

* वा. म. जोशी

सामान्यतः स्त्रियांना सुंदर कौटुंबिक संसार पाहिजे असतो. पुरुषांना कौटुंबिक संसारापेक्षां उच्चतर पराक्रम हवा असतो.

* ॲबरोझ बर्स

स्त्रियांच्या हातांत सांपडल्याशिवाय आपणांस त्यांच्या बाहुपाशांत पडतां येईल काय ?

* बर्नस

अॅडॅमला एका स्त्रीनें मूर्खांत काढलं प्रथम. ती वस्तुस्थिति वारंवार घडतें. मनुष्यावर अधिराज्य चालतें स्त्रीचें व स्त्रीवर अधिराज्य असते सैतानाचे.

* बायरन

स्त्रीवर विश्वास ठेवणं हा एक विरोधाभास आहे. त्यापेक्षां असत्यावर विश्वास ठेवलेला काय वाईट ?

* सर्वन्टस

स्त्रीच्या 'होय' व 'नाहीं' यामधून टांचणी देखील जायला अवकाश नसतो.

* गटे

विश्वस्त स्त्रीच आपणांस वर्धिष्णु बनवतें.

* ओ हेन्री

एकटया असतांना आपला वेळ स्त्रिया कशा घालवितात हें कळलें तर पुरुष कधीच लग्न करणार नाहीं.

* कार्लटन

स्त्रीचें प्रेम हें पुरुषाच्या जीवीतास अमृत होय. त्याशिवाय त्यास सौख्य या शब्दाची स्मृतिहि होणार नाही.

* अेडना फेबर

स्त्री ही आकर्षक आणि नैतिक केव्हां असेल ? जर तिचा चेहेरा खळबळजनक असेल तर.

* सिडने हॅरिस

तीच खरी आदर्श गृहिणी कीं जी पतीच्या इच्छेविरुद्ध पतीला एकही गोष्ट करावयाला केव्हां लावावी हे नक्की जाणू शकतें.

* तुल्सा

मनुष्याला त्याच्या जीवनांत दोन स्त्रिया लागतात. त्यांचें सर्व कांही लिहून घ्यावयाला एक चिटणीस आणि सर्व वस्तु सावरायला एक बायको.

* व्हर्जिनिया वूल्फ

निसर्गापेक्षांहि अधिक चांगल्या रीतीनें पुरुषांचे प्रतिबिंब जगाला दाखविणाऱ्या जादूमय आरशाचे काम आजतागायत स्त्रीनें केलें आहे.

– दर्शनानें, श्रवणानें, स्पर्श झाल्यानें किंवा नुसत्या स्मरणानें पुरुषांना आल्हाद उत्पन्न करणारे स्त्रीयांवाचून दुसरें कोणतेंहि रत्न ब्रह्मदेवानें निर्माण केलेलें नाहीं.

* थॅकरे

सद्गुणी स्त्री ही मर्त्य लोकांतील एखाद्या स्वर्गीय पुष्पाप्रमाणें आहे. किती सुरेख ! किति निर्मळ ! किति निष्कलंक !

* सदी

मला स्त्रीच्या भ्रुकुटिभंगाची जितकी भीति वाटतें तितकी दुसऱ्या कशाचीहि वाटत नाहीं.

* शेक्सपिअर

स्त्रीच्या नैसर्गिक सद्गुणांना शिक्षण प्रकाशित करतें.

* रूसो

आलिंगन आणि अश्रू यांच्या योगानें स्त्री पुरुषांस अंकित करून घेतें.

* ल्यूथर

स्त्रिया पुरुषापेक्षां जास्त सदिच्छेनें धर्म पाळतात.

* बेकन

पतिव्रता स्त्री अभिमानी परन्तु सरळमार्गी असते.

* हण्ट
सद्गुणी स्त्री ही जगांतील अत्यन्त सुन्दर वस्तु होय.

* जेरेमी टेलर
सद्‌गुणी स्त्री प्राप्त होणें हा अिश्वराचा सर्वोत्कृष्ट वर होय.

* लेमर टाईन
स्त्री हा पुरुषाचा उजवा हात आहे.

* जॉर्ज हर्बर्ट
आदर्श गृहिणी शेंकडों गुरुहूनहि श्रेष्ठ आहे.

* हार्मिस
पतिव्रता स्त्रीमध्येंच ईश्वराचें गुणधर्म परिपूर्ण दिसून येतात.

* गोरठ
' सैतान ' वास करितो स्त्रीयांत व 'काम' वास करतो पुरुषांत.

— जेथें धूर फार झालेला दिसत असेल तेथें नवी नवरी स्वयंपाक करीत असेल.

— नारी निंदा मत करो
नारी नरकी खान
जिनमें ध्रुव, प्रल्हाद हुये
तुलसी सूर सुजान

— अहो, स्त्रियांची प्रवृत्ति । धनिक देखोनि उपजे प्रीति ।
दरिद्री भ्रतार अव्हेरति । हेळूनिया सर्वस्वे ॥

— बायको दुकानांत खरेदी करायला गेली आहे; अशा वेळीं ती लवकर परत येईल या कल्पनेनें मोटारीचें एंजिन तसेंच धडधडत ठेवून तिची वाट पाहाणारा माणूस, हा खरा आशावादी माणूस होय.

* श्री. के. क्षीरसागर

स्त्रियांचें खरें सौन्दर्य ओळखणाऱ्यास स्त्रीयांच्या खोटया सौन्दर्या-पासून उत्पन्न होणारा धोका टळेल. प्रेमळपणा, आत्मविसर्जन व स्वजनसेवेंत आनन्द या तिन्हीत स्त्रीयांचे जे अनिवार रूप सौन्दर्य दिसून येते तें तारुण्य, गौरवर्ण आणि नटणें, मुरडणें यांत कधींच दिसणार नाहीं. पण हें कळण्यास सौन्दर्यदृष्टी लागते. पुरुषांना संयमाची कसरत करण्याकरितां तयार केलेले एक धातु उपकरण एवढींच स्त्रीयाविषयीं कल्पना करणारांना स्त्रीसहवास टाळण्या-पलीकडे कांहींच साधणार नाहीं. आणि तोहि बहुधा जमत नाही. अशी प्रत्यक्ष स्थिति आहे.

* फोमा

स्वतःच्या बायकोवर कलिजाप्रमाणें प्रेम करा. व जांभळीच्या झाडाप्रमाणें तिला गदागदा हालवा.

जो स्त्रीच्या पोटीं आला तो धर्मशील कसा राहील,

पोरी म्हणजे साय. बाया म्हणजे दूध.

पुरुषाच्याशिवाय स्त्रीला मुळीं जीवनच नसतें.

– पुरुष वांकडया मार्गानें जाऊं लागला म्हणजे या मार्गानें जाऊं नका म्हणून सांगणारी स्त्री भेटत नाहीं असे क्वचितच घडते. पण एखादी स्त्री सरळ मार्गानें जर चुकली असली तर तिला नेहमीं वांकडा मार्ग दाखविणारा पुरुषच नेहमीं भेटत असतो.

– जीवनांत स्त्री आल्यास हिरवळ नाहींतर वाळवंटच.

* बोरकर

डोळे तुझे बदामी देती मला सलामी,
त्यानेंच हा असा मी, झालो गडे निकामी
लागे न चित्त धामीं, लागे न चित्त कामीं
मोठे लबाड लुच्चे डोळे तुझे बदामी

आशेसम तूं कन्या सुगुणी
चन्द्रकलेसम प्रेमळ भगिनी
प्रिया उषेसम सुख संजीवनी
गंगेहूनि वत्सल जननी

* नित्शे

पुरुषाची उत्पति ईश्वरापासून झाली आणि बायकांची माकडापासून.

* तामिळ साहित्य

सुगृहिणीला कैदेंत ठेवल्यानें कांहीं तिचें रक्षण होत नसते. तिची मानसिक दृढता हीच तिचें उत्कृष्ठ सरंक्षण करणारी असते.

* अमृत

हृदयीं हलाहल, नयनीं अमृत.

ज्ञानवृक्षाला पाणी घालणारी माळीण म्हणजे स्त्री.

पुरुष परमेश्वराची कीर्ति आहे आणि स्त्री परमेश्वराची मूर्ति आहे.

कितीहि दुर्वर्तनीय पति असो, एक दिवस तो चांगल्या रितीनें वागेल अशी अमर आशा केवळ प्रेमळ स्त्रीच्या हृदयांतच असते.

स्त्रीयांच्या अश्रूंत शक्ति असती तर; अश्रूंच्या दर थेंबापासून एकेक साप जन्मला असता.

विश्व म्हणजे एक कोंदण असून त्यात स्त्री हें अद्वितीय रत्न आहे.

निसर्गानें स्त्री जातीला अनेक शाप दिले आहेत आणि या क्रूर शापाचा विसर पडावा म्हणूनच तिला मातृपदाचा वरहि आहे.

* एक चिनी म्हण

शहाणी स्त्री जें जें काय करतें तें या कानाचं त्या कानाला कळूं देणार नाहीं; पण त्याच बरोबर या कानाची त्या कानाला कळूं नये अशी कोणतीहि गोष्ट ती करणार नाहीं.

– आपण सुन्दर दिसतो हा एकच विचार प्रत्येक स्त्रीला कोण–त्याहि धार्मिक विचारापेक्षां जास्त समाधान देतो.

* अमृत

मानवी जीवनाचा पूर्णांक करणारा छेदक अंश म्हणजेच स्त्री.
बागेंत जसें फूल तसें कुटुंबांत स्त्री.

* मॉम

प्रीतिशिवाय स्त्रिया कांहींच करूं शकत नाहींत.

* महात्मा कीं मोहात्मा

स्त्री ही पुरुषाची शत्रू असून जगाला लागलेला काळिमा आहे. स्त्रीविषयक प्रेम हें सर्व हृदयविदारक दु:खाचें व पापकर्मांचें उगम–स्थान आहे.

अध्यात्मदृष्ट्या स्त्रीची योग्यता पुरुषाहून अधिक श्रेष्ठ आहे.

* हॅमलेट

अनीतिचें दुसरें नाव ‘ स्त्री ’ होय.

* वेद

ज्या कुळांत स्त्रीयांच्या अपमान होतो व त्यांचे अन्त:करण दुख–विले जातें तें कुळ एकाद्यानें विष घालून सर्वांना ठार करावें त्या-प्रमाणें नष्ट होत जातें.

* ॲरिस्टॅटल

स्त्री म्हणजे पुरुषाची कमअस्सल नक्कल.

* मिल्टन

स्त्री ही मनुष्य जातीची सुन्दर विकृती जाहे.

* नित्शे

स्त्री ही परमेश्वराची दुसरी चूक आहे.

* टॉम्स डेक्कर

चांगल्यांत चांगली स्त्री वाईटच असते.

* जॉर्ज विक्निस

स्त्रिया या देवळांत मोठ्या सन्तिणी असता. घराबाहेर देवदूत असतात आणि घरांत म्हणाल तर निव्वळ सैतानच !

तारुण्यापेक्षां वार्धक्यांत पुरुषाला पत्नींची जास्त जरुरी असते.

* पै. महंमद

जग आणि जगांतील सर्व वस्तू मूल्यवान आहेत. परंतु सद्‌गुणी स्त्री ही जगांतील सर्वांत मूल्यवान वस्तु होय.

माझें आपल्या स्त्रियांविषयीं काय कर्तव्य आहे ? तू स्वत: जेवशील तेव्हा तिला जेवायला दे. आणि तू पांघरशील तेव्हां तिला पांघारावला दे. आणि तिच्या तोण्डांत मारूं नको. तिला शिवीगाळी करूं नको. अथवा असंतुष्ठ होवून तिच्याशी फारकत करूं नको.

सद्‌गुणी स्त्री म्हणजे माणसाचा सर्वोत्तम खजिना होय.

* काळी राणी

स्त्रीत्व ही केवढी प्रभावशाली शक्ती आहे ! अभावांतूनच अनंत भाव निर्माण करणारी–अनन्त भावाचे अभावांत रूपांतर करणारी ती दिव्य शक्ति.

* म. गांधी

जगांत अहिंसा वाढविणें असेल तर, ती फक्त स्त्री वर्गाकडूनच संवर्धित होईल. कारण त्यागाची मूर्तिमंत देवता म्हणजे स्त्री आहे.

* ठोकळ

तूं आल्यापून काअिबी न पडलं कमी,<br>
संपलं दळिदर माझं, उतरली घरीं लक्ष्मी

* माडखोलकर

स्त्रीच्या साऱ्या जीवनाचा पाया तिच्या चारित्राची विशुद्धता हा आहे.

* मैथिली शास्त्र

नारी जीवन हाय तुम्हारी यही कहानी ।
आंचलमें है दूध और आंखोंमें पानी ।

* साने गुरुजी

खरी संस्कृति स्त्रियांच्या हातीं असतें.

* माडखोलकर

स्त्रीचं जीवन भावनामय असते. स्त्री व कवि यांची जीवनाकडे पाहाण्याची दृष्टी सारखीच असते !

स्त्री ही पृथ्वीचें प्रतीक असून सृष्टीची धारणा स्त्रीमुळें होते. उलट पुरुष हा अभावात्मक आकाशाप्रमाणें आहे. स्त्री जर उद्यां संसारांतून उठून गेली तर मृत सतीचें प्रेत हातावर घेऊन पिसाटा-प्रमाणें भटकणाऱ्या महादेवाप्रमाणें पुरुषाचें जीवन निष्प्रभ व निरुद्देष होऊन जाईल. पुरुष पराक्रमी असेल पण त्याच्या हृदयांत मनुष्याला उन्नत होणाऱ्या कोमल आणि पवित्र भावना स्त्रीनेंच उत्पन्न केलेल्या आहेत.

– बायकांचं धैर्य हें भिजल्या तुषारासारखें असतें.

* भा. रा. तांबे

रत्ना रत्नपणा, तुझेविण असे निःसत्त्व सारे प्रिये.

* रविंद्रनाथ ठाकूर

हे नारी, तूं अर्धी नारी आहेस आणि अर्धं स्वप्न आहेस.

– बायको ही एकच एक गोष्ट अशी आहे कीं जी नाहीं केली तरी पश्चात्ताप होतो आणि केली तरी पश्चात्ताप होतो.

– बायकांचं ध्येय सुखी संसारापलीकडे जावूंच शकत नाही.

– डोळ्याला रिझविणारी बायको अन्तःकरणाला रिझवतेंच असें नाहीं.

* संसारशकट

स्त्रीयांच्या स्वरूपाच्या खण्डीभर स्तुतीपेक्षां त्यांच्या अंगच्या गुणाच्या ओझरत्या उल्लेखानेंहि त्यांच्या अंगावर मूठभर मांस चढतें.

बायको म्हणजे एक प्रकारची चैनच आहे.

संसारांत पुरुषाला आपल्या कर्तबगारीचा अभिमान वाटत असतो. पण वास्तविक पाहातां स्त्रियांच्या स्वयंभू त्यागवृत्तीवरच संसाराची उभारणीं होते म्हणूनच त्या अधिष्ठात्री देवता !

विलासी स्वभाव हा स्त्रीयांचा स्वभावधर्मच ! आहे त्या परि–स्थितींत सुख कसें भोगावें हें त्यांनाच कळतें.

कोणतीहि कामगिरी अंगिकारल्यावर त्यांत रमून जाण्याची हातोटीं स्त्रीयांनाच !

* चरित्रहीन

स्त्रीचं रूप हा केवढा भ्रम आहे ! त्यांत अस्सल वस्तु कांहीं देखिल नाहीं.

★ ★

## १२८ : संकट

* थत्ते

संकटें पाहून नेपोलियनला अतिशय आनंद होत असे.

* हेडगेवार

संकटांना पाहून जो सर्द होत नाहीं, तोच खरा मर्द.

* माडखोलकर

क्षात्रतेज नष्ट करणारें कोणतें संकट आज ओढवलें असेल तर तो सध्या चाललेला अहिंसा नि अनत्याचार यांचा उदोउदो होय.

* वामन पंडित

आली जरी कष्टदशा अपार।
न टाकिती धैर्य तथापि थोर॥

– कठिण समय येतां कोण कामास येतो ?

– विनाशकाले अर्धं त्यजति पण्डितः।

– विनाशकाले विपरीत बुद्धिः।

* महाभारत

जे क्रोधजित आहेत, जे परदुःख शमक आहेत, जे भूतमात्रावर कधीहि क्रोधयुक्त होत नाहींत ते सर्व संकटापासून मुक्त होत असतात.

जे पुरुषश्रेष्ठ सन्मार्गी असतात, परोत्कर्ष पाहून ज्यांची मनें कधींच खिन्न होत नाहींत, कोणत्याही प्रकारच्या असत्य तथा त्याज्य वर्तनापासून जे सदैव स्वतःला दूर ठेवतात तें सर्व संकटापासून मुक्त ोत असतात.

जे परमेश्वरापुढें सदैव नत मस्तक असतात, सर्व धर्मांचीं तत्त्वें जे मनःपूर्वक श्रवण करतात, जे सश्रद्ध असतात, जे सदैव अविचल

सुशांत, मनस्क असतात ते सर्व संकटापासून मक्त होत असतात.

जे कधींहि आत्मपूजेच्या प्रयत्नांत नसतात, जे सदोदित परपूजेंत तत्पर नि संतुष्ट असतात, श्रेष्ठांना नि गुणपूज्यांना भावीत असतात ते सर्व संकटापासून मुक्त होत असतात.

* व्हालनेर

संकटाची जितकी पत्रास राखावी तितकी अधिकाधिक ती मिजासखोर होत असतात.

लोक थोर पुरुषाच्या मागें जितकें धांवतात तितकें त्या दोघांमधील अन्तर वाढत जातें.

* वालपोल

जीवनांत धोका टाळण्याचा नेहमींच प्रयत्न करूं नका. सतत धोका टाळत रहाणें हें फार धोकेदायक आहे.

— संकटें आलीं तरी जो डगमगत नाहीं, बावचळत नाहीं, बरळत नाहीं, धीर सोडीत नाहीं व मन शांत ठेऊन योग्य तेंच करतो तोच खरा मर्द पुरुष होय.

* खलील जिब्रान

उष:कालाकडे जाण्याचा एकच मार्ग आहे–ती रात्र होय.

* विल्यस मॉरिस

कांहींनीं नांव मिळविले, कीर्ति मिळविली, मान-सन्मान मिळविला ते विद्वान होते, शहाणे नि बलवान होते, कांहींचे नांवगांव माहीत नाहीं, अशिक्षित होते, तें दरिद्री होते. सर्व बाबतीत तें दुर्बल होते परंतु दोन बाबतींत नाहीं. दुःख नि अन्याय यांच्यासमोर ते वांकत नसत. तेथें दुबळेपणा नसे.

★ ★

१२९ : संकल्प–व्रतें

* थत्ते

तत्काल केलेले निश्चय जो अंमलांत आणू शकत नाहीं त्याचे निश्चय कधींच अंमलांत येत नाहींत–येणार नाहींत.

* गीता

अिष्ट गोष्टींचा अभ्यास, अनिष्ट गोष्टींचा त्याग करण्यानेंच मनुष्य करारी बनतो.

* साने गुरुजी

संकल्पाशिवाय सृष्टि नाहीं व मनाशिवाय संकल्प नाही.

* रामदास

मना श्रेष्ठ धारिष्ठ जीवि धरावें ।

* वि. दा. सावरकर

कीं घेतलें व्रत न हें अम्हि अन्धतेनें<br>
लब्ध प्रकाश अितिहास निसर्ग मानें<br>
जें दिव्य दाहक म्हणोनि असावयाचें<br>
बुध्याचि वाण धरिलें करि हें सतीचें

* साने गुरुजी

आपल्या भाग्याचा उदय आपल्या हातात आहे. वाट चालण्याचा निर्धार हवा.

* तुकोबा

निर्धाराचें अवघे गोड । वाटे कोड कौतुक ।

* टरनल मॉनिरॉल

आणखी थोडासा संकल्प, थोडी चिकाटी, थोडा प्रयत्न म्हणजेच यश.

* डॉ. अॅलेसिक्स कॅरेल

माणसांना ताकद जर कशानें मिळत असेल तर ती व्रत पाल-नानेंच मिळतें हें सिद्ध झालें आहे.

* जेन फॉक्स

पाण्याचा एक थेंब फारसा महत्त्वाचा नसेल पण. असल्या थेंबाची सतत धार जर दगडावर पडली तर ती धार त्या दगडाला विंधते.

* जवाहरलाल नेहरू

आम्हीं शांततेचे चहाते आहोंत. आमच्या मैत्रीचा हात नेहमीं पुढें केलेला आहे. तो आपल्या हातीं घेण्याची ज्यांची अिच्छा असेल, त्यांनीं घ्यावा. मात्र आमच्या मैत्रीच्या हातामागें असा देह उंच आहे कीं जो अन्यायापुढें वाकणार नाहीं आणि त्या देहांत असें मन आहे कीं जें तत्त्वनिष्ठेमुळें कोणालाहि शरण जाणार नाही.

* खलिल जिब्रान

मनुष्याची कल्पना आणि त्याचें यश यांच्यामध्यें नेहमींच अन्तर असतें. तें अन्तर फक्त अिच्छेलाच ओलांडतां येतें.

* टेरेन्स मॅक्स्विनी

पृथ्वीवरील साऱ्या साम्राज्यांच्या साऱ्या फौजा जरी आल्या तरी एका सत्याग्रहीचा आत्मा त्यांना चिरडून टाकतां येणार नाहीं आणि तो एक मनुष्य प्रभावी ठरेल.

★ ★

१३० : संगत

– विद्यार्थीदशेंत दुर्गुणांचें पहिलें नाकें म्हणजे कुसंगतीचें होय.

* ना. ह. आपटे

कुसंगतींत राहून सौख्यांत राहाण्यापेक्षा सत्संगतींत राहून नरक–यातना भोगणें बरें.

– संग तसा रंग.

* वामन पंडित

तोयाचें परि नांवही न उरते संतप्त लोहावरी
तें भासे नलिनी दळावरि पहा सन्मौक्तिकाचें परी
ते स्वातीस्तव अब्धि शुक्त पुटकीं मोतीं घडे नेटकें
जाणा उत्तममध्यमाधमदशा संसर्गयोगें टिके

* मोरोपंत

सुसंगति सदा घडो, सुजन वाक्य कानीं पडो ।
कलंक मतीचा झडो, विषय सर्वथा नावडो ।
सदंघ्रि–कमळीं दडो, मुरडिता हटानें अडो ।
वियोग घडतां रडो, मन भवच्चरित्रीं जडो ।

– खळा येतें साधुत्व साधुसंगें ।
दुष्टसंगें साधुत्व ते न भंगें ।
पुष्पसंगे मातीस वास लागे ।
मृतिकेचा पुष्पांत गुण न वागे ।

– गुणवत्संसर्गानें नीचहि पावे सदा महत्त्वास
मालेच्या संबंधे सूत्रालाहि घडे शिरी वास

★ ★

## १३१ : सम्पत्ति

* अेक सुभाषित

हलाहल हें विष नसून लक्ष्मी हे वीष आहे. परंतु लोकाची मात्र कल्पना उलटी असतें. हलाहल पिऊन शंकर सुखानें जागत बसला आहे. पण लक्ष्मीला नुसता स्पर्श केल्यापासून विष्णूच्या डोळ्यावर नेहमीं झापड असते. तो गुंगलेला असतो.

* अमृत

तुमच्यापाशीं दोन पैसे असतील तर एका पैशाची रोटी विकत घ्या आणि एका पैशाची फुलें खरेदी करा. कारण रोटी हे शरीराचें अन्न आहे तर फुलें हें आत्म्याचें अन्न आहे.

— गरीब स्थितींतील समाधान हें खऱ्या श्रीमन्तींचें लक्षण आहे.

* महाभारत

पैसा हें मद्य आहे. सेवा अमृत आहे.

* आचार्य जावडेकर

दुसऱ्यानें श्रम करावेत आणि त्याच्या श्रमावर निर्माण झालेली संपत्ति आपणांस उपभोगितां यावी ही वृत्ती म्हणचेच चोरांची वृत्ति होय.

* व. वा. देशपाण्डे

कृपणाजवळ मी कां राहाते याचे उत्तर लक्ष्मी देते कीं, शूराजवळ मी राहिलें तर त्याच्या मृत्यूनन्तर मला वैधव्य प्राप्त होईल. उदार लोकाच्याजवळ रांहण्याची मला लाज वाटते. विद्वान लोकांच्या जवळ आधींच सरस्वति राहात असल्यानें त्याच्याजवळ जायचे झाल्यास सवत म्हणूनच मला राहावें लागेल. म्हणून मीं शेवटीं कृपणाच्याच आश्रयास आलें.

— पैशाच्या आशेने एखाद्या चोरानें मला सडकून चोप दिला तरी

मला आनन्दच वाटेल. कारण एक इसम कां होईना माझ्यापाशी पैसा आहे म्हणून फसला ही कांहीं कमी समाधानाची गोष्ट नाहीं.

– जो गत गोष्टींचा पश्चात्ताप करीत नाहीं किंवा भविष्यकाळास भीत नाहीं. तोच खरा सुखाचा मालक आणि दुःखाचा राजा होय.

* येशू

पैसा मिळाल्यानें मनान शांति मिळत नाहीं. कारण पैसा नष्ट झाला म्हणजे मन शांत राहणार नाहीं.

* अेकसूत्र

व्यापार उद्योगांत जेवढी लक्ष्मी मिळते त्याच्याच निम्यानें शेतांत मिळतें. शेतीच्या अर्ध्यानें राजसेवेत मिळतें आणि भिक्षा मागण्यानें तर बिलकूल मिळत नाहीं.

* महाभारत

लक्ष्मी सत्पुरुषाच्या घरीं त्याच्या गृहिणीच्या स्वरूपातच नांदत असतें.

* जॉनसन

जितकें जास्त तुम्ही मालकीचे कराल तितकें जास्त तुमच्या इच्छा प्रज्वलित होतील, कांही तरी उणें असल्याचा विचार आपणांस समोर असलेलें सौख्य लुटू देणार नाहीं.

* वीचर

मी श्रीमन्त आहे कीं गरीब असा कोणताच मनुष्य सांगू शकणार नाहीं. कारण हृदयच माणसें श्रीमन्त करतें. त्याच्याजवळ काय आहे यापेक्षां तो कसा आहे यावरच अवलंबून आहे.

★ ★

## १३२ : स्वप्न

* शेक्सपिअर

स्वप्न ही रिकाम्या किंवा आळशीं मेन्दूची मुळं आहेत. हवेपेक्षांहि ती विरळ आणि वाऱ्याहूनहि चंचल असतात.

* विचार पोथी

स्वप्न म्हणजे झोपेंत जागणें आणि अवधान म्हणजे जागृतींत निजणें.

स्वप्न काय दाखवितें ? (१) सृष्टीचें मिथ्यात्व (२) कल्पनेचे कर्तृत्व (३) साधनेचे अपूर्णत्व.

स्वप्नजय दोन प्रकारचा (१) सुस्वप्नता (२) निःस्वप्नता.

निद्रा आणि जागृति ह्या दोहोंचे गुण मिळून समाधि बनतें. दोहोंचे दोष मिळून स्वप्न.

* ज्ञानेश्वर

स्वप्नीचें धन तें धनचि नव्हे
मृग–जळीचें जळ तें जळचि नव्हे
अभ्रीची छाया ते साऊली नव्हे
ऐसें जाणोनिया वेगी धरिजेसु आपुली सोय रे राया

* यीटस

दीन मी, स्वप्नाविना काय माझ्या जवळी ?
परि हीच स्वप्न संपत्ति पसरितो मी तव पायदळीं
तुडव ती, जशी तुडवितेस तूं मम स्वप्न–सृष्टि !

* हेज

स्वप्न म्हणजे माणसामध्यें क्रियाशील शक्ति किती आहे, हें अजमावण्याविषयीं कल्पनेचा विलास होय. तीच शक्ति जर जागृतावस्थेंत प्राप्त झाली तर, प्रत्येक जण डाण्टे व शेक्सपिअर होईल.

* मॅझिनी

मला स्वप्न पडलें आणि आढळलें कीं जीवन हें सौन्दर्य आहे; पण मी उठलों आणि जीवन हें कर्तव्य आहे असं मला आढळून आलें

– स्वप्नांत वेळ घालवा. ध्रुवताऱ्याकडे नेणारा तो मार्ग आहे.

निर्मितीची पहिली पायरी म्हणजे कल्पना. स्वप्न तुम्हांस जें हवें त्याचीं कल्पना करा आणि ज्याची तुम्ही कल्पना केली तसें तुम्ही व्हाल आणि शेवटीं जे हवें तें तुम्हाला मिळेल.

★ ★

## १३३ : स्वातंत्र्य

* लो. टिळक

स्वातंत्र्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे.

* गोळवलकर

स्वातंत्र्य कशानें टिकेल ? आपल्या अन्त:करणांत राष्ट्र कल्पना स्पष्ट असेल, त्यासाठीं जन्मभर कष्ट सोसण्याची तयारी असेल, तेव्हांच तें टिकेल.

स्वातंत्र्य हें शरीरावरील कपड्याप्रमाणें आहे. पण समाजाला तेजस्वी व बलवान न केलें तर तो प्रेताचा शृंगार होईल.

* जोसेफ मॅझिनी

लढाईशिवाय स्वातंत्र्य नाहीं.

प्रथम स्वातंत्र्य संपादन आणि नंतर भूतदया.

* साने गुरुजी

स्वातंत्र्य म्हणजे संयम. स्वैराचार नव्हे.

* श्रीकृष्ण पोवळे

स्वातंत्र्याचें अंगीं । संचारोनि वारे ।
हटविती अन्तीं सर्पांना माघारे ।

* वसंत बापट

दीप पेटवुनि घरादारांचे । पूजन केलें स्वातंत्र्याचें ।
त्या ज्योतिचे तेज मिसळुनि झालें आज विराट ।

* म. गांधी

स्वातंत्र्याची सुरवात तळापासून झाली पाहिजे.

* विचार पोथी

स्वातंत्र्याचा उपासक पोपटाला पिंजऱ्यांत अडकवून ठेवणार नाहीं.

★ ★

## १३४ : स्वार्थ–परमार्थ

* पै. महंमद

उपवास, दानधर्म आणि प्रार्थना ह्याहून अधिक चांगलें कृत्य म्हणजे एकमेकांशीं सख्य करणें आपसांतील भांडण मिटवणें.

* तुकाराम

प्रपंच परमार्थ सम्पादीन दोन्ही । एकहि निदानी नव्हे त्यासी

* विचार पोथी

सत्य, संयय, सेवा ही पारमार्थिक जीवनाची प्रवृत्ति आहे.
स्वार्थ बोलून चालून नागडा आहे.

* ज्ञानेश्वर

कोणाचें हें रूप हा देह कोणाचा ।
आत्माराम साचा सव जाणे ।
मी–तू हा विचार विवेकें शोधाया ।

गोविंदु हा ध्यावा याचि देहीं ।
दर्पणीं पाहतां रूप, न दिसें वो आपुलें ।

– अवघाचि संसार सुखाचा करीन ।
आनन्दे भरीन तिन्ही लोक ।

* स्पिनोझा

गुणाचें मूळ आणि गुणाची उपपत्ती किंवा जीवनांतील व्यवहारी-पणाची वागणूक म्हणजेच आपल्या पोळीवर तूप ओढून घेण्याची प्रवृत्ती होय.

* तुकाराम

माझीया मीपणावर पडो पाषाण । जळो हें भूषण नाम माझें ।

– जें जीवन स्वत.साठीं असतें तें व्यर्थ होय. आणि जें जीवन विश्वासाठीं असतें तेंच कृतार्थ असतें.

– केवळ स्वत:साठीं जगणें. ही आत्महत्त्या आहे.

* खलील जिब्रान

एकदां एक सभ्य लांडगा एका भोळया मेण्ढीला मोठ्या प्रेमळपणें म्हणाला, " बाईसाहेब, माझ्यासारख्या गरीबाच्या घरीं आपण केंव्हांच पायधूळ झाडणार नाहीं काय ? " मेंढीनें उत्तर दिले, लाण्डगोबा, तुमचे घर तुमच्या पोटांत नसते तर तुम्हाला भेटायला येण्यांत मला फार आनन्द वाटला असतां.

* यंग

ज्यावेळीं गुण चमकू शकेनासे होतात तेव्हां सोनें चमकू लागतं.

★ ★

## १३५ : हक्क

* जोसेफ मॅझिनी

आपणास अनेक हक्क नकोत. एकच हक्क पाहिजे व तो हक्क म्हणजे पूर्ण स्वातंत्र्य–दास्यमुक्तता.

* गोळवलकर

राष्ट्राच्या जीवनार्थ जगणें व मरणें हा माझा हक्क आहे ही आत्मीयतेची जाणीव उत्पन्न होऊं द्या.

* जोसेफ मॅझिनी व

पिढ्यान्‌पिढ्या हिसकावून घेतलेलें आमचे नैसर्गिक हक, आमचे मनुष्यत्व आम्हास पाहिजे आहे.

* तुकाराम

कांहीं न मागें कोणाशी । तोचि आवडे देवासी ।

* विचार पोथी

अर्थ म्हणतो 'हक्काचें रक्षण करणें हें कर्तव्य आहे.' धर्म म्हणतो 'कर्तव्य करीत राहाणें हा हक्क आहे.'

★ ★

१३६ : हात

* बायबल

तळहातावर परमेश्वरानें ज्या खुणा केल्या आहेत त्या माणसानें जाणव्यांत म्हणूनच.

* अलेक्झँडर दी ग्रेट

तळहात हा हस्तसामुद्रिकाचा आत्माच होय.

* ॲनॅग्झोरस

मनुष्याचे श्रेष्ठत्व त्याच्याच हातावर आहे.

– कराग्रे वतति लक्ष्मी । करमध्यें सरस्वतिः ।।

* बालझाक

जर हात हेंच माणसाच्या कृतींचे निदर्शक आहे तर मग हातावर माणसाची वैशिष्ठ्ये कां असू नयेत.

* न्यूटन

बोटांची, विशेषतः अंगठ्याची, परीक्षा परमेश्वराचें अस्तित्व सिद्ध करूं शकेल.

* अरिस्टॉटल

प्राण्यापेक्षां मनुष्याचें श्रेष्ठत्व केवळ त्याच्या हातांतच आहे. नि प्राण्यांवर स्वामित्व गाजविण्याची शक्ति त्यांच्या अंगठ्यांत आहे.

* मिल्टन

पिवळे ठिपके नखावर येतील तर मृत्यूसूचक होय.

* जोसेफ रोनॉल्ड

व्यक्तीच्या हातावरील रेषा हेंच त्याचें वैशिष्ठ्य होय.

* मार्टिनी

माणसाचा हात म्हणजे त्याच्या जीवनाचा आराखडाच.

* अरिस्टॉटल

हात हा सर्व इंद्रियांचें इंद्रिय आहे. आपल्या संस्थेंतील गुप्त शक्तीचा जागृत भाग म्हणजे हात.

– ह्याच हातानें जीवनांत रंग भरतां येतो, संगीत उठवतां येते, सौन्दर्य सजवतां येतें. व कर्तृत्व मिळवितां येतें. जीवनाचा कारागार म्हणजे हातच.

* रिटाव्हॅन अलेत

हातावर कांहीं चक्र असतील तर तुम्ही खरेंच भाग्यवान आहांत.

– मनुष्याचे भवितव्य ललाटांवरील रेषेवर अवलंबून नसून डोक्याच्या आंतील मेन्दूवर असतें व हातावरील रेषांवर नसून मनगटाच्या जोरावर असतें.

★ ★

## १३७ : हिम्मत

– हिंमत असेल तर किंमत चढेल.

कुसुमाग्रज

मार्ग आमुचा रोधू शकतो ना धन, ना दारा ।
घराची वा वीतभर कारा ।

अनन्त आमुची ध्येयासक्ति अनन्त अन आशा ।

पडो देहि अिन्द्राचे तें वज्रहि वरोनी
दुर्भगोहि धरणी खालीं टाकण्या गिळोनी
तप्त पातला दावाग्नि असे जाळण्याला
जरि फोडले हें डोळे वाट ती दिसेल
जरि कापली तीं जिव्हा मंत्र ती वदेल

★

## १३८ : हिंसा–अहिंसा

– अहिंसा ही क्षात्रवृत्तीची पराकाष्ठा होय. कारण त्यांत अभय सोळा आणे असतें.

– हांव अथवा कपट ही हिंसेची जननी आहे.

– आळस ही एक प्रकारची हिंसाच आहे.

– ज्याचें जनन आपल्या हाती नाहीं त्याला मारण्याचा आपल्याला काय अधिकार आहे ?

– जगाला जे आवश्यक आहे त्यावर मालकीहक्क सांगणें म्हणजे हिंसाच होय.

* म. गांधी

अहिंसचें व्रत पतकरल्यावर आपण या जगांमधील क्षुद्र वा उणें माणसाजवळ नसलेल्या कोणत्याच गोष्टीची इच्छा करतां कामा नये.

सर्व बलाढय शस्त्रामध्यें मनुष्यनिर्मित असं कुठलं विनाशक शस्त्र असेल तर तें अहिंसाच होय.

तर्क कांहीं जगावर अधिराज्य चालवीत नाहीं. जीवनामध्यें आपणांस पुष्कळ प्रकारची हिंसा आढळतें. आपण कमींतकमी हिंसक असा मार्ग शोधून काढला पाहिजे.

हिंसेचें सौम्य स्वरूप म्हणजे द्वेष. आपण अहिंसक आणि द्वेषी असू शकत नाहीं.

भीति आणि अहिंसा कधींहि एकत्र नान्दू शकणार नाहीं. कारण अहिंसेचें व्रत पाळण्यास मोठें धैर्य लागतें.

अहिंसा दीर्घसूत्री आहे अशी भीति बाळगण्याचें कारण नाहीं. अहिंसा ही त्वरित गुणकारी आहे. कारण तें अचूक लक्ष्यवेधी शस्त्र आहे.

रक्तलांच्छित स्वातंत्र्य हें खरें स्वातंत्र्यच नव्हे.

चांगली गोष्ट करण्यासाठीं देखील आपण दडपण आणतां कामा नये. कारण दडपणामुळें चांगल्या गोष्टींचा हेतु सफळ होणार नाहीं.

* भ. महावीर
अहिंसा हा श्रेष्ठ धर्म आहे.

* कुंदकुंद
आत्मदर्शन, आत्मानुभूति म्हणजे अहिंसा.

* विचार पोथी
संस्कृतांत 'हन्' म्हणजे मारणें आणि 'हन्' म्हणजे गुणणें हिंसेनें पापाचा गुणाकार होतो

सिंह हिंसक असल्यामुळें त्याला मागें वळून पहावें लागते. अहिंसकाला सिंहावलोकनाचें कारण नाहीं.

अहम् । ही आत्म्याची खूण आहे.

'अ–हं' म्हणजे 'न हवें ते' असा मी अर्थ करतो.

* महावीर
दुसऱ्याला गुलाम करणें ही हिंसा होय.

खऱ्या अहिंसेला मृत्यूची भीति नसतें. परंतु मानवतेकडे ती आदर भावानें पाहाते.

* उपनिषद
अहिंसा यज्ञ आहे आणि यज्ञ म्हणजे मोठी शक्ति.

* महावीर
कोणत्याही प्राण्याची हिंसा न करणें म्हणजेच ज्ञानी होणं. अहिंसेचा सिद्धांत सर्व श्रेष्ठ होय. हेंच केवढं विज्ञान होय.

आत्म्यामध्यें क्रोधादि भावना निर्माण न होणें म्हणजेच अहिंसा व त्या भावना निर्माण होणें म्हणजेच हिंसा.

★ ★

## १३९ : ज्ञान

* महावीर

आत्मज्ञान हेंच खरें ज्ञान.

* पै. महंमद

ज्ञानाच्यायोगें मनुष्य हिताच्या शिखराला आणि प्रतिष्ठित वादाला चढतो. अिहलोकी अधिपतीशीं बैठक करतो आणि परलोकी सुखाचीं सीमा गाठतो.

* ज्ञानदेव

ज्ञान जयाची हातीं । तो चि समर्थ मुक्ति ।
तरी विरक्तिवांचून कांहीं । ज्ञानासि तगणें नाहीं ।

* विचार पोथी

अज्ञानांतून ज्ञान उत्पन्न होऊं शकत नाहीं.

कामक्रोधांना आपआपसांत लढवून मारणें ह्यांत ज्ञानाचें कौशल्य आहे.

ज्ञान हें ज्ञानगम्य आहे. म्हणजे अगाऊ ज्ञान असेल तर पुढें ज्ञान मिळावयाचे.

बुद्धिगत ज्ञान म्हणजे 'परोक्ष' ज्ञान. तेंच अिन्द्रियांत उतरलें म्हणजे 'अ–परोक्ष' म्हणावयाचें.

ज्यांनीं ज्ञान आचरणांत आणलें त्यांनीं देव मूर्तिमन्त केला.

ज्याला डोळ्यासमोर देव दिसला तो ज्ञानी झाला.

* ज्ञानदेव

राखोंडी फुकितां, दीप न लागे जियापरी ।
तैसा शब्द–ब्रह्म–कुसरी, ज्ञान न पवे ।

चांगली गोष्ट करण्यासाठीं देखील आपण दडपण आणतां कामा नये. कारण दडपणामुळें चांगल्या गोष्टींचा हेतु सफळ होणार नाहीं.

* भ. महावीर

अहिंसा हा श्रेष्ठ धर्म आहे.

* कुंदकुंद

आत्मदर्शन, आत्मानुभूति म्हणजे अहिंसा.

* विचार पोथी

संस्कृतांत ‘ हन् ’ म्हणजे मारणें आणि ‘ हन् ’ म्हणजे गुणणें हिंसेनें पापाचा गुणाकार होतो

सिंह हिंसक असल्यामुळें त्याला मागें वळून पहावें लागते. अहिंसकाला सिंहावलोकनाचें कारण नाहीं.

अहम् । ही आत्म्याची खूण आहे.

‘ अ–हं ’ म्हणजे ‘ न हवें ते ’ असा मी अर्थ करतो.

* महावीर

दुसऱ्याला गुलाम करणें ही हिंसा होय.

खऱ्या अहिंसेला मृत्यूची भीति नसतें. परंतु मानवतेकडे ती आदर भावानें पाहाते.

* उपनिषद

अहिंसा यज्ञ आहे आणि यज्ञ म्हणजे मोठी शक्ति.

* महावीर

कोणत्याही प्राण्याची हिंसा न करणें म्हणजेच ज्ञानी होणं. अहिंसेचा सिद्धांत सर्व श्रेष्ठ होय. हेंच केवढं विज्ञान होय.

आत्म्यामध्यें क्रोधादि भावना निर्माण न होणें म्हणजेच अहिंसा व त्या भावना निर्माण होणें म्हणजेच हिंसा.

★ ★

## १३९ : ज्ञान

* महावीर

आत्मज्ञान हेंच खरें ज्ञान.

* पै. महंमद

ज्ञानाच्यायोगें मनुष्य हिताच्या शिखराला आणि प्रतिष्ठित वादाला चढतो. अिहलोकी अधिपतींशीं बैठक करतो आणि परलोकीं सुखाचीं सीमा गाठतो.

* ज्ञानदेव

ज्ञान जयाची हातीं। तो चि समर्थ मुक्ति।
तरी विरक्तिवांचून कांहीं। ज्ञानासि तगणें नाहीं।

* विचार पोथी

अज्ञानांतून ज्ञान उत्पन्न होऊं शकत नाहीं.

कामक्रोधांना आपआपसांत लढवून मारणें ह्यांत ज्ञानाचें कौशल्य आहे.

ज्ञान हें ज्ञानगम्य आहे. म्हणजे अगाऊ ज्ञान असेल तर पुढें ज्ञान मिळावयाचें.

बुद्धिगत ज्ञान म्हणजे 'परोक्ष' ज्ञान. तेंच अिन्द्रियांत उतरलें म्हणजे 'अ-परोक्ष' म्हणावयाचें.

ज्यांनीं ज्ञान आचरणांत आणलें त्यांनीं देव मूर्तिमन्त केला.

ज्याला डोळ्यासमोर देव दिसला तो ज्ञानी झाला.

* ज्ञानदेव

राखोंडी फुकितां, दीप न लागे जियापरी।
तैसा शब्द-ब्रह्म-कुसरी, ज्ञान न पवे।

हेचि भक्ति हेंचि ज्ञान । अेक विठ्ठलचि जाण ।
बाप विठ्ठलाची आण । अेक विठ्ठलचि जाण ।

सर्व देहीं भजन हेचि निज ज्ञान । मग मुक्तिपण आपोआप ।
मीपण मावळे सद्‌माव उजळे । सुखाचे सोहळे गुरु-खूण ।

* समर्थ

समस्तामध्यें सार साचार आहे ।
कळेना तरी सर्व शोधूनि पाहे ।

* विनोबा

धुरानें झांकिला अग्नि घुळीनें आरसा जसा
वारेनें वेष्टिला गर्भ, कामानें ज्ञान हें तसें

* माझें रामायण

मनुष्याचें ज्ञान जसजसें वाढेल, तसतसें खोटचा कल्पनेला चिकटून राहाण्याचा त्याचा अभिमान गळून पडेल. त्यावेळीं जगावर तात्विकदृष्टचा एकाच खऱ्या धर्माचें साम्राज्य नान्दू शकेल.

* साने गुरुजी

ज्ञानमय नात्याला, चिन्मय नात्याला दिक्कालाचाही प्रतिबन्ध होत नसतो.

मन आणि बुद्धि यांची परिपूर्ण वाढ झाली कीं ज्ञान जन्मते.

– नहि ज्ञानेन सदृशं पवित्रमिह विद्यते ।

– जें का ज्ञानें लाधलें सद्‌विचारा । संपत्तीचा त्यापुढें काय तोरा.

* वामन पंडित

विद्या पूज्य नृपास हा नर पशू ती वेगळा तत्वता
विद्यासमन्वितहि पुष्ट परि त्यजावा
त्याशीं कुठे न सहवास कधीं करावा
ज्याच्या असें विमलही जणि उत्तमांगी
तो सर्प काय न डसें खळ अन्तरंगी ?

* विनोवा

शिष्याच्या ज्ञानावर सही करणें अेवढेच तुमचें काम. बाकी शिष्य स्वावलम्बी आहे.

– जगांतील सर्वांत मागासलेला प्रदेश तुमच्या टोपीखालीच नाहीं ना, याविषयीं नेहमीं सावध रहा.

* फोमा

शिव्या द्यायच्या झाल्या तर सरळ तोण्डावर द्या.

शहाणपणाशिवाय सत्ता म्हणजे वाईट खरीच, पण सत्तेशिवाय शहाणपण सुद्धां चांगलें नव्हे.

* पै. महंमद

हुतात्म्याच्या रक्तापेक्षांही नवीन ज्ञान देणारी शाअीची अेक ओळ महत्त्वाची आहे.

* साने गुरुजी

ज्ञान म्हणजे ध्येयासाठीं शून्य होणें. ज्ञान म्हणजे चर्चा नव्हे वाद नव्हे, देह कुरवाळणें म्हणजे ज्ञान नव्हे ध्येयासाठी देह हंसून फेकणें म्हणजे ज्ञान.

* गो. ग. आगरकर

अज्ञान हा सर्व अधोगतीचा पाया आहे.

* डॉ. राजेन्द्र प्रसाद

छापलेलीं पुस्तके वाचण्यांत खरें शिक्षण मिळत नाहीं. खरें शिक्षण अनुभवाचें पुस्तक वाचण्यानेंच.

* वि. दा. सावरकर

भराभर वाचून सांठत जाणारें ज्ञान फलहीन वृक्षाप्रमाणें होय.

* स्वामी रामतीर्थ

जे वर्तमानपत्र वाचीत नाहींत ते धन्य होत.

* नीति आणि कलोपासना

अज्ञानावर आधारभूत असलेला कोणताही आनन्द शुद्ध वा नित्य असू शकत नाहीं.

* समर्थ

म्हणुनि जितुका भोळा भाव । तितुका अज्ञानाचा स्वभाव ।
अज्ञानें तरी देवाधिदेव । पावेल कैचा ।

* लो. टिळक

ज्ञानासारखी पवित्र वस्तु जगांत दुसरी नाहीं; पण स्वार्थासाठीं किंवा पोटासाठीं ज्ञानाच्या पुंजीचा विक्रय करण्यास जेव्हां एखादा मनुष्य तयार होतो तेव्हां त्याच्या ज्ञानास शुद्ध व पवित्र ज्ञानाची किंमत देणें म्हणजे हिमालयांतून बाहेर पडणाऱ्या गंगोदकाची गटारींतील पाण्याशी तुलना करणें होय.

* कार्लाअिल

ज्ञान म्हणजे तरी काय ? अितिहासाचे आणि अनुभवाचे काढलेलें सारच !

शहाणपणाचें भांडवल उपयोगी पडतें सगळ्यालाच; पण पुरेसें नसतें कशालाच.

धूर्ततेनें जीवनाला सुरक्षितता लाभलीं तरी सुख लाभतेंच असें नाहीं.

* डिझरेली

जें झालं आहे त्याविषयीं माणसाचें ज्ञान जेवढें अधिक तेवढें जें करायचं आहे. त्याविषयीं त्याची ताकद राहील.

* नित्से

स्वत:स ज्ञात गोष्टीं वाचून कुठलाच मनुष्य कशांतून ( पुस्तकांतून देखील ) जास्त शिकू शकत नाहीं. कारण अनुभवानें पाठ फिरवल्यावर त्याच्या कानांस कांहींच ऐकू येत नसतें.

* अमिॉन्स

ज्याला एकच विषय चांगला समजतो तो विद्वान व ज्याला दोन विषय समजतात तो तर फारच विद्वान.

* रूसो

उत्तम मेन्दू म्हणजे ज्यावर मानव जातीचे ज्ञान कोरलें गेलें आहे असा शिळालेखच.

* गटे

स्वत: संपादन केलेलें ज्ञान, विचारानें नव्हे तर आचारानें सर्वात उत्तम असतें.

* बेकन

अज्ञान हेंच माणसाच्या संशयाचें कारण आहे.

* लिबनिझ

जें ज्ञान आपण मिळविलें आहे ते अव्यवस्थित दुकानाप्रमाणें असू नये, आपणाजवळ काय आहे हें तर आपणांस समजलेंच पाहिजे; त्याचा उपयोगहि गरजेच्या वेळीं करता यावयास हवा.

शहाणी माणसें घड्याळ किंवा ज्ञान यांच्या शोभेसाठीं उपयोग करीत नाहींत.

— काय आहे आणि काय असावें या दोहोंतला फरक जाणणारा प्राणी म्हणजेच मनुष्य.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थापना
अनुक्रम 22109 दि: निवांत
क्रमांक 9998 नों: दि: 22/9/58

# सुरस प्रकाशनें

| | रु. |
|---|---|
| छत्रसाल–वालचंद शहा, ३ री आवृत्ती ... ... | ३ |
| भिरभिरे–गंगाधर गाडगीळ ... ... | ३ |
| तूं भेटायला नको होतास–डॉ. कु. सरोजिनी बाबर ... | ३ |
| मायेचा पाझर–शांता शेळके ... ... | ३॥ |
| सर्व हक्क स्वाधीन–वोकील ... ... | ४ |
| भूकबळी–सुरेश शर्मा ... ... | २ |
| पूर्व आणि पश्चिम–शांतिलाल भंडारी ... ... | ४॥ |
| अळूमिनार–पद्माकर डावरे ... ... | ३ |
| जीवननृत्य–मिनाक्षी साने ... ... | ३॥ |
| बजाजी निंबाळकर–वालचंद शहा ... ... | ४ |
| नौकाडुबी–टागोर, २ री आवृत्ती ... ... | ५ |
| गोषांतील सुंदर स्त्रिया–कोठारी, ३ री आवृत्ति... ... | ५ |
| जागरण–अरविंद गोखले ... ... | ३ |
| पाटलाची लेक–चौगुले ... ... | ३ |
| ओझरती नजर–नाईक के. मा.; २ री आवृत्ति ... | ३ |
| मंदिरा–मस्तानी–भांगरे, २ री आवृत्ति ... ... | २॥ |
| सैन्य चालले पुढें–वोकील ... ... | ३ |
| कावळा व ढापी–न. चिं. केळकर ... ... | ४ |
| क्रांतीवीर रासबिहारी बसू–बाळशास्त्री हरदास ... | १॥ |
| तिसऱ्यांदा चिमणराव–चिं. वि. जोशी ... ... | ३ |
| भावकला–लं. रा. पटवर्धन ... ... | ६ |
| हिरवा चुडा–डॉ. कु. सरोजिनी बाबर ... ... | २ |
| कुमार अशोक–लिमये ... ... | ५ |
| जगाचा बाजार–भाग १ ते ३, प्रत्येकीं ... ... | ५ |
| सोनेरी खंजीर–ग. वि. कुलकर्णी, ३ री आवृत्ति ... | २॥ |
| धरणीकंप–वि. वा. हडप ... ... | ४ |
| अजिता–डॉ. कु. सरोजिनी बाबर ... ... | ३ |

| | | |
|---|---|---|
| हिंदीं–मराठी कोश–संपादक–प्रि. सुमेरजी | ... ... | ३;५ |
| सत्यमेव जयते | ... ... | ३ |
| ऐक माणसा तुझी कहाणी–प्रा. आठवले | ... ... | १॥। |
| अर्धपुतळा ,, | ... ... | १॥ |
| स्त्रियश्चरित्रम् ,, | ... ... | ३ |
| हा व्यवहार आहे ... ,, | ... ... | २ |
| पांढरा बाजार ,, | ... ... | १॥। |
| उगवते अंकुर–वालचंद शहा | ... ... | ६ |
| रावबाजी ,, | ... ... | ६ |

## पॉकेट प्रकाशनें

रु. १–१४–० प्रत्येकीं

| | |
|---|---|
| परिवर्तन (विकी बाम)– ... | प्रा. वुद्धिसागर |
| संघर्ष ... | शांसिलाल भंडारी |
| जटाशंकर–२ री आवृत्ति ... | द. भि. रणदिवे |
| चंद्रकांता–२ री आवृत्ति ... | ,, |
| गोरा–(गुरुदेव टागोर) २ री आवृत्ति ... | प्रा. वुद्धिसागर |
| विश्वामित्र ... | वालचंद शहा |
| संसार–प्रबोधकुमार संन्याल ... | शं. बा. शास्त्री |
| प्रवाह ... | प्रा. मा. का. देशपांडे |
| क्षिप्रा ... | शरश्चंद्र मुक्तिवोध |
| पतिपत्नी–(गुरुदेव टागोर) ३ री आ. ... | वा. रा. कोठारी |
| कमळाचं जाळं ३ री आ. ... | डॉ.कु.सरोजिनी वावर |
| विजय कमान ... | स. शं. देसाई |

क्र. क्र. ९·७६१
शाखा

| | |
|---|---|
| आशेची पहांट | द. का. हसमनीस |
| एरिक | अंबादास देवळे |
| मनीषा | सौ. कुमुदिनी रांगणेकर |
| सौभाग्य | मा. वि. आपटे |
| प्रतिभा | द. का. हसमनीस |
| मधुर मीलन | सौ. प्रभावती केसकर |
| शनिवारवाडा | वालचंद शहा |
| दिवास्वप्न | सुरेश शर्मा |
| हृद्‌गंध | पं. सुमतीबाई शहा |
| देवबाप्पा | सौ. नलिनी शहा |
| तुमचा आमचा संसार | वि. वि. बोकील |
| वहिनी | श्रीनिवास कोचकर |
| मातृत्व | प्रा. बुद्धिसागर |
| जातकुळी | सौ. नलिनी शहा |
| घरकुल (इमिली ब्रॉंटि) | प्रा. निरंतर |
| काजळीरात्र | ना. रा. शेंडे |
| सारंच जगावेगळं | जिआँ पॉल सार्त्र |
| आई | मॅक्झिम गॉर्की |
| कुळाईची आन | सौ. नलिनी शहा |
| मी | फ्रॉंसोआ मॉरिआक |
| ज्ञानगंगा | के. मा. नाईक |
| भाव पल्लवी | पं. सुमतिबाई शहा |

★ ★

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम 22209 वि. निर्णय
क्रमांक 9998 नों. दि. 22/9/58

# सु र स सा क्ष र मा ला

प्रत्येकीं ५० नये पैसे

- ★ हर्षचरित्र
- ★ कादंबरी
- ★ मुद्राराक्षस
- ★ रघुवंश

★ अमरकोश पॉकेट साइस

हिंदी–मराठी–हिंदी रु. ४

„ क्राऊनसाइस रु. ७

कापडी बार्यांडिग

॥ श्री ॥

# दि बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लिमिटेड,

## पुणें २

शुभ्र व दाणेदार साखरेचे कारखानदार

मध्यम वर्गाच्या भांडवलाचा व

मालकीचा एकमेव

★ म्हणजेच ★

## —: सिंडिकेटचा साखर कारखाना :—

## मुदतीच्या ठेवी स्वीकारल्या जातात.

★

व्याजाचा दर व इतर माहितीसंबंधीं

पत्रव्यवहार करावा.

★

१८० सदाशिव पेठ,
लक्ष्मी पथ,
पुणें २

दि. ब. नीळकंठ चिंतामण लिमये
C. B. E., B. A., LLB.
अध्यक्ष.

# दि बँक ऑफ महाराष्ट्र लि.

शेडयूल्ड बँक : मुख्य कचेरी–पुणें २.

भांडवल

वसूल भांडवल (भागापोटी रु. २०,५०,००० चे भरलेल्या आगाऊ रकमांसह) वर

रिझर्व्हं व इतर फंड रु. १०,००,०००

एकूण खेळते भांडवल रु. ८,००,००,००० चे वर

सेव्हिंग्ज, स्पेशल सेव्हिंग्ज व मुदत ठेवी यावर वाढविलेल्या व्याजाच्या दराचा फायदा घ्या.

**स्पेशल सेव्हिंग्ज–द. द. अडीज टक्के**

**शाखा :**

अहमदनगर, अकोला, अमरावती, औरंगाबाद, बेळगांव, भिवंडी, मुंबई (फोर्ट, गिरगांव, दादर व जव्हेरी बाजार), चाळिसगांव, धुळें, हरिहर, हुबळी, द. हैद्राबाद, जळगांव, जालना, कल्याण, किर्लोस्करवाडी, कोल्हापूर, कोपरगांव नागपूर, नांदेड, नाशिक, पनवेल, पुणें (भवानी पेठ, डेक्कन जिमखाना व खडकी), रत्नागिरी, सांगली, सोलापूर (फलटण गल्ली व मुरारजी पेठ) श्रीरामपूर व ठाणें.

★ बँकेच्या सोलापूर येथील मोरारजी पेठ शाखेंतील कामाचे तास पुढीलप्रमाणें आहेत :

**सोमवार ते शुक्रवार : स. ९ ते ११ दुपारीं ४ ते ६**

**शनिवार : सकाळीं ९ ते ११**

★ बँकेच्या सोलापूर येथील फलटण गल्ली शाखेंत सेफ डिपॉझिट व्हॉल्टस्‌ची व्यवस्था आहे. तिचा जनतेनें फायदा घ्यावा.

**चिं. वि. जोग,** मॅनेजर.

REFBK-0009761